सावंतवाडी संस्थान

य, शासकीय, आर्थिक व सामाजिक अभ्यास)

(१६७५ - १८३८)

प्रबंध

एच्. डी. पदवीसाठी पुणे विद्यापीठास सादर

प्रा. बाबुराव एफ. पवार
एम. ए

इतिहास विभाग प्रमुख,
कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय,
राहुरी, जि. अहमदनगर

मार्गदर्शक

डॉ. के. एन. चिटणीस
एम. ए पी. एच. डी.

इतिहास विभाग

पुणे विद्यापीठ

पुणे ७

संक्षेप

कोइसा, – कोकणच्या इतिहासाची साधने.

मइसा – मराठ्यांच्या इतिहासाची साधने

क.छ.आणि पो. – करवीर छत्रपती आणि पोर्तुगीज.

क.छ.घ्र.इ.सा.–करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने.

संका.पं.स–संभाजी कालीन पत्रसार संग्रह.

ऐले.संग्रह ऐतिहासीक लेखसंग्रह.

सां.सं.इ. सावंतवाडी संस्थानचा इतिहास.

पेद – पेशवे दप्तर

निद. निवडी दप्तर

को.पो.स, कोल्हापूर पोर्तुगीज संबंध.

सासंइसा – सावंतवाडी संस्थानच्या इतिहासाची साधने.

म.शि. मठगांवच्या शिलालेख.

शिचसा, शिवचरित्र साहित्य.

म.इसा.महाराष्ट्राच्या इतिहासाची साधने.

पभा.भा. पार्चीयन भाषेतील भाषांतर.

म.स्वा.मु. मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम.

को.प्रा.अ.इ. कोल्हापूर प्रांताचा अर्वाचिन इतिहास.

ऐ.सं.साहित्य – ऐतिहासीक संकीर्ण साहित्य.

म.इ.स. – मराठे इंग्रज संबंध.

पोमस पोर्तुगीज मराठे संबंध.

करि करवीर रियासत

क.स.कै. करवीर सरदारांच्या कैफियती

M.R. Moncoos do reino

Tratudos – Tretados Concertos de Pazes, Tomo.

R.V., Livro dos reis Vizinhos

MOSS – Memoir on Sawantwadi State

R & S. Ratnagiri and Sawantwadi Gazetteer.

अनुक्रमणिका

प्रकरण १ ले

प्रास्ताविक

महाराष्ट्रातील अनेक संस्थानांचा राजकीय इतिहास लिहीला गेला. परंतु सावंतवाडी संस्थानचा मात्र राजकीय इतिहासच न लिहिता शासकिय आर्थिक, सामाजीक, धार्मिक इतिहास लिहिणे आवश्यक वाटल्यामुळे "सावंतवाडी संस्थान" हा विषय प्रबंधासाठी निवडुन प्रस्तुत प्रबंधात त्यावर सर्वकष लिखाण करण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. मोमया(गोवा) यांनी "सावंत भोसले व पोर्तुगीज" या विषयावर प्रबंध लिहिलेला असुन त्यात फक्त राजकीय स्वरूपाच्या माहितीचे वर्णन केलेले आहे. परंतु इतिहास म्हणजे फक्त राजकीय इतिहासच नव्हे तर सामान्य माणसाचा इतिहासही त्यात आला पाहिजे. ही इतिहासाची नवीन दिशा आहे. हे सुत्र समोर ठेवल्यामुळेच प्रस्तुत प्रबंधात सावंतवाडी संस्थानच्या वेगवेगळ्या विभागांवर लिहावे लागले.

सावंतवाडी राज्याची स्थापना इ. स. १६२७ मध्ये खेमसावंत पहिले यांनी केली. त्यांच्यानंतर लखमसावंत यांनी शिवाजी महाराजांना सतत विरोध केला. पुढे खेमसावंत दुसरे यांच्या कारकीर्दीत सावंतवाडी राज्याचे स्वतंत्र अस्तित्त्व निर्माण झाले. त्यामुळेच खेमसावंत दुसरे यांची कारकीर्द सावंतवाडी संस्थानच्या इतिहासात महत्वाची मानली जाते. त्यांच्यानंतर सावंतवाडी राज्यावर आलेल्या राज्यकर्त्यांचा विचार करता जयराम सावंत व रामचंद्र सावंत, तिसरे खेमसावंत, आणि राणी दुर्गाबाई हे राज्यकर्ते धडाडीचे, कार्यक्षम, आणि महत्त्वाकांक्षी होते. परंतु तरी सुध्दा सावंतवाडीकरांनी चोहोबाजूंनी शत्रू निर्माण झाल्यामुळे त्यांना फक्त राज्याच्या संरक्षणातच जास्त वेळ खर्च करावा लागला. शेवटी इतर संस्थानांप्रमाणेच पोर्तुगीजांना मागे हटवून इंग्रजांनी वाडी संस्थानवर आपले पूर्णपणे नियंत्रण प्रस्थापित करून सावंतवाडी संस्थान इंग्रज साम्राज्यात विलीन केले व सावंतवाडीकरांची स्वतंत्र सत्ता संपुष्टात आणली.

थोडक्यांत म्हणजे सावंतवाडीकरांचे राज्य स्वतंत्र झाल्यापासून तर सावंतवाडी संस्थानवर इंग्रजांचे वर्चस्व निर्माण होईपर्यन्तच्या काळातील सावंतवाडी संस्थानच्या इतिहासाचा सर्वंकश विचार प्रस्तुत प्रबंधात केला आहे.

सावंतवाडी राज्याच्या सिमा :-

खेमसावंत तिसरे यांनी आपल्या कारकिर्दीत सतत संघर्ष करून आपल्या राज्याच्या सिमा वाढविल्या होत्या. सावंतवाडी राज्याची उ-तर सिमा कालीनदी, मालवण (झालशी प्रांत) पर्यन्त होती. दक्षिणेस तेरेखोल, डिचोली पेडणेपर्यन्त होती. आणि पूर्वेला बेळगांव आणि घाटापर्यन्त तर पश्चिमेस वेंगुर्ल्यापर्यन्त म्हणजे अरबी समुद्राला भिडलेले राज्य होते. करवीरकर, पोर्तुगीज, इंग्रज यांनी वाडीच्या राज्यातील प्रदेश वेळोवेळी घेऊन वाडीच्या राज्याच्या सिमा पुन्हा बदलत गेल्या.

सावंतवाडी राज्याची भौगोलिक परिस्थिती :-

इतिहासात संशोधन करून खरा इतिहास जाणून घ्यावयाचा असेल तर भौगोलिक परिस्थिती पहाणे आवश्यक आहे. भूगोलाची मदत घेऊनच इतिहासाचे संशोधन करावे लागते. भूगोलाची मदत न घेता केलेले ऐतिहासिक संशोधन हे एकांगी संशोधन ठरते. संशोधनाच्या दृष्टीने सर्वंकश विचार करण्यासाठी भूगोलाची मदत घ्यावी लागते. भौगोलिक परिस्थितीच्या अभ्यासामुळे राज्यातील व्यापार, उद्योग, रस्ते, नद्या, या सर्वांची जाणीव होते.

सावंतवाडी राज्य भौगोलिक दृष्टया संपन्न असुन निसर्गतःच राज्याचे संरक्षण करणे सोपे आहे. सावंतवाडीच्या दक्षिणेस गोव्याचा निसर्गसुंदर प्रांत सुरू होतो. आणि पश्चिमेला अरबी समुद्र आहे. सावंतवाडीचे राज्य हे ७३^{0} व ७५^{0} पूर्व रेखांश आणि १५^{0} व १७^{0} उ-तर अक्षांशात पसरलेले होते. राज्याची दक्षिणो-तर लांबी ५० मैल असून पूर्वपश्चिम रुंदी ३० मैल आहे. सावंतवाडी राज्याचे एकूण क्षेत्रफळ १२०० मैल (Squre mile) असून सावंतवाडी राज्य हा दक्षिण कोकणाचा एक भाग आहे.

हवामान व पाऊस :-

राज्यातील हवामानाचा विचार करता काही भागात हिवाळा कडक व उन्हाळाही कडक म्हणजे विषम हवामान, तर काही भागात उन्हाळाही कडक नाही व हिवाळ्यात थंडीही बेताचीच म्हणजे समशितोष्ण हवामान असे. राज्यातील सरासरी पर्जन्यमान ११० ते १५० इंच होते. कधी कधी यापेक्षाही पावसाचे प्रमाण जास्त व कधी कमी म्हणजे दुष्काळ पडत होते.

नद्या :-

सावंतवाडी राज्यातील सर्वात महत्वाची नदी म्हणजे कार्ली नदी होय. कार्ली नदी हनुमंत घाटात उगम पावून राज्यातून वाहत जाऊन शेवटी मालवणजवळ अरबी समुद्राला मिळते.

बांदा नदी मनोहरगड किल्ल्यात उगम पावून सोनेली, ओराव्रे, इनसूली, बांदा, सातोंची, कोवटेंच, अरवंदा या खेडयांपासून वाहत जाऊन तेरेखोलच्या दक्षिणेस अरबी समुद्राला मिळते.

तेरेखोलची खाडीही इतर नद्यांप्रमाणेच व्यापारासाठी उपयुक्त आहे.

वरिल नद्यांप्रमाणेच गुडनदी, तुलोरा नदी (Tulwra river), तिलेरी नदी (Tileree) व कुलना नदी (Kulna river) या नद्याही सावंतवाडी राज्यातूनच वाहतात. नद्यांच्या काठावरील जमीन सुपीक आहे.

सावंतवाडी राज्यात कुडाळ, बांदा, डिचोली, येथील महत्वाचे किल्ले व कोट आहेत आणि वेंगुर्ला व रेड्डी हे समुद्रकिना-यावरील अत्यंत महत्वाचे किल्ले आहेत याखेरीज राज्यातील मनोहरगड, भरतगड, नरसिंहगड, सिदगड, हनुमंतगड इ. किल्ले ऐतिहासिकदृष्टया महत्वाचे आहेत.

थोडक्यात म्हणजे राज्याच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता ती पूर्णपणे राज्यातील व्यापार, उद्योग व राज्याच्या संरक्षणाला अनुकूल आहे. सहयाद्री पर्वताच्या रांगा असल्यामुळे राज्याचे संरक्षणाला मदत होते.

साधने :-

प्रस्तुत प्रबंधासाठी ज्या साधनांचा उपयोग केला ती सर्वसाधारणपणे तीन प्रकारची आहेत. अप्रकाशित अस्सल साधने, प्रकाशित अस्सल साधने, दुय्यम साधने.

१) अप्रकाशित अस्सल मूळ साधने :-

कोल्हापूर रेकार्ड ऑफिसमधील "निवडी दप्तर" व चिटणीस दप्तरातील अस्सल मूळ कागदपत्रे सावंत-करवीरकर यांचे संबंध हे प्रकरण लिहिण्यास उपयोगी पडले.

मुंबई येथील दप्तरखान्यात "सिक्रेट अँड पोलीटीकल डिपार्टमेंट डायरीज" हा अस्सल मूळ कागद पत्रांचा संग्रह सावंत-इंग्रज-संबंधाचे वर्णन करण्यास उपयोगी ठरला.

नॅशनल अर्काईव्हज ऑफ इंडिया, दिल्ली येथील फॉरेन डिपार्टमेंट (पोलीटीकल) मधील अस्सल मूळ कागदपत्रांचा सावंतांच्या सैन्यव्यवस्था लिहिण्यासाठी वापर केलेला आहे.

पणजी (गोवा) येथील पुराभिलेखागारातील मराठी व पोर्तुगीज भाषेतील कागदपत्रांचाही प्रबंधासाठी उपयोग झाला.

पेशवा दप्तर पुणे येथील "रत्नागिरी कलेक्टर फाईल्स" मधील २५ रुमाल, प्रत्येक रुमालात ५ ते ६ फाईल्स आहेत. त्यातील अस्सल मूळ कागदपत्रात सावंत-इंग्रज संबंध, प्रशासन, सैन्य व इ. संबंधी माहीती मिळते.

प्रकाशित अस्सल साधने :-

"मेमॉयर ऑन सावंतवाडी स्टेट" हया कोर्टनी व ऑल्डने लिहिलेल्या पुस्तकात सावंतवाडीवर सर्वंकष प्रकाश टाकणारी माहीती मिळते. उदा. सावंत-इंग्रज-यांच्यातील तह, सावंतवाडीतील व्यापार, नाणे, इ. संबंधी माहिती.

"रत्नागिरी ॲण्ड सावंतवाडी गॅझेटीयर १८८०" या कॅम्पबेलने लिहिलेल्या गॅझेटीयरमध्येही सर्वंकष माहिती आहे. एन्थोव्हेनने लिहिलेल्या "रत्नागिरी ॲण्ड सावंतवाडी" गॅझेटीयरमध्येही वाडीच्या राज्याचीच माहिती आढळते. हाडीने लिहीलेल्या "रत्नागिरी व सावंतवाडी" गॅझेटीयरमध्ये देखील वाडीसंबंधीच माहीती मिळते.

आवळसकर व बांबार्डेकर यांनी प्रत्येकी लिहीलेल्या "कोकणच्या इतिहासाची साधने" हे पुस्तकही उपयोगी ठरले.

"सावंतवाडीसंस्थानच्या इतिहासाची साधने" या वर्दे यांनी लिहिलेल्या पुस्तकातही पत्रांचा संग्रह वाडीच्या सर्वंकष इतिहासावर प्रकाश टाकतो. म्हणजे राजकीय, सामाजीक, धार्मीक, आर्थीक इतिहास लिहीण्यास वरिल पुस्तक उपयोगी ठरले.

"करवीरचे छत्रपती आणि पोर्तुगीज" या स.शं.देसाईंच्या पुस्तकातही महत्त्वाची पत्र प्रकाशित केलेली आहे. त्या पत्रांचा उपयोग सावंत-पोर्तुगीज सावंत-करवीर, यांचे संबंधाचे वर्णन लिहीण्यास झाला. त्याचप्रमाणे "कोल्हापूर-पोर्तुगीज संबंध" या शिरवाडकरांच्या पुस्तकातही प्रकाशीत अस्सल कागदपत्रे छापली आहेत. त्यांचाही या प्रबंधासाठी वापर केला.

वालावलकरांचे,"मठगांवचा शिलालेख" हे अत्यंत जुने पुस्तकही प्रबंधाच्या दृष्टिने महत्त्वाचे ठरले.

ग.ह.खरे यांनी पार्शियन भाषेतील सावंतवाडीसंबंधी काही कागदपत्रे प्रसिध्द केलेली आहेत. त्यात मोगलबादशहाने सावंतांना कुडाळची देशमुखी बहाल केल्याचे वर्णन आढळते.

एम.व्ही.गुजरने लिहीलेले, "करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने" खंड १ ते ४, ऐतिहासीक लेखसंग्रह खंड १ ते १५, त्रैमासिक, शिव-चरित्र-साहित्य खंड १३ भाइसंम,पुणे, या पुस्तकांत असलेल्या पत्रांचाही प्रस्तुत प्रबंध लिहिण्यास महत्त्वपूर्ण मदत झाली.

दुय्यमसाधने संदर्भग्रंथसूचीत नमूद केलेले आहेत.

राजकीय विभाग

सावंत भोसले यांचे मूळपुरुष मांगसावंत होते. मांगसावंत उदेपूर येथील प्रसिध्द सिसोदिया घराण्यापैकी असून त्यांचे उपनांव भोसले असे होते. मांगसावंताने सावंतवाडी या विजापूरकरांच्या मुलखातील होडावडे येथे वास्तव्य केले. पुढे त्यांच्या वंशात भामसावंत हा पराक्रमी पुरुष निर्माण झाला. त्यावेळी या प्रांतावर विजयनगरच्या हिंदू राजांचा अंमल होता. भामसावंताने त्यांच्याविरुध्द बंड केले तेव्हा होडावडे येथे उभयंतामध्ये मोठी लढाई झाली. या लढाईत मात्र भामसावंत मारला गेला. त्याच गांवाला पुढे मांगल्याचा मठ नावं पडले, असे मठगांवच्या शिलेलेखावरून दिसून येते. पुढे अदिलशहा व पोर्तुगीज यांच्यात ज्या लढाया झाल्या त्यात मांगसावंतांच्या वंशजांनी विजापूरकरांना चांगली मदत केली. त्यामुळेच केवळ आदिलशहाने खूष होऊन त्यांना सावंतबहाद्दुर हा किताब दिला. परंतु कुडाळ देशस्थप्रभू व सावंतभोसले यांच्यात आपापसात तंटे निर्माण झाले. मांगसावंताने मराठी सत्ता स्थापन करण्याच्या प्रयत्नामुळे विजापूरच्या बादशहाने प्रभुदेसायांना मदत केली, तेव्हा मांगसावंताचा पराभव होऊन तो मारला गेला. विजापूरकरांनी लगेच सावंतभोसल्यांचा मुलूख घेऊन तो प्रभुदेसायास दिला. मांगसावंताच्या सात बायकापैकी सहा सती गेल्या व एक बायको गरोदर होती ती ओटवणे गांवी राहू लागली. मांगसावंतास यावेळी संतती नसल्यामुळे काही वर्ष सावंतभोसले हे नामशेष झाले परंतु अल्पावधीतच मांगसावंताच्या गरोदर पत्नीला मुलगा झाला त्याचे नांव फोंडसावंत असे ठेवले. फोंडसावंताला पुढे मुलगा झाला त्याचे नांव खेमसावंत असे ठेवले. कुडाळ देशस्थप्रभूने खेमसावंतास माणगांव तर्फेचा नाईक नेमले. परंतु खेमसावंत अतिशय शौर्यवान व कर्तृत्ववान असल्याची वार्ता विजापूरच्या बादशहाकडे गेली तेव्हा खेमसावंतास बादशहाने लगेच देशमुखीची सनद दिली. खेमसावंतास ही सनद १६२७ मध्ये मिळाली. खेमसावंताने चौदा वर्षे देशकतीचे काम केले व

शेवटी इ.स.१६४० मध्ये ते निवर्तले . यावेळी विश्राम नारायण शेणवी सबनीस, अनंत शेणवी चिटणीस, बाबाजी पंडित खसनीस असे अधिकारी नेमले होते. खेमसावंताच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र सोमसावंत हे देशमुखीचे काम करू लागले. त्यांनी दीडच वर्षे काम केले. त्यानंतर त्यांचे धाकटे बंधु फोंडसावंत हे गादीवर आले, फोंडसावंत १६५१ मध्ये निर्वतले व त्यांच्या जागेवर त्यांचे धाकटे बंधू लखमसावंत आले. या काळात मात्र विशेष गोष्ट घडून आली नाही. खेमसावंत पहिले हे सावंतवाडी राज्याचे संस्थापक होते[१].

लखमसावंत :-

लखमसावंत मोठे शूर व विलक्षण कारस्थानी होते. त्यांचे पुतणे खेमसावंत देखील शौर्यशाली असून त्यास चांगली मदत करीत असे. दोघांनी एकत्र येऊन कुडाळ देशस्थ प्रभूंची स-ता संपुष्टात आणण्याचा प्रयत्न केला. याचवेळी शिवाजी महाराजांनी कोकण प्रांत विजापूरकरांपासून जिंकून तेथे आपली स-ता स्थापन केली होती. तेव्हा शिवाजी महाराजांपासून कोकणप्रांत सोडवून घेण्यासाठी त्याने विजापूरकरांकडे मदत मागितली. तेव्हा बादशहाने खवासखानाबरोबर दहा हजार फौज देऊन लखमसावंताच्या मदतीला पाठविले. परंतु लखमसावंतासहीत सर्वांचा शिवाजी महाराजांनी निर्णायक पराभव केला. लखमसावंत व खेमसावंत पोर्तुगिजांच्या आश्रयाला जाऊन राहिले. परंतु पोर्तुगिजांचाही शिवाजीने पराभव केल्यामुळे आता शरण जाण्याशिवाय लखम सावंताला दुसरा पर्याय उरला नव्हता. त्यामुळे त्याने आपला कारभारी पितांबर शेणवी यास शिवाजीमहाराजांकडे पाठवून इ.स.१६५९ मध्ये त्यांच्याशी तह केला[२]. त्यानुसार सावंत भोसले यांनी शिवाजी महाराजाचे मांडलिकत्व स्विकारले. सावंतभोसले स्वतंत्र होणार नाही या धोरणाने शिवाजी महाराजांनी त्यांचे हातपाय

कायमचे बांधून टाकण्याची तहात तजवीज केली होती. परंतु हा तह फार काळ टिकला नाही. कारण सावंतांना स्वराज्याची उच्च महत्वाकांक्षा उमण्यासारखी नव्हती. आपण कोणाचे ताबेदार नसावे एवढेच त्यांना कळत होते. परंतु शिवाजीनेही त्यांना एवढया जाचक अटी घातल्या की त्यापेक्षा त्यांना विजापूरकरांचे वर्चस्व बरे वाटू लागले. त्यामुळे अल्पावधीतच लखमसावंत शिवाजीच्या विरुध्द विजापूरकरांना जाऊन मिळाला. त्याने शिवाजी महाराजांची सर्व ठाणे उठवून त्याजागी आपली ठाणी बसविली[3].

शिवाजीची सावंतांवर दुसरी स्वारी १६६० :-

लखमसावंताने शिवाजी महाराजांची ठाणी उठविल्याची बातमी विजापूर सरकारला कळताच बादशहाने खूष होऊन लगेच लखमसावंतास सर्व हक्कांसह मालवण गांव इनाम करुन दिले. त्यामुळे शिवाजी महाराजांना पुन्हा सावंत भोसले नेस्तनाबूत करणे आवश्यक वाटू लागले, तेव्हा १६६० मध्ये शिवाजीच्या सैन्याने तळकोकणात शिरुन कुडाळपर्यन्त मजल मारली. दरम्यान लखमसावंताने बांदा व वेंगुर्ला या भागाचे संरक्षण करण्याची जबाबदारी पत्करली. शिवाजीने कुडाळच्या किल्ला घेतला सावंतभोसले मागे हटले. परंतु त्याने देसायांना जमवून लगेच कुडाळवर रात्रीचा हल्ला केला पण त्याचा उपयोग झाला नाही. परंतु शिवाजीच्या सैन्याजवळील स्फोटक द्रव्य संपल्यामुळे शिवाजीचे सैन्य दुस-या दिवशी सकाळी शत्रूची फळी फोडून निघून गेले. म्हणजेच आता लखमसावंताचा आता विजय झाला. परंतु लखमसावंताने याचवेळी शिवाजीप्रमाणेच विजापूरकरांचेही वर्चस्व झुगारुन दिले होते. त्यामुळे विजापूरकरांचा सरदार रुस्तुमजमा लखमसावंताविरुध्द लढू लागला[4].

लखमसावंताचे पलायन :-

लखमसावंत व आदिलशहाचे सैन्य यात संघर्ष चालू असतांनाच शिवाजीमहाराज मे १६६३ मध्ये सैन्यानिशी कुडाळ येथे आले त्यामुळे शेवटी लखमसावंताला वाडी सोडून पळ काढावा लागला, त्यानुसार लखमसावंत सह्याद्रीच्या पायथ्याशी जंगलात जाऊन राहिला. कारण आदिलशहा व शिवाजी महाराज हे एकाचवेळी दोन शत्रू त्यांच्यापुढे उभे ठाकले होते.

पुढील काळात शिवाजीमहाराजांना कुडाळकडे लक्ष देण्यास फुरसतच मिळाली नाही. त्यामुळे या संधीचा फायदा घेऊन लखमसावंताने कुडाळात पुन्हा उचल खाल्ली. शिवाजीने घेतलेला काही प्रदेश पुन्हा त्याने परत जिंकून घेतला अशारीतीने शेवटपर्यंन्त लखमसावंताने आपल्या ताब्यातील प्रदेश टिकवून धरला.

शिवाजीची माघार :-

सावंतभोसले यांनी शिवाजी महाराजांच्या मुलखास वरीलप्रमाणे उपद्रव चालूच ठेवल्यामुळे शिवाजीने काही फौज कुडाळचा सुभेदार रावजी पंडित यांच्या मदतीस पाठविली. परंतु यावेळी लखमसावंत शिवाजीच्या सैन्याशी एवढ्या शौर्याने लढला की कुडाळातील अडकलेले शिवाजीचे बरेच सैनिक शेवटी लखम सावंताला शरण आले व शिवाजीच्या सैन्याला माघार घ्यावी लागली. अशारीतीने लखमसावंत व विजापूरकर[5] यांनी संयुक्तिकरीत्या शिवाजीचा पराभव केला.

लखमसावंताच्या उपद्रवामुळे शिवाजी गप्प रहाणे शक्य नव्हते. शिवाजी सैन्यानिशी कुडाळप्रांतात शिरुन विजापूरचा खवासखान या सरदाराला पळवून लावले त्याचप्रमाणे सावंतभोसले यांच्या ताब्यातील किल्ले

व ठाणे हस्तगत केले. सावंत मात्र यावेळी गोमंतकरांच्या आश्रयास गेले. शिवाजीने लगेच गोमंतकात शिरून फोंड्यास वेढा दिला. पोर्तुगीज शरण आले. यावेळी सावंतांच्या आश्रय नाहीसा झाल्यामुळे त्यांनी आपला कारभारी पितांबर शेणवीस पुन्हा शिवाजीकडे पाठवून दिलजमाई घडवून आणली आणि शिवाजीचे पुन्हा मांडलीकत्व स्वीकारून देशकतीच्या वतनाची सेवा करण्यास सावंत तयार झाले. अशारीतीने शिवाजीने शेवटी सावंतभोसलेंचा फडशा पाडला. सावंतभोसले नेस्तनाबूत झालेले असतांना देखील ते पुन्हा मूळ वळणावर गेले. शिवाजीची पाठ फिरता क्षणीच सावंत आदिलशहाच्या अंकित गेले. आदिलशहाने देखील लगेच लखमसावंतास बहुमान वस्त्रे पाठविली. पुढे इ.स.१६६५ च्या मार्च महिन्यात जयसिंग शिवाजीवर चालून आला तेव्हापासून पुढे आठ महिने शिवाजीला सावंताकडे लक्ष देण्यास फुरसतच मिळाली नाही. दरम्यानच्या काळात सावंताने शिवाजीने घेतलेल्या मुलखातील काही प्रदेश परत मिळविला. यावेळी जयसिंग व शिवाजी यांची संयुक्त मोहीम आदिलशहावर निघाली होती त्यामुळे सावंत पुन्हा अडचणीत सापडले.

इ.स.१६६६ च्या जानेवारीत शिवाजीने कुडाळच्या हद्दीवरील रांगणा (बद) किल्ला घेतल्यावर तो परत मिळविण्यासाठी सावंत व विजापूरकरांनी शिवाजीशी संघर्ष केला परंतु तो निरुपयोगी ठरला. शिवाजी महाराज व लखम सावंत यांचे इ.स.१६५९ पासून जे युध्द सुरू झाले ते १६६८ मध्ये संपुष्टात आले. कारण शिवाजी कोकणातील सिद्दीशी लढण्यात गुंतल्यामुळे कुडाळचा प्रश्न कायमचाच मागे पडला. लखमसावंत शिवाजीस कधीही अनुकूल झाला नाही. तर तो पूर्णपणे विजापूरांच्या अंकित गेला व त्याने आपले अस्तित्व टिकविले. शेवटी १६७५ मध्ये लखमसावंत मृत्यू पावला. पुढे सावंतभोसले, आदिलशहाचे राज्य १६८६ त बुडाल्यावर स्वतंत्र झाले. शिवाजी व सावंत भोसले एकच धर्माचे होते.

पण शिवाजीच्या ठिकाणी स्वातंत्र्यप्रीती हा गुण होता, तो सावंतात नसल्यामुळे सावंतांकडून स्वराज्य स्थापनेस जी मदत व्हावयास पाहिजे होती, ती न होता नेहमी विरोधच होत राहिला. उलटपक्षी शिवाजीला जर लखमसावंत येऊन मिळाला असता तर दोघांच्या युतीमुळे पोर्तुगिजांचे त्वरीत उच्चाटन झाले असते. आदिलशहाची सत्ताही संपुष्टात आली असती, सिद्दी देखील जंजिऱ्यातून नष्ट झाला असता. परंतु शिवाजीपेक्षा आपले वेगळे अस्तित्व रहावे व आपले राज्यही स्वतंत्र व्हावे या सावंत भोसलेंच्या कल्पनेमुळे शिवाजी व सावंत हे एकत्र येऊ शकले नाही. त्याचा दुष्परिणाम परकीय सत्ता हिंदुस्थानात भक्कम पायावर उभ्या रहाण्यावर झाला. त्याचप्रमाणे आदिलशहा, मोगली सत्ताही वाढण्यावर झाला आणि स्वराज्याची वाढ व्हायची ती खुंटली. लखमसावंताच्या मनात सुरवातीपासूनच आपले स्वतंत्र अस्तित्व रहावे असे वाटत असल्यामुळे[६] सावंत व शिवाजी यांच्यात तंटे होत राहिले.

दुसरे खेमसावंत (१६७५-१७०९):-

लखम सावंताच्या मृत्यूनंतर त्यांचे पुतणे दुसरे खेमसावंत सत्तेवर आले. त्यानी लहान असतांना चुलत्याबरोबर मोठमोठ्या बिकट प्रसंगात आपले शौर्य प्रकट केले होते. खेमसावंत मराठ्यांना जाऊन मिळू नये म्हणून त्यास विजापूरकरांनी तसे मार्गदर्शनही केले. परंतु याचवेळी दिल्लीचा मोगल बादशहा व शिवाजी महाराज यांनी विजापूरच्या आदिलशाहीचा शेवट करण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. शेवटी मोगलांनी आदिलशाहीची वाट लाविली आणि खेमसावंताने मात्र दरम्यान दिल्लीच्या बादशहाकडे संधान साधण्याचा यशस्वी प्रयत्न करून कुडाळ परगण्याची देशमुखी आपल्याकडेच चालण्यासाठी त्यांकडून इ.स. १६८९ त फरमान मिळविले.

फोंडसावंताने आपल्या राज्यात बरेच नवीन किल्ले बांधले. उदा. फुकेरी येथे हनुमंतगड, गेळे येथे नारायणगड, आंबोली येथे महादेवगड, सोनवडे येथे नरसिंहगड सोनगड मसुरे येथे भरतगड, मालंड येथे सिदगड, कोचरे येथे निवती, हळर्ण येथील कोट, याशिवाय फोंडसावंताने कुडाळ, बांदे, डिचोली साखळी वेंगुर्ले येथील जुन्या कोटांची दुरूस्ती केली. फोंडसावंत २ जानेवारी, १७३८ मध्ये निवतले [१५].

रामचंद्रसावंत व जयराम सावंत (१७३८-१७५५) :-

फोंडसावंत हयात असतांनाच त्यांनी रामचंद्र सावंतास गादीचे मालक केले. परंतु त्यांच्या निधनानंतर राज्यकारभाराचे काम रामचंद्र सावंत व त्यांचे चुलते जयराम सावंत यांच्या नावांने चालू लागले. जयराम सावंत यांनी त्यांचे सैन्य व आरमार वाढविले. त्यांच्या काळात सावंत भोसले यांच्या वैभवाचा कळस झाला होता. याचेळी सावंतांनी पेशव्यांशी सख्य जोडले व पोर्तुगिजांच्या ताब्यातून त्यांचे डिचोली व साखळी हे महाल घेतले. पोर्तुगिजांच्या बारदेशावर स्वारी करून तो प्रांतही सावंतांनी हस्तगत केला. या स्वारीत जयरामसावंतास पोर्तुगिजांच्या ब-याच तोफा व निशाणे मिळाली. आता दरवर्षी सावंत पोर्तुगिजांना जे १००० रु. देत असत तेही नाकारले होते. परंतु १७३९ मध्ये वाडीकरांनी बारदेश प्रांत पोर्तुगिजांना परत केला. इ.स. १७४० मध्ये पुन्हा सावंतांनी बारदेशवर स्वारी केली. पण पोर्तुगिजांनी त्यांना पुढे येउ दिले नाही [१६]. इ.स. १७४३ मध्ये जयरामसावंताने सोंधाच्या राजावर स्वारी केली पण तीत सावंतांचा विशेष फायदा झाला नाही. इ.स. १७४६ मध्ये मात्र पोर्तुगिजांनी सावंतांच्या हळर्ण किल्ल्यावर हल्ला केला व सावंतांचा अत्यंत महत्त्वाचा किल्ला गेला. पुढे १७५० मध्ये तुळाजी आंग्रेनीही जयराम सावंताचा सुरवातीला पराभव केला. परंतु पुढे आंग्रेने कुडाळवर हल्ला केला तेव्हा

जयरामसावंत प्राणपणाने लढला व त्यास विजयही मिळाला आणि आंग्रे यांनी पळ काढला. तेव्हापासून जयरामसावंताच्या वाटेस आंग्रे कधीही गेले नाहीत. जयरामसावंताच्या या विजयाने साताऱ्च्या दरबारी त्याचे विशेष वजन वाढले.

रामचंद्रसावंत-जयराम सावंत कलह :-

इ.स.१७५२ च्या सुमारास रामचंद्र सावंत व जयराम सावंत यांच्यात कलह निर्माण झाला.[१७] हा कलह गादीच्या पुढील वारसावरून झाला होता. गादीच्या वारसाचे एक कारण व दुसरे कारण म्हणजे सावंतांनी जमविलेल्या लाकडाचा वापर आपल्या किर्तीस साजेसा भव्य वाडा बांधण्यास करावा असे रामचंद्र सावंतास वाटत होते. तर जमविलेल्या लाकडांची आणखी गलबते बांधून आपले आरमार वाढवावे असे जयराम सावंतास वाटत होते. वरील दोन कारणांमुळे उभयंतामध्ये कलह सुरू झाला. तो मिटविण्यासाठी त्यांच्या जवळच्या लोकांनी पुष्कळ प्रयत्न केले. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. शेवटी बाळाजी बाजीराव पेशवे यांनी एक तोडगा काढला तो म्हणजे रामचंद्रसावंताने राज्यकारभार पहावा व जयरामसावंताने पेशवे दरबारी जाऊन रहावे. परंतु जयराम सावंतास हे आवडले नाही ते शेवटी कुडाळ येथे जाऊन राहिले[१८]. व १७५३ मध्ये त्यांचा अंतही झाला. या संधीचा पुरेपूर फायदा पोर्तुगिजांनी घेतला व रामचंद्रसावंतास इ.स.१७५४ मध्ये तह करण्यास भाग पाडले. या तहाने पोर्तुगिज लोक आता सावंतवाडी राज्यात ख्रिश्चन धर्माचा प्रसारही करू लागले. अशा परिस्थितीतच रामचंद्र सावंत इ.स.१७५५ मध्ये निवर्तले . रामचंद्र सावंत व जयराम सावंत यांनी सावंतांचे नांव जेवढे नावारूपाला आणले होते, तेवढेच त्यांचे महत्व आपापसातील कलहामुळे कमीही झाले व त्याचा पुरेपूर फायदा पोर्तुगिजांनी उठविला. जर त्यांनी कलह निर्माण होऊ दिला नसता तर मात्र वाडीकरांचे वजन सर्वत्र वाढले असते व त्यांचा शब्द कोणत्याही सत्ताधिशाने झेलून धरला असता. परंतु नेमके तसे घडले नाही[१९].

तिसरे खेमसावंत (१७५५-१८०३):-

रामचंद्रसावंत निवर्तल्यावर त्यांचे पुत्र खेमसावंत उर्फ राजश्री हे गादीवर आले. ते अल्पवयीन असल्यामुळे त्यांची आई जानकीबाई मुख्यप्रधान जिवाजी विश्राम सबनीस यांच्या मदतीने राज्यकारभार पहात असत. सावंतवाडीकरांना नारायणप्रभू देसाईचा मुलगा दादाजीप्रभूचा उपद्रव झाला. परंतु त्याचा खेमसावंताने बंदोबस्त केला. यावेळी पोर्तुगिजांनाही उतरती कळा लागली होती. खेमसावंताने एप्रिल १७५८ मध्ये पोर्तुगिजांकडून पेडणे व साखळी हे महाल घेतले. दरम्यान महादजी शिन्देची पुतणी व खेमसावंत यांचा विवाह झाला. हा विवाह १७६३ मध्ये झाल्यानंतर खेमसावंतास महादजी शिन्दे यांची सर्वतोपरी मदत होणार होती[२०].

खेमसावंताने १७६३ मध्ये राज्यकारभार पूर्णपणे आपल्या हातात घेतला व जिवाजी विश्राम सबनीस कारभारावरून दूर केले. त्याजागी रघुनाथ दळवी, सदाशिव नारायण चिटणीस यांना कारभारी नेमले. एक वर्षानंतर पुन्हा जिवाजी विश्राम यास नेमले. परंतु खेमसावंताने अनेकवेळा कारभारी बदलल्यामुळे राज्यकारभाराचे धोरण एक न राहिल्यामुळे राज्यामध्ये बरीच अव्यवस्था निर्माण झाली होती. कारण नवीन कारभारी म्हणजे जुने धोरण जाऊन नवीन धोरण येत असे. इ.स. १७६५ मध्ये इंग्रजांनी रेडुी किल्ल्यावर हल्ला करून तो किल्ला हस्तगत केला. भरतगड किल्ल्यावर यावेळी विश्राम नरहर हा किल्लेदार होता. परंतु हा किल्लाही इंग्रजांनी घेऊन त्यास फोर्ट ऑगस्टस् असे नांव दिले व ७ एप्रिल १७६५ रोजी खेमसावंताने इंग्रजांशी तह केला. सावंतभोसल्यांनी हा तह पाळला नाही. पुन्हा १७६६ मध्ये इंग्रज व खेमसावंत यांच्यात तह होऊन जवळ जवळ पहिल्या तहाच्याच अटी कायम करण्यात आल्या. परंतु इ.स. १७८० मध्ये खेमसावंताने गेलेला रांगणा किल्ला हल्ला करून परत घेतला[२१].

खेमसावंताने आठ वर्षांपर्यन्त ठरलेली खंडणीची रक्कम पोर्तुगिजांना दिली नाही त्यामुळे पोर्तुगिजांना राग येऊन त्यांनी डिचोलीच्या किल्ल्यास २५ ऑक्टोबर, १७८१ रोजी वेढा दिला व लगेच किल्ला हस्तगतही केला. खेमसावंत व पोर्तुगीज यांच्यात सुरू झालेल्या लढाया चालूच राहिल्या शेवटी पोर्तुगिजांनी खेमसावंताच्या मणेरी येथील मुख्य सैन्यावर हल्ला करून पराभव केला. अशा रितीने दोन वर्षे चाललेल्या लढाईचा शेवट झाला[२२]. यानंतर १७८५ मध्ये मोगल बादशहाकडून खेमसावंतास मोर्चेल व पोषाखचा बहुमान मिळाला. तेव्हापासून खेमसावंत आपल्या नांवास राजेबहादूर असा किताब लावू लागले. परंतु बहुमानाची गोष्ट पेशवे, करवीरकर यांना पटली नाही[२३].

बहुमान मिळाल्यामुळे खेमसावंतास कोल्हापूरकरांना व पेशव्यांना तोंड द्यावे लागले. त्याचबरोबर त्याचा फायदा उठविणारे पोर्तुगिजांनाही खेमसावंतास सामोरे जावे लागत होते. परंतु खेमसावंताने पोर्तुगिजांची मदत घेऊन कोल्हापूरकरांना तोंड दिले. त्याचबरोबर महादजी शिंद्यांचीही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत होऊ लागली होती. त्यामुळेच खेमसावंतावरील बरीच संकटे टळली होती. करवीरकरांनी घेतलेले किल्ले खेमसावंतास परत करावे यासाठी महादजी शिन्दे यांनी पेशव्यांकडे मध्यस्थी केली. त्यानुसार पेशव्यांनी कोल्हापूरकरांकडून नोव्हेंबर, १७९३ रोजी नरसिंहगड वाडीकरांना मिळाला. बाकीचे किल्लेही परत मिळाले[२४].

खेमसावंताच्या काळात लढाईचे बरेच प्रसंग आल्यामुळे सावंतवाडी राज्याच्या खजिन्याची स्थिती खालावत चालली होती. खेमसावंतास आपल्या काळात सर्वस्वी संघर्ष करावा लागला होता. त्यामुळे त्यांना राज्याचा विकास करता आला नाही की हवे तितके राज्यकारभाराकडेही लक्ष देता आले नाही. खेमसावंत तिसरे हे दानशूर व विद्याप्रेमीही भोळे होते. शेवटी खेमसावंत वयाच्या ५४ व्या वर्षी म्हणजे २५ सप्टेंबर, १८०३ रोजी

निवर्तले. त्यांना पुत्रसंतान नव्हते तर मुली मात्र होत्या. खेमसावंतांनी आपले संपूर्ण आयुष्य लढाया संघर्ष, तह, या गोष्टी करण्यातच घालविले. परंतु हे करीत असतांना आपल्या राज्याचे त्यांनी संरक्षण केले हे महत्त्वाचे आहे[२५].

रिजन्सी राज्यकारभार (१८०३-१८२२) :-

राणीलक्ष्मीबाई :- खेमसावंतास पुत्रसंतान नव्हते म्हणून त्यांनी अंतकाळी संस्थानचा राज्यकारभार वडीलपत्नी लक्ष्मीबाई हिच्या स्वाधीन केला व लक्ष्मीबाई इ.स.१८०३ पासून रीजंट म्हणून राज्यकारभार चालवू लागल्या. परंतु आण्णासाहेबांचे पुत्र सोमसावंत व नातू श्रीरामसावंत या दोघांनाही ती गोष्ट आवडली नाही. परंतु वाडीचा कारभार आपल्या हाती रहावा असे लक्ष्मीबाईस वाटत होते. आपल्या ताब्यात राज्यकारभार घेण्यासाठी सोमसावंताने लक्ष्मीबाई व दुर्गाबाई यांना कैद करण्याचे योजिले परंतु सोमसावंतच स्वत: राणीच्या सैन्याच्या जाळ्यात सापडला तेव्हा त्याने कुटूंबातील सर्व माणसे व स्वत: जाळून घेतले. त्याचा एक मुलगा, फोंडसावंत रेडीस होता म्हणून वाचला. पुढे फोंडसावंताने कोल्हापूरकरांची मदत घेऊन राज्यात धुमाकूळ घातला, तेव्हा राणी लक्ष्मीबाईने त्याला त्याच्या वडिलांचे सर्व हक्क देण्याचे मान्य करून तो वाडीस आला.

वाडीकरांमध्ये असे घरचेधरात कलह सुरू झाला[२६] त्यामुळे राज्याचा खजिनाही रिता झाला. त्यामुळे किल्ल्यावरिल लोकांचे पगार थकले. परिणामी नोकरवर्ग वाडीकरांवर असंतुष्ट झाला. सावंतवाडी दरबारची ही स्थिती पाहून या संधीचा फायदा उठविण्याचे करवीरकरांनी ठरविले व नांदोस येथे उभयतात संघर्ष झाला पण तो निरूपयोगी ठरला[२७].

दरम्यान दुर्गाबाईंचा बंधू रामचंद्र खानविलकर याने प्रांतात रण-धुमाळी सुरू केली होती. असे प्रकार होण्याचे कारण म्हणजे लक्ष्मीबाईंचा अव्यवस्थित कारभार होय. कोल्हापूरकरांचा बंदोबस्त करण्यासाठी शेवटी राणीने निपाणीकरांची मदत घेतली. निपाणीकरांचा सरदार मदतीसाठी आला असतांना त्याने लक्ष्मीबाईस कैद केले कारण त्याला स्वतःची स-ता स्थापन करावयाची होती. परंतु राणी युक्तीने कैदेतून सुटून पेडणे येथे जाऊन राहिली. निपाणीकर व सुबराव कागलकर यांनी फोंडसावंताचा मुलगा खेमसावंता यास लक्ष्मीबाईंस मांडीवर घेऊन कारभार करणेस भाग पाडले. लक्ष्मीबाई यांनी थोडेच दिवस राज्यकारभार पाहिला. तरी त्यांची बहुतेक कारकीर्द क्लेशात व दुःखात गेल्यामुळे राणीला दुखणे येऊन त्यातच राणीचा इ.स. १८०८ मध्ये अंत झाला.

राणी दुर्गाबाई :-

लक्ष्मीबाई निवर्तल्यानंतर खेमसावंताची दुसरी पत्नी दुर्गाबाई ह्या राज्यकारभार चालवू लागल्या. त्या मोठ्या कारस्थानी व न्यायी होत्या. त्यांनी राज्यकारभार हातात घेतल्याबरोबर बाहेर गेलेल्या सरदारांना वाडीत आणून त्यांना उपदेश केला व त्यांच्यातील व्देष नष्ट केला. त्यामुळे संस्थानच्या फौजेतील दुर्बलत्व नाहिसे झाले. दुर्गाबाईने फोंडसावंतास गादीवर बसवून स्वतः कारभार चालवू लागल्या[२८].

दुर्गाबाईने सर्व किल्ल्यांवर आपल्या सरदारांच्या नेमणूका करून व किल्ल्याच्या खर्चासाठी त्यास जवळच्या गांवातला वसूल ठरवून देऊन बंदोबस्त केला. परंतु राणी दुर्गाबाईस इंग्रजांबरोबर अनेक वेळा तंटे व तह करावे लागले. फोंडसावंत यांचा ऑक्टोबर, १८१२ रोजी अंत झाल्यामुळे दुर्गाबाईने स्वतः राणीच राज्यकारभार चालवू लागल्या. दुर्गाबाईस इंग्रजांप्रमाणेच कोल्हापूरकरांशीही नेहमीच संघर्ष करावा लागला. इंग्रजांनी

यावेळी हळूहळू राणीवर वर्चस्व निर्माण करण्यास सुरवात केली. व एक एक प्रदेश घेण्यास प्रारंभ केला.

दादीबाई हा एक नवीन शत्रु दुर्गाबाईस निर्माण झाला. तिला असे वाटत होते की आपल्या मुलास दुर्गाबाईनी गादीचा वारस नेमावे परंतु दुर्गाबाईचा या गोष्टीस विरोध होता. म्हणजे आता दादीबाई व दुर्गाबाई असे स्पष्ट दोन पक्ष निर्माण झाले होते. असा आपापसात संघर्ष सुरू असतांनाच खेमसावंताचे नारायणराव पाटणकर यांची कन्या अंबिका हिच्याबरोबर लग्न झाले. दुर्गाबाईची आपल्या सरदारांवरील पकड हळू हळू ढिली होऊ लागली. अनेक सरदारांनी किल्लेदार असतांना किल्ले बळकावले होते. उदा. संभाजी सावंत याने रेडीचा, बबनगोपाळ याने निवती इ. दुर्गाबाई या वाडीतील अंतर्गत कलह, कट, कारस्थानांना कंटाळून गेल्या होत्या. त्यातच त्या आजारी पडल्या व शेवटी १७ जानेवारी, १८१९ रोजी त्यांचा अंत झाला.

दुर्गाबाईच्या अंतानंतर खेमसावंताच्या राहिलेल्या दोन बायका नर्मदाबाई व सावित्रीबाई या कारभार पाहू लागल्या. यावेळी इंग्रजांचे जवळ जवळ पूर्णपणे वाडीच्या कारभारावर व ध्येय धोरणांवर वर्चस्व निर्माण झाले होते. कारण इंग्रज सरकारने वाडीकरांच्या अंतर्गत कलहाचा फायदा पूरेपूर उठवून सावंतवाडीकर आपली अधिसत्ता निर्माण केली होती. वाडीकरांचे महत्वाचे किल्लेही इंग्रजांनी घेतले होते. बबना गोपाळ व संभाजी सावंत यांना वाडीसरकारने कामावर ठेवू नये असा इंग्रजांनी सावंतावर तह लादला होता. परंतु वाडीच्या राज्यात शांतता निर्माण झाल्याने फेब्रुवारी, १८२० रोजी तह होऊन त्यानुसार रेडी, निवती हे किल्ले सोडून सर्व प्रदेश वाडी सरकारला परत केला. कोल्हापूर व वाडीसरकार यांच्यातील तंटा ब्रिटिश सरकारने मिटवावा असे नर्मदाबाई व सावित्रीबाई यांना वाटत होते. त्यानुसार तो ब्रिटिशांनी निकाल लावला. उभयतांमधील तंटे सोडविण्याचे काम इंग्रजांनी स्वार्थासाठीच

यावेळी म्हणजे १८२२ मध्ये खेमसावंताचे वय १७ वर्षाचे होते. आता राज्यकारभार पूर्णपणे खेमसावंताने पहावा अशी इंग्रजांची इच्छा होती. परंतु प्रारंभी खेमसावंताने नकार दिला. पण पुढे खेमसावंत व बाईसाहेब यांचे संबंध बिघडले खेमसावंत कारभार पहात असतांना नर्मदाबाई व सावित्रीबाई ह्या देखील राज्यकारभार पाहू लागल्या. दोघींच्या पक्षांचेही शिपाई प्रांतात वसूलीसाठी हिंडत असत. त्यामुळे जनतेला अतोनात त्रास झाला कारण एकाचवेळी दोघांना वसुल देणे जनतेला शक्य नव्हते. शेवटी मि. डनलॉप ह्या इंग्रज अधिका-यांच्या मदतीने दोन्हीही बाईसाहेब शिपाई बरोबर घेऊन सावंतवाडीत राहू लागल्या. दोन्हीही बायांची हरकत दूर झाल्यावर खेमसावंत उर्फ बापूसाहेब हे स्वतंत्रपणे राज्यकारभार पाहू लागले. इ.स. १८२३ पासून त्यांचा कारभार स्वतंत्र झाला. अशा रीतीने शेवटी रिजन्सी कारभाराची सांगता झाली. रिजन्सीमध्ये संपूर्ण राज्यात अस्थिरता, कारभारात अव्यवस्था, अशांतता निर्माण झाली होती. या सर्व गोष्टी आता कमी होणार होत्या, कारण फक्त खेमसावंतांच्याच हाती सत्ता आली होती[३०].

चवथे खेमसावंत (१८२३-१८३८) :-

ब्रिटिश सरकारने खेमसावंतास अधिकार मिळणेपूर्वीच १८२० मध्ये पहिला पोलिटिकल एजंट नेमला होता. १८२३ मध्ये खेमसावंत स्वतंत्र कारभार करू लागला. पण खेमसावंताचे हवे तसे राज्यकारभाराकडे लक्ष दिसेना. त्यामुळे प्रजेवर जुलूम, जबरदस्ती होऊ लागली. वसुलात घोटाळे निर्माण झाले त्यामुळे तिजोरी रिकामी होण्यास मदत झाली. खेमसावंत कामकाजात एवढे लक्ष घालीत नव्हते, तर त्यांनी देवधर्मात जास्त लक्ष केंद्रीत केले. संस्थानचे कर्ज, चंद्रोबा सुभेदाराची नेमणूक, कोल्हापूरचा तनखा या बाबत देण्याच्या रकमा न फिटता त्या वाढत गेल्या. वसुली करणा-यांवर खेमसावंताचे नियंत्रण नसल्यामुळे जनता, किल्लेदार वगैरे त्रस्त झाले होते. शेवटी १८२८ मध्ये महादेवगडचा पूर्वीचा किल्लेदार फोंडसावंत

तांबुळकर याने वाडीसरकारविरुध्द बंड केले. परंतु नंतर त्याला इचलकरंजी संस्थानात पळून जावे लागले. खेमसावंताने कारभाराकडे एकदम दुर्लक्ष केल्यामुळे तिजोरीत पैसाही येईना व कर्ज तर फुगतच चालले होते. कर्ज द्यायची कशी याचीही काळजी कधी खेमसावंताने केली नाही. त्यामुळेच पुढे राज्यात पुन्हा अस्थिरता निर्माण झाली[२२].

इ.स.१८३२ मध्ये वाडीच्या राज्यात धामधूम सुरू झाली. दादीबाईने बंड केले. वसूली करणारे त्यांच्याकडे जमा झालेले वसूलीचे पैसे सावंतवाडी सरकारच्या खजिन्यात भरीत नसत कारण त्यांच्यावर नियंत्रण, वर्चस्व नव्हते त्यामुळे त्यांना भीतीही वाटत नव्हती. १८३२ मध्ये ब्रिटीशसरकारने जमा व खर्च लिहीण्यास सुरवात करुन शिस्त लावली. तरीही वसूल निट होईना तंटे वाढू लागले. तेव्हा इंग्रजांनी संस्थानातील सर्व जकातीची नाके स्वत:कडे घेतली. एवढे झाले तरी खेमसावंताचा अंदाधुंदी कारभार चालूच होता. त्यामुळे आणखी नवीन बंड उद्‌भवली. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी पुन्हा इंग्रजांची मदत घ्यावी लागली. शेवटी या सावंतवाडी राज्यातील अंतर्गत कलह, गोंधळास कंटाळून जाऊन इंग्रज सरकारने इ.स.१८३८ मध्ये खेमसावंताच्या हातातून सर्व राज्यकारभार काढून घेऊन आपल्या हातात घेतला व शांततेसाठी एक स्थानिक पलटण उभारली. या पलटणीचा सर्व खर्च संस्थानाच्या तिजोरीतून चालत होता. अशा रीतीने सावंताचे स्वतंत्र राज्य संपुष्टात आले. फक्त राज्याचे व्यवस्थापन वाडीकरांकडे इंग्रजांनी तात्पुरते ठेवले होते. वाडीचा कारभार पहाण्यासाठी इंग्रज सरकारने पोलिटिकल सुपरीनटेंडेंट हा अधिकारी नेमला आणि त्याच्या हातात सर्व प्रकारचे अधिकार दिले. इंग्रजांनी सावंतवाडी राज्याचे प्रशासन ताब्यात घेतल्यानंतर प्रशासनात कार्यक्षमता शिस्त, वेळेला महत्त्व, या सर्व गोष्टीचे पालन करून दिवाळखोर बनलेली राज्याची आर्थिक परिस्थिती पुन्हा सुधारावली व राज्याची अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभी केली.

१ वालावलकर, मळगांवचा शिलालेख, पृ. ६५ (१९३२).

२ सभासद बखर, पत्रसारसंग्रह, लेख १०४१. पृ. ६९

3 G.H.Khare,Some persian Records from wadi,p.118.

४ भावे, युगप्रवर्तक शिवाजी महाराज,पृ. १९४-९५.

५ पिंगुळकर, सां. सं. ई. पृ. ४२ (१९११).

६ पिंगुळकर, सां. सं. ई. पृ. ४५ (१९११).

७ Khare G.H.,SPRFW,p.118.

८ दबु दा.गो.,कुलाबकर आंग्रे सरखेल,पृ. १३ (१८६१).

९ R.V.No.5.Fls.34

१० वर्दे सां. सं. ई. सा. लेख. १३ पृ. १२

११ परेरा, मईसा,पोद-२ पृ. ७४-७५.

१२ Courtney and J.W.Auld, & Memoir on Sawantwadi State,p.

१३ Courtney and Auld,MOSS,page.2.

१४ Courtney and Auld,MOSS,p.2.

१५ वर्दे, सांसंईसा. लेख नं. २८, पृ. २८.

१६ Curthey and Auld,MOSS, page.2.

१७ कि-सा, पृ. २

१८ वर्दे, सांसंईसा. लेख. 33, पृ. २६.

१९ वालावलकर, मठ, गां. शि, कुप्राई. पृ. २३.

२० Courtney and Auld, MOSS, page 2-5

२१ Courtney and Auld, MOSS, p.4.

२२ पिसुर्लेकर, पोर्तुगिज-मराठे, संबंध, पृ. २८७.

२३ पिसुर्लेकर, पोमसं, पृ. २९२.

२४ एलेसें, पृ. ४६

२५ Cartas, ordent Portarias No.84, 1804-5 fi.113.

२६ Curtney and Auld, MOSS, page 4-5.

२७ कि-ता, पृ. ५

२८ Curtney and Auld, MOSS, page.7.

२९ वैद्य, श्रीमंत बापूसाहेबांचे चरित्र व आठवणी पृ. २९-३३

३० कि-ता, पृ. ८

३१ Courtney and Auld, MOSS, pp.9 to 10.

सावंत - करवीरकर संबंध

सावंतवाडीकर सावंत - भोसले यांच्या राज्याच्या पूर्वेस कोल्हापूरकरांचे राज्य पसरलेले होते. सावंतवाडीकरांच्या राज्यापेक्षा करवीरकरांच्या राज्याचा पसाराही मोठा होता. करवीरकरांना पोर्तुगीजांपेक्षा सावंतवाडीकरांशी सलोख्याचे संबंध ठेवणे आवश्यक होते कारण की पोर्तुगीज स-त्ता हि परकिय स-त्ता होती, सर्वदृष्टिने पोर्तुगीज हे करवीरकरांच्या पुढे होते, त्यामुळे त्यांचा त्रास होऊ नये म्हणूनच सावंतवाडीकरांशी सुरवातीला करवीरकरांनी सलोखा साधलेला होता. १८ व्या शतकाच्या सुरवातीला शाहू मोगलांच्या अटकेत असताना ताराबाई व सावंतवाडीकर यांचे संबंध विकसित झालेले होते. परंतु १७०८ मध्ये शाहू मोगलांच्या कैदेतून सुटून आल्यानंतर राज्याच्या वारसावर हक्क सांगू लागला व त्यामुळे महाराणी ताराबाई व शाहू यांच्यात स-त्तेसाठी संघर्ष सुरू झाला. त्यावेळी सावंतवाडीच्या गादीवर दुसरे खेमसावंत होते. दुसरे खेमसावंत अतिशय धूर्त असल्याने त्याने ताराबाई शाहू यांच्यातील संघर्षाचा फायदा उठविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच सावंतवाडीकर व करवीरकर यांचे संबंध बिघडले. ताराबाई व शाहू यांच्यापैकी जो पक्ष स-त्तेवर येईल त्या बाजूने वाडीकर आहे असे खेमसावंत वेळोवेळी जाहीर करीत[१]. सुरवातीला वाडीकर ताराबाईच्या पक्षाकडे होते परंतु नंतर ताराबाईचा पक्ष लंगडा झाला तर लगेच वाडीकरांनी शाहुच्या पक्षाला पाठिंबा दर्शविला. थोडक्यात म्हणजे वाडीकरांचे धोरण स्थिर नव्हते.

सावंतवाडीकरांचे धोरण अस्थिर असल्याने त्यांच्याबद्दल करवीरकरांच्या मनात किल्मीश निर्माण झाले. आणि वाडीकर दलबदलु म्हणून त्यांच्याकडे करवीरकरांचा पहाण्याचा दृष्टिकोन बनला. सावंतवाडीकरांना स्वत:चे व राज्याचे आस्तित्व कसे टिकवावे व त्यासाठी काय करावे याची चांगलीच जाणीव झालेली होती. सावंत - करवीरकर यांचे संबंध बिघडण्याचे दुसरे

कारण म्हणजे करवीरकरांना आपल्या राज्याशेजारी कोणतीही स-ता प्रबळ झालेली सहन होत नव्हती. कारण शेजारी प्रबळ झाला की, आपली स-ता कमकुवत होऊन महत्वही कमी होईल असे करवीरकरांना नेहमीच वाटत असे. त्यांना सावंतवाडी संस्थान पूर्णपणे गिळंकृत करण्याची अभिलाषा होती. त्यामुळेच करवीरकरांनी संधी मिळेल त्यावेळी सावंतवाडी राज्यावर घाला घालण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. करवीरकरांचे वाडीकरांवर संकट होते म्हणूनच केवळ सावंतवाडीकरांनी पोर्तुगीज, पेशवे, यांच्याशी मैत्री संपादन केली होती. त्यानुसार करवीरकरांनी वाटेल ते प्रयत्नही केले. दरम्यान सावंतवाडीवर चोहोबाजूंनी आक्रमणे होत होते त्यातील एक बाजू करवीरकरांची होती, परंतु तरीदेखील करवीरकरांनी केलेल्या स्वा-यांना वेळोवेळी खंबीरपणे सामोरे जाऊन संकोच पावत का होईना सावंत - भोसले यांनी स्वत:चे व राज्याचे अस्तित्व टिकविले. कोल्हापूरकर वाडीवर नेहमी स्वा-या करीत असल्यामुळे वाडीकरांनी पोर्तुगीजांशी सलोखा निर्माण करून त्यांची वेळोवेळी ~~करवीरकर~~ करवीरकरांच्या विरूध्द मदत घेतली. परंतु पोर्तुगीजांचा सलोखा सावंतवाडीकरांना महाग पडला कारण सलोखा करीत असतांना वाडीकरांनी आपले काही जन्मसिध्द हक्कही गमविले होते. परंतु सावंतांचे त्यामार्गाने का होईना राज्याचे अस्तित्व टिकू शकले[२].

दुस-या खेमसावंतांचे डावपेच :-

सावंतवाडीकरांनी कसे तरी राज्याचे अस्तित्व टिकविलेले असले तरी दुसरे खेमसावंत गादीवर आल्यानंतर सावंत वाडी राज्याचा विस्तार झाला. राज्याचा विस्तार करीत असतांना शेजा-याशी वितुष्ठ येणारच, त्यानुसार वाडीकर व करवीरकर यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. परंतु त्याचा विचार न करता खेमसावंताने वाडीच्या राज्याच्या

सिमा बदलण्याचे प्रयत्न चालूच ठेवले. आणि अनेक नवीन डावपेच आखून करवीरकरांना पेचात टाकले. १० जानेवारी, १७०६ रोजी खेमसावंत भोसले यांनी करवीरकर व पोर्तुगीज यांचे परस्पर संबंध बिघडावे आणि त्याचा फायदा आपण उठवावा या हेतूने पोर्तुगीजांकडे करवीरकरांविरूध्द मदत मागविली, परंतु पोर्तुगीजांनी खेमसावंतांचा डाव ओळखला आणि त्यास मदत देण्याचे साफ नाकारले, कारण करवीरकरांशी असलेले सलोख्याचे संबंध बिघडू नये यासाठीच होय. खेमसावंतांला पोर्तुगीजांनी मदत नाकारल्यानंतर त्याने उलटा डाव टाकला तो म्हणजे पोर्तुगीजांच्याच विरूध्द करवीकर महाराणी ताराबाई हिच्याशी संबंध सुरळीत केले व करवीरकरांची मदतही मिळविली. ताराबाईने देखील ताबडतोब सावंतवाडीकरांच्या मदतीला सैन्य पाठविले या अगोदर मात्र करवीरकर व सावंतवाडीकर यांच्यातील परस्पर संबंध बिघडलेले होते. तसे पहाता खेमसावंत या आगोदर प्रमुख शत्रू होता परंतु खेमसावंतांवर संकट आल्यानंतर लगेच शत्रूशीही शत्रूत्व संपुष्टात आणून करवीरकरांना मित्र बनविले व तातडीची मदतही विनासायास मिळविली[3]. यापुर्वी मात्र खेमसावंत दुसरे हे करवीरकरांचे संबंध सुधारावे यासाठी उभयतांनी आपापसात कधीही प्रयत्न केले नव्हते. वाडीकर व करवीरकर यांच्या संबंधाचे विवेचन करतांना असे दिसून येते की उभय पक्षीचे संबंध कधीच मैत्रीचे नव्हते. त्यांच्या संबंधात अधून मधून चढउतार होत असे. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रावर मोगलांच्या आक्रमणाचे गंडातर आले, तेव्हा देखील सावंतवाडीकरांचा कल छत्रपतीच्या बाजूने नव्हताच, त्यामुळेच केवळ खेमसावंत व करवीरकर महाराणी ताराबाई यांचे संबंध सलोख्याचे झाल्याचे पाहून पोर्तुगीजांना म्हणजे तत्कालीन गोव्याच्या राज्यसचिवास नवल वाटले होते. सावंतवाडीकर खेमसावंत व करवीरकर यांचे सलोख्याचे संबंध कसे दृढ झाले व खेमसावंत हे ताराबाईच्या कृपेस पात्र होऊन त्यांच्याकडून त्यांना १७०८ मध्ये परगणा कुडाळ, बांदे, डिचोली, पेडणे, साखळी व मणेरी या महालांची सनद कशि मिळाली ते करवीरकर

छत्रपती शिवाजी यांनी खेमसावंतास दिनांक २८ फेब्रुवारी, १७०८ रोजी बहाल केलेल्या सनदेवरून दिसते. म्हणजे फक्त खेमसावंताने शाहू सुटून आल्यानंतर त्याच्या पक्षाला जाऊन मिळू नये हा स्वार्थी हेतू समोर ठेवूनच ताराबाई व छत्रपती शिवाजी यांनी सावंतवाडीकरांना वरिल सर्व महालाची सनद बिनबोभाट दिली होती[४].

<u>सावंत - करवीरकर सलोख्याने पोर्तुगीज पेचात :-</u>

सावंतवाडीकर व करवीरकर यांचे तात्पुरते का होईना परंतु संबंध सलोख्याचे निर्माण झाल्यामुळे पोर्तुगीजांपुढे कठिण पेचप्रसंग निर्माण झाला होता. उभयतांचे सलोख्याचे संबंध त्यांना न खपल्याने पोर्तुगीज व्हाईसरॉयने २० मार्च, १७०९ रोजी करवीरकरांना पुढीलप्रमाणे पत्र लिहीले -"खेमसावंत भोसले यास नेस्तनाबूत करण्यासाठी आपण त्याच्याशी युध्द करावे. अशी माझी आपणाला विनंती आहे. आपल्या प्रगतीत असलेला सावंतवाडीकरांचा अडथळा दूर झाला तर करवीरकर व पोर्तुगीज या दोन सत्तामध्ये प्रत्यक्ष दळणवळण सुरू होऊन व्यापार चांगला चालेल[५]". पोर्तुगीजांनी करवीरकरांना असे आशयाचे पत्र लिहीण्याचे कारण म्हणजे जर करवीरकर व वाडीकर यांच्यात झालेला सलोखा कायम स्वरूपी टिकला तर कदाचित ते पोर्तुगीजांच्या विरुध्द संयुक्त मोहीमही हाती घेतील आणि या संयुक्त मोहीमेमुळे कदाचित आपल्याला आपल्या राज्यालाही मुकावे लागेल अशी भिती पोर्तुगीजांमध्ये निर्माण झाली होती. त्यामुळेच त्यांनी करवीरकरांचे मन वळवून आपलेसे करून घेण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा उपयोग झाला नाही. परंतु नंतरच्या काळात मात्र पोर्तुगीजांनी करवीरकरांशी संधान न ठेवता वाडीकरांना जवळ केले होते ते फक्त आपला स्वार्थ साधण्यासाठीच होय.

खेमसावंताची महाराणी ताराबाईस मदत :-

इ.स. १७०८ नंतर महाराष्ट्रात नवीन पर्व सुरू झाले. शाहू महाराष्ट्रात आल्यानंतर त्याने स्वत:ला लगेच राज्याभिषेक करून घेतला. सुरवातीलाच सांगितल्यानुसार महाराणी ताराबाई व शाहू यांच्यात वारसायुध्द सुरू झाले. ताराबाईने आपला मुलगा छत्रपती शिवाजी यास गादीवर बसविले. त्यामुळे दोन्ही पक्षातील संघर्षाला तीव्र स्वरूप प्राप्त झाले. छोटया मोठया लढाया होऊ लागल्या. दरम्यान महाराणी ताराबाई हिने सावंतवाडीकरांशी या अगोदर संधान साधलेले होते. तेव्हा ऐनवेळी खेमसावंताकडे सैन्याची कुमक मागविली, आणि खेमसावंतही तात्पूरता का होईना परंतु लगेच ताराबाई व शिवाजीस जाऊन मिळाला. शाहूने रांगणा व पन्हाळा हे किल्ले घेण्यासाठी या किल्ल्यांना वेढेही दिले होते, परंतु करवीरकरांना खेमसावंताची मदत मिळाल्यामुळेच रांगणा व पन्हाळा हे दोन्हीही किल्ले ते आपल्या ताब्यात ठेऊ शकले म्हणजे जर खेमसावंताने या कठिण संकटाच्या प्रसंगी जर करवीरकर ताराबाई व शिवाजी यांना मदत केली नसती तर कदाचित त्यांना वरिल दोन्हीही महत्वाचे किल्ले आणि आजूबाजूला मैलोगणपती प्रदेशही गमवावा लागला असता. खेमसावंताचे धोरण जरी स्थिर नव्हते तरी सुध्दा त्याने ताराबाईला दिलेले वचन पाळले म्हणजेच वाडीकर वचनपाळणारेही होते[६].

खेमसावंताने जरी ताराबाईस मदत केली तरी त्याने करवीरकरांच्या कलहाचा फायदा अप्रत्यक्ष उठविण्याचा प्रयत्न केला. त्याने केलेल्या मदतीच्या मोबदल्यात छत्रपती शिवाजी करवीरकरांकडे आपली मागणी पाठविली. वाडीकरांचा चिटणीस जिवाजी विश्राम व विश्वास अनंत सबनीस यांनी करवीरकरांकडे पूर्वी ताराबाईने दिलेले डिचोली, मणेरी, कुडाळ, पेडणे हे पाच महाल वतनादाखल सावंतांना द्यावे अशी मागणी शिवाजीकडे केली या ताराबाईने त्यांना दिलेल्या महालांना शिवाजीने

त्वरीत मान्यता दिली. परंतु ती मान्यता म्हणजे हे परगणे मोकासा चालवावे म्हणून परवानगी दिली म्हणजे वाडीकर सुरवातीला कोल्हापूरकरांच्या छत्राखाली वावरत होते असे दिसते[17]. ताराबाईचा पक्ष अल्पतात व कमकुवत होऊ लागला व शाहूचा पक्ष बळकट झाला याची जाणीव खेमसावंताला होताच त्याने शाहूच्या बलवान पक्षाकडे धाव घेतली व त्याला जाऊन मिळाला. ताराबाईंच्या पक्षाला लगेच सोडचीठ्ठी दिली. आणि लगेच ताराबाईच्या प्रदेशाला उपद्रव करण्यास सुरवात केली. सुरवातीला ताराबाईकडे फायदा होणार होता तेव्हा तिचीच खेमसावंताने बाजू घेतली व नंतर तिच्याकडून फायदा उठविल्यानंतर लगेच तिच्याविरोधात शाहूला जाऊन मिळाला. फक्त स्वार्थासाठीच होय. या करवीरकरांच्या भाऊबंदकीच्या भांडणाचा खेमसावंताने पुरेपूर फायदा घेतला होता. करवीरकर व शाहु यांच्या आपापसातील संघर्षाच्या काळात सावंतवाडीकरांनी आपल्या राज्याच्या सिमाही वाढविल्या होत्या. जर वाडीकर शाहूला मिळाले नसते तर कदाचित मात्र त्यांच्या अस्तित्वालाही धोका निर्माण झाला असता कारण शाहुचे ते प्रमुख शत्रूंकी एक बनले असते[18]. थोडक्यात म्हणजे सावंत वाडीकर नेहमी परिस्थितीनुरूप निर्णय बदलीत असत.

खेमसावंताने शाहुचा पक्ष जवळ केल्यानंतर शाहुकडून आणखी बऱ्याच प्रदेशाची सनद मिळविली व आपल्या राज्याचा विस्तार केला. या मिळालेल्या सनदेत साळसी हा नवीन परगणा सावंताना मिळाला होता. सनदेतील काही प्रदेश राजाराम महाराजांनी सोंधेच्या राज्याला इ.स.१६९६ मध्ये दिला होता. यावरून असे दिसते की, सावंतवाडीकर प्रत्येक ठिकाणी फक्त स्वार्थ पहात होते असे दिसते ज्या बाजूस फायदा असेल त्याबाजूस वाडीकर वळत असे, म्हणजे अगोदर ताराबाई व छत्रपती शिवाजीकडून फायदा करून घेतला नंतर लगेच शाहुशी मैत्री करून त्याच्याकडूनही काही प्रदेशाची सनद मिळविली. असे स्वार्थी व धोरणी

सावंतवाडीकर आपले फक्त अस्तित्व टिकविण्यापलीकडे काहीच करू शकले नाही. खेमसावंताने अशा प्रकारचे धोरण अवलंबिले म्हणूनच त्यांचे राज्य टिकू शकले व राज्याच्या सिमाही वाढू शकल्या. राज्य वाढण्यापेक्षा फक्त राज्याचे अस्तित्वच टिकले उलट बराच प्रदेश पुढील काळात त्यांच्या हातातून गेला[१].

सावंतवाडीकरांची करवीरकरांच्या प्रदेशाला त्रास देण्याचे धोरण असल्यामुळे इ.स. १७०७ मध्येच करवीरकर छत्रपती यांची खासास्वारी पन्हाळा किल्ल्याहून निघून वाडीकर भोंसल्यांचा मुलूख घेण्यास रांगणा किल्ल्यांच्या घाटातून खाली उतरून मौजे माणगांव पर्यन्त मुलूख मारून प्रदेश अधिपत्याखाली आणून छत्रपती स्वत: पुन्हा नारू येथे मुक्कामी येऊन दाखल झाले. दरम्यान करवीरकरांनी त्यांचे कारभारी रत्नाकर पोतणीस यास फौजेनिशी मालवणला रवाना केले. यासमयी वाडीकरांचा मेढा मौजे तिरपण येथे होता. वाडीकरांनी करवीरकरांना तरीच्या पुढे जाऊ दिले नाही त्यामुळे करवीरकर माघारी फिरले आणि पन्हाळा किल्ला गाठला. म्हणजे करवीरकरांनी वाडीकरांचा काही प्रदेश घेऊन वाडीच्या राज्यात पूर्णपणे घुसण्याचा प्रयत्न केला परंतु वाडीकरांनी खंबीरपणे करवीरकरांचा हल्ला परतून लावून शेवटी करवीरकरांना वाडीकरांच्या तीव्र प्रतिकारामुळे परत फिरावे लागले आणि घेतलेल्या वाडीकरांच्या प्रदेशावर देखील पाणी सोडावे लागले होते. करवीरकरांनी केलेले हे आक्रमण आकस्मिक असल्याने वाडीकर बेसावध होते परंतु त्यांनी तरीसुध्दा करवीरकरांना माघारी पाठविले[१०]. माघारी जाऊन करवीरकर गप्प बसले नाही त्यांच्या डोक्यात वाडीकरांचा विषय सारखा घोळत होता. इ.स. १७०७ नंतर दोनच वर्षांनी म्हणजे इ.स. १७०९ च्या सुरवातीलाच करवीरकरांनी सावंतवाडीकरांचा प्रदेश घेण्यासाठी वाडीकरांच्या राज्यावर हल्ला करण्याच्या हेतूने प्रदेशात घुसून अगोदर सोनगड घेतला, सोनगड हस्तगत केल्यानंतर, कोल्हापूरकरांनी लगेच घाटगेच्या घाटाने

खाली उतरून वाडीकरांचा भरतगड व वेताळगड हे किल्ले व किल्ल्याजवळ असलेल्या नदीच्या आसपासचा जवळ जवळ दीड लक्ष रुपयाचा प्रदेश आपल्या अधिप-त्याखाली आणला. आणि एवढ्यावरच समाधान मानून अवास्तव अभिलाषा न बाळगता करवीरकर शेवटी हणमंत घाटाने वर चढून आपल्या राज्यात निघून गेले. सावंतवाडीकरांच्या राज्यामध्ये घुसून प्रदेश लुटून, जिंकून करवीरकर निघून जात तेव्हा कधी कधी सावंतवाडीकरांना ते येऊन धुमाकूळ घालून गेल्याची वार्ता समजत असे, आणि त्यांची नंतर जय्यत तयारी होत असे. परंतु त्याचा उपयोग होत नव्हता. याचे कारण म्हणजे वाडीकरांची संरक्षण व्यवस्था अतिशय कमकुवत होती. वाडीकरांना आपले संरक्षण कुणाच्या तरी इतरांच्या कुबडयांवरच करावे लागत असे. वास्तविक पहाता अडचणीत नेहमी असल्याने वाडीकरांनी आपले लष्कर बळ वाढवून ठेवण्यास हरकत नव्हती[११]. परंतु वाडीकर आपले लष्करबळ मोठ्या प्रमाणात वाढवु शकले नाही.

कोल्हापूरकरांची वाडीवर स्वारी (१७०९-१०):-

सावंतवाडीकरांनी धरसोडीचे धोरण अवलंबिले होते म्हणजे ताराबाईकडून शाहूकडे त्यांनी पलायन केले होते त्यामुळे साहजिकच वाडीकरांबद्दल करवीरकराच्या मनात तीव्र संताप निर्माण झाला. दरम्यानच्या काळात वाडीकरांनी करवीरकरांच्या कलहाचा फायदा घेऊन त्यांच्या प्रदेशात जाऊन लुटालूट करून उपद्रव आरंभिला होता. सावंताचा होणारा उपद्रव कमी करण्यासाठी आणि त्यांना धडा देण्यासाठी करवीरकरांनी १७०९ मध्ये रामचंद्रपंताच्या नेतृत्वाखाली फौज देऊन वाडीकरांच्या प्रदेशावर स्वारी केली. वाडीकर व करवीरकराच्या सैन्यात निकराची लढाई झाली तेव्हा या संघर्षात सावंतवाडीकरांचा निर्णायक असा पराभवही झाला. या स्वारीत

करवीरकरांनी त्यांचा गेलेला प्रदेश व सावंतवाडी सुध्दा जिंकली. परंतु धूर्त सावंतवाडीकरांनी लगेच करवीरकरांशी तह केला. या तहानुसार सावंतांनी यापुढे कधीही कोल्हापूरकरांच्या प्रदेशाला उपद्रव होणार नाही असे आश्वासन दिले आणि या आश्वासनापोटी करवीरकरांनी सावंतांचा घेतलेला प्रदेश त्यांना परतही केला म्हणजे लढाईत पराभव होऊनही वाडीकरांनी करवीरकरांपुढे मान झुकवून आपले राज्य टिकविले. परंतु पुढे उभयंतामध्ये झालेला करार फक्त एकच वर्षाने म्हणजे १७११ मध्ये सावंतवाडीकरांनी पायदळी तुडवला व कोल्हापूरकरांच्या कोकणातील मुलखाला उपद्रव सुरू करून कामत्याचे कोटास वेढा दिला व लुटालूट केली[१२]. त्यामुळे करवीरकरांच्या वाडीकरांवरील विश्वासालाही तडा गेला.

सावंतवाडीकरांनी पक्ष धरसोड केल्यामुळेच ताराबाईने त्यांना शासन म्हणून रामचंद्र पंतांना वाडीवर पाठवून त्यांना धडा दिला होता. यावेळी करवीरकरांनी सावंताविरूध्द आंग्र्याची लष्करी मदत घेतली त्यामुळेच तडकाफडकी विनाविलंब सावंतांचा पराभव होऊ शकला व वाडीकरांचा विरोध कमी होऊ शकला परंतु उभयंतामध्ये झालेला तह सावंतवाडीकरांनी जर कायम पाळला असता तर करवीरकरांचा त्यांच्यावर जबर विश्वास बसला असता आणि पुढील काळात सावंतवाडीकरांनी हर घटकेला करवीरकरांना मदतही केली असती परंतू फक्त स्वार्थापोटी वाडीकरांनी करवीरकरांशी झालेल्या तहाचे उंल्लघन केले. आणि पुन्हा शांत झालेल्या करवीरकरांचे कायमचेच शत्रूत्व ओढवून घेतले. त्याचबरोबर आंग्रेही सावंतवाडीकरांचे मित्र बनण्याऐवजी शत्रू बनले होते. थोडक्यात म्हणजे सावंतवाडीकर मित्र बनविण्यास यशस्वी होत असे. परंतु मैत्री टिकविण्यात त्यांना नेहमीच अपयश आलेले दिसते. मैत्री न टिकविण्यात वाडीकरांनी अपयश येण्याचे कारण म्हणजे सावंतांचा अप्पलपोटेपणा व स्वार्थ होय. प्रत्येक ठिकाणी सावंतांनी फक्त स्वार्थासाठीच तह व करार यांचे उल्लघन केलेले आढळते[१३].

सावंतवाडीकर करवीरकरांची मोहिम १७१८ :-

सावंतवाडीकरांच्या पक्षबदलू धोरणामुळे कोल्हापूरच्या भांडणात अधिक भर पडणे साहजिकच होते. यानंतरच्या काळात मात्र सावंतवाडीकर व कोल्हापूरकर यांचे संबंध कधीच फारसे सलोख्याचे राहिले नाही. विशेषत: सावंतवाडी राज्याची भौगोलीक परिस्थिती लक्षात घेता कोल्हापूरच्या दृष्टिने ती एक उपद्रवकारी परिस्थिती कायमची होऊन बसली होती आणि त्यातूनच वाडीकर व करवीरकर यांच्यात सारखे खटके उडत राहिले. खेमसावंत नंतर फोंडसावंताने शाहू महाराजांचाच पक्ष स्विकारला होता त्यामुळे वाडीकरांशी करवीरकराचा नेहमीच संघर्ष होऊ लागला होता. इ.स.१७१८ मध्ये कुडाळ देशप्रभुपैकी नारायणप्रभू आणि फोंडसावंत यांच्यात तंटा झाला. तंटा होण्याच्या अगोदर सावंतवाडीकरांचे करवीरकरांशी संबंध बिघडलेले असल्यामुळे करवीरकरांनी वाडीकरांना मदत करणेऐवजी वाडीकराविरूध्द नारायणप्रभूस फौजा पाठवून मदत केली. करवीरकरांच्या फौजेने वाडीवर हल्ला करून वाडी शहरहि जिंकून घेतले या संघर्षात फोंडसावंताचा दणदणीत पराभव झाला होता, त्यामुळेच त्याला त्यावेळी सावंतवाडी सोडून जावे लागले होते. परंतु थोडक्यात दिवसात पुन्हा सावंतवाडीकरांच्या फौजांनी कुडाळच्या कोटावर हल्ला केला त्यात जोगणप्रभू मारला गेला. अशारितीने जरी प्रारंभी वाडीकरांना हार खावी लागली तरी शेवटी त्यांनी आपला गेलेला प्रदेश मिळवून मान उंच केली[१४].

एवढाही संघर्ष झाला तरी सावंतवाडीकर फोंडसावंताने पुढेही कटकटी चालुच ठेवल्या. १७३२ च्या जून महिन्यात फोंडसावंताने बोलवण धोसरीच्या डोंगरावर तटबंदी करण्यासाठी आपले सैन्य पाठविले. वास्तविक पहाता फोंडसावंताची ही हालचाल एकप्रकारे करवीरकरांच्या राज्याच्या प्रदेशावर हल्ला करण्यासारखीच होती, या हल्ल्याचा उपद्रव

थांबविण्यासाठी भगवंतराव अमात्य यांनी आपले सैन्य पाठविले. सावंताचे सैन्य बोलावून घोसरीच्या डोंगरावर पोहचण्यापूर्वीच करवीरकरांचे सैन्य अमात्यांच्या नेतृत्वाखाली पोहचले होते. त्यामुळे सावंतांचा बेत उधळून लावला. यानंतर लगेच अमात्य व त्यांच्या फौजेने फोंड सावंताचा पुन्हा तेथे पराभव केला. फोंडसावंताला शेवटी डोंगर सोडून परत जावे लागले. पण पराभवाची भरपाई म्हणून फोंडसावंताने त्याचवर्षी पुन्हा ऑगष्ट महिन्यात सदानंद गडावर स्वारी केली परंतु या स्वारीतही शेवटी करवीरकरांच्या फौजेकडून फोंडसावंताला पराभव पत्करावा लागला. शेवटपर्यन्त करवीरकर सावंतवाडीकडून पराभूत होउ शकले नाही. फोंडसावंताने राज्याचा विस्तार करता आला नाही आणि शेव सावंतवाडी राज्यात शांतता प्रस्थापित करू शकला नाही. करवीरकरांशी चाललेल्या संघर्षात बरेच दिवस घालवल्यामुळे फोंडसावंतास राज्यात विकास करता आला नाही[१५].

इ.स.१७४९ च्या मार्चमध्ये करवीरकर छत्रपती संभाजी कोल्हापूरहुन सिंधूदुर्गला आला होता. त्यासमयी संभाजीने गोव्याच्या पोर्तुगीज व्हाईसरॉयकडे तुको शामजी व मालोजी मालाद यांना पाठवून पोर्तुगीज व सावंतवाडीकर यांच्या तंटयासंबंधी आपण मध्यस्थि करू इच्छितो असे कळविले होते. परंतू संभाजीची मध्यस्थी पोर्तुगीजांनी ताबडतोब नाकारली कारण संभाजीचे म्हणणे होते की, फिरंग्यानी सावंतवाडी-करांचे घेतलेले किल्ले त्यांना परत करावेत. म्हणजे वाडीकर व पोर्तुगीज यांच्यातील तंटा मिटविण्याची करवीरकरांची इच्छा प्रकट केली परंतु त्यात मात्र स्पष्ट सावंतवाडीकरांचीच बाजू घेतली त्याचाच फायदा होईल असा हेतू आपल्या पुढे ठेवला होता. असे पोर्तुगीजांना वाटले होते. परंतु एक स्वार्थी हेतू करवीरकरांच्या मनातही होता म्हणूनच त्यांना पोर्तुगीज - सावंत यांच्यातील तंटा मिटावा असे वाटत होते. तो स्वार्थी हेतू म्हणजे जर वाडीकरांचे राज्य पोर्तुगीजांनी

संपुष्टात आणले तर आपल्याही राज्यावर मोठे संकट निर्माण झाल्याशिवाय राहाणार नाही व आपल्या राज्याचे अस्तित्व देखील धोक्यात येईल अशी भिती करवीरकरांना वाटली होती. सावंताचे अस्तित्व टिकले तर परस्पर त्यांचेच एकमेकांत भांडणे जरी झाली, तरी पोर्तुगीजांचा आपल्या प्रदेशाला प्रत्यक्ष काहीही उपसर्ग पोहचणार नाही म्हणूनच सावंताचे राज्याचे अस्तित्व टिकणे करवीरकरांच्या दृष्टिने महत्वाचे होते[१६].

<u>वाडीकरांचे करवीरकरांशी संबंध सुधारविण्याचे प्रयत्न :-</u>

इ.स. १७३२ मध्ये संघर्ष चालु असतानाच वर्षाच्या शेवटी फोंडसावंताने आपली फौज ओलवणच्या टेकड्या घेण्यासाठी पाठविली ही बातमी करवीरकरांना कळताच त्यांनी गोपाळ रामरावास सैन्यासह फोंडसावंतास तोंड देण्यासाठी पाठविले. फोंडसावंताला या टेकड्यांच्या आजूबाजूचा सर्व प्रदेश गिळंकृत करून सावंतवाडी राज्याच्या सिमा वाढवावयाच्या होत्या, परंतु करवीरकरांच्या सैन्याने मात्र त्यांचे स्वप्न धुळीस मिळविले आणि त्याचा पुन्हा एकदा निर्णायक पराभवही केला. इ.स. १७३८ पर्यन्त उभयतांमध्ये छोट्या-मोठ्या लढाया चालुच होत्या[१७].

वाडीकर संघर्ष करून थकले होते व त्यांना लढायांचा कंटाळा आला होता कारण त्यांचा सतत पराभवही होत होता. त्यांच्या राज्याचा थोडा थोडा प्रदेशही त्यांच्या ताब्यातून चालला होता. तेव्हा वाडीकरांनी विचार करून कोल्हापूरकरांशी आपले संबंध सुधारावे अशी जाहीर इच्छा प्रकट केली आणि नारसावंताला करवीरकरांकडे पाठविले. नारसावंताने करवीरकरांची भयंकर स्तुती केली. स्तुती कोणासही प्रिय असते यानुसार करवीरकरांनीही सावंतवाडीकरांशी मैत्री संपादन केली

व त्यांना मदतीचा हातही देण्याचे आश्वासन दिले[१८].

मदतीचे आश्वासन दिल्याप्रमाणे सावंतवाडीकरांना करवीरकरांनी निपाणीकरांच्या विरूध्द मदत केली. निपाणीकरांनी सावंताच्या प्रदेशात ठाणी घालून किल्ले घेतले. तेव्हा करवीरकरांनी लगेच निपाणीकरांना वाडीकरांचा प्रदेश सोडून व फौज काढून घेण्यास सांगितले तसे न केल्यास निपाणीकरांना युध्दाची तंबीही दिली. यावरून असे दिसते की, सावंतवाडीकर व करवीरकर यांचे संबंध काही काळ का होईना सलोख्याचे होते. सावंतवाडीकरांशी करवीरकरांना सलोखा करणे आवश्यक होते कारण जवळच असलेल्या निपाणीकरांनी करवीरकरांना विरोध करण्यास सुरवात केली होती. त्यामुळेच करवीरकरांनी सावंतवाडीकरांना निपाणीकरांच्या विरूध्द मदत देऊ केली होती, आणि त्यांच्याशी जवळीक साधली होती. सावंतवाडीकरांना करवीरकरांनी आपले मित्र बनविल्यामुळे निपाणी करांनाही दहशत निर्माण होणे साहजिक होते. करवीरकरांनी निपाणीकरांना तंबी देताच त्यांनी वाडीकरांच्या प्रदेशातून ठाणे उठवून घेतली व आपल्या फौजाही काढून घेतल्या. जर करवीरकरांनी यावेळी वाडीकरांना मदत केली नसती तर कदाचित वाडीकरांना निपाणीकरांनी हैराण केले असते व नंतर करवीरकरांनाही संकटात टाकले असते[१९].

वाडीकरांनी रांगणा घेतला (१७५६) :-

सावंतवाडीकरांचे कारभारी जिवाजी विश्राम सबनीस यांनी करवीरकरांचा रांगणा किल्ला फितूरी करून आपल्याकडे घेतला. त्यावेळी करवीरकरांनी याबाबतीत गोवेकरांना विनंती केली की, छत्रपतींना मदत करून रांगणा परत मिळवून द्यावा. १७५७ मध्ये कोल्हापूरकरांचा कारभारी यशवंतराव शिन्दे यांनीही वरील आशयाचे एक पत्र गोव्याच्या पोर्तुगीज व्हाईसरॉयला पाठविले. परंतु शेवटी यशवंतराव शिन्दे याने

रांगणा किल्ल्यावर स्वारी केली व लगेच रांगणा किल्ला हस्तगत केला. करवीरकरांच्या ताब्यात रांगणा गेल्याने सावंतांना चैन पडेना. इ.स. १७७९ त सावंत व पोर्तुगीज यांच्यातही लढाया चालुच होत्या पोर्तुगीजांशी संघर्ष चालू असतानाच वाडीकरांनी रांगणा किल्ल्याला पुन्हा वेढा दिला. परंतु यावेळीही रांगणा किल्ला सावंतवाडीकरांच्या ताब्यात आला नाही. शेवटी पुन्हा एकदा सावंतवाडीकर खेमसावंत भोसले यांना इ.स. १७८१ मध्ये रांगणा किल्ला घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावेळी देखील सावंत-वाडीकरांना रांगणा किल्ला सर करणे शक्य झाले नाही. थोडक्यात म्हणजे वाडीकरांनी १७६६ ते १७८७ या काळात रांगणा घेण्यासाठी प्रयत्न केले परंतु दुर्दैवाने अपयशच पत्करावे लागले[२०].

Th.6709

सावंतवाडीकर भोसले हे कोल्हापूरकरांचे मांडलीक होते त्यांना करवीरकरांनी वेळोवेळी सनदा दिल्या होत्या. वाडीकरांनाही त्या वेळोवेळी आपणहून प्रयत्न करून मिळविल्या. राज्याच्या सिमा वाढविण्याचा विनासायास वाडीकरांनी सपाटाही चालविला होता, तेव्हा करवीरकर छत्रपतींनी त्यांचा बंदोबस्त करण्याचा क्यास केला. सावंतवाडीकर कोल्हापूरकरांचे सेवक असतांनाही ते नेहमी त्यांच्या विरुध्द संघर्षाची भाषा करीत तरीही करवीरकरांनी त्यांना त्रास देण्याचे धोरण सुरवातीला अवलंबिले नव्हते. परंतु वाडीकर संघर्ष थांबविण्यास व करवीरकरांच्या प्रदेशात जाऊन उपसर्ग थांबविण्यास तयार नव्हते त्यामुळे करवीरकरांना वाडीकरांच्या हालचालींना कुठेतरी पायबंद घालावा असे वाटु लागल्यामुळे त्यांनी वाडीकरांना करार करण्यासाठी कोल्हापूरास पाचारणही केले होते. वाडीकरांशी करार करून संबंध सुधारावे व उभय राज्यामध्ये शांततेचे वातावरण निर्माण करावे असा करवीरकरांना त्यांचा सरसुभेदार यशवंतराव शिन्दे यानेही सल्ला दिला होता. परंतु करवीरकरांनी वाडीकर तह करण्यास केव्हर न

आल्यामुळे पुन्हा त्यांच्याशी तहाची भाषा न करता फक्त वाडीकरांप्रमाणेच फक्त संघर्षाचेच धोरण स्विकारले होते. इ.स. १७८२ मध्येच वरील करारासाठी प्रयत्न झाले होते. परंतू वाडीकर या दरम्यान प्रबळ होत चालले असल्यामुळे त्यांनी तहास नकार दिला[२१]. सावंतवाडीकर व करवीरकर यांचे वारंवार तंटे होत, हे झगडे पेशव्यांना मिटवावे लागत. परंतु १७८२ च्या सुमारास सावंतवाडीकर बरेच प्रबळ झाले होते जेव्हा १७८५ मध्ये टिपूने वाडी संस्थानच्या पूर्वेला असलेल्या मराठ्यांच्या सडे ठाण्यावर हल्ले केले. तेव्हा वाडीकरांनी तेथील देसायास मदत केली नाही. त्यामुळे पेशव्यांनी करवीरकरांची बाजू घेतली असेल असे दिसते. इ.स. १७८७ मध्ये सावंतवाडीकरांनी रांगणा किल्ला पुन्हा फितूरी करून घेण्याचा प्रयत्न केला होता, परंतु सावंतवाडीकडील फितूर लोकही करवीरकरांनी पकडले व त्यांचा बंदोबस्त केला. वाडीकरांनी मालवणच्या किल्ल्यानजीक तिपणकहा व तेतालखडी येथे चि-याची तटबंदी बांधली व लाकडाचा मेढा घालून लोकांचा जमाव करून करवीरकरांच्या किल्ल्यास व प्रदेशास उपसर्ग करू लागले होते त्यामुळे वाडीकरांना कोल्हापूरकरांनी तटबंदी व मेढा पाडून टाकण्याची तंबी दिली. आणि करवीरकरांच्या प्रांताला कोणत्याही प्रकारे वाडीकराचा उपसर्ग पोहचेल असे वागू नये किंवा उपद्रव होणार नाही याची काळजी घ्यावी असे पत्रही करवीरकरांनी त्यांच्या कारकूनाबरोबर वाडीकरांकडे पाठविले होते. परंतु सावंतवाडीकरांनी मात्र करवीरकरांच्या प्रदेशाला उपसर्ग देण्याचे बंद केले नाही[२२].

मोगल बादशहाकडून खेमसावंतास मोर्चेल :-

वाडीकर खेमसावंत भोसले यांनी आपणासही स्वतंत्र राज्याप्रमाणे मोर्चेलचा बहुमान असावा अशी इच्छा महादजी शिंद्यांपुढे व्यक्त केली

आणि त्यांच्याच प्रभावामुळे ती पूर्णही झाली. महादजी शिंद्यांनी खेमसावंतास मोर्चेलचा बहुमान व बहादूर हा किताब मिळणेसंबंधी मोगल बादशहाकडे शिफारस केली व त्यामुळेच मोगल बादशहाने खेमसावंतास शिंद्याच्या शिफारसीवरूनच केवळ मोर्चेलचा बहुमान व राजेबहादूर हा किताब इ.स. १७८५ त बहाल केला. परिणामी करवीरकरांचे छत्रपती व पेशवे या दोघांनाही सावंत - भोसले यांना मिळालेला नवीन मानाचा दर्जा मान्य झाला नाही. त्याची परिणीती सावंत वाडीकर व करवीरकर यांचे परस्पर संबंध बिघडण्यावर झाली व त्यातूनच मोर्चेलचे युध्द सुरू झाले. सावंतवाडीकर व महादजी शिन्दे यांचे जवळचे नाते जोडले होते. शिंदाची पुतणी, जयाजीराव शिंदांची मुलगी लक्ष्मीबाई हिचा "विवाह खेमसावंताशी इ.स. १७६३ मध्ये झाला होता. या नवीन नात्यामुळेच केवळ महादजी शिंद्यांनी मोगलबादशहाकडे वरील प्रकारची शिफारस करून वरील बहुमानाचे फर्मान सावंताना मिळवून दिले होते. मोगल बादशहा शहाआलम हा महादजीच्या पूर्णपणे हातात होता. म्हणूनच शिंदांना ते शक्य झाले[२३].

मोर्चेलमुळे करवीरकर व वाडीकर यांच्यातील संबंध टोकाला पोहचले होते. दरम्यान करवीरकर छत्रपती यांनी पोर्तुगीजांची सावंतवाडीकरांच्या विरुध्द ताबडतोब मदतही मागितली होती. सावंतवाडीकर सावंत हे आपले मांडलीक असल्याने त्यांना मोर्चेलसारखे राजचिन्ह वापरण्याचा अधिकार नाही असे करवीरकर छत्रपती शिवाजी दुसरे यांचे म्हणणे होते. एवढेच नव्हे तर सावंतवाडीकरांना राजबहादूर हा किताबही वापरण्याचा अधिकार नाही असे करवीरकरांनी वाडीकरांना कळविले. या अगोदरच वाडीकरांनी १७८१ मध्ये करवीरकरांच्या रांगणा किल्ल्याचा वेढा घालण्याचे धाडस केले होते. परंतु सावंत वाडीकरांशी युध्द सुरू केले तर ते स्वत:च्या हिमतीवर लढविण्याचा आत्मविश्वास त्यांच्यामध्ये नसल्याने व पोर्तुगीज-भोसले यांचे संबंध मैत्रिचे असल्याने करवीरकरांनी पोर्तुगीजांकडे आपला वकील पाठवून मदतीचा संदर्भ लावला. मोर्चेलसारख्या क्षुल्लक

कारणावरून करवीरकर छत्रपती व वाडीकर खेमसावंत यांच्या झालेल्या उपनिर्दीष्ट युध्दाचा परिणाम दोघांनाही भोगावा लागला. म्हणजे सावंतवाडीकरांना पेडणे प्रांत पोर्तुगीजांना द्यावा लागला तर करवीरकरांना युध्दाचा भुर्दंड सहन करावा लागला[२४].

करवीरकरांची वाडीवर स्वारी (१७८५-८६):-

खेमसावंतास मोर्चेलचे राजचिन्ह मिळाल्याने कोल्हापूरच्या छत्रपतींचा अपमान झाला व तो भरून काढण्यासाठीच कोल्हापूरकरांनी सावंतवाडी-करांविरूध्द युध्द सुरू केले. या युध्दाच्या वेळी सावंतवाडीकरांनी विसाजी महादेव या वकिलाला पोर्तुगीजांकडे मदत मागण्यासाठी पाठविला. याचवेळी करवीरकरांचा वकिलही पोर्तुगीजांकडे मदत मिळविण्यासाठी गोव्याच्या गव्हर्नरकडे आलेला होता. पोर्तुगीजांची मदत मागत असतानाच करवीरकरांनी सावंतवाडीकरांच्या प्रदेशात घुसून हल्ले केले आणि निवतीचा किल्ला, भरतगड, व वेंगुर्ले ही वाडीकरांची ठाणी घेतली. आणि लगेच रेडीच्या किल्ल्यासही वेढा दिला. दरम्यान सावंतवाडीकरांची स्थिती अतिशय हलाखीची झाली होती. करवीरकरांशी सामना देण्यासाठी सावंताकडे पुरेसा दारूगोळा वगैरे सामुग्री नव्हती किंवा युध्दाचे सामान खरेदी घेण्यासाठी त्यांच्याजवळ आणि त्यांच्या खजिन्यातही पैसे शिल्लक राहिलेले नव्हते. अशा बिकट परिस्थितीत पोर्तुगीजांची मदत कोल्हापूरकरास झाल्यास आपली धडगत नाही याची खात्री वाटून सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांच्या मदतीसाठी प्रयत्न करून आपल्या पेडणे प्रांतावर पाणी सोडले[२५]. पेडणे प्रांतावर सावंतवाडीकरांनी पाणी सोडले म्हणूनच गोवेकर पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना करवीरकरांच्या विरूध्द मदत केली. इ.स. १७८५-८६ च्या सुमारास कोल्हापूरकर व वाडीकर यांच्यात हातघाईची पुन्हा लढाई सुरू झाली या लढाईत करवीरकरांच्या सैन्याने सावंतवाडीकरांचा दणदणीत पराभव केला. सावंतवाडीकरांचे काही किल्ले

व कोटडी त्यांनी घेतले. या सावंत करवीरकर संघर्षाचा फायदा पोर्तुगीजांनी उठवला, त्यांनी करवीरकरांशी एकीकडे बोलणी केली तर सावंतवाडीकरांशी दुसरीकडे गुप्त करार करून दोघांकडून पोर्तुगीजांनी आपला फायदा करून घेतला. परंतु या अगोदरच करवीरकर व सावंतवाडीकर यांनी संघर्ष टाळून पोर्तुगीजांना विरूध्द समान शत्रू लेखला असता, व संघटन केले असते तर एक परकीय सत्ता हिंदुस्थानातून नष्ट झाली असती. परंतु उभयतांच्या संघर्षात पोर्तुगीजांनी संधी साधली. यापुढेही पोर्तुगीजांनी उभयतांमध्ये भांडणे सुरू करे होतील व आपण करवीरकर व सावंतवाडीकर यांच्या प्रदेशाचे लचके तोडून आपले साम्राज्य वाढविण्याचे स्वार्थी धोरण चालू ठेवले होते. यानंतर पोर्तुगीज व सावंतवाडीकर यांच्यात तह झाला. या तहावर २९ जानेवारी १७८८ रोजी उभयतांच्या म्हणजे पोर्तुगीज व सावंत यांच्या स्वाक्षऱ्या झाल्या[२६]. या तहानुसार पोर्तुगीजांनी करवीरकरां-विरूध्द सावंतवाडीकरांना समुद्रमार्गाने व खुष्कीच्या मार्गाने अडचणीच्या काळात लष्करी मदत देण्याचे मान्य केले, पोर्तुगीजांनी सावंत वाडीकरांना देऊ केलेली लष्करी मदत कोल्हापूरच्या राजाने सावंताच्या राज्यातून माघार घेईपर्यन्त मदत करण्याचेही मान्य केले होते. म्हणजे करवीरकरापेक्षा सावंतवाडीकर पोर्तुगीजांना जवळचे वाटले होते. कारण जर कोल्हापूरकरांनी वाडीकरांचा आपल्या मदतीने पराभव केला तर कोल्हापूरकरांसारखा बलाढ्य शत्रू हाताने निर्माण केल्यासारखे झाले असते असे पोर्तुगीजांना वाटले, त्यामुळेच पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना मदत करण्याचा निर्णय घेतला होता. थोडक्यात म्हणजे एका दगडात दोन पक्षी मारण्याचे पोर्तुगीजांचे धोरण करवीरकर व ~~पोर्तुगीज~~ सावंत यांच्या लक्षात आले नाही. त्यामुळेच पुढील काळात पोर्तुगीजांच्या राज्याचा विस्तार होत गेला व सत्ता भक्कम पायावर उभी राहू शकली आणि उभय पक्षाच्या सत्ता कमकुवत झाल्या होत्या. एवढेच नव्हे तर करवीरकर व सावंतवाडीकर यांच्या राज्यांच्या सिमाही पोर्तुगीजांनी बदलून टाकल्या होत्या[२७]. पोर्तुगीज सावंतवाडीकरांना

मदत देत असतांना करवीरकरांनाही तशी त्यांनी कल्पना दिली होती आणि वाडीकरांच्या ताब्यातील पेडणे प्रांतात घुसविलेले सैन्य कोल्हापूरकरांनी मागे घ्यावे अशी जाहीर सूचना पत्राव्दारे कोल्हापूरकरांना कळविली होती. म्हणजे उघड करवीरकरांचे आता पोर्तुगीज शत्रू झाले व सावंतवाडीकरांचे मित्र बनले. सावंतांच्या मैत्रीत त्यांना पेडणे प्रांत मिळाला. सावंत-करवीरकर यांची लढाई चालू असतांना पोर्तुगीजांनी या लढाईत वाडीकरांच्या बाजूने भाग घेतला व रेड्डी येथे कोल्हापूरकरांच्या आरमाराबरोबर पोर्तुगीज आरमाराची गाठ पडली, तेव्हा पोर्तुगीज आरमाराने लगेच कोल्हापूरच्या आरमाराचा धुव्वा उडविला. त्यामुळे कोल्हापूरकरांच्या सैन्याने तात्काळ रेड्डी, निवती व वेंगुर्ला या ठिकाणाहून यशस्वी माघार घेतली. या अगोदर करवीरकरांचे सैन्य सावंतवाडीकरांच्या राजधानीवर हल्ला करण्याच विचारात होते परंतु सावंतवाडीकरांना जेव्हा पोर्तुगीजांची मदत मिळाली, तेव्हा मात्र सावंतवाडीवरील धोका आपोआप टळला होता. कारण कोल्हापूरकरांच्या सैन्याने थेट कुडाळपर्यन्त माघार घेतली. पोर्तुगीजांची सावंतवाडीकरांना मदत मिळाली म्हणूनच ते करवीरकरांच्या विरुध्द लढू शकले व यशही संपादन करू शकले[२८]. तसे पहाता कोल्हापूरकर व सावंतवाडीकर यांच्यातील संघर्षाचा फायदा फक्त पोर्तुगीजच घेत नव्हते तर ते दोन्हीही पक्ष अत्यंत दुबळे झाले तर लगेच त्यांच्या दुबळेपणाचा फायदा टिपू सुलतान उचलल्याशिवाय राहाणार नाही याचीही जाणीव पोर्तुगीजांना झाली होती. त्यामुळे करवीरकरांची सत्ता व वाडीकरांची सत्ता या दोन्हीही सत्ता एकदमच दुबळयाही होता कामा नये किंवा त्या नष्टही होता कामा नये याची दक्षता पोर्तुगीज घेत होते यात शंका नाही. कारण वरील दोन्हीही राज्ये नष्ट झाली तर त्यांची जागा लगेच टिपू सुलतान घेतल्याशिवाय राहाणार नाही याची पूर्ण जाणीव गोवेकर पोर्तुगीजांना चांगलीच झाली होती. टिपू सुलतान जर आपल्या शेजारी आला तर आपलीही सत्ता तो लवकरच संपुष्टात

आणल्याशिवाय राहाणार नाही याचीही भीती पोर्तुगीजांना वाटत होती. म्हणूनच सावंत-करवीर दोघेही एकदम दुबळे झालेले पोर्तुगीजांना नको होते. त्यामुळे सावंत व करवीरकर यांच्या दोघांच्याही फायद्याचा ठरेल असा तह त्यांच्यात घडवून आणण्यासाठी पोर्तुगीजांनी पेशव्यांना पत्र लिहून प्रयत्न करावे अशी विनंती केली[२९].

तळेगांवची लढाई (१७८७-८८):-

इ.स.१७८७-८८ च्या दरम्यान करवीरकरांनी आपल्या प्रचंड फौजेनिशी सावंतवाडीवर स्वारी केली. या स्वारीत हेरचे ठाणे, गंधर्वगड व रांगणा हे किल्ले सर केले. यानंतर लगेच करवीरकरांच्या फौजा घाटाखाली वाडीकरांच्या प्रदेशात घुसल्या आणि थेट वेंगुर्ल्यापर्यन्त मुसंडी मारून तेथे तळ दिला. यानंतर लगेच तळेगांव येथे करवीरकरांच्या फौजा आणि सावंतवाडीकरांच्या फौजा यांची गाठ पडली. उभयतांच्या फौजांमध्ये मोठी निकराची लढाई झाली. या लढाईत दोन्हीही फौजांमधील सैनिक मारले गेले, दोन्हीही पक्षाचे अतोनात नुकसान झाले परंतु सावंतवाडीकरांचा मात्र दणदणीत व निर्णायक पराभव झाला. सावंतवाडीकरात नंतर डोके वर काढण्याइतपतही कुवत करवीरकरांनी ठेवली नाही. सावंतवाडीकरांच्या सैन्याची दाणादाण होऊन त्यांच्या सैन्याला विस्कळीत स्वरूप प्राप्त झाले. "माय लेकराला धरीना" अशी वाडीकरांच्या सैन्याची स्थिती झाली. कित्येक सैनिक मारले गेले, कित्येक सैनिक जखमी झाले व अनेक सैनिक करवीरकरांचे कैदीही झाले होते. सावंत-करवीरकर यांच्यात झालेली तळेगांवची लढाई ही त्यांच्यात झालेल्या सर्व लढायांपेक्षा मोठी लढाई होती[30].

या लढाईत करवीरकरांना यश मिळाल्यानंतर त्यांनी सावंतवाडीकरांचे खालील सरदार पकडून ते मालवणच्या किल्ल्यात बंदिस्त ठेवले होते, त्यांची नांवे खालील प्रमाणे आहेत-

१) राजश्री सोमसावंत माणगांवकर

२) शिदबा नाईकवाडा

३) पांढ्रे सावंत

४) बाबा यामाना खेमसावंताचा खवास

५) दामे गांवस उपासकर

६) मायेगावस उपासकर

७) कसोबा सबनीस

८) शिवराम जिवाजी सबनीस

अशारीतीने करवीरकरांनी सावंताचे अस्तित्वही धोक्यात आणले होते. अशा बिकट व संकटमय परिस्थितीत सावंतवाडीकरांनी पुन्हा पोर्तुगीजांशी तहाच्या वाटाघाटी करुन करवीरकरांच्या विरुध्द मदत मिळविली, नाहीतर सावंतवाडी संस्थान आता नष्ट होईल की काय अशी सावंतांच्या मनात भीती निर्माण झाली होती. एवढी कठीण परिस्थिती असतानाही पुन्हा सावंतवाडीकरांनी करवीरकरांशी सलोखा निर्माण केला नाही. तात्पुरते, तहासाठी व शांततेसाठीच त्यांनी युध्दबंदी केली व लगेच वेळ आल्याबरोबर करवीरकरांशी संघर्ष सुरु ठेवला. त्याचा परिणाम सावंतवाडीचे राज्यातील प्रदेश कमी होण्यावर झाला[३१].

नांदोसची लढाई :-

तळेगांवच्या लढाईत सावंतवाडीकरांचा पराभव झाला तरीही सावंतानी यापुढे कायमचा संघर्ष मिटावा म्हणून प्रयत्न केले नाहीत तर उलट संघर्षाची ज्योत तशीच तेवत ठेवली होती. त्यामुळे सर्व राज्यकर्त्यांनी आपले मोठ्या प्रमाणात आयुष्य संघर्षात घालविले असे दिसते. तळेगांवच्या लढाईनंतर सावंतवाडीकरांनी लगेच करवीरकरांच्या निघून गेलेल्या फौजेचा पाठलाग करुन पराभव करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. परंतु लगेच

कोल्हापूरकरांचे सैन्य मालवणहून वाडीकडे धावले. नांदोस येथे दोन्हीही सैन्य समोरासमोर येऊन लढाई झाली. या लढाईत वाडीकरांना सुरवातीला यश मिळण्याची आशा होती. परंतु शेवटी त्यांचा पराभव झाला. सावंतवाडीकरांच्या आता पराभवालाही सीमा उरली नव्हती. नांदोसच्या लढाईनंतर, थोडे दिवसात पुन्हा अकेरी येथे उभय पक्षांतील फौजांमध्ये लढाई झाली. या अकेरीच्या लढाईत मात्र पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना मदत केल्यामुळे करवीरकरांना आपली फौज मागे घ्यावी लागली. परंतु लगेच पोर्तुगीजांना शह देण्यासाठी करवीरकरांनी आपली फौज रवाना केली. नेहमी पराभव नशिबी असतांनाही सावंतवाडीकर संघर्षात स्वत:ला गुंतवून घेण्यात मोठे म्हणवून घेत होते[३२]. नांदोसच्या लढाईनंतर करवीरकरांच्या सैन्याच्या तुकडया रामघाट उतरून खाली गेल्या आणि या सैन्याने लगेच डिचोली परगण्यावर स्वारी केली. परंतु पोर्तुगीज सैन्याने करवीरकरांच्या फौजांना यशस्वी तोंड दिले. या स्वारीत करवीरकरांना निर्णायक विजय मिळाला नाही व पोर्तुगीज-सावंत यांच्या संयुक्त फौजेलाही निर्णायक यश मिळाले नाही हे दोघांचेही दुर्दैव म्हणावे लागेल. परंतु करवीरकरांनी मात्र आपल्या ताब्यात असलेले सावंतवाडीकरांचे ठाणी अद्याप सोडली नव्हती व ती सोडण्याचा करवीरकरांचा इरादाही नव्हता. याउलट करवीरकरांनी घेतलेल्या वाडीकरांच्या किल्ल्यांच्या रक्षणासाठी आपले लोक ठेवले होते. कोल्हापूरकरांनी आपले सैन्य माघारी बोलावल्याबरोबर पोर्तुगीजांनीही आता कोणताही धोका होणार नाही याचा अभ्यास करून आपले सैन्य गोव्यामध्ये परत बोलावले आणि आता सावंतवाडीकर व करवीरकर यांच्यातील संघर्ष तात्पुरता स्थगित झाला आणि गेलेली ठाणी व किल्ले परत मिळविण्यासाठी वाडीकरांचे प्रयत्न सुरू झाले. करवीरकर सावंतांचे ठाणे सोडण्यास तयार नव्हते त्यामुळे ही गोष्ट सावंतवाडीकरांच्या मनास नेहमी लागून होती[३३].

सावंतवाडीकरांचा किल्ला नरसिंगड कोल्हापूरकरांनी तर फितुरीने घेतला होता. सावंतवाडीकरांची गुप्तहेर संघटना एवढी कार्यक्षम नव्हती असे दिसते. वाडीकरांनी प्रशिक्षण देतांना सैनिकांमध्ये स्वातंत्र्याची प्रेरणा व स्वराज्याबद्दल स्वाभिमान निर्माण केलेला नव्हता त्यामुळेच सावंतवाडीकराकडील लोक फितूर होत असत.या फितुरीमुळेच १४ जानेवारी, १७८८ रोजी नरसिंहगड करवीरकरांनी आपल्या ताब्यात घेतला होता. एवढेच नव्हे तर नरसिंहगड करवीरकरांनी फितुरीने घेतल्याची बातमीही सावंतांना ब-याच वेळपर्यन्त समजली नव्हती. ही बातमी त्यांना सखुबाई शिन्दे यांनी कळविली व घाटाच्या तोंडी बंदोबस्त कडेकोट ठेवावा अशी सावंतवाडीकरांना सूचनाही केली. याहीपुढे जाऊन सखुबाई शिन्दे यांनी सर्वप्रकारे संस्थानचे संरक्षण करण्याबद्दल उपदेशही केला. याचदरम्यान सावंत व करवीरकर यांच्यात पेशव्यांच्या मध्यस्थीने वाटाघाटी चालू होत्या. परंतु करवीरकरांनी या वाटाघाटी चालू असतांनाच वाडीकरांच्या प्रदेशावर पुन्हा आक्रमणे करण्यास सुरवात केली. अशा सावंत व करवीरकर यांच्यात ठिकठिकाणी चकमकीही झाल्या परंतु करवीरकर सावंतवाडीकरापेक्षा श्रेष्ठच ठरत गेले व वाडीकर नेहमी माघारच घेत गेले[34]. २९ जानेवारी, १७८८ रोजी वाडीकर व करवीरकर यांच्यात तह झालेला असतानासुध्दा करवीरकर व सावंत यांना तहाचे भान राहिले नाही. तर लगेच सावंताच्या भरतगड या किल्ल्यात करवीरकरांच्या सैन्याने वेढा घातला. करवीरकरांचे सैन्य व वाडीकरांच्या किल्ल्याचा किल्लेदार यांच्यात युध्द सुरू झाले. यावेळी खेमसावंताने पुण्यात मामीसाहेब शिंद्यांना पत्र लिहून कळविले, त्यानुसार त्यांनी मध्यस्थी करून तंटा मोडण्याचा प्रयत्न केला. परंतु करवीरकरांनी काही काळाने लगेच वेताळगड येथे येऊन सावंतवाडीकरांशी पुन्हा युध्द सुरू केले, यावेळी देखील करवीरकरांनी सावंतवाडीकरांचा दारूण पराभव केला.

सावंतवाडीकरांच्या पदरात प्रत्येक वेळी पराभवाचेच माप पडण्याचे कारण म्हणजे सावंतवाडीकरांची सैन्यपध्दती जुनाट पध्दतीवर आधारलेली होती. वाडीकरांनी आपल्या लष्कराला कोणत्याही प्रकारचे आधुनिक प्रशिक्षणही दिले नव्हते व सैनिकांना कवायतही शिकविली जात नव्हती. त्यांनी चौकपणी करून, सैन्यातील अधिकारी वर्ग नेमलेला नव्हता. त्यामुळेच केवळ सैन्यात आळस भरलेला होता आणि आळस हे एक वाडीकरांच्या पराभवाचे कारण ठरले होते. वाडीकर स्वत: विलासात कधी कधी दंग असत. शत्रू सीमेवर आला तरी त्यांना त्याची शुध्द रहात नव्हती[३५].

ज्यावेळी करवीरकरांचा सावंतवाडीवर हल्ला होत असे, त्यावेळी सावंतवाडीकर पेशव्यांना हैदर व करवीरकर यांच्या परिप-त्याबाबत नेहमीच कळवीत असत. कारभारी, मदत पाठवित आहोत असे सावंतांना प्रत्येकवेळी कळवीत, परंतु करवीरकरांच्या विरूध्द मदत सावंतांना कधीच मिळू शकली नाही. सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांशी मात्र शेवटी मदतीसाठी सलोखा निर्माण केला होता. परंतु पोर्तुगीजांशीही सावंतानी जरी सलोखा साधला होता तरी त्यांच्याशीही सावंतानी फक्त फायद्याचाच सलोखा निर्माण केला होता. खरे पहाता इ.स.१७८३ पर्यन्त सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात खटके उडत असत परंतु नाईलाजाने वाडीकरांनी पोर्तुगीजांशी जमवून घेतले होते. आणि आता वाडीकरांना संघर्षामुळे किती नुकसान होते ते चांगल्याप्रकारे समजले होते त्यामुळेच युध्दविराम झाला. दरम्यान सावंतानी करवीरकरांशी तह करावयास हवा होता परंतु आपण संकटमुक्त झालो असे समजून वाडीकर नाच-तमाशात मशगूल झाले होते, त्यांचे वाडीच्या राज्यकारभारात अजिबात लक्ष नव्हते. याचवेळी करवीरकरांनी पुन्हा सैन्य वाढविण्यासाठी लष्करभरती सुरू केली. तरीही सावंतवाडीकरांनी त्याची दखल घेतली नाही. या त्यांच्या दुर्लक्षित स्वभावामुळेच वाडीच्या राज्याची संरक्षणव्यवस्था नीट राहिली नाही[३६].

करवीरकरांनी सावंताची ठाणी परत करावी असा आग्रह महादजी शिन्दे यांनी पेशवे दरबारात करून तशी कारवाई केली जावी असेही कळविले होते. परंतु करवीरकर मात्र सावंताचा प्रदेश व ठाणी परत करण्यात तयार होईनात. महादजी शिंद्यांमुळेच सावंतवाडीकरांचे पेशव्यांबरोबरचे संबंध सुधारले होते. महादजी शिन्दे यांच्या सूचनेवरून पेशव्यांनी सावंताची घेतलेली ठाणी करवीरकरांनी परत करावी अशी सूचना केली व आपले कारकून बाळाजी गणेश, शिंदेंकडील सिताराम नाईक यांना करवीरकरांकडे बोलणी करण्यासाठी पाठविले. परंतु पेशव्यांनी केलेली सूचना करवीरकरांनी अमान्य केली. पेशव्यांनी या गोष्टीकडे जवळ जवळ इ.स.१७९२ पर्यन्त विशेष लक्ष दिले नाही. परंतु पुन्हा महादजी शिन्दे यांनी पुण्यास आल्यानंतर सावंतांची तक्रार निवारण करण्यासंबंधी नाना फडणीसाकडे नेट धरले. त्यानुसार पुन्हा एकदा पेशव्यांनी छत्रपती करवीरकर यांनी सावंतवाडीकरांचे किल्ले व मुलुख परत करावा असे करवीरकरांना कळविले. पण पुन्हा करवीरकरांनी ठाणे व मुलूख सावंतांना परत न करण्याचा निर्णय कळविला. शेवटी पेशव्यांनी करवीरकरांवर स्वारी करण्याचे ठरवून परशुरामभाऊ यांना तशी आज्ञाही केली[३७].

सावंतवाडीकरांची ठाणी करवीरकरांनी परत केली :-

सुरवातीला करवीरकरांना पेशव्यांनी सावंतवाडीकरांची ठाणी व मुलुख परत करण्याची सूचना केली. परंतु करवीरकरांनी ती अमान्य केली. त्यामुळेच लगेच पेशव्यांनी करवीरकरांविरूध्द सैन्य पाठवून या सैन्याचे नेतृत्व परशुराम भाऊकडे दिले. यावेळी पेशव्यांचे सैन्य आल्याची वार्ता कळताच सावंतवाडीकरांची ठाणी व मुलुख करवीरकरांनी लगेच परत केला. परंतु करवीरकर मात्र शांत बसले नाहीत तर त्यांनी दंगा आरंभिला व लगेच पुन्हा सावंतांशी संघर्षास सुरवात केली. काही दिवसातच पुन्हा करवीरकर घाबरून शांत झाले, तेव्हा युध्द सुरू झाल्यापासून तर युध्द समाप्तीपर्यन्त

सावंतवाडीकरांचा जेवढा खर्च झाला असेल तो पूर्णपणे कोल्हापूरकरांनी वाडीकरांना त्वरीत द्यावा अशी करवीरकराकडे पेशव्यांनी सूचना पाठविली. म्हणजेच महादजी शिंद्यांनी मध्यस्थी करून पेशव्यांना पुढे करून शेवटी सावंतवाडीकरांना करवीरकराकडून गेलेला प्रदेश व ठाणे परत मिळवून दिली. प्रत्यक्ष पेशवे ही ठाणी व प्रदेश सावंतांना परत मिळावा या मताचे नव्हतेच, फक्त महादजी शिंद्यांमुळे पेशव्यांना हे कृत्य करावे लागले. प्रत्यक्षात मात्र पेशव्यांचा वाडीकरांना विरोधच दिसत होता.[38] थोडक्यात म्हणजे सावंतवाडीकरांना बाहेरच्या सत्ताधिशांकडून वेळोवेळी मदत झाली म्हणूनच त्यांचे अस्तीत्व टिकून राहिले[39]. जर महादजी शिन्दे यांनी सावंतवाडीकरांची बाजू घेतली नसती तर करवीरकरांनी कदापिही यांची ठाणी व घेतलेला प्रदेश वाडीकरांना परत केला नसता व वाडीकरांचे अस्तित्वही धोक्यात आले असते.

सावंतास राजा म्हणून करवीरकरांची मान्यता :-

शेवटी करवीरकरांशी सावंतवाडीकरांचे भांडण पुणे दरबार व महादजी शिन्दे यांच्या मध्यस्थीने मिटले. सावंताना त्यांचा प्रदेशही परत मिळाला. करवीरकरांनी सावंतवाडीकरांबरोबर संबंध सुधारून घेतले आणि लगेच सावंतास "राजा" म्हणून मान्यताही दिली. सावंतास मोर्चेल व राजेबहादूरचा जो मान बादशहाने दिला होता त्यालाही करवीरकरांनी मान्यता दिली. अशारितीने संघर्ष संपुष्टात येऊन सावंत व करवीरकर यांच्या भांडणाची सांगता झाली. पुढे चालून संघर्ष संपुष्टात आल्यानंतर कोल्हापूरकरांकडे पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांच्या विरूध्द मागितलेली मदतही देण्याचे नाकारले. कारण सावंताशी नुकतेच संबंध सुधारून बाजूला होते न होते तोच पोर्तुगीजांनी करवीरकरांकडे मदत मागितली होती. करवीरकरांनी मदत नाकारल्याने पोर्तुगीजांनी लगेच त्यांना लिहिले "की, आम्हाला खेमसावंत या छोटया संस्थानिकाचे पारिपत्य

करण्यासाठी तुमच्या सैन्याच्या मदतीची आवश्यकता नाही;" असे लिहिले असतांनाही करवीरकरांनी त्याची तमा बाळगली नाही[39] आणि वाडीकरांचा सावंताचा मुलुख परत केला. राजा म्हणून मान्यता दिली व त्यांना मिळालेला मोर्चेल हा बहुमानही मान्य करून शेवटी संघर्ष संपुष्टात आणला. कायदेशीररीत्या उभय पक्षांमध्ये शांतता पुस्थापित करण्यासाठी सावंतवाडीकर व करवीरकर यांच्यात करारही झाला होता. या करारानुसार करवीरकरांनी सावंताची ठाणी परत न केल्यास व मुदतीच्या आत सोडचिठ्ठ्या न मिळाल्यास मात्र करवीरकरांवर शिन्दे सैन्य पाठवतील असेही ठरले होते; परंतु करवीरकरांनी ताबडतोब सावंतांना त्यांचा प्रदेश व ठाणी परत केली[40].

सावंतवाडीकरांना ठाणी परत करून शांतता पुस्थापित झाली. परंतु ठाणी व प्रदेश गेल्यानंतर कोल्हापूरकरांच्या पोटात दुखू लागले. करवीरकरांनी कांही दबावापासून सावंतवाडीकरांनी घेतलेला प्रदेश व ठाणी सावंतांना परत केली नव्हती तर केवळ शिन्दे व पेशवे यांच्या दडपणामुळे व भीतीमुळे परत केली होती. त्यामुळे करवीरकरांनी सावंताशी केलेला तह पायदळी तुडवला व २५ डिसेंबर, १७९२ रोजी पुन्हा उभयपक्षात तह झाला. दोन्हीही तह करवीरकरांनी धाब्यावर बसविले व पुन्हा एकदा सावंतवाडीकरांच्या प्रदेशावर व ठाण्यांवर आपले वर्चस्व निर्माण करून ती सोडण्यास किंवा सोडचिठ्ठी देण्यास नकार दिला. त्यामुळेच महादजी शिन्दे व पेशवे चिडले त्यांनी आपली फौज करवीरकरांच्या दिशेने पाठविली[41].

आळत्याची लढाई (१७९३) :-

यावेळी पेशव्यांनी परशुरामभाऊंचे पुत्र रामचंद्रपंत अप्पा यांच्या बरोबर ४ हजार स्वार, दोन हजार पायदळ, दोन तोफा, देऊन

करवीरकरांवर पाठविले. तेव्हा पेशवे व करवीरकर यांच्या सैन्यात आळत्यास लढाई होऊन पेशव्यांचा पराभव झाला. सावंताचा गेलेला प्रदेश व ठाणी तर परत मिळालीच नाहीत उलट पेशव्यांचेच नुकसान होऊन रामचंद्रपंत अप्पास अटक झाली. त्यामुळे पेशव्यांना भयंकर क्रोध निर्माण झाला. त्यांनी आपल्या लवाजम्यानिशी पुन्हा स्वारी करण्याचे ठरविले. त्यानुसार पेशव्यांनी आळत्याचे ठाणे परत मागितले ते करवीरकरांनी देण्याचे नाकारले तेव्हा पेशव्यांनी लगेच मोर्चेबंदीला सुरवात करून करवीरकरांवर तोफांचा मारा सुरू केला. लढाईस सुरवात होऊन करवीरकर बेजार झाले आणि शेवटी हतबल होऊन ते पेशव्यांना शरण आले. त्यामुळे परशुरामभाऊने तोफांचा मारा थांबविला. करवीरकरांनी लगेच पेशव्यांची मागणी मान्य केली. पेशव्यांनी करवीरकरांच्या महाराजांकडे राजाज्ञा पाटणकर, यशवंत घाटगे, रायाजी जाधव, प्रितीराव चव्हाण, गुजाजी गायकवाड यांना ओलीस मागितले; तेही करवीरकरांनी मान्य केले. करवीरकरांनी पेशवेच्या म्हणण्यानुसार लगेच सावंतांचे गड, कोट, मुलुख सोडून दिला, पण ऐवज देण्यास मात्र नकार दिला[४२]. सावंत व करवीरकर यांच्यात आळत्याच्या लढाईने अल्पकाळ शांतता निर्माण झाली. परंतु १७९६ त पुन्हा कोल्हापूरकरांनी वाडिकरांच्या प्रदेशावर स्वारी करण्याचा विचार केला होता. पण लगेच गोव्याच्या पोर्तुगीजांच्या राज्यसचिवाने पुण्यातील पोर्तुगीज वकिलातर्फे पेशव्यांना तसे कळविले होते. ख-या अर्थाने इ.स. १७९३ ते इ.स. १७९८ या ५ वर्षांच्या कालावधीत शांततेचे वातावरण होते पण १२ फेब्रुवारी, १७९४ मध्ये महादजी शिन्दे निवर्तले आणि इ.स. १७९६ तील ६ जानेवारी रोजी वाडीचा मुख्यप्रधान जिवाजी विश्राम मरण पावला, त्यामुळे करवीरकरांना सावंतवाडी राज्यावर हल्ले करून आपला फायदा उठविण्याची मोठी संधी उपलब्ध झाली. जिवाजी विश्रामच्या मृत्यूनंतर ७ वर्षांनी म्हणजे २५ सप्टेंबर, १८०३ रोजी वाडीचा राजा खेमसावंत भोसले वयाच्या ६५ व्या वर्षी मरण

पावला. खेमसावंत भोसले निपुत्रीक असल्याने राज्याच्या वारसाबद्दल गोंधळ निर्माण झाला होता. परंतु खेमसावंताने सावंतवाडीचा संपूर्ण राज्यकारभार त्यांची पत्नी लक्ष्मीबाई हिच्या स्वाधीन केला होता. सावंतवाडीराज्यात अस्थिरता निर्माण झाल्यामुळे करवीरकर अतिशय आनंदी झाले. कारण आता वाडीच्या राज्याचे लचके तोडणे त्यांना सोपे होते[४३].

करवीरकरांची सावंतवाडीवर मोहीम (१८०४-१८०५):-

सावंतवाडीतील वारसा आपणास मिळावा म्हणून आपापसात वाडीकरांमध्ये तंटा सुरू झाला होता. हा तंटा ~~फोंडसावंताचा~~ अप्पासाहेबांचा मुलगा सोमसावंत व सोमसावंताचा पुतण्या श्रीराम सावंत यांच्यातच सुरू झाला. इ.स. १८०४ मध्ये फोंड सावंताने करवीरकरांची मदत मागितली. त्यानुसार करवीरकरांनी लगेच फोंडसावंताच्या मदतीस सैन्य पाठविले. आणि पुन्हा वेगळ्या फौजाही रत्नाकरपंत व शिवराम भोसले यांच्या नेतृत्वाखाली देऊन वाडीवर मोहीम काढली. त्यानुसार रत्नाकरपंत २७ मे, १८०५ रोजी आपल्या फौजानिशी वाडीच्या मोहीमेवर निघाला व वाडी प्रांतात प्रत्यक्ष प्रवेशही केला. या मोहीमेचे फोंड सावंताला मदत करणे व सावंतांचा नवीन प्रदेशही मिळविणे असे हेतू होते. त्याप्रमाणे करवीरकरांच्या सैन्याने रेड्डीवर हल्ला चढविला आणि रेड्डीचा किल्ला सर केला व समक्ष फोंड सावंताची भेट घेऊन रेड्डीच्या किल्ल्याभोवती करवीरकरांचे सैन्यही संरक्षणासाठी ठेवले. फोंडसावंताला लगेच संरक्षणाखाली कोल्हापूरला छत्रपती महाराजाकडे आणण्यात आले. तेथे महाराजांनी फोंडसावंताचा सत्कार करून काही दिवस त्यास कोल्हापूर दरबारात ठेवूनही घेतले[४४]. पावसाळा संपल्यानंतर पुन्हा रत्नाकर अप्पा पंडित यांना फौजेसह घाटाखाली वाडीच्या ताब्यातील प्रदेशात पाठविले. त्यांनी घाटाखाली

उतरल्यानंतर प्रथम कुडाळचे ठाणे घेतले आणि जवळपासचा प्रदेशही करवीरकरांच्या फौजा ताब्यात घेऊ लागल्या. नरसिंहगड, भरतगड व निवती हे किल्लेही त्यांनी काबीज केले व त्या ठिकाणी फोंडसावंताचा जमही बसवून दिला. लक्ष्मीबाई लगेच ग्वाल्हेरच्या शिंद्यांकडे मदत मागितली. शिंद्यांकडे मदत मागण्यासाठी जात असतांना मार्गात निपाणीचे शिदोजी निंबाळकर भेटले निंबाळकरांनी करवीरकरांचे चिकोडी व मनोली हे तालुके जिंकल्यामुळे तेही करवीरकरांचे शत्रू बनले होते. निंबाळकर साहजिकच आता सावंताचे मित्र होण्यास उत्सुक होते. त्यानुसार त्यांनी वाडीकरांना मदतही करण्याचा निर्णय घेतला. निपाणीकर व वाडीकर यांच्यात मैत्री झाली. हे समजताच करवीरकरांचे रत्नाकरपंत यांनी घेतलेला प्रदेश फोंडसावंताच्या ताब्यात देऊन करवीरकरांनी आपल्या कोल्हापूर या राजधानीकडे प्रयाण केले. म्हणजे निपाणीकर व सावंतवाडीकर यांच्यात दिलजमाई होऊन मैत्री झाली. तेव्हा कोल्हापूरकरांना या दिलजमाईची भीती वाटल्यामुळेच करवीरकरांनी आपले सैन्य त्वरीत वाडीप्रदेशातून काढून घेतले[४५].

दरम्यानच्या काळात फोंडसावंत व लक्ष्मीबाई यांच्यातील संघर्ष वाढतच चालल्यामुळे सावंतवाडीचे राज्य टिकणे आता कठीण झाले होते. परंतु निपाणीकर व वाडीकर यांच्या मैत्रीला भीक न घालता वाडीकरांमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत कलहाचा फायदा घेण्याचे करवीरकरांच्या छत्रपतींनी ठरविले व लगेच १८०६ मध्ये रत्नाकरपंत व हैबतराव गायकवाड यांच्याबरोबर २०० घोडेस्वार व ३००० पायदळ देऊन वाडीकरांवर चालून जाण्यास सांगितले. करवीरकरांच्या आदेशानुसार रत्नाकरपंत व हैबतराव हे दोघेही सैन्यानिशी ताबडतोब पारपोली घाटामार्गे माधवगडाकडे गेले. माधवगडाजवळ वाडीकरांचे सैन्य व करवीरकरांचे सैन्य यांची गाठ पडली. त्यांच्यात जवळ जवळ आठ दिवस निकराची लढाई झाली. परंतु या लढाईत करवीरकरांना निर्णायक विजय मिळाला

नाही तर याउलट मुशीगेट येथे झालेल्या लढाईत करवीरकरांचा सरदार बाळा धकू चांभार हा सावंताकडून मारला गेल्यामुळे करवीरकरांना कोळगांव येथे माघार घ्यावी लागली. थोडक्यात म्हणजे करवीरकरांचा जो समज होता की, आपण सावंतवाडीचे संपूर्ण राज्य घशात घालू, ते त्यांना शक्य झाले नाही तर उलट माघार घ्यावी लागली. फोंड सावंतही शेवटी करवीरकरांच्या विरोधांत गेला[४६].

नांदोसची दुसरी लढाई (१८०६):-

श्रीरामसावंताचे इ.स. १८०६ मध्ये शेवटी निधन झाले. यावेळी फोंडसावंतही कुडाळला जाऊन राहिला. कोल्हापूरकरांच्या मदतीने फोंडसावंताने रांगणा (प्रसिध्दगड) घेतला तेथे दोन आठवडे मुक्काम करून घाटाखाली उतरले व त्यानंतर नांदोस येथे येऊन ठाणे दिले. नांदोस येथे एक गढी बांधली. यावेळी करवीरकरांच्या फौजेचा प्रतिकार करण्यासाठी राणी लक्ष्मीबाईने फोंड सावंताचा रजपूत्र धोंडो गोविंद यास फौज देऊन नांदोसकडे रवाना केली. नांदोस येथे दुसऱ्यांदा उभयतांच्या सैन्यात घनघोर लढाई झाली. या लढाईत धोंडो गोविंद ठार झाला व त्याच्या फौजेची भयंकर नुकसान झाले लक्ष्मीबाईची सवत दुर्गाबाई हिचा भाऊ रामचंद्र खानविलकर फौज जमा करून नांदोस येथून कोल्हापूरच्या फौजेला घालवून देण्यासाठी त्याने करवीरकरांच्या फौजेवर हल्ला केला. यशवंतगड व निवती हे किल्ले पुन्हा सावंतवाडीकरांच्या ताब्यात गेले. एवढेच नव्हे तर सावंतवाडीकरांच्या फौजेने भरतगडालाही वेढा दिला होता. परंतु तेवढयात कोल्हापूरहून आणि मालवणकडून करवीरकरांच्या सैन्याला मदत आली[४७]. या मदतीमुळेच घाबरून जाऊन वाडीकरांनी आपली फौज भरतगडचा वेढा उठवून माघारी नेली. फोंडसावंतास करवीरकरांचा आश्रय मिळवूनही सावंतवाडीची गादी मिळाली नव्हती.

याअगोदर करवीरकर नुकतेच वाडीच्या प्रदेशात हल्ले करीत आणि हल्ले करून वाडीकरांचा प्रदेश जेवढा घेता येईल तेवढा काबीज करण्यात नेहमीच दंग होते. त्यांनी फोंडसावंताला मदतीचे आमीष दाखवून फक्त आपला स्वार्थ साधण्याचाच प्रयत्न केला होता. परंतु फोंडसावंताला गादी मात्र मिळवून दिली नाही.[४८] फोंडसावंत व त्याचे विरोधक यांच्यात कायमच संघर्ष किंवा अंतर्गत कलह चालू रहावा व त्याचा फायदा आपण उठवून आपल्या राज्याच्या सिमा वाढवून विस्तार करावा हा स्वार्थी हेतू करवीरकरांच्या डोळ्यासमोर असल्यामुळेच केवळ फोंडसावंत व त्याचे विरोधक यांच्यातील कलहास त्यांनी नेहमीच उत्तेजन दिलेले दिसते. नाहीतर जर करवीरकरांना शांतता हवी असती तर लगेच ते वाडीकरांमध्ये असलेले अंतर्गत कलह मध्यस्थी करून संपुष्टात आणू शकले असते आणि वाडीचे राज्य स्थिर करून जनतेलाही दिलासा मिळाला असता परंतु करवीरकरांना तसे नको होते[४९].

चौकुळीची लढाई (१८०७):-

सावंतवाडीकरांच्या घरातील भाउबंदकी अद्याप मिटली नव्हती. करवीरकर व सावंतवाडीकर यांच्यात लढाई मागून लढाई होत होती. परंतु या संघर्षात करवीरकर थोड्याफार फरकाने जड पडत असत. फोंडसावंत आवश्यकता पडेल तेव्हा करवीरकरांकडे मदतीची याचना करीत असे. सावंताच्या फौजेने भरत गडास वेढा दिला, असतांना मालवणहून करवीरकरांचे सैन्य भरतगडाकडे आले तेव्हा वाडीकरांनी हे सैन्य येण्याच्या आगोदरच वेढा उठविला होता. रत्नाकरपंत व शिवाजीराजे ३००० सैन्य घेऊन हणमंत घाटाने महादेवगडा नजीक पोहचले. पुढे चौकुळी येथे मात्र सावंतवाडीच्या फौजा व करवीरकरांच्या फौजा यांच्यात घनघोर लढाई झाली. या लढाईत सावंतवाडीकरांच्या सैन्याचा दणदणीत पराभव झाला. करवीरकरांचा विजय झाल्यानंतर लगेच त्यांच्या सैन्याने सावंतवाडीच्या कोटास वेढा दिला. यावेळी पुन्हा कोटाचा मुख्य द्वाराजवळ दोन्हीही

फौजांमध्ये मोठी लढाई झाली. या लढाईमध्ये करवीरकरांचे बरेच सरदार मृत्यूमुखी पडले. त्यामुळे करवीरकरांनी लगेच आपल्या फौजेस वेढा एप्रिल, १८०७ रोजी उठावावा लागला. सन १८१० मध्ये पुन्हा रेड्डी व निवती वाडीकरांच्या ताब्यात आले[४९].

इ.स. १८०८ मध्ये लक्ष्मीबाईचे निधन झाले. व सावंतवाडी राज्याचा कारभार राणी दुर्गाबाई हिच्याकडे आला. दरम्यान करवीरकर वाडीच्या राजधानीपर्यन्त पोहोचले होते. परंतु वाडीकरांनीही नंतर बघ्याची भूमिका सोडली आणि पोर्तुगीजांची मदत घेऊन करवीरकरांच्या ताब्यातील भरतगड यशवंतगड आणि कुडाळचे खंदक परत मिळविले आता फक्त वाडीचा किल्लाच करवीरकरांच्या ताब्यात राहिला होता. तोही घेण्याचा प्रयत्न चालू होता. या दरम्यान वाडीकरांनी आपले सैन्य वाढविले व करवीरकरांच्या प्रदेशात जाऊन उपसर्ग देण्यास सुरवात केली. त्यामुळेच केवळ करवीरकरांना शह बसला. शेवटपर्यन्त सावंतवाडीकर व करवीरकर यांच्यातील संघर्ष संपुष्टात आला नाही, तर एकमेकात नेहमीच वैमनस्याचे वातावरण होते. काही काळ शांतता निर्माण झाली की, लगेच पुन्हा अशांतता निर्माण करण्याचे काम करवीरकर करीत असत. वास्तविक पहाता करवीरकरांनी सावंतवाडीकरांना शत्रू न समजता त्यांच्याशी जवळीक साधली असती तर दोन्हीही संस्थानांचे अस्तित्व अधिक काळ टिकू शकले असते व पुढे इंग्रजांना वाव मिळाला नसता[५०].

सुरवातीला सिंधू दुर्गाच्या समोरील प्रदेशाचे स्वामित्व सावंतवाडी करांकडे होते. छत्रपती शिवाजीने त्यांच्याकडून मालवण घेतले पण करवीरकरांकडे मालवणचा ताबा आल्यानंतर सावंतवाडीकर व करवीरकर यांचा भांडणातच पुष्कळ वेळ गेला, खरे म्हटले तर मसुऱ्याचे अर्धे उत्पन्न व किल्ला हे सावंतवाडीकरांच्याच मालकीचे होते, पण कोल्हापूरकरांच्या सैनिकांनी डावपेच आखून तेथील किल्लेदारास लाच देऊन हा किल्ला

१८०८ मध्ये आपल्या स्वतःच्या अधिप-त्याखाली आणला. मसुरे, मालवणच्या वायव्येस १६ कि.मी. आहे. मसुरे तर्फ अतिशय सधन असुन तो गिळंकृत करण्यासाठी करवीरकरांनी सावंतवाडीकरांविरूध्द बरीच कारस्थाने केली. या मसुरे गांवचा ~~भरतगड~~ किल्ला आपल्या ताब्यात असावा यासाठीही करवीरकरांनी वाटेल ते मार्ग अवलंबिले. परंतु सावंतवाडीकरांनीही खंबीरपणे त्यांना तोंड दिले. या दोन्हीही स-तांच्या संघर्षामुळे त्या प्रदेशातील जनतेचे हाल होत असे, जनतेने शेतात केलेली पिकेही तुडवून त्यांचे नुकसान होत असे. पिकांची नासधूस झाल्यामुळे उत्पादनातही घट होऊ लागली होती[५१].

कोल्हापूरकर व सावंतवाडीकर यांचे संबंध वैमनस्याचे होते. परंतु इंग्रजांनी मात्र बघ्याची भूमिका न घेता करवीरकरांनाच सावंतवाडीकरांपेक्षा जास्त मदत केली आणि वाडीकरांचा प्रदेश घेण्याची जेव्हा जेव्हा संधी आली ती न चुकविता तो प्रदेश घेत राहिले. करवीरकर व सावंतवाडीकर हे नेहमी चालत आलेल्या संघर्षामुळे कमकुवत झाले. त्यामुळे इंग्रजांनी या उभय पक्षांमध्ये अडत्याची भूमिका बजावली व आपला स्वतःचा फायदा करून घेतला. सावंत व करवीरकर यांच्यात जर भांडणे उपस्थित झाली तर इंग्रज सरकारने त्याची दखल घ्यावी आणि फैसला करावा असे त्यांच्यात ठरले. होते. थोडक्यात म्हणजे या काळात इंग्रज हिंदूस्थानातील सर्वच संघर्षमय संस्थानाचे मध्यस्थी म्हणून भूमिका बजावित असत. करवीरकरांनी इंग्रजांकडे सावंताबद्दल म्हणणे मांडले ते इंग्रजांनी ऐकून नरसिंहगड, प्रसिध्दगड, (रांगणा) व भरतगड हे किल्ले लगेच वाडीकरांकडून करवीरकरांच्या ताब्यात दिले परंतु किल्ल्यांच्या खर्चासाठी जो वसूल गोळा होत होता तो मात्र करवीरकरांकडे दिला नाही, त्यामुळे पुन्हा वाद निर्माण झाला वाडीकरांनी काही गाँवांचा लगेच वसूलही करून घेतला[५२]. शेवटी मुंबईच्या गव्हर्नराने याबाबतीत पूर्ण चौकशी करून किल्ल्यांच्या सर्व खर्चासाठी कांही गांवे करवीरकरांना

तोडून द्यावी असे ठरले. इ.स.१८११ मध्ये एल्फीन्स्टन कोल्हापूरवर स्वारी करण्यासाठी आपली फौज घेऊन निघाला ही बातमी करवीरकरांना कळताच करवीरकरांनी असे म्हटले की " आपल्या सरहद्दीवरील निपाणीकर व सावंतवाडीकर यांच्या हमेशा कटकटी चालल्या आहेत. त्यांचा उलगडा पेशवे दरबारातून होत नाही" म्हणजे करवीरकरांना वाडीकरांशी कटकटी किंवा संघर्ष करण्याचा कंटाळा आला होता असे दिसते. इंग्रजांची स्वारी होणार हे लक्षात आल्यावर वाडीकरांशी असलेला संघर्षही मिटवून एकत्र येऊन इंग्रजांशी लढावे असेही करवीरकरांना वाटत होते. परंतु वाडीकर या गोष्टीस तयार नव्हते. तर याउलट इ.स. १८१३ त पुन्हा वाडीकरांनी करवीरकरांच्या ताब्यात असलेला भरतगडही घेतला. ख-या अर्थाने इंग्रजांना आता संपूर्ण कोकणचा प्रदेश व किनारपट्टी ताब्यात घ्यावयाची होती त्यामुळेच स्थानिक संस्थानिकांमध्ये कलह निर्माण करून ते तसेच चालू रहाण्यासाठी प्रयत्नही चालू ठेवले व त्याचा फायदा, सांगो आपले साम्राज्य वाढविण्यासाठी घेतला[53].

शेवटी सावंत व करवीरकर यांच्यातील संघर्षाचा फायदा इंग्रजांनी पुरेपूर घेतला व दोन्हीही संस्थाने शेवटी आपल्या अधिप-त्याखाली आणली, करवीरकर व सावंत यांच्यातील संघर्ष हा इंग्रजांच्या हस्तक्षेपानंतर बराच काळ म्हणजे जवळ जवळ इ.स.१८४३ पर्यन्त चालला होता. परंतु नंतर मात्र हे संस्थानिक नामधारी बनले व इंग्रज राज्यकर्ते झाले. इ.स.१८३५ मध्ये करवीरकरांनी, इंग्रजांनी हस्तक्षेप केलेला असतांना सुध्दा वाडीकरांच्या प्रदेशात आपले मामलेदार पाठवून त्यांनी नवीन नाके बसवून कर वसुली घेण्यास सुरवात केली होती तेव्हा वाडीकरांनी जवळच्या सुभ्याच्या म्हणजे धारवाडच्या इंग्रज पोलिटिकल एजंटला कळविले नंतर त्या एजंटाने लगेच करवीरकरांना तशाप्रकारे कर घेण्याचे बंद करावे व नाके उठवावे असा आदेश दिला होता[54]. परंतु एकच वर्षानंतर म्हणजे

इ.स. १८३६ मध्ये कर्नाटक प्रांताच्या पोलिटीकल एजंटने करवीरकरांच्या मागणीला दुजोरा देऊन मनोहरगड येथे सावंतवाडीकरांनी निर्माण केलेला गोंधळ व अशांतता यांचा बंदोबस्त करण्याचे करवीरकरांना आश्वासन देऊन तशाप्रकारे मनोहरगड प्रांताचा बंदोबस्तही केला. म्हणजे करवीरकर व सावंतवाडीकर यांच्यातील दुवा म्हणजे इंग्रज सरकार होते असे म्हणता येईल[55].

१ एस्. एम्. गर्गे, क. रि. पू. ७९-८०

२ शिवसा, ख. १३ लेख ७८ शिवचरित्रसा.

३ देसाई, क.प्र. व.पो. पृ. ४

४ राजवाडे, खं. ८ ले. ६ पृ. ८४-८५

५ राजवाडे, खं. ८ ले. पृ. ८४-८५

६ शिवसा, ख. १३, ले. ७८

७ नि. द. रू. ३. पु. कृ. २ कोल्हापूर रेकॉर्ड ऑफिस.

८ कि-ता.

९ कि-ता.

१० निद, अ, (१८३८४)

११ निद, अ. १८३८४

१२ निद, रू. ६९, पु. १(११२१६)

१३ निद, रू. १५३, पु. १ (१ २८५) [illegible]

१४ निद, पु. १ (११२१८)

१५ निद, पु. ११, २१७

१६ Pissurlekar, Assemetosto Conselho do Estado Vol.V. Documents-88.

१७ सबनीस, पंअबाद, पृ. २९२-८३

१८ निद, रू. ६९, पु. १ (११२११५)

१९ सबनिस, पंअबाद, पृ. १३२

२० शिवसा, ऐ. खं. १३ पृ. ४४

२१ निद, अं, (१८३६०)

२२ निद, रुक. ४ पु. कृ. १-५५७

२३ Tretadose concertos de Pazes, Tomo VIII p.327-244.

२४ Tec de p.T VIII 237-244

२५ कि-ता.

२६ कि-ता.

२७ Livro 2 de Pazes, p.308

२८ Tretadose Concrtos de Pazes, Tomo VIII,Pg.209-310

२९ कि–ता.

३० निद, रुक. १०, ३२७

३१ कि–ता.

३२ निद, रु. कु. ४८, ७४३३

३३ कि–ता.

३४ शिचसा, खं. १३, पृ. ९७–९८

३५ शिचसा, खं. १३, पृ. ९८–१००

३६ Moncoes do Reino No.170, page 27.

३७ कि–ता.

३८ Moncoes do Reino No.175 p.19

३९ पोद, २, पृ. १११

४० शिचसा, १३ पृ. ११२

४१ ऐलेसं, पृ. ४६–६०

४२ ऐलेस, पृ. ४६–६३

४३ गुजर, कछपई सा, ४ ले, ८६ पृ. ७३

४४ निद, अ. २९७

४५ निद, अ. २९७

४६ कि–ता

४७ गुजर, मा. वी, क. छपडसा, पृ. २८५–८६

४८ कि–ता.

४९ भाईसंत्रे, पृ. ६३

५० कि–ता.

५१ भाईसंत्रे, पृ. ६३

५२ कछप्पइसा, पृ. ३२७–२८ गुजर

५३ भाईसंत्रे, पृ. ५०

५४ निद, अ. १६१३५

५५ निद, अ, १५५३१

प्रकरण ४ थे

सावंत - इंग्रज संबंध

सावंतवाडीकर व करवीरकर हे पश्चिम किनारपट्टीवर चाचेगीरी करीत असत, या चाचेगीरीचा इंग्रजांना त्रास होऊ लागला. त्यामुळे त्यांनी सावंतवाडीकरांचा बंदोबस्त केल्यानंतर त्यांच्याशी १२ जानेवारी १७६६ मध्ये करार करुन चाचेगीरी न करण्याचे आश्वासनही घेतले. दरम्यानच्या काळात इंग्रजांनी बंगाल प्रांतात आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. आणि हळू हळू ते एक एक प्रांत गिळंकृत करु लागले होते. त्यामुळे कंपनी एक राजकीय सत्ता बनली. हिंदुस्थानात प्राचीन काळापासून लहान लहान राज्ये अस्तित्वात होती. त्यामुळे ती कधीही बळकट झाली नाहीत म्हणूनच इंग्रजांनी या सर्व संस्थानिकांना एकछत्री अंमलाखाली आणण्याचा प्रयत्न केला आणि पुढे चालून इंग्रजच या देशाचे सार्वभौम सत्ताधिश बनले. या संस्थानापैकीच सावंतवाडी हे एक स्वतंत्र संस्थान होते ते ही इंग्रजांनी घेण्यासाठी प्रयत्न सुरु केले होते. इंग्रजांनी सुरु केलेली तैनाती फौजेची पध्दत म्हणजे हिंदुस्थानातील संस्थानिक राज्यकर्त्यांवर एक प्रकारे आघातच होता. संस्थानिकांच्या आपापसातील झगडयांचा फायदा इंग्रजांनी घेऊन सर्व संस्थाने खालसा करुन ब्रिटीश साम्राज्य कन्याकुमारीपासून तर काश्मिरपर्यन्त निर्माण केले होते[१]. इंग्रजांनी हिंदुस्थानातील सर्व परकीय सत्तांना ही राजकीय सत्तास्पर्धेत हरविले होते. उदा. फ्रेंचासारखे परकिय विरोधकही इंग्रजांकडून पराभूत झाले होते व त्यांनी हिंदूस्थानातून काढता पाय घेतला होता. याचवेळी संपूर्ण जगावर इंग्रजांचे वर्चस्व होते. म्हणूनच इंग्रज्यांच्या साम्राज्यात सूर्य मावळत नव्हता असे म्हटले जात होते. सावंतवाडीकरांवर तसे अगोदर पोर्तुगीजांचे अप्रत्यक्ष वर्चस्व होते परंतू इंग्रजांनी जेव्हा महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर नजरा घालण्यास सुरवात केली तेव्हा पोर्तुगीजांना राज्यविस्तार करण्याच्या स्पर्धेतून मागे हटविले व इतर प्रदेशाप्रमाणेच सावंतवाडी संस्थानातही घुसखोरी केली.

व त्यांच्यावर आपले पूर्णपणे वर्चस्व प्रस्थापित केले. सावंतवाडीकर व इंग्रज यांचे तसे १६७४ पासूनचे संबंध आहे. वाडीकरांच्या मालकीच्या तरांडयाने इंग्रजांचे मालवाहू जहाज लुटून जहाजावरील लोकांशी लढाई केली व ~~स्रोत~~ इंग्रज लोकांचा पराभव केला. यावेळी त्यांना पुढील काळात इंग्रज एवढे बलशाली होतील याची कल्पना नव्हती. इ.स. १७६६ मध्ये इंग्रज व सावंत यांच्यात तह झाला या तहापूर्वीही १७३० मध्ये सावंतवाडीकर व इंग्रज यांच्यात एक तह झाला होता. यापूर्वी इ.स. १७२० मध्येही वाडीकरांनी इंग्रजांशी आंग्र्याच्या विरुध्द तह केला होता. इ.स. १७३० मध्ये उभयंतामध्ये झालेला तह हा पूर्णपणे इंग्रजांच्या स्वार्थाचा होता. तर कुलाबांमध्ये फक्त इंग्रजांनी समान शत्रूचे म्हणजे आंग्रेचे कोट किल्ले घेतले तर सावंतांना दिले जातील असे लिहीले होते परंतू प्रत्यक्षात सावंत वाडीकरांना काहीच मिळाले नाही. या उलट त्यांचाच प्रदेश इंग्रजांनी हळू हळू घेतला[2]. इ.स. १७३० चा इंग्रजांनी वाडीकरांशी तह करण्याचे महत्वाचे कारण म्हणजे इंग्रजांचा व्यापार सुरळीत चालावा, मालवाहू जहाजे सुरक्षित यावेत व जहाजांना पश्चिम किनारपट्टीवर सुरक्षितता लाभावी यासाठीच वाडीकरांशी तह केला होता. एवढेच नव्हे तर इंग्रजांच्या मालावर सावंतवाडीकरांनी कर लादू नये असेही या तहात कलम होते. म्हणजे इंग्रजांनी मदतीचे आश्वासन देऊन वाडीकरांना एक प्रकारे आपले व्यापारी रक्षक म्हणून काम करण्यास भाग पाडले होते. व्यापाराचे निमित्त करूनच इंग्रजांनी प्रारंभी पश्चिम किनारपट्टी आपल्या वर्चस्वाखाली आणली आणि हळु हळु संपूर्ण कोकणप्रांत सावंतवाडी राज्यासह गिळंकृत करण्याचे प्रयत्न सुरु केले. त्यासाठी वाडीकरांशी अनेक तह करार करून वाडीच्या राज्यात व्यापारी सवलती मिळविल्या व नंतर राजकिय वर्चस्व प्रस्थापित केले.

परंतु वाडीकरांनाही तसे पहाता या काळात मित्र मिळविणे गरजेचे होते कारण वाडीकरांचे याचदरम्यान आंग्रेबरोबर युध्द सुरू होते, ते संपुष्टात येते कुठे नाहीतर लगेच कोल्हापूरकरांशी संघर्ष सुरू झाला, कुडाळच्या देसायांशीही चकमकी उडत होत्या, पश्चिमेकडे पोर्तुगीजही आता वाडीकरांचे कडवे शत्रू बनले होते. या सर्व शत्रूंशी तोंड देण्यासाठी यातून काहीतरी मार्ग काढावयाचा म्हणून वाडीकरांनी इंग्रजांचा आश्रय घेतला व त्यांच्याशी तह केला आणि वाडीसंस्थानवर जे न टळणारे संकट आले होते ते टाळण्याचा अल्पकाळ यशस्वी प्रयत्न केला. वाडीकरांना इंग्रज सोडून इतरांशी संघर्ष करतांना इंग्रजांकडून मिळालेल्या तोफाच फक्त उपयोगी पडल्या अन्यथा संपूर्ण तह इंग्रजांच्या फायद्याचाच होता[3].

सावंतांची गलबते भस्मसात : १७४८ :-

इ.स. १७३० मध्ये उभयतांमध्ये झालेला तह अल्पकाळ टिकला. सावंतवाडीकरांना समुद्रावर चाचेगीरी करण्याची सवय असल्याने ते इंग्रजांच्या तहाने जास्त काळ बांधले नाही कारण वाडीकरांनी लगेच इंग्रजांची मालाने भरलेली जहाजे लुटली व माल आपल्या राज्यात पाठवून रिकामी गलबते इंग्रजांकडे पाठवून दिली. साहजिकच इंग्रज चिडले त्यांनी लगेच वेंगुर्ले येथे ~~येथे~~ दिसलेली सावंतवाडीकरांची दोन गलबते जानेवारी, १७४८ स भस्मसात केली. वाडीकरांची गलबते जळाल्याने वाडीकरांचे आतोनात आर्थिक नुकसान झाले कारण गलबते तयार करण्यासाठी अतिशय खर्च सोसावा लागत असे. परंतू इंग्रजांनी वाडीकरांवर बरोबर आपला सूड उगवला व वाडीकरांनी लुटलेल्या मालाची भरपाई करून घेतली. थोडक्यात म्हणजे आपला स्वतःचा स्वार्थ साधण्याचे जे धोरण होते ते वाडीकरांचे तर होतेच परंतू इंग्रजांचेही स्वार्थी धोरण होते. एकमेकांशी तह करणे, करार करणे, बोलणी करणे ते फक्त आपापल्या स्वार्थासाठीच होते. एकमेकांच्या संबंधाचा फायदा फक्त आपल्या स्वार्थासाठीच करून घेण्याचे दोघांचेही दृष्टिकोन होते[4]. परंतु सावंतवाडीकरांपेक्षा इंग्रज अतिशय चतुर, धोरणी, प्रसंगावधान साधणारे असल्यामुळे वेळोवेळी वाडीकरांना मागे हटावे लागले.

इंग्रजांनी वाडीकरांचा रेड्डी किल्ला घेतला (१७६५-६६) :-

इ.स. १७५६ मध्ये इंग्रज व पेशवे यांनी मिळून आंग्र्यांच्या अजिंक्य आरमाराचा पाडाव केला. परंतू यानंतर पश्चिम किनारपट्टीवर पेशव्यांची आरमारी सत्ता वाढण्याऐवजी इंग्रजांची आरमारी सत्ता या भागावर वाढू लागली व पुढील काळात इंग्रजच कोकण किनाऱ्याचे सत्ताधिश बनले याच दरम्यान सावंतवाडीकरांनी पुन्हा आपली सवय न सोडता समुद्रावर चाचेगीरीस आरंभ केला. इंग्रजांच्या व्यापाराला धोका निर्माण झाला. त्यामुळे इंग्रज व वाडीकर यांच्यात बेबनाव होऊ लागला. उभयतांमध्ये पहिली लढाई झाली तीत वाडीकरांनी पेशव्यांनी मदत केल्यामुळे त्यांनी इंग्रजांचा पराभव केला. त्यामुळे इंग्रजांची सुरवातीला नाचक्की झाली. इंग्रजांना आता वाडीकरांवर सुड उगवावयाचा होता. त्यांना काहीतरी निमित्त हवे होते; पण ते सापडेना. शेवटी सावंतवाडीकरांची चाचेगीरी हे इंग्रजांना निमित्त मिळाल्याने त्यांनी वाडीकरांवर हल्ला केला. पहिल्यांदा मालवण घेतले नंतर लगेच रेड्डीचा किल्ला इंग्रजांनी सावंतवाडीकरांना परत करून त्याच्या मोबदल्यात मसूरी स्वतःकडे घेतला. या लढाईत मात्र वाडीकरांचा निर्णायक पराभव झाला होता[5]. सावंत-इंग्रज यांच्या संघर्षानंतर त्यांच्यात जो तह झाला त्यातील सर्व अटी इंग्रजांनी ठरविल्या व तहावर सावंतवाडीकरांनी फक्त सही करून त्यांच्यावर लादलेला तह गुपचूप मान्य केला होता. या तहाने सावंतवाडीकरांवर एक लक्ष रुपयांची युध्दखंडणी लादली होती. एवढेच काय पण या तहाने सावंतवाडीकरांचे आरमारही पूर्णपणे संपूष्टात आले होते. कारण वाडीकरांनी आपल्या पदरी आरमार ठेऊ नये असे तहात इंग्रजांनी कलमच घातले होते व ते सावंतवाडीकरांना मान्यही होते. म्हणजे आपल्या राज्याचे संरक्षण करण्यासाठीही सावंतवाडीकर आता आरमार ठेऊ शकत नव्हते. इंग्रजांनी वाडीकरांवर आरमार ठेवु नये असे बंधन घातले त्यामुळे वाडीकर आता हताश झाले, त्यामुळेच जलमार्गाच्या बाजूने वाडीकर स्वसंरक्षणही देखील करु शकणार नव्हते. वाडीकरांचे स्वातंत्र आता हळू हळू इंग्रज काढून घेत होते. ७ एप्रिल, १७६५-६६ च्या तहानेच

इंग्रजांनी सावंतवाडीकरांच्या रेड्डी किल्ल्यात व आजूबाजूच्या प्रदेशात आपला रेसिडेंट पाठविला व तेथील सर्व सत्ता त्या रेसिडेंटच्या हातात सुपूर्त केली. अशाच प्रकारे इंग्रजांनी वाडीकरांचा थोडा थोडा प्रदेश, किल्ले, कोट, नद्या, स्वत:च्या ताब्यात घेतले व सावंतवाडीकरांना शेवटी आपले मांडलीकत्व स्विकारण्यास भाग पाडले. परंतू सावंतवाडीकरांनी अजूनही चाचेगीरी करण्याचा धंदा सोडला नव्हता. तह झाला म्हणजे तात्पूरती चाचेगीरी बंद होत असे व नंतर काही दिवसांनी लगेच वाडीकर चाचेगीरी सुरू करीत[६]. त्यानुसार सावंतवाडीकरांनी हा तह देखील जास्त दिवस पाळला नाही. तहाच्या अटी पायदळी तुडवून त्यांनी लगेच पुन्हा आपला चाचेगीरीचा व्यवसाय सुरू केला. लगेच इंग्रजांनी सावंतांकडे आपले लक्ष वळविले. इंग्रज आता आपल्याशी संघर्ष करून आपली नाचक्की होणार हे ओळखून सावंतवाडीकरांनी ताबडतोब इंग्रजांकडे तहाची मागणी कळविण्यास आपला वकील पाठविला. इंग्रजांनी वाडीकरांची मागणी लक्षात घेऊन लगेच त्यांच्याशी तहाच्या वाटाघाटी २४ ऑक्टोबर १७६६ रोजी संपविल्या. या तहानुसार पुन्हा वाडीकरांवर २ लाख रुपये खंडणी इंग्रजांना देण्याचा बोजा पडला. या खंडणीची परतफेड झाल्यानंतरच कदाचित रेड्डीचा किल्ला पुन्हा वाडीकरांच्या ताब्यात दिला जाईल अशी अट घातली होती. ठरल्याप्रमाणे सावंतवाडीकरांनी इंग्रजांच्या खंडणीची परत फेड केली आणि तहानुसार सावंतवाडीकरांना रेड्डीचा किल्लाही इंग्रजांनी पुन्हा परत केला. वरील घडामोडी होत असतानाच माधवराव पेशवे पुण्याच्या गादीवर होते. त्यांनी या घडामोडींकडे मात्र दुर्लक्ष केले होते, कारण पानिपतच्या युध्दात मराठ्यांचा दारूण पराभव झाला होता. त्याची पेशव्यांना भरपाई करावयाची असल्याने वाडीकरांनी पेशव्यांना बोलावूनही ते आले नाही[७].

<u>खेमसावंत व इंग्रज</u> :-

खेमसावंत तिसरे यांनी १७५५ मध्ये वाडीसंस्थानचा राज्यकारभार राजा म्हणून आपल्या ताब्यात घेतला. यांच्याच कारकिर्दीकाळात वाडी सरकारने

राज्याच्या विस्ताराचा प्रयत्न केला व सर्वक्षेत्रात नेत्रदिपक प्रगती साधली होती. खेमसावंतांच्या काळात वाडीकरांनी समुद्रावर कोणाचेही जहाज लुटण्यास मागे पुढे पाहिले नाही. म्हणजेच वाडीकर चाचेगीरी करीत असत. त्यांच्या प्रमाणेच करवीरकरही चाचेगीरी करीत असत. सावंत व करवीरकर या दोघांचीही चाचेगीरी बंद करून इंग्रजांनी १७९२ पासूनच ख-या अर्थाने पश्चिम किनारपट्टीवर स-ता वाढविण्यास सुरवात केली[८].
इंग्रजांचे मालाने पूर्ण भरलेले जहाज खेमसावंतांच्या लोकांनी पकडून रेड्डीच्या खाडीत आणले. जहाजाच्या नावीकाला त्यांनी ठार मारले. ही बातमी इंग्रजांना समजताच त्यांना सावंतवाडीकरांचा क्रोध आला आणि वाडीकर खेमसावंत यांनी या वेळी महादजी शिन्दे यांना विनंती करून त्यांना मध्यस्थी करण्यास सांगितले. खेमसावंतांच्या विनंती नुसार महादजी शिन्दे यांनी परस्परच इंग्रजांशी संधान साधून मिटविण्याचा प्रयत्न केला, परंतु इंग्रजांनी महादजी शिंद्याचे म्हणणेही मानले नाही. महादजी शिन्दे यांनी इंग्रज वकीलास लिहीले की परस्पर वाडी संस्थानास कोणत्याही प्रकारे उपसर्ग करू नये, त्यांचेसंबंधी आम्हास विचारा, परंतु महादजी शिंदाना न विचारता इंग्रज सरकारने ऑक्टोबर,१७९९ मध्ये कुठलाही विचार न करता[९] आपली लढाऊ जहाजे व सैन्य खुजगी येथे उतरविले व परस्पर सावंतवाडीकरांशी संघर्ष करून आपली वसुली केली. यावरून असे सिध्द होते की सावंतवाडीकर नेहमीच चाचेगीरी करून इंग्रजांना त्रास देत असत. खेमसावंताने तरी विचार करून इंग्रजांच्या जहाजांना उपसर्ग पोहचणार नाही असे वागावयास हवे होते.परंतु याउलट खेमसावंताने आपल्या आरमाराला पूर्णपणे समुद्रावर चाचेगीरी करण्याची परवानगी दिलेली होती. जर खेमसावंताने चाचेगीरी बंद केली असती तर कदाचित त्यांचे इंग्रजांशी संबंध ही सुधारले असते. चाचेगीरीच्या मोबदल्यात इंग्रजांनी सावंतवाडीकरांवर अनेक जाचक असे तह लादले होते. तरीसुध्दा सावंतवाडीकरांच्या सरदारांनी व आरमाराने चाचेगीरी करण्याचे

थांबविले नव्हते तर याउलट त्यांच्या चाचेगीरीचे प्रमाण पहिल्यापेक्षा वाढले होते. म्हणजेच चाचेगीरी केल्याशिवाय सावंतवाडीकरांना चैन पडत नव्हते. इंग्रजांनी त्यांचा बराच प्रदेश आपल्या घशात घातला तरीही त्यांनी अद्याप आपली सवय टाकली नाही तर उलट तिच्यात वाढ झाली. याचा परिणाम त्यांच्या राज्याचा विकास खुंटण्यावर झाला व परकियांशी संबंध बिघडण्यावरही झाला[१०]. सावंतवाडीकरांनी जर चाचेगीरी वेळीच बंद केली असती तर इंग्रजांची मदत घेऊन त्यांना गोव्यात राज्यविस्तार करता आलाँ असता. परंतु तसे झाले नाही.

मालवणची इंग्रजांकडून नाकेबंदी १८०२ :-

इ. स. १८०२ मध्ये इंग्रजांनी मालवण घेण्याची गरज भासली, त्यानुसार त्यांनी मालवणची नाकेबंदी करण्याचा विचार केला. मालवण बंदर व्यापाराचे केंद्र समजले जात होते. त्यामुळेच ते आपल्या ताब्यात असावे असे इंग्रजांना वाटले. पोर्तुगीजांनाही मालवण बंदर व्यापाराच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे वाटत होते. परंतू इंग्रज सत्ता पोर्तुगीजांपेक्षा सर्व दृष्टिने बलशाली असल्यामुळे पोर्तुगीजांनी मालवणाचा नाद सोडला. इंग्रजांनी मात्र आपले आरमार मालवण बंदरात आणले व लगेच बंदराची सर्व बाजूंनी नाकेबंदी केली. संपूर्ण बंदरावरील अधिकार इंग्रजांनी आपल्याकडे घेऊन मालवण बंदर व आजूबाजूच्या मुलुखावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आणि तेथून वाडीकर व पोर्तुगीज यांना माघार घ्यावी लागली. यावेळी पोर्तुगीजांनी माघार घेतल्यामुळे पोर्तुगीजांची सत्ता फक्त गोवा, दीव, दमन, पर्यन्तच मर्यादीत राहिली व इंग्रजांनी मात्र संपूर्ण हिंदुस्थानावर कब्जा मिळवला. करवीरकरही किनारपट्टीवरून मागे हटले होते. मालवण बंदरांची नाकेबंदी झाली तेव्हा मालवणचा तत्कालीन सावंतवाडीकरांचा सुभेदार सितारामराव भोसले यांने मुंबई सरकारला याबाबतीत दाद मागण्यासाठी पत्र लिहीले परंतू कंपनी सरकारचा वाडीकरांवर राग

होता आणि मालवणकर यांना मालकी हक्कही पुनःस्थापित करावयाचा होता. त्यामुळे सुभेदारास कोणत्याही प्रकारे उत्तर न देता ब्रिटीशांनी मालवणवर आपले अधिपत्य निर्माण केले[११].

इंग्रजांनी मालवणवर आपला ताबा मिळवला तेंव्हा तर विल्यम क्लार्क नांवाचा गोवेकर पोर्तुगीजांचा वकील मालवणला होता त्यानेही आपल्या सरकारच्या म्हणण्यानुसार इंग्रजांचे त्यावेळचे गव्हर्नर जोनाथन डंकन्‌यास मालवणची नाकेबंदी उठविण्यासाठी विनंती केली. तेव्हा या विनंतीचे इंग्रज गव्हर्नरने नकारात्मक उत्तर देऊन मालवणच नव्हे तर सुवर्णदुर्ग, रेडी आणि वसई या बंदरांचीही मुंबई सरकार नाकेबंदी करणार असल्याचे सांगितले. परंतु नाकेबंदी उठविली नाही. त्यामुळे वाडीकरांचे देखील बरेच नुकसान झाले. इ.स. १८०४ मध्ये करवीरकरांनी देखील नाकेबंदी उठविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. शेवटी इ.स. १८०६ मध्ये इंग्रजांनी मालवण बंदराची केलेली नाकेबंदी उठविल्याचे जाहिर केले. इ.स. १८०७ मध्ये इंग्रज सरकार व सावंतवाडीकर यांचे पुन्हा संबंध बिघडले तेव्हा इंग्रजांनी इ.स. १८०८ मध्ये उठवलेली नाकेबंदी पुर्ववत करण्यांत आल्याची घोषणा केली. करवीरकरांचेही या नाकेबंदीने अतोनात नुकसान झाले होते. या नाकेबंदीने मात्र इंग्रज व पोर्तुगीज यांच्यातील संबंध बिघडून एकमेकात वितुष्ट निर्माण झाले होते[१२].

इंग्रजांनी मालवण बंदराची केलेली नाकेबंदी त्यांच्या फायद्याची ठरली. मालवणची नाकेबंदी जाहिर केल्याबरोबर सावंतवाडी आणि कोल्हापूरकर यांचा इंग्रजांना होणारा त्रास कमी होऊन इंग्रजांची व्यापारी जहाजे माल घेऊन सुखरुप किनाऱ्यावर येऊन उतरू लागली. नाकेबंदीमुळे इतर परदेशी व्यापाऱ्यांचा देखील व्यापारही आपोआप बंद झाला. तेव्हा आता फक्त इंग्रजांचाच या बंदरात व्यापार सुरु होता. इंग्रजांच्या व्यापाराला यामुळे जोरदार चालना मिळाली. व्यापार भरभराटीला येऊन त्यांच्या वस्तूंना बाजारात नैसर्गिक मागणी वाढू लागली. कारण बाजारात इंग्रज मालाला स्पर्धा करणारा कोणत्याही व्यापाऱ्याचा माल येत नव्हता. तेव्हा आता

व्यापारातील स्पर्धा संपुष्टात येऊन इंग्रजांचीच मालवणच्या बंदरात व्यापारी मक्तेदारी उरली होती. म्हणूनच मालवणची बाजार पेठही इंग्रजांनी आता हुकमी बाजारपेठ बनविली होती. हवा तेवढा नफा इंग्रज व्यापाऱ्यांनी या मालवण बंदराच्या नाकेबंदीमुळे मिळवून घेतला होता. परंतु त्यांनी यावेळी इतर सत्ताधिशांचा व त्यांच्या व्यापाराचा तीळमात्रही विचार केला नाही[१३].

खरे म्हणजे मालवण बंदर हे इंग्रजांच्या ताब्यात गेले नसते, व तेथे त्यांचे वर्चस्वही निर्माण झाले नसते; परंतु मालवणवरून करवीरकर व सावंतवाडीकर यांच्यात संघर्ष सुरू होता. वाडीकरांना मालवणवर आपले वर्चस्व असणे गरजेचे वाटत होते. तेंव्हा उभयंतामध्ये तीव्र संघर्ष सुरू झाल्यानंतर या संघर्षाचा फायदा धुर्त इंग्रजांनी उठविला, किंबहूना सावंतवाडीकर व करवीरकर यांच्यात सुरू असलेला संघर्ष अधिक तीव्र कसा करता येईल व दोघांना बाजूला करून मालवणचे आपण स्वामी कसे बनू; यावर वाडीकर व करवीरकर यांच्या संघर्षात करवीरकरांची बाजू घेऊन इंग्रजांनी वाडीकरांचा प्रदेश व मालवण बंदर गिळंकृत केले. यात सर्वच एतद्देशीय लहान लहान सत्तांचा स्थानिक व परदेशी व्यापारावर परिणाम होऊन बंद पडण्याची वेळ आली होती. परंतू इंग्रज सरकारने या एतद्देशीय संस्थानीकांचा विचारही मनात आणला नाही[१४]. सावंतवाडीकरांच्या लोकांनी ८ मार्च, १८०८ म इंग्रजांच्या किनारपट्टीवरील बोटी जिंकून घेतल्या; तेव्हा गोव्यातील इंग्रजांच्या वकीलाने सावंतवाडीकरांना लिहून पाठविले की, ताबडतोब जिंकलेल्या बोटी परत कराव्या. परंतु दरम्यान वाडीकर व इंग्रज यांच्यात सुरू झालेल्या अप्रत्यक्ष संघर्षाचा फायदा करवीरकरांनी घेण्याचे ठरवून याचवेळी सावंतवाडीकरांवर स्वारी करण्याचे ठरविले त्यानुसार वाडीच्या प्रदेशावर करवीरकरांनी हल्ले केले. त्यांच्यात झालेल्या संघर्षात वाडीकरांचा करवीरकरांनी पराभव केला. त्यामुळे इंग्रजांना फावले व काट्याने काटा

काढला यानुसार वाडीकरांशी यावेळी इंग्रजांनी संघर्ष न करताच परस्पर करवीरकरांनी वाडीसरकारांवर सूड उगवला व त्याचा कंपनी सरकारने फायदा उठवला. वाडीकर संकटात सापडल्याने त्यांनी करवीरकरांविरूध्द कंपनी सरकारकडे मदत मागितली व करवीरकरांनी घेतलेला प्रदेश मिळविण्यासाठी प्रयत्न केले[१५].

इ.स. १८०८ मध्ये लक्ष्मीबाईचे निधन झाले व राज्याचा कारभार पूर्णपणे राणी दुर्गाबाईच्या हाती आला. दरम्यान वाडीकरांनी पुन्हा इंग्रजांना किनारपट्टीवर चाचेगीरीचा त्रास देण्यास सुरवात केली. इंग्रजांनी आक्रमक भुमिका घेण्याचा विचार करता क्षणिच सावंतवाडीकर ताबडतोब तह करण्यास तयार झाले. त्यानुसार ३ ऑक्टोबर १८१२ रोजी मडूरे येथे सावंतवाडीकरांनी इंग्रजांशी तह केला. त्यामुळे सावंतवाडीकरांची चाचेगीरीही थांबली. या तहानेच कोल्हापूरकरांचे मालवण व सिंधूदुर्ग हे किल्ले इंग्रजांकडे गेले. एवढेच नव्हे तर सावंतवाडीकरांच्या ताब्यात असलेले वेंगुर्ले बंदरही इंग्रजांनी आपल्या वर्चस्वाखाली आणले. अशा रितीने डावपेच आखून इंग्रजांचे शेवटी पश्चिम किनाऱ्यावर समुद्रावर वर्चस्व निर्माण झाले. सावंतवाडीकरांनी चाचेगीरी कायमचीच बंद करून इतर सतद्देशीय सत्तांशी हातमिळवणी केली असती तर इंग्रजांना हटविणे सोपे झाले असते. परंतू वाडीकरांनी कोणताही तशाप्रकारे विचार केला नाही तर फक्त चाचेगीरी करून इतरांचा माल आपल्या राज्यात आणण्याचे स्वार्थी काम केले.

इ.स. १८१२ मध्ये वाडीकरांबरोबर इंग्रजांनी जो तह केला, त्या तहानुसारच सावंतवाडीकरांच्या ताब्यात असलेली सर्व जहाजे, वेंगुर्ल्याचा कोट इंग्रजांनी स्वत:कडे घेतले, इंग्रजांनी वाडीकरांचे सर्व लढाऊ जहाजे देखील आपल्या ताब्यात घेतले. शिवाय कोणतेही जहाज सावंतवाडीकर इंग्रजांच्या लेखी परवानगीशिवाय सोडू शकत नव्हते. म्हणजे एका मागून एक असे तह वाडीकरांवर इंग्रजांनी लादून आपले बस्तान बसविले. इंग्रजांना

लहान जरी कारण मिळाले तरी त्याचा उपयोग करून इंग्रज वाडीकरांना त्यांच्या निर्णयाप्रमाणे वागण्यास भाग पाडीत असत. याच त-हेने इतर संस्थानिकांशी इंग्रज सरकार वागत असे कारण कंपनी आता व्यापारी कंपनी म्हणून राहिली नव्हती तर ती एक हिंदुस्थानातील राजकीय स-ता बनली होती. स्थानिक संस्थानांमध्ये संघर्ष निर्माण करून त्यांना नेहमी संघर्षात गुंतवून ठेवायचे आणि आपण त्याचा आपल्या साम्राज्यविस्तारासाठी फायदा उठवायचा, असे इंग्रजांचे धोरण होते. दोन संस्थानांच्या भांडणात न्यायदानाचे काम इंग्रज करीत, त्यात दोघांनाही हळूहळू बाजूला करून त्यांचे राज्य स्वत:च्या साम्राज्यात विलीन केले जात असे, अशा प्रकारे इंग्रजांनी आपले धोरण अवलंबिले होते[१६]. जानेवारी १८१३ त सावंतवाडीकरांनी करवीरकरांकडून भरतगड घेतला परंतु इंग्रजांनी मार्च महिन्यात आपल्या सैन्याची एक तुकडी करवीरकरांच्या मदतीला पाठवून वाडीकरांच्या ताब्यातून पुन्हा लगेच भरतगड करवीरकरांना देण्यात आला. करवीरकर हे वाडीकरांचे शत्रू व वाडीकर हे करवीरकरांचे कडवे शत्रू आहेत हे इंग्रजांनी ओळखले होते आणि म्हणूनच ब-याचवेळा सावंतवाडीकरांच्या विरुद्ध इंग्रजांनी करवीरकरांना मदत केली होती. करवीरकरांनीही सावंतवाडीकरांचा शेवट करण्यासाठी पाश्चात्य स-ता म्हणून इंग्रजांना जवळ केले होते. करवीरकर व इंग्रज या दोघांनी संयुक्तरित्या वाडीचे राज्य संपुष्टात आणण्याची प्रतिज्ञाही केली होती. सरकारने वेंगुर्ले गांव आपल्या ताब्यात वाडीकरांच्या होकाराने घेतले. एवढेच नव्हे तर वाडीकरांनी वेंगुर्ले गांव इंग्रजांना देतांना तेथील लोकांनी इंग्रजांना चांगली वर्तणूक द्यावी आणि वसूलही द्यावा असे अव्हान केले होते. यावरून सावंतवाडीकरांवर इंग्रजांचे किती वर्चस्व होते हे कळते. इ.स. १८१५ मध्ये मालवण येथील इंग्रजांच्या तुकडीने मालवणच्या उ-तरेकडील सावंतवाडीकरांच्या दोन तर्फांचा मुलूख घेतला[१७].

इंग्रजांनी सुरवातीला करवीरकरांना वाडीकरांच्या विरूध्द मदत केली. परंतू याचा अर्थ असा नव्हता की सावंतवाडीकरांचा नाश झाल्यानंतर करवीरकरांचे अस्तित्व टिकणार होते. तर वाडीकरांच्या नाशानंतर लगेच इंग्रजांना करवीरकरांचेही महत्व कमी करून त्यांचेही राज्य घशयात घालावयाचे होते. त्यामुळेच इंग्रजांनी आपले इतरांपेक्षा वेगळे राजकारण सुरू केले होते. इंग्रजांनी सावंतवाडीकरांच्या प्रदेशांत अनेक वेळा आपले सैन्य पाठवून आपणास हवा तो मुलुख सक्तीने घेण्यास सुरवात केली होती. या धोरणाला मात्र वाडीकर विरोध करू शकत नव्हते. कारण वाडीकरांची अंतर्गत सुरू असलेली भांडणे व करवीरकरांबरोबर चालू असलेला संघर्ष यामुळे वाडीकर सर्वच बाबतीत कमकुवत झाले होते. बुडत्याला काडीचा आधार त्याप्रमाणे वाडीकरांची स्थिती झाली होती. इंग्रज वाडीकरांना नीट राज्यकारभार करू देत नव्हते. नेहमीच अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करून कमकुवत झालेल्या वाडीकरांना पुन्हा कमकुवत कसे करता याकडे इंग्रजांचे नेहमी लक्ष लागलेले असे. समुद्रावरील सावंतवाडीकरांचा अंमल ब्रिटीशांनी नष्ट केला व आपले वर्चस्व निर्माण करून आपला मुक्त संचाराचा व्यापार सुरू केला होता. आता करवीरकर व सावंतवाडीकर यांचा होणारा त्रास कमी झाल्यामुळे व त्यांच्यावर इंग्रजांचे अधिपत्य निर्माण झाल्याने बिगर जकाती व्यापार इंग्रज करू लागले[१८].

सावंतवाडीकर राणी दुर्गाबाई व इंग्रज :-

राणी दुर्गाबाईच्या हातात वाडीच्या राज्याचा कारभार आल्यानंतर इ.स. १८०८ ते १८१२ पर्यन्त तिने स्वत:च्या नांवानेच कारभार केला. परंतू इ.स. १८१२ मध्ये फोंड सावंताच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा बापूसाहेब खेमसावंत चौथे यास सावंतवाडीच्या गादीवर बसविले. याचवेळी १८१२ चा तह झाला या तहानुसार वेंगुर्ले इंग्रजांच्या ताब्यात गेले. जर वाडीकरांनी इंग्रजांशी असा तह करण्याचे टाळले असते तर कदाचित वेंगुर्ले

सावंतांच्याच ताब्यात राहिले असते. पुढे सावंतवाडीकरांना मात्र इंग्रजांच्या ताब्यात गेलेला प्रदेश सोडवून घेणे कठिण झाले होते. इ.स. १८१४ ते इ.स. १८१९ या काळात सावंतवाडीकर-इंग्रज यांच्यात ब-याच कटकटी निर्माण झाल्या होत्या. वाडीकर आमच्या प्रदेशात धुमाकूळ घालतात असा आरोप इंग्रजांनी केला, बिनबुडाचा आरोप इंग्रजांनी पुढे करून सावंतवाडीकरांशी कुरापत काढली व त्यांना तह करण्याची सूचना दिली. परंतु वाडीकर राणी दुर्गाबाईने इंग्रजांशी तह करण्यास साफ नकार दिला होता. इ.स. १८१५ मध्ये वराडतर्फे व मुलंड तर्फ व काली नदीच्या उत्तरेकडील प्रदेश सावंतवाडीकरांच्या ताब्यातून इंग्रजांनी घेतला व त्यावर आपले अधिपत्य निर्माण केले[१९].

राणी दुर्गाबाईने तह करण्याचे नाकारल्यामुळे इंग्रजांनी वाडीकरांचा प्रदेश जिंकून स्वार्थी धोरण अवलंबिले होते. मात्र राणी दुर्गाबाईने इंग्रजांना वेळोवेळी विरोधही तीव्रपणे केला होता. अखेरीस वाडीसरकारच्या दरबारामध्ये फाटाफूट झाली. सरदार स्वतंत्र वृत्तीने वागू लागले, आंतर्गत कलह देखील सुरु होते. या अंतर्गत कलहास व परकियांशी सुरू असलेल्या कायमच्या संघर्षाला राणी दुर्गाबाई कंटाळली होती. इंग्रज सरकारचे सैन्य वाडीच्या दारात तोफा घेऊन उभे ठाकले होते. या संपूर्ण परिस्थितीचा खोलवर विचार करून राणी दुर्गाबाईने इंग्रज सरकारशी तह करण्याचा विचार बोलून दाखविला. परंतू इंग्रजांशी तह करण्याचा निर्णय घेणे पूर्वी दुर्गाबाईने दहादा विचार केला आणि पुन्हा तह करण्याचा विचार मनातून कायमचाच काढून टाकला. शेवटी नर्मदाबाई व सावित्रीबाई या दोन राण्यांनी इंग्रजांशी १३ फेब्रुवारी, १८१९ रोजी तह करून त्यावर स्वाक्ष-या केल्या[२०]. या तहाने सावंतवाडीकरांनी इंग्रजांचे वाडीकरांवरील अधिसत्य कायदेशीररीत्या मान्य केले. या अगोदर एकच वर्ष म्हणजे १८१८ त पेशवाई बुडून इंग्रजांचा अंमल या भूभागावर सुरू झाला होता.

सावंतवाडीकरांशी डावपेचाचे राजकारण करून इंग्रजांनी आपला फायदा उठवला होता. वास्तविक पहाता इंग्रजांनी मालवण घेतल्यावर शांत बसण्यास हवे होते, परंतु त्यांनी तशी कृती न करता मालवणहून ले. स्मिथ जाऊन त्याच्या जागी जे. जे. स्पॅरो २५ जानेवारी १८१३ ला, आला. त्याला मालवणला आल्यावर असे वाटले की वेंगुर्ला व विजयदुर्ग आणि सिंधुदुर्ग ते मालवण किनारा दळणवळणासाठी जहाजे व होडया ठेवण्यासाठी कालीनदीची भालावलीची खाडी, मसुऱ्याची नदी यांना लागुनच इंग्रजांचा प्रदेश आहे; त्याची पहाणीही होडयामधून होऊ शकेल, तेव्हा हा संपुर्ण किनारा आपण ताब्यात घ्यावा अशी मागणी मुंबई सरकारकडे केली व ती मंजूरही झाली[२१]. त्यानुसार नद्यांच्या पलीकडील सावंतांचा प्रदेशही स्पॅरोने आपल्या अधिपत्याखाली आणण्यात सुरवात केली. कारण किनाऱ्यावर तो होडीतून फिरत असतांनाच त्याला वाडीकरांचा प्रदेश घेण्याची अभिलाषा निर्माण झाली होती. त्यानुसार बराच वाडीकरांचा प्रदेश इंग्रजांनी घेतला आणि घेतलेल्या प्रदेशाचे संरक्षणही जे. स्पॅरोने डोळ्यात तेल घालून केले होते.

इंग्रजांनी जेव्हा राणी दुर्गाबाईकडे मनुरे, मालंड व पराड या तर्फांची मागणी केली; दुर्गाबाईसारख्या करारी राणीने ती मागणी अमान्य तर केलीच परंतु इंग्रजांचे मालवणवर असलेले अस्तित्वही तिला मान्य नव्हते, तेव्हा त्यांची मागणी मान्य करणे तर दुरच होते. यावेळी चोहोबाजूंनी इंग्रजांचीच सत्ता वाढत होती. सुरवातीला राणी दुर्गाबाईस इंग्रजांनी भिती हि दाखविण्याचा प्रयत्न केला. परंतु ती आता अजिबात घाबरत नाही हे पाहून इंग्रज सरकारने कर्नल डावसे यांच्या नेतृत्वाखाली राणी दुर्गाबाईच्या विरुध्द वरील तर्फांमध्ये फौज पाठविली. इंग्रजांच्या सैन्याला राणीच्या सैन्याने भक्कमपणे तोंड दिले. परंतु इंग्रजांचे सैन्य आधुनिक शिक्षण घेतलेले व निपुण असल्यामुळे वाडीच्या सैन्याचा त्यांच्यापुढे टिकाव

लागणे शक्य नव्हते. वाडीकरांच्या सैन्याचा पराभव होऊन तीनही तर्फा इंग्रजांनी आपल्या ताब्यात घेतले, व वाडीकरांचे सैन्य हुसकावून दिले. शेवटपर्यन्त सावंतवाडीकरांनी वरील प्रदेश परत घेण्यासाठी प्रयत्न केले. परंतू त्यात यश मिळाले नाही. संघर्षाचा मार्ग सोडून पत्रापत्रीही करून पाहिली. परंतू तरीही वाडीकरांना ते तर्फ घेणे शक्य झाले नाही[२२].

इंग्रजांच्या वर्चस्वाखालील वाडीकरांची गावे :-

इ.स. १८१४ पर्यन्त इंग्रजांनी वाडीकरांचा बराच प्रदेश जिंकून आपल्या राज्याला जोडला होता. सावंतवाडीकरांशी नेहमीच संघर्ष करीत त्यांची खालील गांवे हस्तगत केली होती.

१) तर्फ मसुरेतील गांवे :-

१. कांदळगांव, २. चौके, ३. आंबेरी, ४. हेवळी, ५. हडी. ६. आंब्डोस, ७. सालेल, ८. मालवण ९. साळगांव, १०. खेडी, ११. वेरले.

२) तर्फ मालंड :-

१. मालंड, २. डागमोडे, ३. वोवळीये, ४. आसरोडे, ५. वाडीवडे, ६. किरलोक, ७. शिरवडे, ८. वडाचे पाट, ९. खोरले, १०. पुनवरे, ११. असगणी, १२. हेदुळ, १३. पोपीय, १४. मसदे, १५. राठीवडे, १६. हिवळे, १७. गोळवण,

३) तर्फ वराड :-

१. वराड, २. काळसे, ३. तळगांव, ४. नांदोस, ५. धमापूर. ६. पेडूर, ७. कुवाबे, ८. बंदर वेंगुर्ले[२३].

वरील सर्व गांवे इंग्रजांनी सावंतवाडीकरां घेतली व आपल्या साम्राज्यात इ.स.१८१४ पर्यन्त जोडली व तेथील वसुलही गोळा करून आपल्या खजिन्यात जमा करू लागले.

वरील सर्व गांवे घेतल्यानंतर इंग्रजांनी राज्य कारभाराच्या सोईसाठी या गांवांचा एक जिल्हा निर्माण केला, नव्याने बनविलेल्या जिल्हयास मालवण जिल्हा असे नांव दिले. या जिल्हयाचा अधिकारी इ.स.१८१४ पर्यन्त रेसिडेंटच होता. यानंतर त्याला कलेक्टर व रेसिडेंट हा जोडकिताब देण्यात आला. या जिल्हयाची मुलकी व सैनिकी व्यवस्थाही या कलेक्टरकडेच सोपविण्यात आली होती. प्रशासक म्हणून तो या संपूर्ण जिल्हयाचा कारभार पाहू लागला, मुलकी का[illegible] त्याच्याकडेच होता. थोडक्यात म्हणजे नव्याने घेतलेल्या सावंतवाडीकरां[illegible]देशात आता इंग्रजी अंमल मोठ्या धुमधडाक्यात सुरू [illegible] दरम्यान वाडीकर मात्र हताश झाले होते. इंग्रजांपुढे त्यांचे काही चालत नव्हते. सावंतवाडीकरांनी मोठ्या कष्टाने मिळविलेला प्रदेश त्यांनी अल्पकाळात गमावला हे त्यांचे दुर्दैवच म्हणावे लागेल. कालीं नदीच्या आसपासचा प्रदेश व कालीं नदीही इंग्रजांनी वाडीकरांच्या ताब्यातून घेतली. कालीं नदीतून चालणा-या व्यापारावरही इंग्रजांनी आपले स्वत:चे स्वामित्व मिळविले. या नदितील मालाची आयात-निर्यात होत असतांना त्यावरील जकातही इंग्रज सरकारच आकारीत असत व वसुलही तेच करीत असत ही नदी मालवण जिल्हयाच्या रेसिडेंटच्याच ताब्यात होती[२४].

मालवण जिल्हयाचा सुरवातीलाच रेसिडेंट व नंतर कलेक्टर असा जोड किताब देऊन ज.स्परो यांची नेमणूक करण्यांत आली होती. यावेळी फोंडसावंत वाडीच्या गादीवर होता. तो या इंग्रजांच्या सल्ल्यानेच राज्यकारभार करीत असे. फोंडसावंताने याच दरम्यान कंपनी सरकारशी भविष्यकाळात तरी वाडी सरकारचे संबंध सुधारतील अशी आशाही व्यक्त

केली होती. मागे सांगितल्याप्रमाणे इंग्रजांनी सावंतांचा जो प्रदेश घेतला त्याचबरोबर वेंगुर्ला व आजूबाजूचा प्रदेशही वाडीकरांकडून जिंकून घेतला. आणि आपल्या साम्राज्यास जोडून मालवणचा कलेक्टर या प्रदेशाचाही कारभार पाहू लागला. राणी दुर्गाबाई हिने सुध्दा इंग्रजांना शेवटी कंटाळून त्यांच्याशी मैत्रीची भाषा सुरू केली[२५]. तेव्हा इंग्रज ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. कारण त्यांना नुसते सावंतवाडी राज्यच घ्यावयाचे नव्हते तर संपूर्ण हिंदूस्थानभर आपले साम्राज्य पुस्थापित करण्याची त्यांची तृष्णा होती. परंतू यानंतर राणी दुर्गाबाईनेही मिळेल तेथे इंग्रजांना कसून कडवा विरोध करण्यास सुरवात केली. परंतू इंग्रजांच्या देशात औद्योगिक क्रांती झाली होती. त्यामुळे आधुनिक लष्कर हत्यारे तयार होऊन इतरांना इंग्रजांशी तोंड देणे कठिण झालेले होते[२५].

मालवण रेसिडेंटला सावधानतेचा इशारा :-

मुंबई सरकारने मालवणचा रेसिडेंट जे. ए. डनलाप यास पत्र पाठवून कळविले की वाडीची राणी दुर्गाबाईकडे ज्या मागण्या पाठविल्या त्या तिने सर्व धुडकावून लावल्या आहेत. तिच्यातील इंग्रजांबद्दलचे वैर वाढले आहे. तेव्हा सावध राहून राणीकडून होणाऱ्या स्वारीस प्रतिकार करावा. अशा आशयाचे पत्र डनलापला मिळाले[२६] म्हणजे इंग्रज सरकार देखील सावंत वाडीकरांची मनात भिती बाळगून होते असे दिसते. कारण राणी दुर्गाबाईने कोल्हापूरकर व वाडीकर यांच्या भरतगड व नरसिंहगड या किल्ल्यांवरुन सुरू असलेल्या भांडणात इंग्रज सरकारने मध्यस्थी करावी यासाठी त्यांना लिहीले होते, परंतु इंग्रजांनी मात्र ते करण्यास नकार दिला होता. कारण कोल्हापूरकरांशी वाडीकरांपेक्षा त्यांचे संबंध चांगले व जवळचे होते. त्यामुळे ~~इंग्रजांनी मात्र ते करण्यास नकार दिला होता कारण कोल्हापूरकरांशी वाडीकरांपेक्षा संबंध चांगले व जवळचे होते.~~ त्यामुळे इंग्रजांनी उभयतांच्या भांडणात मध्यस्थी करण्याचे तर बाजूलाच ठेवले परंतु सावंतवाडीकरांचे त्या

किल्ल्यावरील व आजूबाजूच्या प्रदेशावरील सर्व हक्कही काढून घेतले व ते सर्व हक्क कोल्हापूरकरांकडे तात्पुरते दिले. वरील दोन्ही किल्ल्यांचे संरक्षणही करवीरकरांवर सोपविले. तेव्हा सावंतवाडीकर त्यामुळे चिडले ते आता आपल्या प्रदेशावर हल्ले केल्याशिवाय राहाणार नाहीत याची भीती वाटल्यामुळे मालवण रेसिडेंटला त्याबद्दल काळजी घेण्याची सूचना आली होती[२६].

वाडीकरांचे अंतर्गत भांडणे व इंग्रजांचा फायदा :-

मालवणच्या रेसिडेंटला सावध राहाण्याचा इशारा आलाच होता परंतु त्याचबरोबर इंग्रज सरकारने वाडीच्या संपूर्ण राज्यात आपले अंतर्गत हेरांचे जाळे पसरविले होते. तेव्हा वाडीकरांच्या काय हालचाली होतात कोठे होतात याबद्दल इथंभूत व अचूकपणे माहिती इंग्रजांना मिळू लागली. सावंतवाडीकरांना या गोष्टीची कल्पना असूनही याबाबतीत त्यांनी गंभीर दखल घेतली नाही. अर्थात दखल घेऊनही सावंतवाडीकर आता एवढा तीव्र विरोध करू शकत नव्हते कारण वाडीकरांच्या चोहोबाजूने शत्रूच निर्माण झालेले होते. तेंव्हा एका शत्रूस संपूर्ण ताकद लावून विरोध केला तर इतर लगेच त्यांच्या विरुध्द उभे रहात होते याची भीती वाडीकरांना वाटत होती.

अ. इ.स. १८१४ च्या सप्टेंबर मधील वाडीतील एका हेराच्या पत्रावरून समजते की वाडीमध्ये अंतर्गत भांडणे सुरू झाली. तेव्हाच राणी दुर्गाबाईने इंग्रजांना काली नदीतील मडसूल गोळा करू न देण्याचा निर्धार केला.[२७] म्हणून इंग्रजांनी या वाडीकरांच्या अंतर्गत भांडणांचा फायदा घेण्याचे ठरविले आणि शेवटी या भांडणाचा फायदा इंग्रजांनी घेतला.

राणी दुर्गाबाईंच्या विरूध्द चंद्रोबा सुभेदार होता तो दादीबाईंचा मित्र होता. संभाजी सावंत व बबना गोपाळ यांना मात्र दुर्गाबाईने स्वत: नेमले होते: दरम्यान राज्याच्या सर्व सरदारांना इंग्रजांना राज्यातून हुसकावून लावण्याची ताकीद दिली. परंतू राणी दुर्गाबाईंचा हुकूम कोणीच मानीनासे झाले. याउलट या सरदरांनीच आपापले लष्कर तयार करून राणीच्या विरूध्द उभे राहिले. परंतू राणी कोणासही घाबरली नाही. कारण इंग्रजांना सुध्दा राणी दुर्गाबाईने भिक घातली नाही. तेव्हा या सरदारांना ती कधीच घाबरली नाही. या अंतर्गत भांडणाचाच इंग्रजांनी मोठ्या प्रमाणावर फायदा उठविला. भांडणामुळेच केवळ इंग्रज सरकार सावंतवाडी राज्यामध्ये हेर पाठवून माहिती मिळवू लागले, कारण सर्व सरदार, राणी, हे भांडणात गुंतल्याने राज्यात काय चालले त्याकडे लक्ष देण्यास कोणीही उरले नव्हते. नाहीतर इंग्रजांचे हेर वाडीकरांच्या राज्यांत उदासपणे हेरगीरी करू शकले नसते, तर याउलट त्यांना वाडीराज्यात प्रवेशही करता आला नसता. परंतू अंतर्गत कटकटी निर्माण झाल्याने इंग्रजांचा फायदा झाला व ते वाडीच्या राज्याचे लचके तोडू लागले[२८].

इंग्रजांचा कारकून व जासूद अटकेत :-

राणी दुर्गाबाईने १८ ऑक्टोबर १८१५ मध्ये ब्रिटीशांच्या कारकूनाला अटक करण्यास आपल्या पोलिसांना सांगितले. त्यानुसार त्यास कैद केले. परंतु त्याच्याकडून पत्र घेऊन इंग्रज सरकारला देण्यासाठी जात असलेला जासूद यासही कैद केले. म्हणजे राणीने हेरगीरी करणारा कारकून व जासूद यांना अटक केली. मालवणचा रेसिडेंट याचाही एक हेर अटकेत ठेवला. पकडलेल्या व्यक्ती हेरगीरी करतात याबद्दल सावंतवाडीकरांना काहीच कल्पना नव्हती परंतू मालवणला जे मुख्य चिटणीस इंग्रजांच्या पदरी काम करीत होते त्यांनीच सावंतवाडीकरांना सावंतवाडी राज्यातील इंग्रजांच्या

हेरांचे नांवे व माहिती कळविली होती[२९]. ही माहिती वाडीकरांना वेळोवेळी मिळाली म्हणूनच त्यांनी वरील सापडलेल्या हेरांना अटक केली होती. याचा अर्थ असा की सावंतवाडीकरांनी देखील आपले लोक इंग्रजांच्या प्रदेशात हेर म्हणून ठेवले होते. इंग्रज वाडीच्या राज्यातून माहिती गोळा करण्याच्या प्रयत्नात असत, तर वाडीकरही इंग्रजांच्या प्रदेशातून माहिती गोळा करण्याच्या काव्यात असत. इंग्रजांच्या पदरी सावंतांचे लोक नोकरी करून सावंतांकडे इंग्रजांची सर्व गुप्त माहिती कळवित असत.

इंग्रजांच्या मालवण येथील ऑफिसात काम करणारा मुख्य चिटणीसच सावंतवाडीकरांचा अंमलदार लखाबा नेरोलकर याच्याशी सर्व प्रकारचा पत्रव्यवहार करीत असे व सर्व प्रकारच्या गुप्त बातम्या सावंतवाडीकरांना कळवित असे व त्यानुसार सावंतवाडीकरांच्या हालचाली होत असत. परंतु आंतर्गत भांडणामुळेच फक्त इंग्रजांना वाडीच्या राज्यात शिरण्यास वाव मिळाला होता.

ब्रिटीश हेरांना अटक झाल्यानंतर राणी दुर्गाबाईस इंग्रजांनी पत्र पाठवून त्यांना सोडून द्यावे व त्यांच्या अटकेचे कारण द्यावे असे कळविले. परंतु राणीने कारकून व जासूद यांच्यापैकी जासूद हा इंग्रजांचा नोकर असल्याने त्याची सुटका केली. परंतु कारकून गोलकीराव सर्जेराव हा वाडीकरांच्या दरबारात नोकरीला होता, तेव्हा त्याने हेरगीरी करून देशद्रोहाचे कृत्य केल्याने त्याची सुटका करण्यास राणीने नकार दिला आणि त्यास अशा कृत्यामुळे कोणत्याही सरकारने शिक्षा केलीच असती असे इंग्रजांना कळविले. यावेळी इंग्रजांनी पुन्हा वाडीकर राणीस एक पत्र पाठवून कळविले की आम्ही जासुदाकडे तुरूंगातील आमच्या कारकूनास एक पत्र देतो. तेव्हा ते पत्र त्याला मिळाले पाहिजे व त्याने दिलेले उत्तरही आम्हास मिळाले पाहिजे अशी राणीची परवानगी मागितली. परंतु दुर्गाबाईने यावर काहीच उत्तर दिले नाही[३०].

कारकूनाचे मन वळविण्याचा प्रयत्न :-

इंग्रजांनी राणी दुर्गाबाईस वेळोवेळी पत्र लिहूनही तिने अटक केलेल्या ब्रिटीश कारकूनास सोडले नव्हते. यावेळी तो तुरुंगात असतानाच राणीने त्यास ब्रिटीश सरकारची नोकरी सोडून सावंतवाडीकरांच्या पदरी नोकरीसाठी त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. कारकूनास चांगला पगार देऊन नोकरीचे संरक्षण देण्याचीही तयारी दर्शविली. परंतु यासाठी कारकूनाने ब्रिटीशांची नोकरी सोडून त्यांना सावंतवाडीकरांच्या दरबारात व राज्यात काय चालले याबद्दल कोणत्याही प्रकारे हेरगीरी करून माहिती न पुरविण्याची त्याला शपथ घेण्यास सांगितले. परंतु त्या कारकुनाने तशी शपथ घेण्याचे नाकारले. कारण सावंतवाडीकरांकडे बाकी असलेल्या पगाराची रक्कम अजूनही सावंतवाडीसरकारनी त्यास अदा केली नव्हती; त्यामुळे पुन्हा वाडीसरकारच्या सेवेत येण्याची त्याची इच्छा नव्हती. तेव्हा त्याने राणीला वाडीसरकारच्या सेवेत येण्यास स्पष्ट नकार दिला व इंग्रजांची नोकरी सोडण्यासही नकार दिला. त्यामुळे राणीने त्यास तुरुंगातून सोडण्याऐवजी संभाजी सावंतांच्या घरात स्थानबध्द करून ठेवले[३१].

एलफीन्स्टनच्या राणीकडे मागण्या :-

एलफीन्स्टनने राणी दुर्गाबाईकडे पुढील मागण्या पाठविल्या होत्या.

१) कारकूनाची सुटका करणे

२) कारकूनाच्या अटकेचे स्पष्टीकरण

३) इंग्रजांच्या झालेल्या अपमानाचे स्पष्टीकरण

वरील प्रकारच्या मागण्या राणीकडे आल्यानंतर राणीने या मागण्यांचा विचार करून लगेच त्या फेटाळून लावल्या आणि कारकूनाची सुटका करण्याचेही नाकारले व त्याच्या अटकेचे स्पष्टीकरण देण्याचेही नाकारले. मागण्या नाकारताच इंग्रज सरकार संतप्त झाले व लगेच सावंतवाडीकरांशी संघर्ष करण्यासाठी इंग्रजांनी पुढील तयारी सुरू केली. राणीने हेतुपुरस्कर इंग्रजांचा

अपमान केला, असा आरोपही राणीवर एलफीन्स्टनने केला होता[३२].
सावंताशी संघर्ष करण्यासाठी एक तात्कालीक कारण शोधून काढले ते म्हणजे कारकूनाची ताबडतोब सुटका झाली पाहिजे, हे होय! व नकारात्मक उत्तर येताच स्पष्टीकरण देणेची मागणी, जर राणीने यावर कारकूनाची सुटका केली नाही तर लगेच सावंतवाडीकरांच्या प्रदेशात सैन्य पाठविणे आणि जर राणीने कारकूनाची सुटका केली तर मात्र संघर्ष टाळून दुसरा काहीतरी मार्ग काढावा व संबंध सुधारावे असे ठरले होते.

ब्रिटीश कारकूनाची सुटका :-

वाडीकरांनी माघार घेऊन मागितलेले किल्ले इंग्रजांना विनासायास दिले आणि नंतर इ.स.१८१५ च्या जून महिन्यात शेवटी राणीला इंग्रजांच्या अनेक तंब्या मिळाल्यामुळे राणीने तुरुंगात डांबून ठेवलेल्या इंग्रजांच्या कारकून व जासूद यांची सुटका केली. परंतु त्यांची फक्त तुरुंगातून सुटका झाली होती आणि किल्ल्याच्या बाहेर जाण्यास मात्र त्यांना परवानगी अजूनही दिलेली नव्हती. म्हणजे फक्त किल्ल्याच्या कष्टडीतून सुटका झालेली होती. तरी सुध्दा त्यांच्यावर वाडीकरांच्या पोलीसांची पाळत होती, की ते हेरगीरी करतात की, काय! थोडक्यात म्हणजे त्यांची सुटका करून त्यांना नजरकैदेत ठेवले होते. कारण राणीला अजूनही या हेरांचा संशय होता. राणी दुर्गाबाई अत्यंत धूर्त, धोरणी व कर्तबगार होती. कारण शेवटच्या क्षणापर्यन्त तिने इंग्रजांच्या हेरांची सुटका करण्यास नकारच दिला होता; परंतु अगदी शेवटच्या क्षणी संघर्ष अटळ आहे असे वाटल्यावर तिने लगेच इंग्रज हेरांची सुटका केली. सुटका करूनही तिने नवीन डाव टाकला. की, त्यांना नजर कैदेत किल्ल्याच्या आवारात ठेवले व किल्ल्याच्या बाहेर जाण्यास त्यांना साफ परवानगी नाकारली अशा रीतीने शेवटपर्यन्त निर्णयाशी धरून होती पण नाइलाजाने तिला मनाविरुध्द निर्णय घ्यावा लागला[३३].

राणी दुर्गाबाईची इंग्रजांशी संबंध सुधारविण्याची इच्छा :-

इ.स. १८१५ च्याच दरम्यान राणी दुर्गाबाईने एल्फिन्स्टन यास पत्र लिहून आपले मत कळविले की आपली मैत्री अगदीच पक्की आहे. होईल तेंव्हा कृपया आपण सहकार्य करावे. इंग्रजांचा कारकून व जासूद यांची सुटका झाल्यानंतर सावंतवाडीकरांचा शिलेदार ज्योत्याजीराव घाटगे यास फितूर करून मेजर स्कुईलर याने इंग्रजांची हेरगिरी करण्यास प्रवृत्त केले तेव्हा त्या वाडीकरांनी तुरुंगात टाकले होते, परंतु मेजर स्कुईलर याने त्याच्या सुटकेबद्दल पुन्हा वाडीकर राणीस लिहिले होते पण तो सावंतवाडीकरांचा नोकर असल्याने व त्याने गुन्हा केल्यामुळे तो दोषी ठरला आहे. म्हणून त्यास मात्र तुरुंगातच ठेवण्यात येईल असे उत्तर पाठविले आहे, असे राणीने एल्फिन्स्टनला लिहिले. पुढे असून इंग्रजांवर अजून कोणत्याही प्रकारचा आरोप ठेवला नाही, एवढेच नव्हे तर रेसिडेंटने सावंतवाडी सरकारशी काहीही पत्रव्यवहार केला तर त्यास सावंतवाडीसरकार नियमित उत्तरेही पाठवित आहे. आम्हाला कंपनी सरकारशी मैत्रीच हवी आणि ती स्थापण्यासाठी आम्हाला तुमचे सहकार्य मिळेल यात शंका नाही. असे इंग्रज सरकारला पत्राने कळविले[34] म्हणजे राणीने पहिल्यांदा विरोध करून पाहिला, परंतु इंग्रज प्रबळ असल्याची खात्री होताच त्यांच्याशी मैत्री संपादन करण्याचे प्रयत्न सुरू केले.

थोडक्यात म्हणजे इंग्रजांशी मैत्री संपादन करण्यासाठी राणी दुर्गाबाईने त्यांची हवी तशी स्तुती करण्यास सुरुवात केली. आणि तिला स्तुती तर करण्याशिवाय पर्याय नव्हता. नाहीतर संघर्षाचे संकट येऊ पहात होते आणि सावंतवाडीसंस्थानचे अस्तित्वही सहिसलामत टिकणे अशक्य होते. म्हणजे निर्णय घेण्यामध्ये राणी नेहमी यशस्वी होती कारण जर या संकटकाळात तिने इंग्रजांबरोबर संघर्ष करण्याचा निर्णय घेतला असता तर मात्र कदाचित सावंतवाडी संस्थानचे अस्तित्व धोक्यात आले असते, आणि वाडीचे राज्य

लगेच इंग्रजांनी आपल्या साम्राज्यात विलीन केले असते. म्हणूनच तिने एल्फीन्स्टनची मर्जी संपादन करून संघर्षाचा प्रसंग टाळला आणि वाडीसरकार मित्रत्वाने संबंध प्रस्थापित करण्यास तयार आहे असे एल्फीन्स्टनच्या नजरेस आणून दिले.

परंतु एलफीन्स्टनने पुन्हा राणीला पत्र पाठविले की गव्हर्नर जनरलने पाठविलेल्या आदेशाचे पालन करावे आणि अजूनही इंग्रजांचे दोन कारकून सावंतवाडीकरांच्या तुरूंगात आहेत, त्यांची सुटका करावी व तुमच्या मुख्याधिकाऱ्याने गोव्याला मेजर स्कुईलर कडे क्षमा मागावी की, आम्ही केलेल्या गुन्ह्याबद्दल क्षमा असावी[३५]. एल्फीन्स्टनने पाठविलेल्या पत्राला मात्र राणी दुर्गाबाईने उत्तरच दिले नाही. कारण ह्या पत्रातील मजकूर राणीला अपमानकारक वाटला होता.

इंग्रजांची कोल्हापूरकरांना तंबी :-

सावंतवाडी राज्यात राणी दुर्गाबाई व दादीबाई यांच्यात भांडणे चालू असताना सरसुभेदार संभाजीसावंत यांनी निपाणीच्या अप्पा देसाईकडे मदतीची याचना केली की, १००० सैनिक पाठवावेत. तेव्हा काही सैनिक अप्पा देसाईने पाठविले. परंतु करवीरकरांना ही बातमी समजताच वाडीकरांच्या भांडणात त्यांनी हस्तक्षेप करून आपला फायदा उठविण्यास सुरवात केली. करवीरकरांचा वाडीसरकारांच्या कुडाळ प्रांतात जाऊन महसूल वसुली करायचा हेतू होता आणि त्याच बरोबर दुर्गाबाईच्या विरूध्द दादीबाई व चंद्रोबा सुभेदार यांना मदतीचाही महत्वाचा हेतू करवीरकरांचा होता. परंतु यावेळी इंग्रजांनी कोल्हापूरकरांना बजावले की, तुम्ही सावंतवाडीकरांच्या अंतर्गत भांडणात कोणत्याही प्रकारे भाग घेऊ शकत नाही व तसा भाग घेण्याचा तुम्हाला अधिकारही नाही[३६]. अशारीतीने वाडीकरांच्या अंतर्गत कलहाचा करवीकरांना फायदा उठविण्याची तीव्र इच्छा असतानाही इंग्रजांच्या धमकीमुळे करवीरकर आपली इच्छा पूर्ण करू शकले नाहीत. थोडक्यात म्हणजे इंग्रज व करवीरकर यांच्यात एकप्रकारे

वाडीकरांच्या अंतर्गत कलहाचा फायदा उठविण्यासाठी शर्यतच सुरु होती. पण इंग्रज मात्र करवीरकरांना जड पडले. कारण इंग्रज सत्ता ही जागतीक सत्ता होती तेव्हा करवीरकरांचा त्यांच्याबरोबर टिकाव लागणे शक्य नव्हते. करवीरकरांप्रमाणे हिंदुस्थानातील अनेक संस्थाने इंग्रजांनी घशात घातली होती.

कारकुनाच्या इंग्रज सरकारकडे तक्रारी :-

राणी दुर्गाबाईने आपल्या राज्यातील हालचाली विषयी हेरगीरी करणा-यांना अटकेचे सत्र सुरु केले होते. दरम्यान इंग्रजांनीही सप्टेंबर १८१५ पासून वाडीराज्यातील घडामोडींवर बारीक लक्ष देण्यास सुरवात केली होती. इंग्रजांचा कारकून वाडी दरबारात असतांना वाडीकरांनी त्यास अटक केली आणि त्याची मालमत्ताही वाडीसरकारने हिराकून घेतली. एकूण नऊ महिने त्यास अटकेत ठेवण्यांत आले होते. कारकून स्वत: लिहितो की "मला राणी दुर्गाबाईच्या अधिकारात फेब्रुवारी १८१५ त हेरगीरी करतो म्हणून अटक झाली. माझ्याजवळील गोवा वकीलास लिहिलेले दोन पत्रही वाडीसरकारने घेतले ते पत्र दरबारात वाचून दाखविले आणि नंतर माझ्या घरी गार्ड पाठविले व माझ्यासह कुटूंबाला एकत्र अटकेत ठेवले"[35].

सकाळ - संध्याकाळ गार्ड आम्हाला बाहेर घेऊन जात तेव्हा सावंत-वाडीतील लोक आम्हाला पहात असे, त्यामुळे आमचा अपमान होत असे हे कृत्य हेतुपुरस्कर केले जात होते[36]. अशा अनेक तक्रारी या इंग्रज कारकुनाने वाडीसरकारच्या विरुध्द इंग्रज सरकारकडे नोंदविल्या; त्यात वाडीसरकारने दिलेल्या वागणुकीचा रिपोर्टही त्याने गोवा येथील इंग्रज वकील मेजर स्कुईलर यास दिला.

सावंतवाडीराज्यावर चंद्रोबाचा वर्चस्व पुस्थापित करण्याचा प्रयत्न :-

इ.स.१८१५ मधील नोव्हेंबर महिन्यात संभाजी सावंत व सुभेदार चंद्रोबा या दोघांच्या सैन्यात मलगम येथे पहाटे पाच वाजेच्या सुमारास

चकमकी उडाल्या आणि त्यात चंद्रोबाचा पराभव झाला. चंद्रोबाने अनंत वेळा वाडीच्या राज्यावर आपले स्वामित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला परंतु प्रत्येकवेळी त्याचा निर्णायक पराभव होत गेला, एवढेच नव्हे तर त्याला इंग्रजांचा देखील पाठिंबा होता, तरी सुध्दा तो त्याच्या कुटूंबाचे-ही संरक्षण करण्यास अपात्र ठरला. परंतु असे असतांना ही चंद्रोबाने पुन्हा वाडीकरांविरूध्द सैन्य जमविण्यास सुरवात केली. चंद्रोबा व दादीबाई एकत्र येऊन लढा देऊ लागले. तेंव्हा शेवटी इ.स. १८१६ मध्ये चंद्रोबा व दादीबाई यांची बाजू उजवी झाली. दरम्यान राणी दुर्गाबाईने लगेच इंग्रजांकडे मदतीची याचना केली व चंद्रोबाने आणलेल्या संकटातून सुटका करण्यासाठी राणीने इंग्रजांना विनंतीही केली होती. दुर्गाबाईचे सरदार संभाजी सावंत व बबना गोपाल यांनी देखील चंद्रोबापुढे हार खाल्ली. यावेळी दुर्गाबाईने इंग्रजांकडे मदत मागितली असतांनाही इंग्रजांनी तिच्याविरूध्द चंद्रोबाला मदत करून राणीचा शेवटी पराभव केला.[३८]

राणीचा पराभव अटळ असतांनाही तिने विरोधकांशी संघर्ष केला. चंद्रोबाने सावंतवाडीला वेढा दिला. वेढा देऊन वाडीचे राज्य आपल्या ताब्यात येण्याअगोदर राणी दुर्गाबाई आपणास शरण आली पाहिजे असा चंद्रोबाचा हेतू होता. चंद्रोबाने इंग्रजांच्या मदतीने वाडीराज्याची सत्ता ताब्यात घेण्याचे प्रयत्न सुरू ठेवले होते. इकडे इंग्रजांचा डाव वेगळाच होता. चंद्रोबाला थोडीशी मदत करून त्याच्याकडून परस्पर राणी दुर्गाबाईला हैराण करून तिला व तिच्या सरदारांना सत्ता सोडण्यास भाग पाडून शेवटी चंद्रोबाच्याही हाती सत्ता न देता आपणच आपल्या साम्राज्यात वाडीचे राज्य विलीन करावे व आपल्या साम्राज्याचा विस्तार करावा; असे इंग्रजांचे वाडीच्या राजकारणातील डावपेच होते. इंग्रजांना शेवटी हिंदुस्थानातील कोणत्याही संस्थानिकाचे स्वतंत्र अस्तित्व ठेवावयाचे नव्हते, तर प्रत्येक संस्थान हे आपल्या काबेत आणून आपले अधिकार निर्माण करून तेथील स्वातंत्र्य संपुष्टात आणावयाची होती, म्हणूनच

त्यांनी भारतीय संस्थानांमध्ये अंतर्गत कलहांना उत्तेजन दिले होते. वाडीच्या राज्यात असेच घडले. राणी दुर्गाबाई इंग्रजांना तोंड देऊ शकत नव्हती. त्यामुळे तिने मुकाट्याने पराभव पत्करला होता[३९].

राणी दुर्गाबाई तह करण्यास तयार :-

राणीला तिच्या प्रशासनात अनेक अडथळे निर्माण झाले. ह्या अडथळ्यांना तोंड देण्यास ती असमर्थ ठरली होती. कारण अंतर्गत कलह आता दिवसेंदिवस तीव्र होत चालला होता. इंग्रज सरकारची अनेकवेळा मदतीसाठी प्रार्थना करूनही त्यांनी मदत नाकारली होती. शेवटी जानेवारी १८१९ मध्ये राणीने तिचा मुख्यमंत्री निवती येथे डनलाप या इंग्रजसरकारच्या प्रतिनिधींबरोबर तह करण्यास पाठविला होता. म्हणजे निवतीचा किल्लाही इंग्रजांनी घेतला होता, व त्यानंतर हळू हळू वाडी राज्याचा पूर्ण प्रदेश घेण्याचे प्रयत्न होते. राणीने इंग्रजांशी तहाची तयारी दाखविली असतांनाही इंग्रजांनी अन्यायकारक अशा अटी राणीवर लादल्या त्यामुळे राणीने त्या अमान्य केल्या. या अगोदर जर राणीने अटी मान्य केल्या तर अंतर्गत कलहास इंग्रज प्रोत्साहन देणार नाही व नंतर चंद्रोबालाही मदत देण्याचे थांबविण्यांत येईल असे इंग्रज सरकारने राणी दुर्गाबाई हिस कळविले होते. कारण सावंतवाडीत कोणतेही सरकार अधिकारावर आले तरी ते ब्रिटीश सरकारच्या विरूद्ध जाऊ शकत नव्हते. एल्फीन्स्टनने यावेळी राणीस पत्र पाठवून धक्का दिला की शांतता हवी असेल तर इंग्रज सरकारने सुचविलेल्या अटी विनासायास मान्य कराव्यात[४०]. म्हणजेच जर राणीने इंग्रजांच्या अटी अमान्य केल्यास सध्या वाडीच्या राज्यात जी अशांतता व गोंधळ निर्माण झाला आहे. त्यास आणखीण प्रोत्साहन दिले जाईल व अस्थिरता निर्माण केली जाईल.

ब्रिटीश सरकार न कळत अप्रत्यक्ष व गुप्तपणे राणी दुर्गाबाईच्या विरोधकांना मदत करीत होते. व प्रत्यक्षात मात्र सावंतवाडी सरकारशी मैत्रीचे संबंध जोडणे इष्ट असे म्हणत होते. म्हणजे वाडीकरांचे कलह संपुष्टात येता कामा नये असे इंग्रज प्रयत्न करीत व वरकरणी दुर्गाबाईलाही मदत करण्याचे तोंडी अमिष दाखवित असत. चंद्रोबा व दुर्गाबाई यांच्यापैकी चंद्रोबासच शेवटपर्यन्त इंग्रज सरकारने मदत करावी असे पुण्याचे रेसिडेंट एल्फीन्स्टन याने प्रतिपादन केले होते. एवढेच नव्हे तर राणी दुर्गाबाईने ब्रिटिश कारकुनाच्या मालमत्तेची भरपाई करून दिली नाही, तर निश्चीतपणे इंग्रज सैन्य सावंतवाडी राज्यावर हल्ला केल्याशिवाय राहाणार नाही, असे एल्फीन्स्टनने राणीला पत्राने कळविले होते. यानंतर राणीने चाचेगीरी करणारे गलबते तयार करण्यास रेड्डी येथे सुरवात केली, तेंव्हा एल्फीन्स्टनने राणीला लिहिले की, " जर गलबते तयार करण्याचे बंद केले नाही तर मात्र सावंतवाडीसरकार व इंग्रज सरकार यांच्यामध्ये शांतता निर्माण होणे अशक्य होईल. तरी तुम्ही गलबते तयार करू नये[४१]". म्हणजे राणीने आपले आरमार भक्कम बनविण्यासाठी गलबते बनविण्याचा कारखाना रेड्डी येथे सुरू केला होता. तो एकप्रकारे इंग्रजांना शहच होता.

इंग्रज सरकारने राणी दुर्गाबाईला अनेक तऱ्हेची पत्रे पाठविली परंतु राणी मात्र शेवटपर्यन्त इंग्रजांच्या काबूत गेली नाही. जर सावंतवाडी राज्यात अंतर्गत कलह निर्माण झाले नसते, राणीच्या कारभारात अडथळे निर्माण झाले नसते, तर तिने इंग्रजांना खंबीरपणे तोंड देऊन यशस्वी झाली असती, परंतु केवळ कलह निर्माण झाल्यामुळे तिला धड राज्यकारभार ही निट करता येईना व इंग्रजांनाही यशस्वी तोंड देता येईना. इंग्रज व राणी यांचे संबंध बिघडले नसते, परंतु तिने हेरगीरी करणाऱ्या इंग्रजांच्या लोकांना पकडून तुरुंगात टाकण्यास सुरवात केल्याने इंग्रजांचे सावंतवाडीकरांशी संबंध कटू झाले, परंतु तरीसुध्दा राणीने त्याची तमा बाळगली नाही तर या

उलट इंग्रजांनी केलेल्या मागण्या सहजा सहजी मान्य न करता शेवटपर्यन्त धुडकावित राहिली व अंतकाळी असह्य झाल्यामुळेच तिला इंग्रजांना पुढील काळात शरण जावे लागले. इंग्रजांनी देखील राणीचा पाठपुरावा केला असे म्हणावे लागेल कारण वेळोवेळी तिला पत्रे पाठवून कारकुनाच्या अटकेचे कारण व स्पष्टीकरण विचारले व अपमानाचा प्रश्न नसतांनाही आमचा अपमान झाला असे दाखवून तो धुवून काढण्यासाठी राणी विरूद्ध शेवटपर्यन्त कारवाया केल्या[४२].

राणी दुर्गाबाईची शरणागती :-

एलफीन्स्टनने अनेक पत्रे पाठवून राणीला घाबरून सोडले. परंतु शेवटी राणीने मात्र गोव्यातील इंग्रज वकीलास पत्र पाठवून क्षमा मागितली आणि यापुढे चुका होणार नाहीत याची खात्री दिली. राणी लिहीते. "When we all met at Maddor and the treaty which was Concluded there is perfectly understood by me, therefore I never would fit out any armed boat or men for the purpose of committing piracy".

राणीने मद्दूर येथे इंग्रजांशी तह केला होता त्यानुसार यापुढे कुठल्याही प्रकारे मी लढाऊ बोट किंवा जहाजे तयार करणार नाही व आपल्या संरक्षणात अडथळाही आणणार नाही[४३]. म्हणजे राणीने शरणागती पत्करून इंग्रजांशी मैत्री करण्यास ख-या अर्थाने उत्सुक झाली होती. कारण इंग्रजांशी मैत्री केल्याशिवाय तिला दुसरा पर्यायच नव्हता. एवढेच नव्हे तर इंग्रजांच्या अटींनुसार परदेशात वाडीकरांचा माल जाण्यासाठी इंग्रजांची परवानगी घेण्यास सुरवात केली होती. याचा अर्थ असा की राणी आता पूर्णपणे इंग्रजांच्या आज्ञेत गेली.

वाडीकरांचा इंग्रज प्रदेशावर हल्ला :-

इ.स. १८१९ च्या ऑगस्ट महिन्यात जवळ जवळ शंभरापेक्षा जास्त वाडीकरांचे सैनिक वराड तर्फातील तुळगाम मध्ये घुसले व जोराचा हल्ला

चढविला सुधा चोर व राम पटारा या दोघांना ताब्यात द्यावे अशी मागणी केली व ही मागणी पूर्ण न केल्यास येथील पाटलास पळवून नेऊ अशी वाडीकर सैनिकांनी धमकी दिली. परंतु इंग्रजाचे गुप्तहेरखाते अतिशय कार्यक्षम असल्याने वाडीकरांच्या हल्ल्याची बातमी ताबडतोब गुप्तहेराने इंग्रजांच्या कमांडिंग अधिकाऱ्यास दिली ब्रिटीश सैन्य विनाविलंब वाडीकरांच्या सैन्याच्या दिशेने चालून गेले. तोपर्यन्त वाडीकरांचे सैन्य दोन्ही राज्यांच्या सीमेवर जाऊन थडकले. नंतर ते वाडीच्या हद्दीत गेले. वाडीकरांचे सैन्य संभाजी नाईक या जुमलेदाराच्या ताब्यातील होते. आणि या सैन्याला इंग्रज प्रदेशावर हल्ला करण्याचा हुकूम राणी दुर्गाबाई हिनेच दिला होता व तुळधम घेण्यास सांगितले.परंतु इंग्रजांचे गुप्तहेरखाते कार्यक्षम असल्याने इंग्रज सैन्य त्वरीत आल्यामुळे सावंतवाडीकरांचा हेतू साध्य झाला नाही व इंग्रज सरकारचाही प्रदेश वाचला. परंतु यानंतर मात्र राणीचे इंग्रज प्रदेशावर आक्रमण करण्याचे धाडस होऊ शकले नाही. कारण दरम्यान अंतर्गत कलहास उधान आलेले होते[४४].

जसजसे अंतर्गत कलह वाढत होते तस तसे राणी दुर्गाबाईचे सैन्यही आपोआप कमी होत गेले. ब्रिटीश सरकारने राणी दुर्गाबाई हिस सावंतवाडी राज्याची प्रमुख म्हणून मान्यता दिली. परंतु ती आता जास्तकाळ सत्तेवर राहु शकत नव्हती. कारण चंद्रोबा व संभाजी सावंत यांच्यातील भांडण विकोपाला गेले होते. म्हणूनच सावंतवाडी राज्यात अराजकता व अशांतता निर्माण झाली होती. यावेळी राणी दुर्गाबाईने मालवण येथील रेसिडेंट डनलॉप यास पत्र पाठवून विनंती केली की कृपया ४०० माणसांची मदत पाठवावी, परंतु डनलॉपने मात्र वाडीकर नेहमीच तहाचे उल्लंघन करतात म्हणून नकार दिला. कारण काली नदीच्या बाजूला वराड तर्फमधील तुळधम खेड्यातील गुरे बबना गोपाल या राणीच्या सरदाराच्या लोकांनी पकडले होते. तेव्हा डनलॉपने ती गुरे सोडण्यास सांगितले, परंतु ती गुरे कोठे आहेत हे आम्हाला माहिती नाही, असे खोटे उत्तर राणीच्या लोकांनी

डनलापला पाठविले होते. त्यामुळेच केवळ इंग्रज सरकारचा सावंतवाडी सरकारवर विश्वास राहिलेला नाही व म्हणून वाडीकरांना इंग्रजांची मदतही मिळणार नाही, असे डनलापने सावंतवाडीकरांना स्पष्टपणे कळविले होते[४५].

राणीचा सरदार बबना गोपाल याने इंग्रजांच्या प्रदेशातील गुरे न सोडल्याने डनलापने त्वरीत बबना गोपालच्या पलटनीतले दोन सैनिकांना मालवणला अटक केली व गुरे सोडल्यानंतरच वरील दोन सैनिकांची सुटका होईल असे जाहिर केले. बबना गोपालही ब्रिटीशांची गुरे सोडण्यास तयार होईना व डनलापही त्याचे सैनिकांची सुटका करण्यास तयार होईना; यावेळी राणी दुर्गाबाई काहीच स्वत:चा निर्णय घेऊ शकत नव्हती, कारण आपापसात चाललेल्या संघर्षामुळे सरदार दिवसेंदिवस प्रबळ बनत चालले होते. म्हणूनच राणीने इंग्रजांच्या छत्राखाली जाण्याची तयारी दर्शविली होती. परंतू ब्रिटीश सरकारला आता लवकरच सावंतवाडी राज्याचा शेवट करून अस्तित्वही नष्ट करावयाचे होते. राणी दुर्गाबाई आता इंग्रजांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेण्यास तयार झाली, एवढेच काय पण हव्या त्या मागण्याही मान्य करण्यास ती एका पायावर तयार झाली होती. परंतू आता उलटे होऊन इंग्रज सरकारचाच राणीवरील विश्वास उडाला. इंग्रजांचा भरवसाच राहिला नाही. म्हणून इंग्रजांनी नेहमी राणीच्या विरुध्द भूमिका घेतली होती[४६]. आणि कोणत्या मार्गाने सावंतवाडी संस्थान खालसा करून आपल्या साम्राज्यात विलीन करता येईल यासाठी प्रयत्न तातडीने सुरू केले होते.

राणीच्या वागण्यावर इंग्रजांनी उघड उघड अविश्वास दर्शविला होता. तरी सुध्दा ११ जानेवारी, १८१७ मध्ये राणीने इंग्रज सरकारला म्हणजे एलफीन्स्टनला पत्र पाठवून कळविले की कंपनी सरकारशी पूर्ववत मैत्री स्थापण्याची वाडीकरांची तीव्र इच्छा आहे. यावेळी राणीने आपले सरदार संभू गोविंद, बबना गोपाल, यांना हुकूम दिला की जेव्हा तुम्ही व्यापारासाठी मालवण या बंदरात जाल, तेव्हा कोणासही त्रास देता कामा नये असा सरदारांना

आदेश दिला होता. म्हणजे अप्रत्यक्ष इंग्रजांना त्रास दिला जाणार नाही असे आश्वासन देऊन त्यांच्याशी सावंतवाडीकरांचे संबंध सुधारावे असे राणीला वाटत होते व तसे राणीने संबंध सुधारण्यासाठी इंग्रजांना आवाहनही केले होते. पुन्हा इंग्रजांना लिहीले की, सावंतवाडीला कॉन्फरन्स भरविली होती तेंव्हा मेजर हजर होता. आमच्यात वाडीकर व इंग्रज यांच्यातील मैत्री वाढत जावी व ती पक्की व्हावी अशी चर्चा झाली होती. याहीपुढे जाऊन कंपनी सरकारने सावंतवाडीकरांना प्रत्येक कठीण प्रसंगाच्या वेळी मदत करावी असेही आमच्यात बोलणे झाले होते. यावेळी वाडीकरांनी वेंगुर्ला सोडावा व त्यांना नरसिंहगड व भरतगड मिळावा असे ठरले होते[47].

परंतु इंग्रज सरकारने मात्र याविरूध्द पवित्रा घेऊन भरतगड व नरसिंहगड हे किल्ले वाडीकरांच्या ताब्यातून काढून घेतले व ते कोल्हापूर करांच्या ताब्यात दिले. म्हणजे इंग्रजांनी जरी माझा देश बुडावा अशी आशा केली तरी मी माझ्या सैन्याला कंपनीविरूध्द जाण्यापासून परावृत्त करील. आणि कंपनी सरकारशी मैत्रीच स्थापन्याचा प्रयत्न करीन असे राणीने इंग्रजांना चोखपणे सांगितले. राणीने इंग्रजांपुढे आता एकदम लीनता स्वीकारली होती. कारण अंतर्गत कलहांमुळे राज्यात अस्थिरता निर्माण झाली होती तर बाहेरून इंग्रजांसारख्या शत्रूचे मोठे संकट वाडी संस्थानवर कोसळू पहात होते. त्यामुळे तिला इंग्रजांची मर्जी संपादन केल्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

राणी पुढे लिहीते की माझा मुलगा फोंडसावंत मे. या स्वतःचा संरक्षक मानीत होता. कारण तो कंपनीचा प्रतिनिधी आहे. परंतु तो वारल्यानंतर त्याचा मुलगा अतिशय लहान आहे आणि मी देखील म्हातारी आहे म्हणूनच मी कंपनीसरकारला नेहमी विनंती करते की माझे, माझ्या नातवाचे व माझ्या देशाचे रक्षण करावे. तथापि चार वर्षांपासून मी कंपनीसरकारला आंकोड व वराड या जिल्ह्याबद्दल लिहीत आले. परंतु आतापर्यन्त कंपनीसरकारकडून एकही व्यवस्थित उत्तर आले नाही याचा परिणाम माझ्या राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर झाला. खजिना रिकामा

झाला तरी अजून ते जिल्हे मायूगा ताब्यात आले नाहीत राणीने वरीलप्रमाणे सविस्तरपणे इंग्रजांना लिहीले व शेवटी संबंध वृध्दींगत व्हावे अशी विनंतीही केली[४८].

अशा रितीने राणीच्या इच्छेनुसार लगेच तिच्यावर अनेक जाचक अटी लादून तिच्या पत्राला एलफीन्स्टनने उत्तर दिले. त्यात लिहिले की ज्यामुळे तुला आजगांव पाट व हवेली या दोन तफांतील महसूल देऊ केला होता, त्यावेळी तू हे प्रकरण अमान्य केले होते त्यामुळे इंग्रज सरकारने जबरदस्तीने तुला ते मान्य करण्यास भाग पाडले. तेव्हा या तफां तू गमविल्या याचे कारण तू केलेले इंग्रज सरकारशी युध्द होय. तुम्ही वाडीकरांनी भरतगडावर हल्ला केला तेव्हा तो किल्ला आमचा मित्र करवीरकरांच्या ताब्यात होता, असे असतांना ही तू भरतगडावर हल्ला करण्याचे धाडस केले हा निर्णय तू चुकिचाच घेतला होता असे लिहीले, तरी शेवटी एलफीन्स्टनने राणीच्या तब्येती विषयी देखील चौकशी केली होती. याचा अर्थ असा की इंग्रज सरकारही आता सावंतवाडीकरांशी मैत्री संपादन करण्यास तयार झाले होते कारण आता वाडीकर पूर्णपणे इंग्रजांच्या कह्यात आले होते. कमकुवत, अकार्यक्षम, भ्रष्टाचारी असे सावंतवाडीकरांचे प्रशासन चालू होते. इंग्रजांनी आता शेवटी पूर्ण फायदा घेण्याचे ठरवून त्यांच्याशी मैत्री करण्याचा विचार केला होता[४९].

सावंतवाडीकर व पेशवे यांच्यात गुप्त करार :-

राणी दुर्गाबाई एकीकडे कंपनी सरकारशी मैत्रीचा हात पुढे करते आणि मैत्रीसाठी इंग्रजांच्या वाटेल त्या जाचक अटीही मान्य करण्यास तयार होते आणि दुसऱ्या बाजूस इंग्रजांना अंधारात ठेऊन त्यांच्या विरूध्द पेशव्यांबरोबर गुप्तकरार करते हे गुढ इंग्रजांना उमजत नव्हते. राणीने इ.स.१८१७ च्या एप्रिल मध्ये पेशव्यांशी इंग्रजांच्या विरूध्द गुप्त करार केला हा करार फक्त कंपनिसरकारच्याच विरोधी होता. हा करार होताच इंग्रजांच्या गुप्तहेर खात्यातील हेरांनी ही बातमी ताबडतोब

इंग्रजांना कळविली[५०]. पहिल्यांदा या कराराची बातमी मालवण रेसिडेंटला समजली मालवण रेसिडेंटने पुणे रेसिडेंटला कळविली. राणी दुर्गाबाई विश्वासघातकी असल्याची जाणीव इंग्रज सरकारला झाली. त्यामुळे तिच्याशी कधीही मैत्री संपादन करण्याचा प्रयत्न करायचा नाही व तिने मैत्रीसाठी पुढे केलेला हात मागेच ठेवायचा व तिचे राज्य लवकरात लवकर घशात घालावयाचे असा विचार यावेळी इंग्रजांनी केला, कारण आतले राजकारण राणीचे त्यांना वेगळेच जाणवले होते.

गुप्त कराराची बातमी कळताच एल्फीन्स्टनने राणीला कळविले की सावंतवाडीसरकार मैत्रीचा हात पुढे करून विश्वासघात करू पहात आहे. तुझ्या लोकांनी मालवण प्रांतात गोंधळ घालण्यास सुरवात केली आहे. वराड जिल्ह्यावर हक्क दाखवून वाडीकरांनी लढाईची तयारीही केली आहे. जर वाडीकरांनी सैन्यानिशी इंग्रजांच्या प्रदेशावर चाल केली तर राणी तुला मात्र स्वत:लाही सजा दिली जाईल, याचा विचार करावा. कोणत्याही प्रकारे नंतर राणीवर व तिच्या राज्यावर दया केली जाणार नाही. एवढेच नव्हे तर कदाचित सावंतवाडीकरांना संपूर्ण राज्यालाही मुकावे लागेल. याचा अर्थ असा की इंग्रज सरकार आता चिडले होते त्यामुळेच त्यांनी अशी भाषा सुरू केली होती आणि आता सावंतवाडीराज्याचा शेवटही जवळ आला होता. एल्फीन्स्टन एका मागून एक दमबाजीची राणीला पत्रे पाठवू लागला. गुप्तकरार हे एक कारण इंग्रजांना मिळाले, त्याचा फायदा उठवून वाडीकरांवर त्यांनी ताशेरे उडविण्यास प्रारंभ केला. राणीने दिलेले कोणत्याही आश्वासनावर त्यांनी विश्वास न ठेवण्याचे ठरविले[५१].

कंपनी प्रदेशात वाडीकरांची लुटालूट :-

ऑगष्ट १८१७ मध्ये कंपनी सरकारच्या प्रदेशात वाडीसरकारच्या लोकांनी जाऊन लुटालूट आरंभिली. नांदुस गावांत ३० वाडीकरांचे लोक घुसले येथे एका ब्राह्मणाच्या घरात जाऊन त्याची ५०० रू.ची मालमत्ता लुटली व कांहींना जखमीही केले. यानंतर त्यांनी वेंगुर्ला हे खेडे चार वेळा लुटले.

सर्व ठिकाणी केलेल्या लुटीची वार्ता एल्फीन्स्टनने वाडीला राणीस तातडीने कळविली व राणीला सांगितले की एकीकडे मैत्रीची भाषा व दुसरीकडे आमचा प्रदेश लुटून फस्त करण्याचे धोरण चालू ठेवतात. अशी तक्रार राणीकडे पाठविली होती. एवढेच नव्हे तर लुट करणाऱ्यांना राणीने सजा करावी व लुटलेली संपत्ती परत घेऊन ज्याची होती त्याला परत करावी. आम्हाला खात्री आहे की तू आम्ही सांगितल्याप्रमाणे वागशील तसे न केल्यास आमचे अधिकारी आमच्या प्रदेशाचे संरक्षण करतीलच यात शंका नाही आणि यापुढे कधीही वाडीकर आमच्या प्रदेशात घुसून लुट करणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. याबरोबरच इंग्रजांनी राणीकडे खालील मागण्या केल्या[५२].

<u>इंग्रजांच्या मागण्या</u> :-

वाडीतील सरदारांनी इंग्रजांचा प्रदेश लुटला म्हणून इंग्रज सैन्य वाडीत घुसले आणि ब्रिटीश सरकारने लगेच वाडीकरांकडे मागण्या पाठविल्या. त्या खालीलप्रमाणे होत्या. ->

१) गुन्हेगारांना ताब्यात द्या.

२) लुटलेली संपत्ती परत करणे.

३) संभाजी सावंत व बबना गोलाल यांचे सत्तेवरुन उच्चाटन होणे आवश्यक

४) रेड्डी व निवतीचे किल्ले ३ वर्षे इंग्रजांना द्यावेत

सावंतवाडीकरांकडे मागण्या गेल्यानंतर त्यांनी वाचून त्यावर विचार केला व लगेच त्या सर्व अवास्तव मागण्या असल्याने व स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या मागण्या असल्यामुळे अमान्य केल्या. लगेच तसे मागण्या फेटाळल्याचे पत्रही सावंतवाडीकरांनी इंग्रजांना पाठविले. त्यामुळे इंग्रज सरकारचे पित्त अधिक खवळले व त्याची परिणीती इंग्रज व सावंत यांच्यात संघर्ष निर्माण तोपयाहार झाली. या संघर्षात इंग्रजांची सरशी झाल्याने वाडीकरांनी माघार घेऊन लगेच रेड्डी व निवतीचे किल्ले इंग्रजांना देऊन टाकले[५३].

अशा रितीने संघर्ष संपुष्टात आला. परंतु इंग्रजांचे मात्र हे किल्ले घेऊन समाधान झाले नाही तर त्यांना संपूर्ण वाडीचे राज्यच घेण्याची तृष्णा होती.

Th. 6709

वाडीकरांच्या लोकांनी इंग्रजांच्या प्रदेशातील खेडी लुटली इंग्रजांनी वाडीकरांकडे तक्रारही नोंदवली. परंतु राणी दुर्गाबाईने ही लुट माझ्या राज्यातील लोकांनी केलेली नसून इतर प्रदेशातील लोकांनी वाडीकरांच्या लोकांच्या नावाखाली केली असावी असे इंग्रजांना ठामपणे व आत्मविश्वासाने कळविले होते. एवढेच काय पण मी त्याचा बंदोबस्तही यापुढे करू शकणार नाही, असेही लिहीले होते. यावरून राणी दुर्गाबाईच्या धाडसाची कल्पना येते. मात्र जास्तच न टळण्यासारखे संकट येण्याची वेळ आली तर लगेच सर्व चुका राणी कबुलही होत असे व लगेच इंग्रजांशी मैत्रीसाठी हात ही पुढे करण्यास तयारी दाखवित असे. परंतु कंपनी सरकारही आता राणीचा स्वभाव ओळखून होते. राणीवर प्रत्यक्ष आरोप करण्यासही कंपनीसरकार मागे पुढे पहात नव्हते. कारण राणी जर कंपनी सरकारशी अविश्वासाने वागत असेल तर कंपनी सरकार देखिल यापुढे राणी बरोबर त्याच पध्दतीने वागेल असे कंपनी सरकारच्या अधिका-यांनी राणीला कळविले होते[५४].

इंग्रजांचा वाडीकरांवर हल्ला करण्याचा निर्णय :-

जानेवारी १८१८ मध्ये राणीने व तिच्या सरदारांनी ब्रिटीशांच्या प्रदेशावर हल्ले करण्यास सुरवात केली. अजूनही आपण इंग्रज सरकारकडून गेलेला प्रदेश मिळवू अशी खात्री वाडीकरांना वाटत होती. परंतु वाडीकरांना वाटणारी खात्री आता निरूपयोगी ठरली होती. हल्ल्याची बातमी कंपनी सरकारला समजताच इंग्रजांची लेफ्टनंट कर्नल इमलॅक यास सैन्य देऊन सावंतवाडीकरांच्या विरूध्द पाठविण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला.

दरम्यानच्या काळात सावंतवाडीकर आता पेशव्यांच्या सल्ल्याने वागू लागले त्यामुळे इंग्रजांना जास्तच राग आला. परंतु इकडे इ.स. १८१८तच पेशव्यांचा इंग्रजांनी ठिकठिकाणी पराभव करून त्यांचे अस्तित्वही धोक्यात

Th. 6709

आणले होते.त्यामुळे सावंतवाडीकरही आता घाबरले होते. कारण पेशवे व इंग्रज यांच्यात जेव्हा ठिकठिकाणी लढाया सुरू होत्या तेव्हा वाडीकरांनी ब्रिटीशांच्या प्रदेशाला त्रास दिला व बराच प्रदेश लुटलाही होता. याचवर्षी कंपनी सरकारने पेशवाईचा शेवट केला व पेशव्यांचे संपूर्ण राज्य आपल्या साम्राज्यात विलिन केल्याचे जाहिर केले[५५].

पेशव्यांच्या स-तेचा शेवट केल्यानंतर इंग्रजांनी आपले लक्ष सावंतवाडीकरांकडे वळविले आणि आता सावंतवाडी राज्य पूर्णपणे आपल्या ताब्यात घेण्याचे ठरविले व त्यानुसार सावंतवाडी राज्य शेवटी आपल्या वर्चस्वाखाली आणले आणि प्रत्येक राजास इंग्रजांच्या सल्ल्याप्रमाणे वागणे भाग पाडले.

परंतु असे असले तरी राणीने मात्र शेवटचा प्रयत्न म्हणून २००० सैन्य पुन्हा जमविले, निपाणीकरांची ही इंग्रजांविरुध्द मदत घेण्याचे ठरले होते.परंतु ब्रिटीश हेराने ही वार्ता लगेच इंग्रजसरकारला त्वरीत कळविली त्यामुळे इंग्रज सावध झाले होते. १६ नोव्हेंबर,१८१८ पर्यन्त सावंतवाडी राज्याचा शेवट होण्याची वेळ आलेली होती. परंतू तरी सुध्दा सावंतवाडीकर इतरांच्या मदतीने आपले व आपल्या राज्याचे अस्तित्व टिकविण्याचे अयशस्वी प्रयत्न करीत होते. परंतु आता ते शक्य नव्हते. पेशव्यांसारखी महाराष्ट्रातील सर्वात मोठी स-ता संपुष्टात आणून त्यांच्या राज्यावर आपला युनियन जॅक फडकविला तेंव्हा सावंतवाडीकर तर कंपनी सरकारपुढे अगदी क्षुल्लक होते. त्यामुळेच इंग्रजांनी सावंतवाडी राज्य अचानकपणे ताब्यात घेतले नाही[५६].

१५ डिसेंबर १८१८ त कंपनी सरकारने एलफीन्स्टनला सावंतवाडीवर स्वारी करण्याची सूचना दिली व सैन्याचे नेतृत्व मात्र मेजर जनरल सर वुईल्यम कीर यांच्याकडे दिले व लगेच वाडीकरांपुढे पुढीलप्रमाणे मागण्या ठेवल्या.जर त्यांनी मागण्या मान्य केल्या नाही तर लगेच आपले सैन्य वाडीत घुसवायाचे, नाहीतर मग शांतता प्रस्थापित करावयाची. इंग्रजांच्या मागण्या पुढीलप्रमाणे :-

१. वाडीसरकारने मागे असलेली खंडणीची बाकी व पुजेची लुटलेली संप-ती परत करावी.

२. कंपनी सरकारला काली नदी व पोर्तुगीज राज्य यातील किनारा दिला पाहिजे. त्यात निवती व रेड्डी किल्ले असावे.

३. कंपनी वेंगुर्ला स्वत:च्या ताब्यात ठेवील त्याला जोडून असलेले मालवण व पाट कंपनीच्याच ताब्यात राहतील.

वाडी सरकारने शेवटी १७ फेब्रुवारी १८१९ मध्ये जनरल किर बरोबर तह करून मागण्या मान्य केल्या हा तह इष्ट इंडिया कंपनी व खेमसावंत भोसले यांच्यात झाला व तहानुसार सावंतवाडीकरांनी इंग्रजांचे स्वामीत्व मान्य केले[५७].

इ.स.१८१९ च्या तहानुसार खेमसावंताने संभु सावंत व बबना गोपाल यांचीपुन्हा नेमणूक करू नये अशी हामी ब्रिटीश सरकारला दिली आणि वरील दोघा सरदारांना इंग्रजांच्या ताब्यात देण्याचेही मान्य केले. तर्फ पाथ व आझगांवही निवती व रेड्डीबरोबर इंग्रजांना दिले. काली नदीपासून तर पोर्तुगीज राज्यापर्यन्तचा भागही इंग्रजांना दिला. त्याचबरोबर सावंतवाडी राज्यात ब्रिटीशांची पल्टन ठेवण्याचेही मान्य केले. कॅप्टन हंचीनसन यास पोलीटीकल एजंट म्हणून नेमले. हचीनसन करवी इ.स.१८२० च्या फेब्रुवारीत इंग्रज सरकारने वाडीकरांशी पुन्हा तह केला. या तहानुसार आझगांव जिल्हा पूर्ण इंग्रजांना मिळाला. मनोहर गड किल्ल्याचा महसूल व त्या किल्ल्याची वाडीकरांची मालकी मान्य करण्यांत आली. इंग्रजांनी आता जवळ जवळ सावंतवाडीकरांचे सर्व हक्क कमी कमी करीत आणले व शेवटी इ.स.१८२० नंतर थोडयाच दिवसांत हचीनसची नेमणूकही रद्द केली व रत्नागीरीच्या न्यायधिशाच्या ताब्यात सावंतवाडीचा कारभार पूर्णपणे देण्यांत आला[५८].

इ.स.१८२२ मध्ये सावंतवाडीचा कारभार रत्नागीरीच्या कलेक्टरकडे सुपूर्त केला. याचदरम्यान प्रसिध्दगड व नरसिंगड यांच्या महसूलावरून सुरू असलेला वाडीकर व करवीरकर यांच्यातील संघर्ष इंग्रज सरकारने मध्यस्थी करून मिटविला. वाडी सरकारने कुलसूली, नेरून, बोडीवी, हुबळी, मुगम या तर्फांचा करवीरकरांना दरवर्षी ७८३४ रुपये करवीरकरांना महसूल द्यावा असे ठरविण्यात आले. अशारितीने सावंतवाडीचा कारभार खेमसावंताने शेवटी इंग्रजांच्या सल्ल्यानेच सुरू केला. म्हणजेच इंग्रज सरकारचा आता वाडीकरांच्या कारभारात हस्तक्षेप सुरू झाला. खेमसावंत हा कारभार पहाण्याच्या बाबतीत कमकुवत ठरला खेमसावंत उर्फ बापूसाहेब याने महसूल व्यवस्थेकडेही कानाडोळा केला, सरदारांवर नियंत्रण ठेवले नाही. त्यामुळे कोल्हापूरकरांचा महसुलाचा हप्ता व इंग्रज सरकारने चंद्रोबाला ठरवून दिलेला तणखाही वाडीकरांनी दिला नाही. त्यामुळे देण्याची रक्कम दिवसेंदिवस वाढतच गेली तरी सुध्दा वाडीकरांनी त्याकडे लक्ष दिले नाही[५९]. इ.स.१८३० मध्ये तर वरील देणेची रक्कम खूपच वाढली. या अगोदर दोनवर्षे फोंडसावंताने वाडीसरकारविरूध्द बंड केले. त्याने महादेव गडाला वेढा दिला. त्याच्या विरूध्द वाडीकरांनी इंग्रजांची मदत घेतली व फोंडसावंताचा पराभव केला. फोंड सावंत लगेच इचलकरंजी करांच्या आश्रयास पळाला. इ.स.१८३२ ते १८३८ या कालावधीत सावंतवाडी राज्यात बंडाळी माजली होती. सर्वत्र अस्वस्थता व अशांतता निर्माण झाली होती. फोंड सावंताने आपले बंडाचे निशाण आतापर्यन्त खाली ठेवले नव्हते. १८३२ मध्ये वाडी सरकारने इंग्रजांशी तह केला. या तहानुसार वाडीसरकार यापुढे कोणत्याही मंत्र्यास इंग्रज सरकारच्या सल्ल्याशिवाय काढून टाकणार नाही असे ठरले. परंतु वाडीसरकारने हा करार दीर्घकाळ पाळला नाही. इ.स.१८३६ त सावंतवाडी प्रदेशातून वेंगुर्ल्यापासून तर रामघाटापर्यन्त इंग्रजांचे सैन्य जात असेल तर त्यावर वाडीकरांनी कर लादला होता. हा कर रुपाने मिळणारा पैसा यापुढे वाडीकरांनी न घेता तो इंग्रजांनी घ्यावा असे ठरले[६०].

आत्ता वाडीसरकारला मिळणारा कर त्याने पैसा देखील इंग्रज सरकार घेऊ लागले, त्यामुळे वाडीसरकार सरदारांचे, नोकरांचे पगारही नियमित करीत नव्हते, तर ते उलट थकले होते त्याचा परिणाम राज्यात अराजकता बंड, अस्थिरता निर्माण होण्यावर झाला. त्यामुळे पुन्हा इंग्रजांनी शांतता निर्माण करण्यास वाडीसरकारला मदत केली. इ.स. १८३८ मध्ये सावंतवाडी राज्यात मोठ्या स्वरूपाचे बंड झाले. त्यामुळे ब्रिटीश सरकारने वाडीसरकारचे सर्व अधिकार काढून घेतले व वाडी राज्याचे व्यवस्थापन तात्पुरते इंग्रजांनी ताब्यात घेतले व लगेच कारभार पहाण्यासाठी पॉलीटीकल सुपरीनटेंडेंटची नेमणूक करण्यात आली. इंग्रज सरकारच्या ताब्यात इ.स. १८३८ मध्ये वाडीच्या राज्याचा कारभार ~~आपल्या हातात~~ आल्यानंतर दिवाळे निघालेल्या वाडीच्या राज्याची आर्थिक बाजू पुन्हा सुधारली आणि वाडीची अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभी केली. अशा रितीने शेवटी संपूर्ण वाडीकरांचे राज्य हे इंग्रजांच्या साम्राज्यात विलीन झाले. व त्यांच्या साम्राज्याचे अविभाज्य घटक बनले[६१]. १७ सप्टेंबर १८३८ रोजी वाडीचा कारभार पहाण्यासाठी इंग्रज सरकारने रीचर्ड स्पूनर या पॉलीटीकल सुपरीनटेंडेंटची नेमणूक केली. व सावंतवाडी संस्थानचे स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात येऊन इंग्रजी अमल सुरू झाला.

१ पूरेक, खंड २ ले ७१ पृ. २०३-२०५

२ पिंगुळकर ,मांसई, परिशिष्ठ २१, पृ. ९९

३ कि-ता.

४ पेद ,२५-२३-२२

५ भाइसंत्रे, १४/६

६ भारसं.,त्रे पृ. ४३

७ कि-ता.

८ पुरेक, ख-२ ले ७१ पृ. २०३-२०५

९ शिवता, खं. १३, पृ. ६४

१० केळकर, मइ. पृ. १३४, ३७

११ भाइसत्रे, पृ. ३०

१२ कि-ता, पृ. ३८

१३ कि-ता.

१४ कि-ता, पृ. ३९

१५ Political Diary No.226,232,pp.5606, 2759,193,317.

१६ Political Diary No.280 (3) p.1514.

१७ Political Diary No.282, pp.323-327.

१८ भाइसंत्रे पृ. ६० वर्ष १४

१९ Courtney and Auld,MOSS,p.6.

२० कि-ता पृ. ७

२१ Courtney and Auld,MOSS.p.8.

२२

२३ चौकसी, मारे, पृ. ३५-३६

२४ चौकसी, मारे, पृ. ३४-३५-४१

२५ चौकसी, मारे, पृ. ३९. पत्र.७

२६ चौकसी, मारे, पृ. ३९-३४ पत्र ८

२७ कि-ता, पृ. ४२-४३

२८ कि-ता, पत्र, १२ पृ. ४३-४५

२९ चौकसी, मारे, पृ. ४३-४५ पत्र १२

३० कि-ता, पृ. ४९ पत्र १५

३१ चौकसी, मारे, पृ. ४९-५० पत्र १५, १३, १४

३२ कि-ता, पृ. ५४, पत्र १९

३३ चौकसी, मारे, पृ. पत्र २१

३४ चौकसी, मारे, पृ. ६० पत्र २२

३५ कि-ता, पृ. ६१-६२, पत्र २२.

३६ निद, पृ. १ (२००३७)

३७ चौकसी, मारे, पृ. ८२-८८

३८ मारे, पृ. ८८, पत्र ४२ चोकसी

३९ मारे, पृ. ८८-९० पत्र ४२. चोकसी

४० चौकसी, आर.डी., मारे, पृ. ९४ पत्र ४४-४५.

४१ चौकसी, मारे, पृ. ९५ पत्र ४५

४२ चौकसी, मारे, पृ. ९५ पत्र ४५.

४३ चौकसी, मारे, पृ. ९६, पत्र ४६

४४ चौकसी, आर.डी., मारे, पृ. १०६ पत्र ५२, ५३

४५ चौकसी, मारे, पृ. १०७, पत्र ५३

४६ चौकसी, कि-ता, पृ. १०८ ५३. पृ.

४७ Bombay Archives. Political diary No.431 po. 1882-84.

४८ कि-ता

४९ Political Diary No.478 p.867-73.

५० चोकसी, मारे, पृ. ११३-१४ पत्र ५५.

५१ कि-ता, मारे, पृ. ११५-१६ पत्र ५७

५२ मारे, पृ. ११७-१९ पत्र ५८. चोक्सी

५३ MOSS पृ. ७.

५४ Political Diary No. 2131, pp. 1082-84.

५५ Political Diary 392 (8) pp. 457-60.

५६ चोकसी, मारे, पृ. १३४ पत्र ७८

५७ MOSS p. 7. Courtney & Auld.

५८ Courtney and Auld, MOSS. p. 7.

५९ Courtney and Auld, MOSS. P. 8.

६० Courtney and Auld, MOSS, P. 9.

६१ Courtney and Auld, MOSS, P. 10.

सावंत - पेशवे संबंध

पेशव्यांच्या काळात वाडीकर सावंतांच्या सभोवती पोर्तुगीज, आंग्रे, कोल्हापूरकर, पेशवे, हैदर किंवा टिपू या सत्ता होत्या. यापैकी पेशव्यांनी सावंतवाडीच्या सावंतांवर आक्रमण करण्याची कधीच इच्छा धरली नाही. कारण पश्चिम किनाऱ्यावर असलेल्या शत्रूंच्या विरुध्द पेशव्यांना सावंतवाडीकरांची मदत आवश्यक होती[१].

परंतु तरी सुध्दा पेशव्यांनी स्वतःच्या फायद्याचा जास्त विचार केलेला दिसतो. त्यांना राज्यविस्तारासाठी भरपूर जागा जरी होती तरी सुध्दा त्यांनी सावंतांकडे दुर्लक्ष केलेच नव्हते. येन केन प्रकारे ते सावंतांना मदत करून पोर्तुगीजांसारख्या परकीय सत्तेला दूर लोटण्याचा प्रयत्न करीत होते. सिद्दी यांशी देखील लढण्यासाठी पेशव्यांनी सावंतवाडीकरांची मदत घेतली होती. उदा. पेशवे - पोर्तुगीज संघर्षात सावंतांनी पेशव्यांना मदत केली. पेशव्यांनी आपले राज्य वाढविण्यासाठी व आर्थिक फायद्यासाठी नेहमी सावंतवाडीकरांची मदत घेऊन फायदा करून घेतलेला दिसतो. पेशवे सावंतांशी तह करीत असत आणि त्यात स्वतःच्या फायद्यासाठी काही कलम व सावंतांच्या फायद्यासाठी काही कलम घालीत असत, परंतु प्रत्यक्षात मात्र पेशव्यांचा या तहामुळे जास्त फायदा होत असे, कारण इतर सत्तेविरुध्द लढण्यासाठी पेशव्यांकडे सैन्यबळ कमी पडत असल्यामुळे त्यांना सावंतांची मदत घेणे अत्यावश्यक होते आणि म्हणूनच ते अशा प्रकारे तह करून त्यांना आमिष दाखवून त्यांची मदत मिळविण्याचा प्रयत्न करीत असत. त्यांच्यात एकमेकात व्देश जरी निर्माण झाला तरी थोड्याच अवधीत त्यांचे संबंध पूर्ववत झालेले आढळतात. कारण पेशव्यांनी सावंतांची वेळोवेळी मदत घ्यावी लागत होती, ती स्वतःच्या फायद्यासाठीच असे दिसते.

पेशव्यांनी सावंतवाडीकरांकडे लष्करी मदत मागितली :-

इ.स. १७३८ मध्ये फोंडसावंत हा सावंतवाडीच्या गादीवर होता. त्यावेळी पेशव्यांनी त्यांच्याकडे सैन्याची कुमक मागितली होती. कारण पेशव्यांचे यावेळी आंग्र्याविरुध्द व पोर्तुगीजांविरुध्द युध्द चालू होते. त्याच्या मोबदल्यात पेशव्यांनी सावंतांना काही गांवे मोकासा करून देण्याचे ठरले होते. असा जरी त्यांच्यात ठराव झाला होता तरी त्या ठरावास त्यांनी लेखी तहनाम्याचे स्वरूप दिले. उभयंतामध्ये झालेल्या या तहामुळे सावंतांचा फायदा होणार होता. कारण पोर्तुगिजांसारख्या बड्या शत्रूविरुध्द पेशव्यांकडून वेळी अवेळी मदतीचे आश्वासन मिळाले होते. आणि सावंतवाडीसंस्थानात शांतता नांदावी, त्यास कुठलाही त्रास होणार नाही[२], यासाठी तर मराठ्यांनी "श्रीं ची " शपथ घेतली होती. या तहामुळे सावंतांना काही तोफांचाही लाभ होणार होता. थोडक्यात म्हणजे हा तह सावंतांच्या दृष्टीने अतिशय फायद्याचा होता. कारण प्रत्येक कलम हे समजूतीने मांडून त्यात पेशव्यांनी सावंतांच्या फायद्याचाही विचार केला आहे. इंग्रजांचे सावंतांशी जे तह झाले त्यात प्रत्यक्ष अन्याय न होता अप्रत्यक्षरीत्या अन्यायच झाले. मात्र या तहामुळे सावंतवाडीकरांवर अन्याय झाला नाही. पेशव्यांनी आपल्या प्रदेशाच्या संरक्षणाबरोबर सावंतवाडी राज्याचेही संरक्षण, आपल्या राज्याच्या कल्याणाबरोबर सावंतवाडी राज्याच्या कल्याणाचाही विचार केला होता, यात शंका नाही. म्हणूनच सावंतवाडीसरकार देखील प्रत्येक निर्णय भक्कमपणे घेऊ लागले. पेशव्यांना सावंतवाडी संस्थान जगवावयाचे होते. कारण पेशव्यांच्या राज्याची सीमा व पोर्तुगीजांच्या राज्याची सीमा या दोन्ही सीमांच्या मध्यभागी सावंतवाडी राज्य पसरलेले होते, आणि पोर्तुगिजांनी जर आपल्या प्रदेशावर स्वारी करण्याचा प्रयत्न केला तर सावंतांना त्यांच्याविरुध्द चिथवून देऊन

लढाई आपल्या प्रदेशात न होता व आपल्यावरील संकट टाळण्यासाठी पोर्तुगीज व सावंत यांच्याच प्रदेशात युध्द झाले पाहिजे व आपल्या राज्याला पोर्तुगिजांपासून काहीही इजा होता कामा नये यासाठी त्यांनी सावंतवाडी राज्याचा "बफर स्टेट" म्हणून उपयोग करून घेतला आणि म्हणूनच सावंतांना पेशव्यांनी वेळोवेळी सहकार्य केले. ~~[illegible]~~ यावेळी गादीवर असलेला राजा फोंडसावंत इतका काही कर्तबगार नव्हता आणि म्हणूनच पेशव्यांनी जरी सावंतवाडी राज्याचा बफर स्टेट म्हणून उपयोग करून घेतला; तरी त्यात सावंतांचा फायदा झाला. वाडीकर आपले राज्य वेळोवेळी आलेल्या संकटामधून वाचवू शकले.

वरील तहानंतर लगेच ११ डिसेंबर १७३८ रोजी दुसरा तह उभय पक्षांमध्ये झाला[3]. या तहाप्रमाणे पेशव्यांनी सावंतांवर पोर्तुगिजांचा प्रदेश जिंकून त्यांचा पराभव करण्याची कामगिरी सोपविली होती आणि त्याच्या मोबदल्यात सावंताना वेगवेगळ्या प्रकारची बक्षिसे देण्याचे या तहात आश्वासन दिले होते. आणि पोर्तुगिजांनी घेतलेले सावंतांचे खोरजुवे व पनाळे, आणि डिचोली ही देखील त्यांना परत मिळणार होती. पेशव्यांनी अशा प्रकारे सावंतांना मदत करून सावंतवाडी राज्याच्या आसपासचा प्रदेश घेतला व सावंतवाडी राज्याच्या सीमाही वाढविल्या होत्या. उदा. इ.स. १७३९ मध्ये पेशवे व पोर्तुगीज यांच्यात युध्द झाले, त्यात पेशव्यांचा विजय झाला आणि त्यांच्यात झालेल्या तहात पेशव्यांनी सावंत भोसले यांच्यासाठी खोरजुवे व पनाळे ही बेटे पोर्तुगिजांकडून सावंतांना देण्यात आली[4]. खरे पाहिले तर इ.स. १७०० नंतरच वाडीकर सावंतांच्या कुटुंबाची भरभराट झालेली आहे[5]. यानंतरच सावंतवाडीकर स्वतंत्रपणे राज्यकारभार करू लागले आणि त्यांचे राजकीय स्थान, निश्चित झाले. श्री.शाहू आणि जयराम व रामचंद्र सावंत यांच्यात २९ जून, १७४९ रोजी तह झाला. या तहात मात्र पेशव्यांनी काहीसे प्रमाणात आपला स्वार्थ साधला होता. सावंत -

भोसले यावेळी पूर्णपणे स्वतंत्र होते. परंतु या तहामुळे पेशव्यांकडून त्यांच्यावर ~~काहीशा प्रमाणात~~ दडपण आलेले होते. तरीसुध्दा त्यांनी ह्या परिस्थितीस तोंड देऊन आपले स्वतंत्र अस्तित्व टिकविले. ज्याप्रमाणे पेशव्यांनी या तहात स्वत:चा फायदा करून घेतला, त्याचप्रमाणे सावंतांचाही काही प्रमाणात का होईना पण फायदा झालाच होता. सावंतांना सैन्याची, दारुगोळ्याची मदत करून त्यांनी जिंकलेल्या प्रांतातूनच पेशव्यांना खंडणी किंवा त्या जिंकलेल्या प्रांतामधील काही प्रदेश देण्याचे कबूल केलेले होते[६]. हे लक्षात घेता असे समजते की सावंतवाडीकरांच्या स्वत:च्या राज्यातून मात्र पेशव्यांना कवडीचा फायदा नव्हता व यातूनच काही सावंत पेशव्यांना देतही नव्हते. तर देत होते ते जिंकलेल्या प्रदेशातूनच. तेव्हा तसा सावंतांचा त्यात अजिबात तोटा झाला नाही उलट त्यांची स्थिती बळकट होत गेली व फायदाच होत गेला. सर्वसाधारणपणे निरीक्षण केल्यानंतर असे आढळले की जेवढे या दोन्ही पक्षात तह झालेले आहे, त्यामध्ये असा कुठलाही तह आपणास सापडणार नाही की ज्यात सावंतांचा पूर्णपणे तोटा झालेला आहे. या उलट त्यांचा फायदाच झालेला आढळून येईल. प्रत्येक तहातील कलमे ही दोन्ही पक्षांच्या मान्यतेने ठरत असत व नंतर तहावर सह्या होऊन त्यास मान्यता मिळे व तह जाहीर होत असे.

शाहू छत्रपतीच्या दरबारातही पोर्तुगीज आपल्या हस्तकांमार्फत सावंतांविरुध्द कारवाया करीत होते. तुळाजी आंग्रेही सावंतास आपला शत्रू मानी व त्याच्या नाशासाठी पोर्तुगिजांचे साहय मागत असे. अशा परिस्थितीत सावंतांना एकच आश्रयस्थान दिसत होते व ते म्हणजे नानासाहेब पेशवे हे होय.

बाळाजी बाजीरावाचा सावंतांमधील कलह मिटविण्याचा प्रयत्न :-

जयराम सावंत व रामचंद्र सावंत हे सत्तेवर आल्यानंतर काही वर्षांनी त्यांच्यात आपापसात भांडणे सुरू झाली. ते इ.स.१७३८ ते इ.स.१७५५ पर्यन्त सत्तेवर होते. इ.स.१७५२ मध्ये त्यांच्यात उघडपणे कलह निर्माण झाला आणि दोघे चुलते-पुतणे एकमेकांबरोबर भांडू लागले. यावेळी सावंतांचे प्रधान जिवाजी विश्राम यांचे पेशव्यांच्या दरबारात पूर्वीपेक्षा विशेष वजन पडू लागले व यावेळी प्रामुख्याने त्यांच्यात भांडणे सुरू झाली. त्यांच्यातील कलह मिटविण्यासाठी जवळच्या लोकांनी पुष्कळ प्रयत्न करून पाहिले, परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. शेवटी श्री स्याजी दळवी याने या भांडणाचे वर्तमान बाळाजी बाजीराव यांजकडे जाऊन कळविले[7].

पेशवे बाळाजी बाजीराव याने रामचंद्र सावंत व जयराम सावंत या दोघासही कलह मिटविण्यासाठी उपदेशपर पत्रे लिहीली. त्यांनी चांगल्या रीतीने दोघांनाही साजेसा उपदेश केला. शेवटी पेशव्यांनी असा मार्ग काढला की, रामचंद्र सावंत याने सावंतवाडीस राहून जिवाजी विश्राम यांच्या मदतीने राज्यकारभार चालवावा, व जयराम सावंत यांनी आपले दोन मुलगे व पांडुरंग विश्राम सबनीस यांच्यासह आपल्या दरबारी येऊन रहावे. अशाप्रकारे बाळाजी बाजीराव यांनी दोघांमधील झगडा मिटविण्याचा प्रयत्न करून काही प्रमाणात त्यात यश मिळविले. परंतु याचवेळी इ.स.१७५४ मधील ऑक्टोबर महिन्यात गोव्याचा गव्हर्नर व रामचंद्र सावंत यांच्यात तह होऊन या झगडयाचा परिणाम वाईट झाला व भोसल्यांचे शत्रू पोर्तुगीज यांना आपला हेतू पूर्णपणे साधण्यास आयतीच संधी प्राप्त झाली. ~~होती~~, यांचा विचार मात्र सावंतांनी भांडतांना केला नव्हता हे स्पष्ट दिसते. यासाठीच म्हणजे पोर्तुगिजांचा सावंतांचा आपापसातील कलहात हस्तक्षेप होऊ नये म्हणूनच बाळाजी

बाजीराव पेशवा याने हिरिरीने झगडा मिटविण्याचा प्रयत्न केला होता, तरी सुध्दा शेवटी पोर्तुगीज व रामचंद्र सावंत एक होऊन सावंतवाडीकर पोर्तुगिजांच्या हातातील बाहुले बनले व अखेर पोर्तुगिजांनाच सावंतांचे राज्य बळी पडले. या अगोदरच बाळाजी बाजीराव याने सावंतांना कळविले होते की, जर झगडा लवकर मिटवला नाही तर सावंतवाडी संस्थान धोक्यात येईल व संस्थानचे संरक्षणही धोक्यात येऊन संस्थानास कलह अपायकारक ठरेल. आणि शेवटी तसेच झाले व संस्थानाचे पोर्तुगिजांनी हळू हळू तुकडे करून गिळंकृत करण्यास सुरवात केली. अशा त-हेने बाळाजी बाजीराव पेशवा याने उभयतांमधील कलह मिटविण्याचा प्रयत्न केला. परंतु तरी देखील ते त्यात अयशस्वी ठरले.

इ.स. १७३९ च्या मे महिन्यात पेशवे व पोर्तुगीज यांच्यात युध्द सुरू झाले. या युध्दात पोर्तुगिजांचा पराभव झाला व पेशवे विजयी ठरले. या युध्दानंतर वसईचा किल्ला पेशव्यांच्या ताब्यात आला. या दोघांच्या युध्दानंतर सावंतांना मात्र लाभ झाला. कारण पेशव्यांनी खोरजुवे व पनाले ही बेटे पोर्तुगिजांकडून सावंतांना परत केली आणि पूर्वीच्या, सावंत - पोर्तुगीज तहानुसार १००० झेराफीनें पोर्तुगिजांना सावंत देत असत. परंतु त्याही पुढे देण्याचे पेशव्यांनी त्यांना बंद करण्यास सांगितले. या युध्दामुळे सावंतांवर जो पोर्तुगिजांकडून आघात होत होता, तो आता जवळ जवळ बंद झाला होता. पोर्तुगिजांना सावंतांकडून जाणारी खंडणीही बंद केल्यामुळे आता सावंतवाडीकरांचा आर्थिक फायदा मोठ्या प्रमाणात झाला होता[१].

<u>खेम सावंत तिसरे व पेशवे (१७५५ ते १८०३) :-</u>

हैदर व टिपू यांनी कर्नाटकात आणि मराठ्यांच्या मुलखात जो दंगा मांडला होता. त्या संदर्भात खेम सावंत यांची मदत पेशवे सरकारने

मागितल्याचा उल्लेखही आढळतो. या काळात खेम सावंत हे कुडाळ प्रांताच्या सरदेशमुखीवर सावंत भोसले घराण्यातील पुरुष होते. तिस-या खेमसावंताचे आणि पेशव्यांचे पूर्वापार संबंध सलोख्याचे होते. इ.स. १७६५ सालच्या एका पत्रात असा उल्लेख आहे की "तुम्ही पुरातन वतनदार, तुमच्या वडिलांनी स्वामी कार्यें केली आहेत." गोपाळजी आंग्रे पेशव्यांच्या तालुक्यात उपद्रव करू लागल्यावर सावंतांनी त्याचा बंदोबस्त केला असा उल्लेख इ.स. १७७० सालच्या पत्रात लेख नं. ३९ मध्ये आढळतो[१०].

सावंतांच्या एकनिष्ठतेबद्दल पेशव्यांच्या मनात मुळीच संदेह नव्हता. कारण पेशव्यांनी जेव्हा जेव्हा वाडीकरांना मदतीस बोलावले. तेंव्हा तेंव्हा वाडीकर पेशव्यांच्या मदतीस हजर होत असे[११].

"पहिल्यापासून तुम्ही सरकारचे लक्षात आहात, पुढेही या प्रमाणेच लक्ष धरून चालाल, तुमचे निष्ठेची खातरजमा आहे." असा निर्वाळा पेशव्यांनी दिला होता. इ.स. १७७० मध्येच हैदरने कर्नाटकात धुमाकूळ घालण्यास सुरवात केली. हि बातमी पेशवे माधवराव यांना कळताच त्यांनी खेमसावंतास पत्राने कळविले. यावर खेमसावंताचे असे म्हणणे पडले की, हैदरकडील प्रबळता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कारण हैदर व सावंत यांच्या राज्याची सीमा एकच होती[१२].

इ.स. १७८५ त टिपूने नरगुंद वेढले व सर्व राजांना तंबी देण्यास सुरवात केली. यानंतर त्याने हैदरचे अनुकरण करून कर्नाटकात दंगा चालू केला. त्यावेळी पूर्वी पेशव्यांनी सावंतांची टिपू विरूध्द मदत मागितली होती आणि पेशव्यांनी रवाना केलेल्या फौजेत मिळावे अशी विनंती एका पत्राव्दारे पेशव्यांनी सावंतांना केली होती[१३]. परंतु सावंत मात्र यावेळी घरच्या भांडणात गुंतलेले होते. कारण करवीरकरांनी सावंतवाडी प्रांतातील सावंताचे एक गांव घेऊन उपद्रव देण्यास प्रारंभ केला होता.

तेव्हा ही आपली अडचण दूर केल्यास आपण पेशवे सरकारच्या चाकरीस सिध्द आहोत असे पेशव्यांना सावंतांनी कळविले होते. याचवेळी करवीरकरांपासून होणारा उपद्रव पेशव्यांनी दूर केला होता. परंतु अद्याप सावंत जमावानिशी पेशव्यांच्या सैन्यात सामील न झाल्याने त्यांना पेशवे यांनी सूचना देऊन त्वरित सैन्यात सामील व्हावे असे कळविले[१४].

सावंतवाडीकर पेशव्यांना नेहमी मान देत असत, आणि म्हणून पेशव्यांनी काही गोष्टी सांगितल्या तर ते ऐकतही. उदा. १७७७ सालच्या एका पत्रात (ले. ७८) सवाई माधवराव पेशवे यांनी सावंतांना खास पत्र लिहून करवीरकरांच्या प्रांतात उपद्रव न करण्याविषयी कळविले होते. आणि सावंतांच्या करवीरकरांबद्दल ज्या तक्रारी असतील त्या वकीलामार्फत पेशव्यांकडे पाठविण्यास पेशव्यांनी सावंतास लिहीले होते[१५].

पुढे १७८२ च्या सुमारास त्यांची दिलजमाई झाली असावी कारण महादजी शिन्दे याजकडून आता करवीरकरांपासून तुम्हास त्रास होणार नाही असे सावंतांना आश्वासन मिळाले. १७८५ त टिपूने पुन्हा कित्तूरकरांकडे आपले लक्ष वळविले. तेव्हा कित्तूरकराने शरणागती पत्करली. पेशवाई मुलखातील संपगांव खानापूर, जांबोटी हे त्याने घेतले होते. यावेळी खेमसावंताच्या राज्याला सुध्दा धोका निर्माण झाला होता. तेव्हा स्वत: खेमसावंताने ताबडतोब पेशव्यांना टिपूने घातलेल्या दंग्याबद्दल पत्राने कळविले. पेशव्यांचा बराचसा मुलूख पेशव्यांना माहिती न होताच टिपूने जिंकून घेतला असता. परंतु सावंतवाडीकरांच्या पूर्वसूचनेमुळे पेशवे सावध झाले होते[१६].

खेम सावंताकडे जेव्हा रघुनाथ पेशवे यांनी मदतीची याचना केली, त्यावेळी खेमसावंतांनी मदत मिळवून देतो म्हणून पेशव्यांना छातीठोकपणे आश्वासन दिले. आणि त्यानुसार आश्वासनाला जागून सावंतवाडीकरांनी

हैदरअली व गोविंद बरवे यांना पत्रे लिहून त्यांची मदत पेशव्यांना मिळवून देण्यासाठी हिरीरीने प्रयत्न केला. यावरून पेशवे व खेमसावंत यांचे परस्पर संबंध सुधारलेले होते. कारण स्वत: नेहमी पेशव्यांना मदत करूनही दुसऱ्या संस्थानिकांची मिळवून देण्याचा प्रयत्न खेमसावंताने पेशव्यांसाठी केला. सावंत व पेशवे यांचे घरगुती संबंधही स्नेहाचे होते, यात शंका नाही कारण ते नियमित एकमेकांना भेटण्यास येत जात असत[१७].

परंतु काही वेळेस मात्र सावंत - पेशवे यांच्या संबंधात खटके उडालेले दिसतात. उदा. पेशव्यांनी १७५५-५६ त दादाजी प्रभू यांस सावंतांविरुध्द मदत केली[१८]. तर सावंतांनी इ.स. १७६३ मध्ये फोंडयांच्या लढाईत पेशव्यांना मदत न करता पोर्तुगिजांना मदत केली व पेशव्यांच्या रोषाचा धोका पत्करला होता. एवढेच नव्हे तर त्या वेळेला खेमसावंताने पोर्तुगिजांना पेशव्यांच्या सर्वस्वी गुप्त बातम्याही पुरविल्या होत्या. अशा प्रकारे त्यांच्यात काही वेळेस वितुष्ट आले होते. फोंडयाच्या स्वारीत सावंतांनी पेशव्यांशी बेईमानी केली होती. परंतु पेशव्यांनी त्याबद्दल वाईट वाटून घेतले नाही व त्यांच्यावर काही अटीही लादल्या नाहीत तर उलट पेशव्यांनी ~~फक्त~~ सावंतांचा फक्त निषेध नोंदविला होता[१९].

<u>सावंतांनी पेशव्यांना वेळोवेळी केलेली मदत :-</u>

सावंतवाडीकरांनी पेशव्यांना वेळोवेळी अडचणींना तोंड देण्यासाठी मदत केली होती. इ.स. १७३८ मध्ये पेशव्यांनी गोवे प्रांतात स्वारी करून पोर्तुगिजांना धडा शिकविण्याचे ठरविले आणि यावेळी पेशव्यांनी सावंतांकडे मदत मागितली व त्यांना विश्वासात आणि विचारात घेतले होते. पेशवे व सावंत हे दोघे एकमेकांचे शेजारी होते. त्यामुळे पेशवे बाजीराव याने ही गोष्ट लक्षात घेऊन ती सावंतवाडीकरांना पटवून दिली. पेशव्यांची स्वारी करण्याची कारणे जर आपण पाहिली तर पोर्तुगीज पश्चिम किनाऱ्यावर आपले वर्चस्व वाढवीत चालले होते ते कमी

करण्यासाठी आणि पेशव्यांच्या ताब्यातील कोकण, पोर्तुगीज हळू हळू घेऊ लागले होते. थोडक्यात म्हणजे पेशव्यांना परकीय पोर्तुगीज सत्ता दिवसेंदिवस डोईजड होत चालली होती. ती नष्ट करण्यासाठी स्वारी करणे आवश्यक होते[२०].

पेशव्यांची स्वारी गोवे प्रांतावर झाल्यास सावंतवाडीकरांनी त्यांना या स्वारीत सैन्यासह मदत करावी असे ठरले. सावंतांच्या मदतीच्या आश्वासनावर विश्वास न ठेवता लगेच मार्च, १७३८ मध्ये सावंतवाडीकरांचा मातबर माणूस सुलतानजी रामजादे यास सावंतांचा प्रतिनिधी म्हणून पेशवे दरबारी बोलावून घेतले आणि ठरलेल्या स्वारीबद्दल वाटाघाटी झाल्या. तसे पेशवे अतिशय धूर्त व चाणाक्ष होते. त्यांना दुसऱ्या माणसाची मदत न भुलता कशी मिळवावी हे [redacted] चांगले जमले होते. कारण सावंतांचा प्रतिनिधी व पेशवे यांच्यातील वाटाघाटी संपल्यावर त्या प्रतिनिधीस मेजवाणी देऊन व परत जाणाऱ्या [redacted] खर्चासह आणि वस्त्रे देऊन त्याची सावंतवाडीस रवानगी केली. अशाप्रकारे पेशवे आपला फायदा करून घेण्यासाठी वाटेल ती गोष्ट करण्यास तयार असत[२१].

शेवटी पेशव्यांनी गोव्यावर स्वारी केली. यावेळी पेशव्यांचे सैन्य गोव्याच्या दिशेने जाताना त्या सैन्यात सावंतवाडीकरांचेही सैन्य सामील झाले होते. त्याचबरोबर सावंतांना पेशव्यांनी काही महत्वाच्या सूचनाही दिलेल्या होत्या. या सूचनानुसार सावंतवाडी-करांनी पोर्तुगीजांची कोंडी करण्याचे ठरविले. त्यांनी पोर्तुगीजांना धान्य पोहचविण्याचे नाकारले व पोर्तुगिजांना रसद मिळू दिली नाही. एवढेच करून ते थांबले नाही तर पोर्तुगिजांच्या जहाजांना सावंतवाडी-करांच्या ताब्यात असलेल्या कुठल्याही बंदरात थारा देण्यास साफ नकार दिला. इ.स. १७३९ च्या मार्च महिन्यात पोर्तुगिजांच्या ४७ पराडया व एक फ्रिगेट दमणहून येत होते, त्यांच्यावर सावंतांच्या

आरमाराने हल्ला केला व तो संपूर्ण काफिला लुटला व त्यांचा पूर्णपणे नाश केला[२२]. या झालेल्या चकमकीत सावंतवाडीकरांच्या माणसाने पोर्तुगिजांच्या कप्तानास ठार केले. ही लढाई रेड्डीच्या किल्ल्याजवळ झाली. यामध्ये गोवेकरांचे आतोनात नुकसान झाले कारण परांड्यातील मालही सावंतांनी लुटला व त्यांचा कप्तानही मृत्युमुखी पडला. एवढेच करून सावंत थांबले नाहीत तर सावंत आपले शेजारी, ते आपल्याविरुध्द पेशव्यास कुठल्याही प्रकारची मदत करणार नाहीत, अशी पोर्तुगिजांची समजूत सावंतांनी वरकरणी पोर्तुगिजांशी बोलणी केल्यामुळे झाली होती. परंतु प्रत्यक्षात मात्र घडले वेगळेच. आणि सावंतांनी शेवटी पेशव्यांनाच हवी ती मदत केली. सावंत तसे राजनीतीत निपुण होते. त्यांची राजकीय कारस्थाने (Political Diplomacy) अगदी वाखाणण्याजोगी होती. सावंतांनी पोर्तुगिजांची दिशाभूल केली, हे त्यांच्या लक्षात आले आणि त्यावेळेपासून पोर्तुगीज अतिशय सावध झाले[२३]. कारण सावंतांनी पेशव्यांना मदतीचे आश्वासन देण्याच्या अगोदरच पोर्तुगिजांशी बोलणी करून त्यांनाही पेशव्याविरोधी मदत करण्याचे आश्वासन दिले होते. पोर्तुगिजांना वाटले की, सावंतवाडीकर हे आपल्याशी बेईमानी करणार नाहीत, म्हणून त्यांनी बारदेशातील बहुतेक सैन्य काढून घेतले होते, परंतु हे सर्व उलट झाले. "भरवशाच्या म्हशीला टोणगा" या म्हणी प्रमाणे सावंतवाडीकरांनी टोणगा देऊन, त्यांना मदत न करता त्यांच्याशी उलट बेईमानी केली, व त्यांनी अभावितपणे एकाएकी उठावणी करून बारदेशावर लढाई केली व तो प्रदेश जिंकून घेतला. कोळवाल किल्लाही घेतला. कायसू किल्लाही घेतला, आगवड व रेईस या किल्ल्याखेरीज बाकीचा सर्व मुलूख सावंतांनी हस्तगत केला. या मोहिमेत सावंतांना ४३ तोफा व मुबलक दारूगोळाही मिळाला होता[२४].

इ.स. १७७१ मध्ये पेशवे यांनी हैदरअली विरोधी स्वारीची तयारी केली. आणि पेशव्यांचे सैन्य पोर्तुगिजांच्या हद्दीतून जावे व पोर्तुगिजांकडून दारुगोळ्याचीही मदत घ्यावी अशा मागण्या पेशव्यांनी पोर्तुगिजांकडे केल्या. परंतु हे करण्यासाठी सावंतांचे वकील विठ्ठल विश्राम व त्यांचा भाऊ जिवबा सबनीस यांनी माधवराव पेशव्यांना तसे करण्यास प्रवृत्त केले आणि या स्वारीत सावंतवाडीकरांनी पेशव्यांना पूर्णपणे मदत केली होती[२५].

बारदेशातील सर्व प्रदेश सावंतवाडीकरांनी घेतल्यामुळे इकडे पेशव्यांनाही हवी होती तशी मदत होऊन त्यांनाही बराचसा नवीन प्रदेश मिळाला व एका मातबर पोर्तुगिजांसारख्या शत्रूचाही नायनाट करता आला. सावंतवाडीकर यानंतर म्हापसे येथे छावणी करून तेथेच राहिले. पोर्तुगिजांची साष्टी गेली, बारदेश गेला फक्त गोवे बेटच तेवढे त्यांच्या ताब्यात राहिले-त्यांची पन्यावर धारण बसली[२६]. सावंतवाडीकरांना पेशव्यांनी सांगून ठेवले होते की, स्वारीच्या वेळेस पोर्तुगिज इकडे लढाईत गुंतल्यावर बारदेशावर तुम्ही स्वारी करून तो प्रदेश हस्तगत करा. त्यानुसार सावंतांनी तो प्रदेश जिंकून पोर्तुगिजांना हाकलून लावले. जर सावंतांनी तसे केले नसते तर मात्र मग पेशव्यांचा पराभव अटळ होता आणि शेवटी पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांवरही संकट आणून त्यांनाही नामोहरम केले असते व सावंत आणि पेशवे दोघांही पक्षांचे हाल झाले असते. शेवटी दोघांचेही राज्य पोर्तुगिजांचे ताब्यात गेले असते. पण त्यामानाने सावंतांनी अतिशय धूर्तपणे काम केले व पेशव्यांना मदत दिली. आणि म्हणूनच पेशव्यांना पोर्तुगिजांना जेरीस आणता आले व आपले नांव सर्वत्र पोहचविता आले. त्यामुळेच पेशव्यांनीही सावंतांना मदत करण्यास कुचराई केली नाही[२७].

सावंतांनी पेशव्यांना एवढी मदत करूनही इ.स. १७४१ मध्ये पेशव्यांकडे पोर्तुगिजांनी सावंतवाडीकरांविरूध्द मदत मागितली होती. पोर्तुगिजांच्या मागणीनुसार पेशव्यांनी त्यांना पाहिजे ती मदत केली. त्यामुळे सावंतांचा पराभव होण्याच्या आतच सावंतवाडीकरांनी पोर्तुगिजांकडे तहाची मागणी केली. कारण पोर्तुगीजांचे लष्कर हे सावंतांच्या लष्करी सामर्थ्यापेक्षा वरचढ होते. व त्यात पुन्हा पेशव्यांचीही मदत झाली. यावेळेला पेशव्यांनी जरी पोर्तुगिजांना सावंतांविरूध्द मदत केली होती. परंतु पुढे ~~सकूब~~ पुन्हा सावंतवाडीकरांना पहिल्याप्रमाणेच मदत देणे चालूच ठेवले होते यात शंका नाही[२८].

इ.स. १७२२ मध्ये पोर्तुगिजांनी पेशव्यांच्या प्रदेशांत जाऊन त्रास द्यावयास सुरवात केली त्यामुळे पेशवे माधवराव बल्लाळने सावंतांना त्यांचा बंदोबस्त करण्याबद्दल कळविले होते. इ.स. १७७४ मध्येही सावंतांची पुन्हा त्यांनी मदत मागितली आणि सावंतांनीही ताबडतोब त्यांना मदत केली होती. सावंतवाडीकरांनी जानराव धुळूप यास विजयदुर्गी आरमाराचा बंदोबस्त करून सावध रहाण्याविषयी कळविले व पेशव्यांना मदत केली[२९].

सावंतवाडीकर गोव्याच्या पोर्तुगिजांच्या गुप्त बातम्याही पेशव्यांना पोहोचविण्याचे काम करीत असत. त्यांनी पोर्तुगिजांच्या विरूध्द पेशव्यांना वेळोवेळी सर्व प्रकारे मदत केली होती. जेव्हा जेव्हा पेशव्यांनी वेळोवेळी त्यांच्याकडे मदत मागितली, तेव्हा तेव्हा सावंतवाडीकरांनी आपल्या कुवतीप्रमाणे पूर्ण मदत करण्याचे प्रयत्नही केले. एवढेच नाही तर हेरगिरी करून पेशव्यांना बातम्याही त्यांनी पुरविल्या होत्या[३०].

इ.स. १७७५ च्या जानेवारीत पोर्तुगीज आरमारानिशी जंजिरा आणि विजयदुर्गाकडे निघाले. ही बातमी पेशव्यांना कळताच पेशव्यांनी देखील लगेच सावंतांना ही बातमी कळविली आणि या पोर्तुगिजांच्या आरमारात हैदर व आंग्रेही पेशव्यांच्या विरूध्द सामील झाले आहेत, तेव्हा तुम्ही म्हणजे सावंतांनी पोर्तुगिजांवर मारा करणे व त्यास पायबंद घालणे असे कळविले. म्हणजे ज्याप्रमाणे सावंत पेशव्यांना गुप्त बातम्या पुरवीत त्याचप्रमाणे पेशवे देखील सावंतांना गुप्तरितीने बातम्या पुरवीत होते. त्या नुसार दोघेही पक्ष काळजीने वागत असत. पेशवे सावंतवाडीकरांना नेहमी उपदेश करीत असत[३१].

पेशव्यांनी सावंतांना वेळोवेळी केलेली मदत :-

पेशव्यांनी सावंतांना अडचणींच्या वेळी नियमितपणे मदत केलेली होती. पेशवे व आंग्रे यांचे संबंध नेहमी तणावाचे असत. कारण पेशव्यांचे वर्चस्व तुळोजी आंग्रे सहन करण्यास तयार नव्हते व पेशवेही तुळोजीचे वर्चस्व मानीत नव्हते. तेव्हा त्यांच्यात संघर्ष सुरू झाला. यावेळी इंग्रज व पेशवे एक होऊन आंग्र्याचा पराभव करण्याचे ठरले. सावंतवाडीकर हे पेशव्यांच्या बाजूचे आहे हे तुळोजी आंग्रे चांगले जाणून होते[३२].

त्यामुळे जेव्हा इ.स. १७४६ मध्ये सावंतवाडीकरांचा पोर्तुगिजांशी झगडा चालू होता तेव्हाच तुळोजी आंग्रेने सावंतवाडीवर अचानक चाल केली आणि पहिल्याच हल्ल्यात सावंतांचा पराभव करून त्यांच्यावर विजय मिळविला. परंतु लगेच पेशव्यांनी आपल्या सैन्याच्या तुकड्या सावंतवाडीकरांच्या मदतीसाठी पाठविल्या. सावंत व पेशवे यांच्या सैन्याने शेवटी कुडाळनजिक आंग्र्यांच्या फौजेस मार देऊन त्यांचा पराभव घडून काढला व आंग्र्याच्या सैन्याला अगदी थोड्याच अवधीत

त्यांच्या प्रदेशाबाहेर हाकलून दिले. सावंतांनी पोर्तुगिजांविरुध्द केलेली मदत लक्षात घेऊन पेशव्यांनीही सावंतांना आंग्र्याविरुध्द मदत करुन वाचविले[३३].

सावंतवाडीकरांनी[१] राजश्री भगवंतराव यांनी एकत्र येऊन तुळोजी आंग्र्यांच्या मुलखावर स्वारी करण्याचे ठरविले आणि ठरल्याप्रमाणे इ.स. १७४८ च्या फेब्रुवारी महिन्यात त्यांनी तुळोजी आंग्र्याच्या प्रदेशात हल्ले करण्यास प्रारंभ केला. सुरवातीला सावंतवाडीकरांनी संगमेश्वर या ठिकाणापर्यन्त आंग्र्यांचा मुलूख जिंकून घेतला व सुड्या गडास वेढा दिला. आंग्रेही सावंतांवर तुटून पडला. यावेळीही पेशव्यांनी सावंतांना मदत पाठविली होती. आणि म्हणूनच सावंतवाडीकर तुळोजीचा पराभव करु शकले[३४].

सावंत व आंग्रे यांच्यातील युध्द शेवटी संपुष्टात आले आणि उभयतांमध्ये तह घडून आला. परंतु तो तह जास्त दिवस टिकला नाही तर तुळोजीने तहाचे उलंघन केले व याचवेळेला यशवंत गडाजवळ सावंतांचा पोर्तुगिजांशी कज्जा झाला. ही संधी साधून तुळोजीने भरत गडास वेढा दिला आणि सावंतांच्या प्रदेशात धुमाकूळ घालू लागला. यावेळी सावंतांनी पेशव्यांकडे मदत मागितली होती, की आंग्र्यानी घेतलेली गलबते, ठाणी परत मिळवून द्यावी. तेव्हा पेशव्यांनी लगेच मानाजी पायगुडे या सरदारास सैन्य घेऊन सावंतवाडीकरांना मदत करण्यासाठी पाठविले. मानाजी पायगुडे सावंतांच्या फौजेस मिळाला व शेवटी सावंतांना आंग्र्याविरुध्द घवघवित यश मिळाले[३५].

त्रिंबक हरी हा पेशव्यांच्या पदरी होता त्याने इ.स. १७५१ मध्ये सावंतांचा गंधर्वगड व डुकरवाडी ही दोन ठाणी घेतली आणि पुढे लगेच हेरे चंदगडेही घेण्याच्या प्रयत्नात होता. ही बातमी पेशव्यांना समजताक्षणीच त्यांनी त्रिंबक हरी यास पत्र पाठविले व त्याची समजुत घातली.

पत्रात त्यास लिहिले की, "आमचे व जयराम आणि रामचंद्र सावंत यांचे संबंध स्नेहाचे आहेत, हा कलह आपापसात करू नका उलट तुम्ही सावंतास मदत करून त्यांच्या शत्रूचे पारिपत्य करावे. सावंताची घेतलेली स्थळे सोडून द्यावी. आंग्रे यांनी कुठल्याही प्रकारची मदत करू नये. व सावंतवाडीकरांना विनाकारण आंग्र्याचे ऐकून त्रास देऊ नये"[३६]. अशा प्रकारे सावंताना आंग्र्यापासून होणारा त्रास कमी करण्याचा पेशवे जातीने प्रयत्न करीत होते. आंग्रे मात्र कुणालाही सावंताच्या विरूध्द चिथवीत असत.

इ.स. १७५२ मध्ये जयराम व रामचंद्र सावंत यांच्यात आपापसात कलह सुरू झाला तेव्हा आंग्रेस वाटले की जयराम सावंतास मदत करून या संधीचा फायदा उठवावा, परंतु पेशवे यांच्या पंतप्रतिनिधींनी आंग्रेला असे करण्यापासून परावृत्त केले. आणि सावंत व आंग्रे यांच्यातील यावेळी होणारे युध्द टळले[३७].

परंतु या अगोदर इ.स. १७५० मध्ये तुळोजी आंग्रे याने सावंतवाडीवर हल्ला केला. हा हल्ला सावंतवाडीकरांच्या सैन्याने पेशव्यांची मदत घेऊन ताबडतोब परतवून लावला होता. कारण आंग्रे हा समुद्रावर लढण्यातच पटाईत होता. आणि त्याला जमिनीवर लढण्यासंबंधी तेवढी माहिती नव्हती. त्यामुळे सावंत व पेशवे यांच्या सैन्यापुढे आंग्रेस माघार घ्यावी लागली[३८].

तुळोजी आंग्रे यांचे पेशव्यांशी हाडवैर होते आणि त्यांच्यात वैर आहे हे जगजाहीर होते. आणि त्यामुळेच आंग्रे हा पेशव्यांच्या शत्रूशी सहानुभूती दाखवित असे, आणि पेशव्यांच्या मित्रांशी मात्र त्याने सहानुभुतीने न वागता उलट ते पेशव्यांचे मित्र म्हणून पेशव्याप्रमाणेच त्यांना शत्रू मानीत असे. त्याचप्रमाणे त्यांच्याशी वागत असे. उदा.

सावंत हे पेशव्यांचे मित्र होते म्हणूनच आंग्रे त्यांना आपले दुश्मन समजत असत, म्हणूनच आंग्रेवर १७४९ मध्ये सावंतांनी चढाई करून पेशव्यांना दिलासा दिला होता[३९].

इ.स. १७४६ च्या डिसेंबर महिन्यात पेशव्यांनी राजश्री सदाशिवराव भाऊ याबरोबर दोन हजार फौज देऊन पोर्तुगीज आणि सावंत यांच्या संघर्षात सावंतवाडीकरांच्या मदतीस पाठविली होती. सदाशिवराव भाऊ व त्याच्या सैन्यास पोर्तुगीज अतिशय धाबरत असत. परंतु सदाशिवराव यांच्या सैन्यातही काही पोर्तुगिजांचे हस्तक असल्यामुळे इकडील गुप्त बातम्या पोर्तुगिजांना अगदी व्यवस्थितपणे मिळत होत्या आणि म्हणूनच पोर्तुगीज, सावंत व पेशवे यांच्या सैन्याला व्यवस्थितरीत्या तोंड देऊ शकले.

इ.स. १७४० त बाळाजी बाजीराव याने पुणे येथे पोर्तुगिजांशी तह केला पण तो सावंतवाडीकरांना आवडला नाही. जयराम सावंतास पोर्तुगिजांच्या खालावलेल्या परिस्थितीबद्दल चांगली माहिती होती. कारण यावेळी पोर्तुगिजांची स्थिती अत्यंत दयनीय व शोचनीय झाली होती. ~~कारण~~ अजाप पोर्तुगिजांना पोर्तुगालहून मदत येणार होती, त्याच्या अगोदरच आपण बारदेशावर हल्ला करून तो जिंकून घ्यावा असेही जयराम सावंत विचार करीत होता. जयराम सावंतांचे मुत्सद्दी म्हणत होते की, पूर्वी एक पोर्तुगिज सैनिक दहा वाडिकरांच्या शिपायांस भारी होई. पण आता एक वाडीकर शिपाई शंभर पोर्तुगिज शिपायास भारी होऊ लागला आहे[४०].

इ.स. १७४७ मध्ये सदाशिवरावाने आपल्याबरोबर सैन्य घेऊन पोर्तुगिजांवर चाल करून, पोर्तुगिजांना सावंतवाडीकरांशी तह करण्यास भाग पाडावे हा महत्वाचा उद्देश सैन्य घेऊन त्यांच्यावर चाल करून जाण्याचा होता. सदाशिवरावाने पोर्तुगिजांना लिहिले की, सावंत-भोसले हे

पेशव्यांचे अंकीत आहे आणि त्यामुळे त्यांचे किल्ले व प्रदेश तुम्ही जे काबीज केलेले आहेत. ते त्यांचे त्यांना परत करणे इष्ट आहे". आणि यानंतरच मग पोर्तुगिजांनी एक मातबर वकील त्यांच्याकडे पाठवून सावंतांशी योग्य तह करण्यास तयार झाले[४१].

इ.स. १७४९ च्या दरम्यान मात्र पेशव्यांनी सावंतांना सैन्याची कुमक करण्याचे टाळले होते. तरी पेशव्यांकडून यावेळी सैन्याची मदत होत नसली तरी पैशांचे सहाय्य त्यांच्याकडून सावंतांना वेळोवेळी मिळे. पेशव्यांनी सावंतवाडीकरांना पैसे पाठवितांना त्यास सैन्याची कुमक न करण्याचे कारण असे सांगितले की, पेशव्यास मोगलांच्या प्रतिकारार्थ सतत लष्कर सुसज्ज ठेवावे लागते. शिवाय वसई परत घेण्यासाठी पोर्तुगीज जातील असाही संशय बाळाजी बाजीराव यास होता आणि म्हणूनच पेशवे यांनी सावंतांना दिली जाणारी सैन्याची कुमक बंद केली होती[४२]. म्हणजे पोर्तुगिजांच्या ताब्यात वसई जाऊ नये यासाठी पेशव्यांनी सावंतवाडीकरांना मदत देण्याचे टाळले. वाडीकरांना लष्करी मदतीऐवजी आर्थिक मदत मात्र पेशव्यांनी तातडीने पाठविली.

काही महत्वाच्या प्रसंगी सावंतांनी पेशव्यांना मदत केली नाही. तरी सुध्दा पेशव्यांनी त्याबद्दल सावंतांना कुठलेच शासन दिले नाही. उदा. मराठ्यांविरुध्द मोगलांनी केलेल्या एका हल्ल्याच्या प्रसंगी नाना पेशव्यांनी सांगितलेली जहाजे सावंतांनी पेशव्यांच्या मदतीस पाठविली नव्हती. हा केलेला अपराध सावंतांना माफ करण्यात आल्याचा निरोप पुणे दरबाराकडून म्हणजेच पेशव्याकडून सावंतवाडीकरांना पाठविण्यात आला होता. तेव्हा पेशवे अतिशय दयाळू आणि समजदार होते असे दिसते. कारण सावंतांनी त्यांना अडचणीत मदत केली नाही तरी त्यांच्यावरील सूड न उगवता त्यांना क्षमा केली[४३].

एवढेच करून पेशवे थांबले नाही तर पेशव्यांनी सावंत व पोर्तुगीज यांचे संबंध सुधारण्यासाठी देखील त्यांनी बरेच प्रयत्न केले. माधवराव पेशव्यांनी त्यासाठी गोपाळ रामचंद्र यास पोर्तुगिजांकडे पाठविले होते. परंतु मध्येच त्याला परत बोलाविण्यात आले, व त्यांचे निवेदन ऐकल्यावर सावंतांच्या प्रश्नांचा विचार केला जाईल. तेव्हा तुमच्या वकिलासही उपस्थित रहाण्यासाठी पाचारण केले जाईल. असे पोर्तुगिजांना सांगण्यात आले. परंतु त्यामुळे पोर्तुगिजांना पेशव्यांचा संशय आला. पेशव्यांनी गोपाळ रामचंद्र यांस परत बोलावल्यामुळे पोर्तुगिजांना असा संशय आला की, पेशव्यांनी सावंतांशी संधान बांधण्यासाठी गोपाळ रामचंद्र यास गोव्याहून कांहीही खलबत न करता परत बोलावले आणि त्यामुळे पेशवे यात अयशस्वी झाले[४४].

इ.स.१७४६ ते १७४८ या दरम्यान सावंतवाडीकरांनी परकीय सत्तेशी, आणि इतर आपल्या शेजारी असलेल्या शत्रूंबरोबर युध्द लढले. केले. मुख्यत: सावंतांचे युध्द पोर्तुगिजांबरोबरच चालू होते आणि या युध्दात पोर्तुगिजांकडून सतत तीन वर्षे मार बसत असला तरी सावंतवाडीकरांनी धैर्य न सोडता त्यांच्याशी लढाई चालूच ठेवली. परंतु शत्रूस शरणचिठ्ठी दिली नाही, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. युध्दाला भयंकर खर्च येतो, प्राणहानीही प्रमाणाबाहेर होते व राज्यातील जनता पिडीत होते, राज्याचा दर्जा दिवसेंदिवस खालावत जातो, या सर्व गोष्टींचा सावंतांनी अजिबात विचार केलेला नाही असे दिसते, कारण या गोष्टी विचारात न घेतल्यामुळे[४५] सावंतवाडी राज्याची आर्थिक स्थिती एकदम खालावली. सावंतांकडे खर्चासाठी पैसेही उरले नाही, त्यामुळे राज्यातील लोकांनी तर धास्तीच खाल्ली. राज्यातील जनतेचे जीवन अतिशय कष्टमय आणि विस्कळीत झाले. त्यामुळे सावंतवाडीकरांना आता कर्ज घेण्याशिवाय दुसरा पर्यायच उरला नव्हता आणि म्हणूनच वाडीकरांना दुसऱ्या राज्यांवर म्हणजे पेशवे, पोर्तुगीज यांच्यावर अवलंबून रहाणे भाग पडले.

जर सावंतांनी नियमितपणे लढाया टाळल्या असत्या व समझोता करुन नेहमी तंटे मिटविले असते तर कदाचित त्यांचा खजिना पूर्णपणे भरलेला असता व त्यांना ही स्थिती आली नसती. आर्थिक आप-तीमुळे प्रत्येक बाबतीत परकीय स-तेच्या मदतीवर अवलंबून रहावे लागे. जनतेच्या कल्याणाची कामे सुध्दा या काळात सावंत हवी तितक्या प्रमाणात करू शकत नव्हते.[४६]

सोंधेच्या राजाला पेशव्यांची तंबी :-

सावंत व पोर्तुगिज यांचा संघर्ष १७४६ पासून अतिशय तीव्र बनला. या संघर्षात सावंतांचा शेजारी सोंधेचा राजा हा सावंतवाडीकरांना मदत न करता पोर्तुगिजांना सावंतांविरुध्द मदत करीत होता. ही बातमी पेशव्यांना कळल्याबरोबर डिसेंबरमध्ये सोंधेच्या राजाकडे सावंतांविरुध्द पोर्तुगिजांना मदत केल्याबद्दल जाब मागितला. एवढेच करुन पेशवे थांबले नाही तर पोर्तुगिजांच्या हद्दीजवळ फोंडे व काबु द राम येथील मर्दनगड व खोलगड हे किल्ले त्यांच्या स्वाधीन करण्याची सोंधेच्या राजास ताकीद दिली. सोंधेकरास आपला धाक वाटावा म्हणून पेशवे यांनी सुपा व अशवा येथील त्यांचे किल्ले देखील तरवारीच्या बळावर जिंकून[४७] घेऊन घाटमाथ्यावरील सर्व ठाणी ही बळकावली. पेशव्यांचा या मागील उद्देश म्हणजे सोंधेकरास तंबी देऊन त्याने सावंतवाडीकरांविरुध्द पोर्तुगिजांना कधीच मदत करू नये. असे अनेक हेतू सोंधेकरांना तंबी देण्यापाठीमागे पेशव्यांनी साध्य केले होते. सदाशिवराव याने सोंधेकरांशी बोलणी करतांना म्हटले होते की, " आम्हाला गोवेकरांकडून खंडणी घ्यावयाची आहे, त्याचप्रमाणे सावंतांचे पोर्तुगिजांनी बळकावलेले किल्ले परत मिळवावयाचे आहे, आणि त्यासाठी पेशव्यांना मर्दनगडही हवा होता. पेशव्यांना सोंधेच्या राजाकडूनही खंडणी घ्यायची होती. याही पलीकडे जाऊन पेशव्यांनी सोंधेकराकडे घाटाखाली उतरण्यासाठी सैन्याची मदत मागितली.

अशा त-हेने पेशव्यांनी सावंतांच्या संरक्षणासाठी सोंधेकरास धमकी दिली पण त्यात स्वत: पेशव्यांनी वाटेल तसा स्वार्थ साधून घेतला[४८].

पेशव्यांची दादाजी प्रभूस मदत आणि सावंतांवर स्वारी :-

इ. स. १७५५-५६ साली पळपुट्या नारायण प्रभूचा मुलगा दादाजी याने सावंतवाडीकर सावंताविरूध्द नानासाहेब पेशवे यांच्या मदतीने मोठे राजकारण केले. राजश्री जयराम सावंत इ. स. १७५३ साली हृदयरोगाने दिवंगत झाले व नंतर सन १७५५ मध्ये त्यांचे पुतणे रामचंद्रसावंतही निवर्तले. यामुळे सावंतांच्या गादीवर कोणीच कर्ता पुरूष राहिला नाही. गादीवर अज्ञान तिसरे खेमसावंत असून मातोश्री जानकीबाई ह्या जिवाजी विश्राम सबनीस यांच्या मदतीने राज्यकारभार पहात होत्या. या संधीचा फायदा घेऊन दादाजीने नानासाहेब पेशवे यांचे मन वळविले[४९].

खरे पाहिले असता नानासाहेबांनी जयराम सावंताने पोर्तुगिजांच्या विरूध्द चाललेल्या लढयात पेशव्यांना दिलेल्या मदतीची आठवण ठेवली नाही. कारण ते दादाजी प्रभूच्या नजराण्यास भाळले होते. शेवटी पनवेल (दंडराजापूरी) नजिक नारो त्र्यंबक पेशव्यांचा सरदार यास दादाजी प्रभूस मदत करण्याचा हुकूम होऊन तो ३,००० फौजेनिशी सावंतवाडीकरांवर नेरूपर्यन्त चाल करून आला. पुढे जिवाजीने मोठया प्रयत्नाने पेशव्यांची समजूत घालून नारो त्र्यंबकला माघारी फिरण्याचा हुकूम आणून लाविला व श्रीकृपेने सावंतांवर आलेले भयंकर संकट टळले, नाहीतर मात्र आता सावंतांचा पराभव अटळ होता. सुरवातीला जर जयराम सावंत यांनी पेशव्यांना पोर्तुगिजांविरूध्द मदत केली नसती तर कदाचित पोर्तुगिजांना विजय मिळवून पेशवाईचा पूर्वीच अंत झाला असता. एवढे असूनही नानासाहेब पेशवेंनी दादाजीकडून नजराणा मिळावा म्हणून त्यास बळी पडला, व विचार न करता त्याला मदत करण्याचा निर्णय घेतला. शेवटी जिवाजी विश्रामने हि चूक पेशव्यांच्या लक्षात आणून दिली व नंतर त्यांनी सैन्य

माघारी बोलाविले. आणि सावंतवाडी राज्यावरील धोका टळला. परंतु पेशव्यांनी सावंतवाडीकरांशी आपले संबंध कटुतेचेच न ठेवता लगेच सुधारून घेतले, कारण त्यांना सावंतांची वेळोवेळी मदत घ्यावी लागणार होती[५०].

इ.स. १७५९ मध्ये पेशव्यांनी आपला वकील पोर्तुगिजांकडे पाठवून पोर्तुगिज व्हाईसरॉय कोंदि द येग यास सावंतवाडीकरांशी तह करण्यास भाग पाडले. आणि शेवटी जुलै महिन्यात तह घडवून आणला. या तहानुसार पेडणे, डिचोली (अत्रग्राम) व साखळी (स-तर) हे तीनही महाल सावंतांना पोर्तुगिजांनी दिले आणि पोर्तुगिजांनी सावंताविरूध्द आंग्रेस मदत करू नये. आणि पुन्हा हळर्णे/आणि तेरेखोल हे सावंतांना परत देण्यात यावे असे ठरविले. सावंतांचे भाऊ कृष्ण सावंत हे पोर्तुगिजांच्या आश्रयास होते तर पेशव्यांनी पोर्तुगिजांना सावंतवाडीराज्यातून कोणीही आले तरी त्यास आपल्या चाकरीस ठेऊ नये असे सांगितले[५१].

शेवटी १७६१ मध्ये पोर्तुगिजांनी डिचोली, साखळी, पेडणे हे महाल सावंतवाडीकरांना दिले होते. अशारितीने सावंतांशी सख्य जोडण्याचा पोर्तुगिजांनी आणखी एक अयशस्वी प्रयत्न केला होता[५२].

गोव्याच्या रक्षणासाठी सावंतवाडीकरांचे रक्षण करणे पोर्तुगिजांना आगत्याचे वाटे. सावंतांचे राज्य जर कोल्हापूरकरांकडे गेल्यास गोवा राज्यास धोका निर्माण झाल्याशिवाय राहाणार नाही हे ओळखून त्यांनी महत्वाचे मानून पेडणे, डिचोली व साखळी हे प्रदेश पुन्हा आपल्या ताब्यात घेतले. हे महाल परत मिळण्यासाठी १७९४ त महादजी शिंदे यांनीही प्रयत्न केले व पेशव्यांनीही वकील पाठवून प्रयत्न केले पण अखेरीपर्यन्त पेशव्यांना न जुमानता वरील महाल आपल्या ताब्यातून पोर्तुगिजांनी सोडलेच नाही[५३].

सावंतवाडीकर व विसाजीपंत (पेशव्यांचा सेनापती) यांची औपचारिकरीत्या झालेली भेट :-

इ.स. १७७१ मध्ये विसाजीपंत आणि खेमसावंत यांची कुडाळजवळ औपचारिकरीत्या मुलाखत झाली. ही मुलाखत म्हणजे त्यांच्यात झालेला गुप्त करारच असावा, कारण ही मुलाखत संपल्यानंतर त्यांनी वाटा बदलून पोर्तुगिजांवर चाल करण्यास प्रारंभ केला. यानंतर मणेरी या खेड्याजवळ तळ ठोकले ते पोर्तुगिजांच्या सरहद्दीजवळच होते. यावरून असे कळते की, ही औपचारिकरीत्या झालेली मुलाखत नसून त्यांच्यात झालेला गुप्त करार होता व त्या करारात ठरल्याप्रमाणे दोघेही वाटा बदलून पोर्तुगिजांवर हल्ले करण्यास तयार झाले[५४].

सावंत व पेशवे यांचा हैदरविरोधी संघ :-

इ.स. १७७७ मध्ये सखाराम बापू, माधवराव पंडित व बाळाजीपंत फडणीस यांना सावंतांच्या वकीलाने कळविले होते की, कर्नाटकात हैदरअली हा जास्त प्रबळ होत चालला आहे आणि त्यावर आपण काहीच उपाय किंवा त्याला आपण काहीच पायबंद घातलेला नाही, आणि त्यामुळे त्याला अजिबात दहशत बसत नाही, तरी आपण संघटीत होवून हैदरला तोंड दिले पाहिजे नाही तर पुढे आपणास हैदरच्या विरोधी लढण्यास कठिण होईल. तेव्हा आपण अगोदरच फौजांची तयारी करून वेळीच कर्नाटकाचा बंदोबस्त करणे अत्यावश्यक आहे[५५]. हेच लक्षात घेऊन पेशव्यांनी सावंतांशी युती करून त्यांनी हैदरविरोधी एक मोठा संघ उभारला होता. हा संघ हैदरच्याच विरोधात बहुतकरून होता, आणि त्यांना हैदरला समूळ नष्ट करावयाचे होते. हैदरच्या पराभवानंतर त्यांना पोर्तुगिज सत्ता संपुष्टात आणावयाची होती, याचवेळेला इंग्रजही सुरतेस येण्याच्या प्रयत्नात होते, तर सावंत आणि पेशवे यांनी इंग्रजांना रोखण्याचाही हेतू या संघ

स्थापनेच्या पाठीमागे ठेवला होता. म्हणजे दोन्ही त-हा एकत्र येऊन सर्व शत्रूंचा नायनाट करावयाचा त्यांचा विचार होता. त्यांचे दोघांचेही शत्रू एकच होते. त्यात महत्वाचे शत्रू, हैदर, पोर्तुगीज व इंग्रज[५६]. परंतु पुढे पेशव्यांनी सावंतांना मदत नाकारल्यानेच सावंतांना पोर्तुगिजांशी नाईलाजाने मदतीचा करार करावा लागला व त्यांच्याकडून मदत घेतली. यावेळी सावंत व पेशवे यांच्या संबंधात पुन्हा एकदा वितुष्ट आले होते, परंतु थोडया काळातच त्यांचे संबंध सुधारले. ते असे की, कोल्हापूरकरांनी अद्याप त्यांची ठाणी सोडली नव्हती ही गोष्ट त्यांच्या मनाला लागून होती. पोर्तुगिजांची मदत घेऊनही ठाणी अद्याप करवीरकरांकडून ते परत घेवू शकले नव्हते. या गोष्टीचीही त्यांना तीव्रतेने खंत वाटू लागली. म्हणून त्यांनी पुन्हा जिवबा दादाच्या मार्फत महादजी शिन्दे यांच्या मदतीने पेशव्यांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांना त्यात यश आले आणि पेशव्यांनीही करवीरकरांकडून सावंतवाडीकरांची ठाणी परत मिळवून देण्याचे आश्वासन दिले, परंतु हे आश्वासन त्यांनी पूर्ण केले नाही. पेशव्यांनी १७९२ पर्यन्त या आश्वासनाकडे लक्ष दिले नाही. शेवटी महादजी शिन्दे यांनी परत सावंतांची तक्रार निवारण्यासाठी नाना फडणीसांकडे नेट धरले. तेव्हा पेशव्यांनी कोल्हापूरकरांना सावंताची ठाणी सोडण्याबद्दल कळविले. परंतु तिकडे कोल्हापूरकरांनी लक्ष दिले नाही, म्हणूनच पेशव्यांनी करवीरकरांवर स्वारी करण्यास परशुराम भाऊ यांस आज्ञा केली. अशा त-हेने सावंत - पेशवे संबंध पूर्ववत सुधारले[५७].

<u>सावंतवाडीवर करवीरकरांची स्वारी व पेशव्यांची करवीरकरांना मदत :-</u>

१२ मे, १७८५ त तिस-या खेमसावंतास दिल्लीच्या मोगल बादशहाकडून राजेबहादूर हा किताब मिळाला व त्याच बरोबर मोर्चेलचाही बहुमान मिळाला होता[५८]. त्यामुळे करवीरकरांना ही गोष्ट सहन झाली नाही.

पहिलेही त्यांच्यात वैर होतेच त्यात ही भर पडली. पेशव्यांना देखील ही गोष्ट आवडली नाही. करवीरकरांनी सावंतांवर स्वारी केली व या स्वारीत पेशव्यांनी करवीरकरांना सावंतांविरुध्द मदत केली. या लढाईत सावंतांचा पराभव झाला. परंतु या अगोदर सावंत - करवीरकर लढयात पेशव्यांनी सावंतांना मदत केलेली होती. परंतु बहुमानामुळेच पेशवे विरोधात गेले होते. यावेळी सावंतांनी पोर्तुगिजांशी करार केला[५९]. कारण सावंतवाडीकर आता अतिशय अडचणीत सापडले होते. करवीरकर, पेशवे या दोन्हीही स-ता वाडीकरांना मोर्चेलचा बहुमान मिळाल्यामुळे त्यांच्या विरोधात गेले होते. करवीरकरांनी तर वाडीकरांविरुध्द कारवायाही सुरू केल्या होत्या. या संकटावर मात करण्यासाठीच सावंतवाडीकरांनी पोर्तुगिजांबरोबर मैत्री संपादन केली होती.

पश्चिम किना-यावर सावंतांना इंग्रजांविरुध्द पेशव्यांची मदत :-

इंग्रजांचे जहाजे नेहमी व्यापाराच्या निमि-ताने समुद्र किना-यावर ये-जा करीत असत. यावेळी सावंतवाडीकर सरदेसाई यांचे सरदार समुद्र किना-यावर चाचेगीरी करून इंग्रजांना त्रास देत. या सरदारांची जहाजे व आरमार मालवण येथील सिंधुदुर्ग किल्ल्यानजिक असत. मालवण बंदरी हे लोक बळावले होते. व्यापा-यांचे तारवे लुटून तो माल विकणे हाच त्यांचा मुख्य धंदा होता. ही गोष्ट इंग्रजांच्या लक्षात येताच इंग्रजांची जहाजे समुद्र किना-यावर तो-याने फिरू लागली. हा उपद्रव बंद करण्यासाठी मुंबईहून कंपनी सरकारचे आरमार आले. इंग्रजांच्या या आरमाराने सावंतांच्या चाच्यांची कोंडी केली. ही बातमी माधवराव पेशवे यांना कळताच त्यांनी जानोजी धुळूप[६०] यास सावंतांच्या मदतीस जाण्यास सांगितले. त्यावेळी सावंतांचा जय होऊन इंग्रजांना वेढा उठवावा लागला. जर पेशव्यांनी या वेळी सावंतवाडीकरांना जातीने मदत

केली नसती तर सावंतवाडीकर इंग्रजाचे भक्ष्य बनले असते आणि हे भक्ष इंग्रजांनी केव्हाच घशात घातले असते, परंतु केवळ पेशव्यांनी आपली भूमिका खंबीर ठेवली व सावंतांना मदत करून त्यांच्यावर ओढवलेले संकट टळले. पेशव्यांनी त्यांना मदत केली पण त्या मदतीच्या पाठीमागे दुसराही एक हेतू असावा आणि तो म्हणजे जर सावंतांना इंग्रजांनी जिंकले असते तर पुढे इंग्रजांची पेशव्यांना लगेच भीती निर्माण झाली असती, व म्हणून इंग्रजांना शह देण्यासाठी त्यांनी सावंतांना मदत केली होती.

पेशव्यांचा सावंतांना खूष ठेवण्याचा प्रयत्न :-

सावंतांना खूष ठेवणे व त्यांची मदत घेऊन वेळेवर आपला फायदा उठविण्यासाठी पेशव्यांनी सावंतांना मात्र खूष ठेवण्याचा प्रयत्न केला होता. कारण जर आपण तसे केले नाही तर सावंतवाडीकर कदाचित पेशव्यांच्या विरुध्द जाऊन त्यांच्या शत्रूला मदत करतील अशी भीती पेशव्यांना वाटत होती. म्हणूनच वरील प्रयत्न त्यांनी केला. उदा. मालवण येथील प्रतिनिधी भाऊसाहेबांना लिहीतो की, नागसावंतांची स्त्री भागीरथीबाई हिला वर्षास खालील वस्तू पाठविल्या पाहिजे.

१) वस्त्रे पातळ	-	१
२) शेला	-	१
३) चोळीचा खण	-	१
४) फडकी	-	१

या प्रमाणे दरवर्षी बोळवण देण्याचे करावे म्हणजे पेशव्यांनी सामाजिक पध्दतीप्रमाणे सावंतांना खूष ठेवण्याचा प्रयत्न केला होता असे दिसते[६].

सावंतांचे राजकारण :-

इ.स.१७८८ च्या जानेवारीत टिपू व पेशवे यांचे युध्द चालू होते. हे युध्द चालू असतांना सावंतवाडीकरांनी टिपूला नजराणे पाठविले. आणि खलीताही पाठविला, यावरून ~~कळते की~~, पेशव्यांच्या विरूध्द टिपूला सावंतवाडीकरांनी मदतही केली असावी असा निष्कर्ष निघतो. ~~ही~~ मदत केवळ पेशवे यांचे वर्चस्व किंवा दडपण झुगारून देण्यासाठीच असावी. एकीकडे पेशव्यांशी वरकणी गोड बोलायचे व दुसरीकडे टिपूला नजराणे पाठवावयाचे, तसेच पोर्तुगिजांना देखील मदत करावयाची व पेशव्यांना ते अज्ञात ठेवायचे अशा प्रकारे सावंतांनी अयशस्वी राजकारण केले[६] आणि म्हणूनच या नंतर पेशव्यांनी सावंत - करवीरकर स्वारीत करवीरकरांना मदत करून सावंतांवर एक प्रकारे सूडच उगवला असावा. यावरून त्यांनाही सावंतांचे पारिपत्य करावयाचे होते असे दिसते. सावंतवाडीकर पेशव्यांना गुप्त बातम्याही देत असत. जून,१७९१ मध्ये जिवाजी विश्राम यांनी सावंतवाडीहून पेशव्यांना कळविले की पोर्तुगिजांची जी सांता - आवा ती नौका मराठ्यांनी पकडली होती. त्यावरून कुरापत काढून त्यांनी विजयदुर्गावर स्वारी करण्यासाठी आपले आरमार सुसज्ज ठेवले आहे, पुढे त्याने असेही कळविले की, पोर्तुगिजांचे दोन वकील वेश पालटून पुण्याला येत असून नारायणराव धुमे व विठ्ठल गोकी अशी त्यांची नावे आहेत. ही गुप्त बातमी पेशव्यांना कळ त्याबरोबर त्यांनी याबाबत दक्षता घेतली. म्हणजे सावंतांनी पेशव्यांशी राजकारण केले व त्यांना मदतही वेळोवेळी केली असे यावरून समजते[६३].

१ शिवसा, १३, पृ. २३–२४.

२ कि–ता.

३ शिचसा, त्रैमासिक, भाइसंमं, १३ वा, खंड, पत्र–२७, पृ. २३ (१९६५).

४ कि–ता.

५ अ. ब. वालावलकर, ~~ममाशि~~, पृ. २१ ·

६ शिवसा, १३, पृ. ३२–३३

७ वि. पु. पिंगुळकर, सासंइ, पृ. ७१–७४, ४७–४९....१९११

८ केळकर, मराठे व इंग्रज, पृ. १३४–३७. जाने. १९६३.

* झे-याफीन हे पोर्तुगीजांचे नाणे होते. त्यास असरफी असे म्हणत.

९ पिंगुळकर, सासंइ, पृ. ६४ .

१० शिवसा, १३, ले. ३९, पृ. ४६, १९६४–६५.

११ कि–ता, लेख ५५, पृ. ७२–७३.

१२ शिवसा, १३ ले, ५५, पृ. ७२–७३, १९६४–६५

१३ कि–ता, लेख, ७३, १४१ पृ. ९३–९४.

१४ शिवसा, १३ ले, १४१, पृ. ९३–९४

१५ कि–ता, १३ ले, ७८ पृ. ९७.

१६ शिवसा, १३ ले. १४२, पृ. ९५–९६

१७ वर्दे, सासंअीसा, भाअीसंभ, पुरस्कृत, लेख, ४२–४३,
पृ. २२–२३ १९७१.

१८ अ. ब. वालावलकर, ~~ममाशि~~, पृ. २२–२३.

१९ पिसुर्लेकर, पोमसं, पृ. २६१

२० पे. द. पृ. ९. ले. २३.

२१ पे. द. पृ. ३४, ले. ८७

२२ भाइसत्रै, व १४. पृ. २९

२३ भाइसत्रै, व. १४ पृ. २९

२४ कि–ता.

२५ मइासा २,पोद पत्र २६,पृ.८२ पिसुर्लेकर,

२६ माआिसंत्रि,व १४ पृ.२९.

२७ भाइस.त्रै.व १४ पृ.२९.

२८ गो.स.सरदेसाई,पेदनिका, पाकिपेहा, पत्र ४. पृ.१२–१३.

२९ शिवसा, १३, लेख ४१,४३ पृ.४८–४९, ५३–५४, १९६४–६५.

30 कि–ता, लेख ४६, ४७,पृ.५५–५६.

३१ शिवसा,१३,लेख.४६

३२ भाइसंत्रै,वर्ष १४,पृ.३६–३७ जुलै,१९७७

३३ भाइसंत्रै,व १४,पृ.३६–३७,जुलै,१९७७

३४ कि–ता, पत्र २५, पृ.२५–२७.

३५ पेदनिका, पकिपेहा,पत्र ११०.पृ.१०९

३६ कि–ता, पत्र ७८,पृ.७५

३७ कि–ता,पृ.९०–९१

३८ भाईसंत्रै ,व.१४ पृ.३७

३९ पिसुर्लेकर,पोमसं,पृ.२४३,१९६३

४० Pissurlekar,Assentos V.p.643.

४१ पिसुर्लेकर,पोमसं.पृ.२५५.

४२ कि–ता.पृ.२२७

४३ भाईसंत्रै, १४,पत्र १२ पृ.१७

४४ पिसुर्लेकर,भाइसा.प.१००,पृ.५७

४५ गो.स.सरदेसाई,पेदनिका,पकिपेहा,पत्र ८२,पृ.८१

\+ सोंधे हे स्वतंत्र संस्थान होते.

४६ भाइसंत्रै,व १४.पत्र १०.पृ.१३.

४७ भाईसंत्रै,१४ पत्र.१० पृ.१३.

४८ अ.ब.वालावलकर ~~[illegible]~~ पृ.२२–२३.

४९ ~~पोमसं.~~ पिसुर्लेकर,पृ.२२४

५० कि–ता.

५१ पितुर्लेकर, पोमतं, पृ. २५८.

५२ कि-ता, पृ. २९४.

५३ पितुर्लेकर, मइता, पोद. २, पत्र ३६ पृ. ८४.

५४ शिवसा, १३ लेख, ५४, पृ. ६३, ७२.

५५ कि-ता, पृ. ७८-७९.

५६ कि-ता, पृ. २४०-४५.

५७ पितुर्लेकर, पोमतं. पृ. २९२.

५८ गर्गे, एस. एम., करि, पृ. २४०-४१.

५९ भाइतैदे, व १४. पृ. ४०.

६० कि-ता.

६१ पेदनिका, पकिपेइा, पृ. ९४-९५, पत्र ९७.

६२ पितुर्लेकर, मइता, पोद. २, पृ. ६६, पत्र १०८.

६३ पितुर्लेकर, मइसा, पोद. २, पृ. १०५. पत्र ६४.

प्रकरण ६ वे

सावंत - पोर्तुगीज - संबंध

पोर्तुगीजांनी इ.स.१५१० मध्ये प्रारंभी आदिलशहाकडून गोवा घेतला. त्यानंतर त्यांनी इ.स.१५८० सालापर्यन्त गोवा, दीव, दमण, साष्ट, बारदेश, सातिगांव इ. प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. वरिल प्रदेश घेऊन पोर्तुगीजांनी हिंदुस्थानच्या भूमीवर आपले पाय रोवले व साम्राज्यविस्ताराचे धोरण पुढेही चालू ठेवले. यानंतर १७ व्या शतकात इ.स.१६६४ मध्ये कुडाळचे देसाई लखम सावंत व शिवाजी महाराज यांचा संघर्ष झाल्यामुळे त्यात लखम सावंताची पिछेहाट झाली. परिणामी लखमसावंतास पोर्तुगीजांनी लगेच त्यांच्या राज्यात आश्रय दिला. यावेळी खऱ्या अर्थाने सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांचे संबंध आले.

पोर्तुगीजांना यावेळी शिवाजीची अत्यंत भिती वाटत होती. त्यामुळे सावंतवाडीकरांना त्यांनी गोव्यात आश्रय देऊन आपलेसे करून घेण्याचा प्रयत्न केला. म्हणजे १७ व्या शतकाच्या शेवटी सावंतांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण होण्यापूर्वीच त्यांचे पोर्तुगीजांशी संबंध आले होते. आठराव्या शतकात मात्र पोर्तुगीजांचे वाडीकरांप्रमाणेच सातारा व कोल्हापूरचे छत्रपती राजे, पुण्याचे पेशवे, आंग्रे कुलाबकर इ. सत्ताधिशांशी संबंध प्रस्थापित झाले. परंतु वरील सर्व सत्ताधिशांपेक्षा सावंतवाडीकर, पोर्तुगीजांच्या राज्याच्या सीमेशेजारी असल्यामुळे त्यांच्याशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करणे पोर्तुगीजांना आवश्यक वाटले होते.

लखम सावंत व शिवाजी महाराज यांच्यात वैर होते.कारण लखम सावंत आदिलशहाची बाजू घेऊन शिवाजीशी तंटा करीत असे. त्यामुळे शिवाजीने लखमसावंताचा पराभव करून त्यास मांडलीक बनविले होते. परंतु लखम सावंतास शिवाजीचे मांडलीकत्व सहन होत नव्हते म्हणून ते झुगारून देण्यासाठी सावंतवाडीकरास कुणाची तरी मदत घेणे आवश्यक होते, त्यामुळेच वाडीकरांनी

पोर्तुगीजांशी सख्य जोडले होते, व मराठ्यांशी उघड उघड संघर्ष करण्यात सावंतवाडीकर तयार झाले. एवढेच नव्हे तर ठिकठिकाणी प्रत्यक्षात मराठ्यांना तीव्र विरोधही दर्शविला. जर वाडीकरांनी पोर्तुगीजांशी सख्य जोडले नसते तर मराठ्यांनी सावंतवाडीकरांना कायमचेच त्यांचे मांडलीकच ठेवले असते. परिणामी सावंतांना पुढील काळात कधीच स्वतंत्र होता आले नसते. इ.स. १६७५ मध्ये लखम सावंतानंतर खेमसावंत सावंतवाडीच्या स-तेवर आला त्याने मात्र लखमसावंतापेक्षाही पोर्तुगीजांशी निकटचे संबंध प्रस्थापित केले. आणि खेमसावंताच्या काळातच वाडीकर स्वतंत्र झाले. त्याचप्रमाणे सावंतवाडी राज्याच्या सीमाही याच काळात दूरपर्यन्त पोहचल्या. म्हणजेच सावंतवाडी राज्याचा विस्तार झाला[१].

पोर्तुगीजांनी याचकाळात इ.स. १६८५ मध्ये सावंतवाडीकरांशी एक गुप्त करार केला. त्यानुसार पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांच्या रक्षणाची हामी दिली. संकट काळात आरमारही मदतीला पाठविण्याचे कबूल केले. सावंतवाडीकर मराठ्यांशी जर संघर्ष करीत असतील तर त्यांना दारूगोळाही मोफत दिला जाईल, असेही पोर्तुगीजांनी सावंतांना आश्वासन दिले होते. सावंतवाडीकरांनी संभाजीच्या राज्यातील इंग्रज, डच, फ्रेंच यांच्याशी कोणत्याही प्रकारे संधान ठेवू नये असेही या गुप्त करारात ठरले होते. अशा रितीने हा गुप्तकरार करून सावंतांना पोर्तुगीजांनी सर्व प्रकारची अमिषे दाखवून येनकेन प्रकारे मराठ्यांशी युध्द करण्यास प्रवृ-त करण्याचा प्रयत्न केला. या करारापासूनच ख-या अर्थाने सावंत व पोर्तुगीज जवळचे मित्र बनले होते. पोर्तुगीजांचे राजकीय ध्येयधोरणे इंग्रजापेक्षाही धूर्तपणाचे होते. तरीही ते संपूर्ण हिंदुस्थान काबूत आणू शकले नाही. पोर्तुगीज नेहमी आपले धोरण लगेच जाहीर करीत नसत, व एखाद्यास मदत करावयाची असल्यास ते सर्वसामान्यपणे उघडपणे करीत नसत. उदा. पोर्तुगीजांना मोगलांचा काटा काढावयाचा होता त्यांनी सावंतवाडीकरांनाच परस्पर मदत करून मोगलांकडे वळविले. आणि

सावंतवाडीकराप्रमाणेच मोगल बादशहा आपला मित्र आहे असे वरकरणी दाखविले. पोर्तुगीजांना मोगलांचा शेजार इतर सत्ताधिशांपेक्षा घातक वाटत होता. कारण मोगल बादशहा कधी आपले राज्य संकटात टाकील याचा नेमच नव्हता. म्हणूनच काट्याने काटा काढावा यानुसार सावंतवाडीकरांकडून मोगल सत्तेचा शेवट करण्याचा प्रयत्न केला. परंतु काही प्रमाणात ते यशस्वीही झाले. इ.स. १६९६ मध्ये खेमसावंताने मोगलांचा कुडाळ येथील किल्ला जिंकून आपल्या ताब्यात घेतला. त्यामुळेच पोर्तुगीजांचा सावंतांवरील विश्वास दृढ झाला[2].

परंतु उपलब्ध कागदपत्रावरून असे दिसून येते की पोर्तुगीज अतिशय मतलबी होते. त्यांनी आपले धोरण दुटप्पी ठेवले होते. ज्या बाजुकडून आपला सर्वदृष्टीने फायदा असेल त्याच बाजूकडे ते झुकत असत. उदा. सावंतवाडीकरांना इ.स. १६९६ त सक्रीय मदत केली आणि इ.स. १६९८ त वाडीकरांनी मोगलांच्या ताब्यात असलेल्या फोंड्याच्या किल्ल्यावर चाल करताच पोर्तुगीजांनी आपल्या फायद्याचा विचार करून मोगलांना मदत करून त्यांची बाजू घेतली[3] व वाडीकरांना विरोध दर्शविला. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे वाडीकरांनी जर फोंड्याचा किल्ला घेतला तर ते बलशाली होतील व उद्या आपल्या राज्यालाही त्यांच्यापासून उपसर्ग झाल्याशिवाय रहाणार नाही. त्याच प्रमाणे आपल्या व्यापारालाही धोका निर्माण होईल, परिणामी आपले अतोनात आर्थीक नुकसान होईल. या सर्व गोष्टींचा विचार करूनच पोर्तुगीजांनी सावंतांना मदत न करता मोगलांना मदत केली. व फोंडा सावंतांपासून वाचविला. या संघर्षात मोगलांची सरशी होऊन वाडीकरांना मागे हटावे लागले. पोर्तुगीजांनी जर यावेळी सावंतवाडीकरांना मोगलांच्या विरूध्द मदत केली असती, तर सावंतांना सर्व परकीय सत्तांमध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले असते; कारण मोगलांचा जर पराभव झाला असता तर पोर्तुगीजांनाही पोर्तुगालमध्ये परत पाठविले असते.

मराठेही सावंतवाडीकरांना वचकून राहिले असते. परिणामी संपूर्ण कोकण, गोवा, व पश्चिम किनारपट्टी सावंतवाडीकरांच्या ताब्यात आली असते. परंतु पोर्तुगीज अत्यंत धूर्त, चाणाक्ष असल्यामुळे त्यांनी प्रसंगावधान साधून सावंत - मोगल, संघर्षात मोगलांनाच मदत केली आणि सावंतवाडीकरांचा त्यामुळेच पराभव झाला. यापूर्वीही पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना इतरांच्या प्रदेशात बंडाळी सुरू करण्यास प्रवृत्त केले होते. प्रत्यक्षात मात्र वाडीकरांची तशी भूमिका घेण्याचा विचारही नव्हता, परंतु केवळ पोर्तुगीजांच्या दबावामुळेच त्यांना वरील भूमिका घ्यावी लागली. सावंतवाडीकरांनी देखील पोर्तुगीजांशी जशास तसे वागणे आवश्यक होते. परंतु वाडीकर तसे न वागल्यामुळेच त्यांच्यावर पोर्तुगीजांचे वर्चस्व वाढत गेले. उदा. पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना संभाजीच्या प्रदेशात बंडाळी करण्यास प्रवृत्त केले होते. कारण पोर्तुगीजांना शिवाजी महाराजानंतर संभाजीराजेंचीही भीती होती. संभाजी राजेंसारख्या बलाढ्य व बलवान मराठी शत्रूचा नायनाट केल्याशिवाय किंवा शत्रूस अतिशय कमकुवत किंवा दुर्बल केल्याशिवाय आपली सत्ता टिकणार नाही व आपल्या राज्याचा विस्तारही होणार नाही याची पोर्तुगीजांना जाणीव होती. त्यामुळेच त्यांनी सावंतवाडीकरांचा प्रत्येक ठिकाणी ढाल म्हणून उपयोग करून घेतला. आपण स्वत: मराठ्यांचा राजा संभाजीबरोबर न लढता सावंतवाडीकरांना पुढे करूनच संभाजीला नामोहरम करण्याचा पोर्तुगीजांचा डाव होता. थोडक्यात म्हणजे सावंतवाडीकरांना सर्व प्रकारची मदत करून परस्पर शत्रूचा काट्याने काटा काढावा असे पोर्तुगीजांचे धोरण होते[४]. परंतु यावरून सावंतवाडीकर इतके विचारी, धोरणी, धूर्त नव्हते असे दिसते, कारण खेमसावंतांने जर पोर्तुगीजांशी मिळते जुळते न घेता छत्रपती संभाजीशी कायमचे सख्य जोडले असते तर परकीय सत्ता मग ती पोर्तुगीज असो, डच, फ्रेंच किंवा इंग्रज असो, या सर्वांना ते थोपवून धरू शकले असते. किंबहुना पोर्तुगीजांना १६९० पूर्वीच मायदेशी परतावे लागले असते व इतर परदेशी

व्यापा-यांवरही याचा परिणाम होऊन त्यांनी शिस्तीत फक्त व्यापारच केला असता. परंतु सावंतवाडीकरांनी इतका खोलवर विचार केला नाही परिणामी वाडीकर पोर्तुगीजांच्या जाळ्यात अडकले ते कायमचेच, पुन्हा त्यांची कधीही सुटका झाली नाही. त्यामुळेच वाडीकरांना त्यांचे सर्व निर्णय मानण्याची वेळ आली होती.

मोगलांच्या लष्कर भरतीसाठी वाडीकरांना पोर्तुगीजांची संमती :-

इ.स.१६८४ मध्ये पोर्तुगीज व्हायसरॉय कौंट द.आलव्होर याने बारदेश व आसपासचा प्रदेश पोर्तुगीजांच्या वर्चस्वाखाली आणला होता. या प्रदेशातून वाडीकरांना हुसकावून लावले होते. बारदेश घेतल्यानंतर हतबल झालेल्या वाडीकरांवर पोर्तुगीजांचे पूर्ण वर्चस्व निर्माण झाले होते. यावेळी परकीय स-तांबरोबर असलेले वाडीकरांचे संबंधही पोर्तुगीजांच्या मनावर होते. तेव्हा कोणाबरोबर कसे संबंध ठेवावयाचे याबाबत सर्व निर्णय पोर्तुगीज सावंतवाडीकरांना कळवीत असत. उदा. मोगल बादशहाच्या सांगण्यावरून त्याच्या वकीलांनी अनेक वेळा वाडीकरांना त्यांच्या सैन्यात भरती होण्यासाठी पाचारण केले होते. परंतु वाडीकर मोगलांच्या लष्करात स्वनिर्णयाने जाऊ शकले नाही. कारण तसे करण्यास पोर्तुगीजांची संमती आवश्यक होती. इ.स.१६८८ त सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांकडे मोगल लष्कर भरतीसाठी संमती मागितली, तेव्हा त्यांनी ती दिली. संमती देण्यापूर्वी व्हाइसरॉयने आपल्या सल्लागार मंडळाची बैठक बोलावून सदर बाबीवर चर्चा करूनच संमती दिली होती[५]. म्हणजे सावंतवाडीकर आता पोर्तुगीजांच्याच मार्गदर्शनाखाली वागत होते. जर तसे न वागल्यास वाडीकरांना त्यांच्या राज्यावर लगेच संकट येण्याची भीती वाटत होती. परंतु पोर्तुगीजांना मात्र सावंतवाडीकरांचे अस्तित्व लवकर नष्ट होऊ द्यावयाचे नव्हते, तर याउलट सावंतवाडीकरांच्या अस्तित्वाला धोका पोहचू नये यासाठी ते सर्वतोपरी प्रयत्न करीत असत, कारण जर सावंतवाडी-

-करांचे स्थान धोक्यात आले तर त्यांच्यावरही लगेच मराठे, व मोगल यांचे संकट कोसळण्यास विलंब लागणार नाही याची पोर्तुगीजांना जाणीव होती. पोर्तुगीजांचे राजकीय डावपेच सावंतवाडीकरांना उमजत नव्हते. सावंतवाडीकरांचे आस्तित्व टिकवावयाचे म्हणूनच त्यांनी इंग्रजांप्रमाणेच सावंतवाडी राज्याचा "बफर स्टेट" म्हणून उपयोग करून घेतला होता. त्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते. इतर स-तांबरोबर प्रत्यक्षात संघर्ष न करता आगोदर वाडीकरांना मदत करून त्यांना पुढे करावयाचे, संघर्ष झाल्यास नाश झाला तर वाडीकरांचा होईल, विजय झाला तर आपला फायदा होईल आणि आपल्या राज्याला मात्र तसूभरही धोका निर्माण होणार नाही, असे पोर्तुगीजांचे धोरण होते. इतरांशी संघर्ष होण्याची चिन्हे दिसल्यास या संघर्षाचे किंवा युध्दाचे रणांगणही वाडीकरांचे राज्यच असेल याचीही दखल पोर्तुगीज घेत होते. आपल्या प्रदेशात युध्द लढण्याचे ते टाळीत असत, कारण नुकसान झाले तर ते वाडीकरांचे होईल, हे ते जाणून होते.

खेमसावंताचे पोर्तुगीजांकडून अभिनंदन :-

इ.स. १६९४ मध्ये मराठ्यांच्या जहाजांकडून पोर्तुगीज जहाजांवर हल्ले होऊ लागले. प्रामुख्याने राजापूर व मेलोंडी येथेच पोर्तुगीज जहाजांना मराठ्यांकडून उपसर्ग होऊ लागला. यावेळी पोर्तुगीजांनी खेमसावंतांची मदत मागताच त्याने त्वरील पोर्तुगीजांना मदत केली. त्याबद्दल पोर्तुगीज व्हाइसरॉय कौंट द व्हिला व्हेर्द याने खेमसावंताचे अभिनंदन केले[६]. फक्त अभिनंदन करून पोर्तुगीज थांबले नाही तर खेमसावंतांवर यापुढे मराठ्यांच्या जहाजांचा पोर्तुगीज जहाजांना त्रास होणार नाही याची खबरदारी घेण्याची जबाबदारी टाकली. यानंतर पुढेही १६९६ त खेमसावंताने कुडाळच्या किल्ला जिंकून ताब्यात घेतल्यामुळे पोर्तुगीजांना आनंद होऊन त्यांनी पुन्हा खेमसावंताचे अभिनंदन केले[७]. परंतु पोर्तुगीज अतिशय गोडबोले व मतलबी होते हे खेमसावंतवाडीकरांच्या लक्षातच आले नाही. आपले काम

इतरांकडून कसे करून घ्यावे याची त्यांना पूर्णपणे माहिती होती. त्यांनी खेमसावंतास हाताशी धरूनच मराठ्यांशी झुंज दिली. खेमसावंतही विचार न करता भावनेच्या आहारी जाऊन मराठ्यांच्या विरूध्द संघर्षात पडले. पोर्तुगीजांना वेळोवेळी मदत केली. यामुळे पोर्तुगीजांना मराठ्यांकडून होणारा त्रास बंद झाला. पोर्तुगीजांनी सावंतांच्या मदतीवरच मराठ्यांना मागे हटविले, नाहीतर त्यांना ते शक्य झाले नसते, कारण एकाच वेळी अनेक शत्रूंना तोंड देणे सोपे नव्हते. यावेळेपासूनच जर पोर्तुगीजांचे राजकीय डावपेच सावंतवाडीकरांनी ओळखले असते तर कदाचित त्यांच्यावर निर्माण झालेले पोर्तुगीजांचे सर्वस्व कायमचेच झुगारून देऊ शकले असते. परंतु दुर्दैवाने वाडीकरांच्या काहीच ध्यानात आले नाही.

यानंतर पुढे सावंत व मराठे यांच्यात वितुष्ठ आल्याने सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांकडे मदत मागितली कारण माजी व्हाईसराय वाँद आल्व्हेरा याने प्रसंग येईल तेव्हा मदत करण्याचे वाडीकरांना वचनच दिले होते. त्यानुसार व्हाईसरायने राज्याच्या सल्लागार मंडळाची बैठक बोलावली आणि बैठकीत खेमसावंताने मागितलेल्या मदतीचा अर्ज चर्चेसाठी ठेवला. यावर सल्लागार मंडळाने असे मत प्रदर्शित केले की "व्हाईसरायच्या वचनाप्रमाणे खेमसावंतास मदत जरूर द्यावी मात्र आमच्या आरमाराने खेमसावंताच्या आरमाराबरोबर मराठ्यांच्या बंदरावर व आरमारावर संयुक्तरित्या हल्ले करू नयेत. तथापि, सरदेसाई यांच्या गलबतांना व्यापारासाठी उत्तरेकडे किंवा दक्षिणेकडे जायचे असल्यास आमच्या राज्याचे मित्र म्हणून त्यांच्या गलबतांना आमच्या आरमाराने विनासायास संरक्षण द्यावे"[८]. म्हणजे अडचणीच्या काळात सावंतवाडीकरांची पोर्तुगीजांनी वेळोवेळी मदत घेतली आणि सावंतवाडीकरांवर संकट आले तेव्हा मात्र पोर्तुगीजांनी संयुक्तपणे मराठ्यांच्या बंदरावर हल्ले करण्यास वाडीकरांना स्पष्ट नकार दिला. याचे कारण पोर्तुगीजांना मराठ्यांचा रोष पत्करावयाचा नव्हता; तर त्यांची मर्जी संपादन करावयाची होती.

यावेळी पोर्तुगीजांनी सावंतांना दिलेल्या मदतीच्या वचनाचा भंग केला. सावंतवाडीकर व मराठे यांच्यात झगडा सुरू करून आपण तटस्थ रहावे आणि त्यांच्यातच आपापसात लढाया व्हाव्यात व त्यांच्या संघर्षातूनच शेवटी आपल्याला फायदा उठविता येईल अशी पोर्तुगीजांची धारणा होती. नेहमीच सावंतवाडीकरांना कोणाबरोबर तरी संघर्षात ठेवण्याचाच पोर्तुगीजांचा प्रयत्न होता. जेव्हा वाडीकरांनी कुडाळचा किल्ला घेतला तेव्हा एका बाजूने सावंतांवर पोर्तुगीजांचा विश्वास दृढ झाल्याचे सांगितले आणि दुसरीकडे मात्र मोगलांना मदत करून त्यांना कळविले की "बंडखोर खेमसावंतास आमचे राज्य कधीच क्षमा करणार नाही. त्याच्या अपराधाबद्दल त्याला शिक्षा ही झालीच पाहीजे". यावरून पोर्तुगीजांचे परराष्ट्रीय धोरण कसे होते याची कल्पणा येते. सावंत व मराठे आणि सावंत व मोगल असा संघर्ष सावंतांना पोर्तुगीजांनी मदत करून चालूच ठेवण्याचा प्रयत्न केला होता. त्यात नुकसान व नाश फक्त वाडीकरांचाच मोठ्या प्रमाणावर होत होता. आणि पोर्तुगीज मात्र तटस्थ राहून सर्वांना पुन्हा वरकरणी मित्र म्हणत असत. या स-यांना भांडणात गुंतवूनच त्यांनी आपल्या राज्याच्या सीमा वाढविण्याचा सपाटा चालू ठेवला होता.

सावंतवाडीकर व मोगल यांच्या संघर्षात एकाच वेळी पोर्तुगीजांनी एकीकडे सावंत व दुसरीकडे मोगल अशी दोघांनाही गुप्त मदत केली. एकास केलेली मदत दुस-यास माहिती होणार नाही याचीही त्यांनी खबरदारी घेतली होती. म्हणजे पोर्तुगीज किती कावेबाज होते हे सिध्द होते. परंतु सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांची वरील प्रकारची वर्तणूक जर मोगलबादशहा औरंगजेबाच्या निदर्शनास आणून दिली असती तर मात्र पोर्तुगीज फार अडचणीत आले असते व त्यांच्या सवयीस आळा बसला असता. पण खेमसावंताने तसे केले नाही यावरून सावंतवाडीकर इतके चौकस बुध्दीचे नव्हते व त्यांच्याकडे चातूर्य व धाडस यांची उणीवच होती असे दिसते.

सावंत वाडीकर पोर्तुगीजांचे मांडलीक :-

प्रारंभी मोगलबादशहाने खेमसावंतास इ.स.१६८९ मध्ये कुडाळ प्रांताची सरदेशमुखी दिली होती. सरदेशमुखी घेऊन सावंतवाडीकर मोगलांचे मांडलीक झाले होते. परंतु पुढील काळात मात्र सावंतवाडीकरांवर मोगलापेक्षा पोर्तुगीजांनी आपली छाप पाडून वर्चस्व निर्माण केले. परिणामी वाडीकरांनी कुडाळच्या किल्ला घेऊन मोगलांचे मांडलीकत्व झुगारून देऊन स्वतंत्र झाले. सावंत व मोगल यांच्या संघर्षात शेवटी सावंतवाडीकर अपयशी ठरले, तेव्हां आता पोर्तुगीजांना जवळ केल्याशिवाय त्यांना पर्यायच उरला नव्हता. म्हणूनच त्यांनी पोर्तुगीजांचा आश्रय घेतला. सावंतवाडीकर अतिशय अडचणीत आल्याचे पाहून पोर्तुगीजांनी त्यांच्यावर अनेक अन्यायकारक अटी लादल्या. उदा. खेमसावंतास पोर्तुगीजांनी पोर्तुगालच्या राजाचे मांडलीकत्व स्विकारण्यास सांगितले. ही अट सावंतवाडीकरांनी निमूटपणे मान्य करून २ सप्टेंबर १६९९ रोजी पोर्तुगालच्या राजाचे मांडलीकत्व पत्करले[१]. परंतु यावेळी पोर्तुगीजांनी इतर अनेक अटी लादुन त्यांचा फायदा उठवून घेतला. उदा. सावंतवाडीकरांनी पोर्तुगालच्या राजाची सेवा करावी. याचा अर्थ असा की, सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांचा मदतीस कधीही उभे रहावे व ते सूचना करतील तसे ऐकावे असा होतो. त्यामुळे सावंत-वाडीकर आता पूर्णपणे पोर्तुगीजांच्या छत्राखाली गेले होते. ~~त्यामुळे~~ परिणामी सावंतांचे स्वतंत्र्यही अस्तास गेले होते. त्यांना आता स्वतंत्रपणे कोणताही निर्णय घेणे शक्य नव्हते तर याउलट येथून पुढे सावंतवाडीकरांना पोर्तुगीज राजा व प्रदेश यांच्या रक्षणासाठी लढावे लागणार होते. मग पोर्तुगीजांचा असलेला शत्रू सावंतांचा मित्रही असला तरी त्याच्याशी पोर्तुगीजांच्या हितासाठी लढणे अपरिहार्यच होते. कारण सावंत हे पोर्तुगीज राजाचे मांडलीक होते. पोर्तुगीजांना मदत करीत असतांना लागणारा पैसा वाडीकरांना खर्च करावा लागणार होता व संघर्षात आपली माणसेही गमवावे लागणार होते. साहजिकच

सावंतवाडीकरांच्या मनात पोर्तुगीजांबद्दल किल्मिश निर्माण झाले होते. त्यामुळेच हळूहळू वाडीकर आता पोर्तुगीजांच्या विरुध्द पवित्रा घेऊ लागले व त्यांना विरोधही करू लागले.

सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांचा प्रदेश लुटला :-

इ.स. १६९९ त सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांचे मांडलीकत्व स्विकारले होते. परंतु सावंतवाडीकर आता इतके पोर्तुगीज व्देशाने पछाडले होते की, त्यांनी इ.स. १७०२ मध्ये पोर्तुगीजांचे मांडलीकत्व झुगारून देऊन गोव्याच्या हद्दीत शिरून काही खेडी लुटली, गुरेढोरे आणि काही माणसे पळवली. सर्व खेडी बारदेश या प्रदेशातीलच लुटली गेली होती. सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांच्या विरोधी पवित्रा घेण्याचे तात्कालीक कारण म्हणजे मोगल बादशहाकडुन खेमसावंताने खोरजुवे बेट घेतले होते, ते बेट पोर्तुगीजांना देऊन टाकण्याबद्दल मोगलबादशहाने एक आज्ञापत्र काढून सावंतवाडीकरांना पाठविले होते. परंतु सावंतवाडीकरांनी या आज्ञापत्रांचे स्वागत न करता ते धुडकावून लावले आणि खोरजुवे बेट पोर्तुगीजांना न देण्याचा निर्धार केला होता. त्यामुळेच सावंतवाडीकरांना पोर्तुगीजांची चीड येऊन त्यांनी त्वरीत बारदेशात शिरून लुटालूट करून पोर्तुगीजांविरुध्द प्रतिक्रीया व्यक्त केली. परंतु गोव्याच्या हंगामी गव्हर्नर प्रिमज दो मॅंटोनिग्रो लुईज कौतिन्यु याने सावंतवाडीकरांकडे निषेधाचा खलीता पाठविला व पळवून नेलेली गुरे व माणसे परत करण्याची मागणी केली[१०]. थोडक्यात म्हणजे सावंतवाडीकरांना खोरजुवे बेटावरील ताबा सोडून ते पोर्तुगीजांना द्यावयाचे नव्हते म्हणूनच त्यांनी उघड उघड पोर्तुगीजांना स्पष्ट विरोध दर्शविला. इ.स. १७०२ च्या आक्टोबरमध्ये मराठ्यांनी फोंड्याच्या किल्ल्यावर स्वारी केली. यावेळी फोंडा मोगलांच्या ताब्यात होता. जर फोंडा मराठ्यांनी जिंकून घेतला तर आपल्याला ते हैराण करतील आणि वेळप्रसंगी मराठ्यांपुढे आपल्याला

पराभवही पत्करावा लागेल अशी पोर्तुगीजांना भीती वाटत होती. म्हणूनच त्यांनी फोंडाच्या मराठा-मोगल संघर्षात मोगलांना आतून मदत केली व सावंतवाडीकर मोगलांच्या विरूध्द जाऊ नये म्हणून अतिशय दक्षतेने वेळेपुरते त्यांनाही जवळ केले[११] व त्यांची मदत घेतली तरीही फोंडयाचा किल्ला मराठ्यांनीच घेतला होता. पोर्तुगीज जरी मोगलांचा व्देश करीत होते तरी मराठ्यांबद्दल त्यांना फार प्रेम होते असे नाही, परंतु सर्वच शक्तीपासून आपले राज्य कसे वाचविता येईल व राज्याची वाढ कशी करता येईल या गोष्टींचा पोर्तुगीज नेहमीच विचार करीत असत. अशारीतीने वेळ आणि काळ पाहून पोर्तुगीज आपले धोरण आखीत. म्हणजे वेळप्रसंगी शत्रूबरोबर जरी मैत्री करण्याची गरज भासली तरी त्यात पोर्तुगीजांना त्यात वावगे वाटत नव्हते. फायद्यासाठी ते कधीही धोरण बदलण्यास तयार होत असत. सावंतवाडीकरांची मदत घेतली तरीही किल्ला मराठ्यांनीच घेतला होता. पोर्तुगीजांना जरी मुसलमानांविषयी व्देष होता तरी मराठ्यांबद्दल त्यांना फार प्रेम होते असे नाही, परंतु सर्वच शक्तीपासून आपले राज्य कसे वाचविता येईल व त्याची वाढ कशी करता येईल, या गोष्टींचा ते नेहमी विचार करीत होते. आणि म्हणूनच त्यांनी फोंडयाच्या स्वारीत मोगल सैन्यास सक्रीय मदत केली व सावंतवाडीकरांचीही मदत मिळवून दिली. सावंतांशी जरी त्यांचे वाकडे होते तरी सुध्दा वेळेवर त्यांनी सावंतवाडीकरांशी संबंध सुधारून घेतले होते.

सावंतवाडीकरांची पोर्तुगीजांकडे धान्यपुरवठ्याची मागणी :-

मार्च १७०३ मध्ये सावंतवाडी राज्यात दुष्काळ पडला. या दुष्काळामुळे राज्यात धान्याचे पीक आले नाही. त्यामुळे राज्यात धान्याची टंचाई निर्माण झाली. राज्यातील जनतेची उपासमार होऊ लागली, तेव्हा सावंतवाडी सरकारने पोर्तुगीज व्हाईसरॉयकडे धान्य पुरवठ्याची मागणी केली. या मागणीत एकूण १००० पोती तांदूळ नमूद

केलेले होते. परंतु पोर्तुगीज व्हाइसरॉयने ही मागणी अर्धवट मान्य केली व ५०० पोती तांदूळ देऊ म्हणून सांगण्यात आले आणि गोव्यात ज्या भावात हे तांदूळ नागरिकांना मिळतात त्याच भावात सावंतवाडी राज्यात विकले जातील असेही पोर्तुगीजांनी सावंतांना सांगितले. यावेळी सावंतवाडीकर अतिशय अडचणीत होते. कारण ते मराठ्यांकडे व मोगलांकडे मदत मागू शकत नव्हते. परंतु त्यांनी एक सावधगिरी केली होती ती म्हणजे त्यांनी पोर्तुगीजांबरोबर संबंध विकसीत केले होते. व या संबंधाचाच त्यांना फायदा मिळाला[१२].

या दुष्काळाच्या संकटाच्या वेळी मात्र पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना मदत करून उपकृत केले, जर पोर्तुगीजांनी त्यांना मदत केली नसती तर वाडीकरांची काय परिस्थिती झाली असती याचा विचार न केलेला बरा.

दुष्काळाच्या वेळी पोर्तुगीजांना सावंतवाडी राज्यावर स्वारी करून ते राज्य गिळंकृत करता आले असते. व खेमसावंताची सत्ताही संपुष्टात आणता आली असती. परंतु पोर्तुगीज अत्यंत धूर्त व करारी वृत्तीचे होते. कारण त्यांना मोगलसत्ता व मराठी सत्ता या सत्तांना कोकणातच थोपवून धरण्यासाठी सावंतवाडीकरांचा उपयोग करून घ्यावयाचा होता. व त्यामुळे त्यांनी सावंतवाडी राज्य संपुष्टात न आणता उलट त्यास वेळोवेळी प्रत्येक क्षेत्रामध्ये मदत करण्याचे धोरण अवलंबिले होते व वाडीकरांची सत्ता आपणास वरचढ होऊ नये याचीही त्यांनी दखल घेतली होती. पोर्तुगीजांच्या या धोरणामुळेच सावंतवाडीकरही आपले संस्थान अस्तित्वात ठेऊ शकले, नाही तर मराठ्यांनी केव्हाच ते गिळंकृत केले असते आणि सावंतांना आपल्या वर्चस्वाखाली आणले असते. थोडक्यात म्हणजे पोर्तुगीजांनी सावंतांना जरी अडचणीत मदत केली तरी त्यांच्याकडून बराच फायदा उठविला होता.

सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात संघर्ष :-

पोर्तुगीजांनी वेळोवेळी सावंतवाडीकरांना सहाय्यक केले होते. उदा. दुष्काळात सावंतवाडी राज्यातील जनता जगावी म्हणून पोर्तुगीजांनी ५०० पोती तांदूळ सावंतवाडीकरांना पाठविला होता. परंतु प्रत्यक्षात खेमसावंत इ.स. १७०३ च्या मध्यास पोर्तुगीजांवरच उलटला व त्यांच्या विरूध्द संघर्ष सुरू केला. कारण याचवेळी मराठे व मोगल यांच्यात संघर्ष चालू होता. त्यात सावंतांनी मोगलांना मदत करावी यासाठी पोर्तुगीजांनी त्यांचे मन वळविले परंतु मोगलांकडूनच आपले खच्चीकरण पोर्तुगीज केल्याशिवाय रहाणार नाही याची जाणीव झाल्यामुळेच सावंतवाडीकरांनी पडिल्यांदा फोंडयावर स्वारी करून तो किल्ला इ.स. १७०३ ताब्यात घेतला. व नंतर पोर्तुगीजांचे काही जहाजे तांदूळ घेऊन जात असतांना सावंतवाडीकरांनी लुटली. कारण त्यांचा दुष्काळ अजून संपला नव्हता. त्यामुळे सावंताने सर्व बाजूनी संघर्ष निर्माण केलेला आढळतो. मोगलांशी संघर्ष चालू असतांनाच त्यांचे मराठ्यांशी वाकडे होते आणि याचवेळी पोर्तुगीज सत्तेशीही त्यांनी संघर्ष सुरू केला होता[१३].

सावंतांच्या या सर्व शत्रूंनी सावंतांना शिक्षा करावयाचे ठरविले. १७०३ च्या शेवटी सोंधेचा राजा व पोर्तुगीज यांच्यात बोलणी झाली व ही बोलणी सावंतांच्या विरोधीच होती. इ.स. १७०४ च्या दरम्यान मोगलही सावंतांच्या विरूध्द संघर्ष सुरू करण्याच्या विचारात होते. त्यांना पोर्तुगीजांची फूस होती. इ.स. १७०५ च्या मे महिन्यात मोगलांनी लगेच सावंतांवर स्वारी केली व पोर्तुगीजांनी त्यांना सक्रीय मदतही दिली. या युध्दात खेमसावंतांचा पराभव झाला. पोर्तुगीज व्हाइसरॉयने स्वत: जातीने युध्दात भाग घेऊन फोंडयाचा किल्ला जिंकून तो मोगलांच्या ताब्यात दिला. याचवेळी पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांच्या अंबोनाच्या किल्ल्यावर स्वारी करून त्या किल्ल्याचा नाशही केला व त्या

किल्ल्याच्या आसपास असलेली जमीन त्यांनी मोगलांच्या ताब्यात दिली. त्यावेळी औरंगजेबाने पोर्तुगीज व्हाईसरॉयला पत्र पाठवून आभार मानले. कारण केवळ पोर्तुगीजांनीच हे सावंताविरूध्दचे युध्द जिंकले होते[१४].

जर पोर्तुगीजांनी मोगलांना मदत दिली नसती तर कदाचित सावंतवाडीकरांनी फोंड्याचा किल्ला घेतलाच असता आणि मागे पुढे पोर्तुगीजांनाही त्याचा उपसर्ग पोहचला असता, हा धूर्तपणा राखूनच पोर्तुगीजांनी मोगलांना विजयी करण्यासाठी स्वत: झळ खाल्ली व सावंतांचा पराभव केला. यावेळी सावंतांनी अजिबात विचार केलेला दिसत नाही. जर सावंतांनी मराठ्यांना शरण जाऊ त्यांच्याशी दिलजमाई केली असती आणि त्यांची मदत घेतली असती तर मात्र कदाचित घडलेल्या सर्व इतिहासाला वेगळेच वळण प्राप्त झाले असते. व पोर्तुगीज-मोगल या सत्तांचा पराभव होवून मराठेशाही व सावंतवाडीकर यांचा विजय निश्चीत झाला असता. आणि सर्वत्र मराठ्यांचे राज्याचा विस्तार झाला असता. परंतु सावंतांनाच मुळी मराठ्यांचे वर्चस्व नको होते. म्हणूनच त्यांनी मराठ्यांकडे मदतीची याचना केली नाही. जर मराठे विजयी झाले तर आपल्याला त्यांच्या वर्चस्वाखाली साधा सरदार म्हणून रहावे लागेल याची वाडीकरांना जाणीव होती. यावेळी पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना चांगले ओळखले होते, कारण सावंतवाडीकर हे मोगलांचे नोकर असुनही त्यांचे वर्चस्व झुगारून देऊन त्यांच्याशी संघर्षास उभे ठाकले. तेव्हा आपल्याविरूध्द वाडीकर संघर्ष करण्यास कधीच मागेपुढे पहाणार नाही म्हणूनच त्यांनी मोगलांकडून वाडीकरांचा निपात करण्याचा प्रयत्न केला.

पोर्तुगीज व सावंतवाडीकर यांच्यात सुरू झालेला संघर्ष आता वरील सत्तांमध्ये शेवटी तह होउन संपुष्टात आला. पोर्तुगीजांनी लादलेल्या सर्व अटी सावंतांनी मुकाट्याने मान्य केल्या. परंतु त्यातील ही काही अटींची पूर्तता करण्यास सावंतवाडीकर असमर्थ ठरले. सावंताने

पोर्तुगीजांचे जे लोक कैद केले होते त्यांची सुटका केली नाही. म्हणजेच सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांशी केलेला तह पायदळी तुडवला. तहातील सर्व कलमांचे तंतोतंत पालन करणे सावंतांना शक्य नव्हते. तहाचे उल्लंघन झाले व त्यांच्यात पुन्हा संघर्ष सुरू झाला. या नव्याने सुरू झालेल्या संघर्षास केवळ सावंतच जबाबदार होते असे नाही तर पोर्तुगीजांचीही त्यात चूक होती कारण पोर्तुगीजांनी जर तहातील अटी सौम्य प्रकारे वाडीकरांवर लादल्या असत्या तर उभयतांमध्ये सलोखा निर्माण झाला असता. परंतु वाडीकरांना संपुष्टात आणण्यासाठी पोर्तुगीजांनी अन्यायकारक अटी लादल्या त्यामुळे वाडीकरांनीही मुद्दामपणे त्या न पाळण्याचे धोरण अवलंबिले. संघर्षाच्या सुरवातीस पोर्तुगीजांनी बिखोलीम नांवाचा सावंतांचा किल्ला घेतला व तो पाडला. हा किल्ला संपूर्ण कोकणात वाडीकरांचा एकमेव किल्ला म्हणून मानला गेला होता. तो पोर्तुगीजांनी २४ तासातच जिंकला[१५]. त्यानंतर खोरजुवे पैनेले देखील पोर्तुगीजांनी सावंताकडून घेतले. खोरजुवे हे बेट तर सुरूवातीलाच औरंगजेबाने त्यांना दिले होते. पोर्तुगीजांनी सावंतांचे जे किल्ले घेतले होते ते सर्व किल्ले त्यांनी हेतु पुरस्कर जमीनदोस्त केले होते. कारण ते पुन्हा सावंतांना घेता न आले पाहिजे. सावंतवाडीकरांना पोर्तुगीजांनी अगदी जेरीस आणले होते पण खेमसावंताने मात्र पोर्तुगीजांशी खंबीरपणे लढा दिला व तो म्हणजे आपले राज्य किंवा संस्थान भविष्यकाळात अस्तित्वात रहावे याच हेतुने होय. वेळप्रसंगी त्याचे उलट, सुलट निर्णय घेण्यासही कमी केले नाही. उदा. खोरजुवे बेट पोर्तुगीजांना देण्यास त्याने स्पष्ट नकार दिला होता. खेमसावंत हा सावंत राजघराण्यात एक धाडसी, राजनितीज्ञ व कुशल संघटक असा राजा होऊन गेला. त्याने कुणाची पर्वाही केली नाही. मग ते पोर्तुगीज असो की मराठे असो किंवा मोगल असो. आपला स्वत:चाच निर्णय तो अमलात आणीत असे[१६].

सावंतवाडीकरांचे पारिपत्य करण्यासाठी पोर्तुगीजांनी वाटेल त्या मार्गाचा अवलंब केला व प्रत्येक सत्तेशी समन्वय साधला. या काळात या प्रदेशात असा एकही राजा किंवा सत्ताधारी शिल्लक राहिला नव्हता की, त्याच्यांशी पोर्तुगीजांनी संबंध साधून त्यांच्याकडून सावंतांबद्दल तक्रार केली नव्हत

आपली सत्ता टिकविण्यासाठी पोर्तुगीजांनी हवा त्या प्रकारचा अवलंब केला आणि गोवा परिसरात का होईना पण स्वत:ची सत्ता शेवटपर्यन्त टिकवून धरली. सावंतांच्या बाजूने आता कोणीच राहीले नव्हते. पोर्तुगीजांनी हिंदुराव घोरपडे आणि कृष्णाजी पंत यांना पत्र पाठवून खेमसावंताविरूध्द चिथवून देण्याचाही प्रयत्न केला होता. त्यावेळी ते राजीही झाले होते. सर्व सत्ताधीश आता पोर्तुगीजांचे मित्र आणि सावंतवाडीकरांचे शत्रू बनले होते. त्यामुळे सावंतवाडीकर हैराण झाले होते. सर्वबाजूंनी शत्रूचे हल्ले सुरू झाले व शेवटी सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांची माफी मागितली व माघार घेतली[१७].

सावंतवाडीकरांचे राजकीय डावपेच :-

पोर्तुगीजांनी सर्व सत्ता सावंतवाडीकरांविरूध्द उठविल्या होत्या. परंतु हिंदूराव घोरपडे यांनी मध्यस्थी करून उभयतांमधील संबंध पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न केले होते. खेमसावंताला देखील आपणास एखादा मित्र असावा असे वाटू लागले. व त्या दृष्टीने मध्यस्थी घालून पोर्तुगीजांशी संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू केले. परंतु पोर्तुगीज उलट, सुलट बोलू लागले. या अगोदर सावंतवाडीकरांच्या राज्याचा "बफर स्टेट" म्हणून उपयोग करून घेत होते, व आता सावंतांचे राज्य आता नामशेष करण्याची ते भाषा करू लागले. तेव्हा सावंताना क्षमा करणे दूरच राहिले. अशावेळी खेमसावंतही भयंकर संतापला की, आपण पोर्तुगीजांशी संबंध सुधारण्यास तयार असताना सुध्दा ते आपल्या नाशाचीच भाषा करतात. यावेळी म्हणजे १७०६ मध्ये खेमसावंत डावपेच खेळू लागला व आपले पाणी पोर्तुगीजांना खोलवर दाखविण्याचा प्रयत्न केला[१८].

खेमसावंताने ताराबाईची भेट घेऊन तिच्याशी बोलणी केली आणि राणीच्या संमतीने काही सैन्य सावंतवाडीकरांच्या मदतीला जांबावली येथे आले. परंतु असे उलटे कसे काय घडले याचा पेच पोर्तुगीज व्हाईसरायपुढे

निर्माण झाला. कारण खेमसावंताला मित्र कोणीच शिल्लक नव्हता, राणीयाडी तो शत्रूच होता. त्याचा नि:पात करावयाचा असेच सर्वांनी ठरविले होते. मग राणीने त्यास कुठल्या आधारावर मदत देऊ केली असेल, याचे पोर्तुगीजांना कोडे पडले. शेवटी पोर्तुगीजांनी हिंदुराव घोरपडे यास पत्र पाठवून सावंतांची मदत बंद करावी असे सूचविले होते. परंतु आता सावंत अतिशय धूर्तपणाने वागू लागले. त्यांनी योग्य पवित्रा घेतला होता. त्यांनी वेगवेगळ्या प्रयत्नांनी ताराबाईला जवळ केले. तेथे त्यांनी मानापमानास स्थान न देता राणीची शेवटी मदत मिळविली व पोर्तुगीजांना शह देऊन सावंतांचा एखादा तरी पाठीराखा व मित्र आहे हे देखील त्यांना दाखवून दिले. यावरून सावंतही राजकीय डावपेच खेळण्यात कमी नव्हते असे वाटते[१९].

खेमसावंताची फोंड्यावर स्वारी - १७०६ :-

खेमसावंताने १७०६ च्या जानेवारीत फोंड्याच्या किल्ल्याला वेढा दिला. व मोगलांशी युध्द सुरू झाले होते. हे युध्द मोगलांशी नव्हते तर ते खरे पहाता पोर्तुगीजांशीच होते. कारण मोगलांना संपूर्ण मदत पोर्तुगीजांनीच केली. परंतु यावेळी खेमसावंतही कमी नव्हता त्याने बरोबर आपल्या सैन्यास कवायती देऊन फोंड्याच्या किल्ल्यास दिलेला वेढा न उठविता फोंडा आपल्या ताब्यात घेतला. सावंतवाडीकरांनी येथे खरे धैर्य व शौर्य दाखविले कारण पोर्तुगीज व मोगल या दोन्ही सत्तांचा पराभव एकावेळी करणे म्हणजे अशक्य होते. परंतु खेमसावंताने ते शक्य करून दाखविले. मोगलांच्या सैन्यातील एकीच्या अभावाचा फायदा खेमसावंताने घेतला व आपली बाजी मारली. यावेळी राम सावंत हा मोगलांना फितूर झाला होता. फोंड्याचा मोगलांचा गव्हर्नर सय्यद अली यास कोकण ताबडतोब सोडावे लागले. परंतु काही दिवसातच पोर्तुगीज, सोंदेचा राजा, मोगल या तिघांचे सैन्याने मिळून फोंड्यावर हल्ला केला व किल्ला सावंतांकडून सावंतांच्या शत्रूंनी शेवटी अटापिटा देऊन घेतला[२०].

परंतु यानंतर १७०७ मध्ये मोगल बादशहा औरंगजेब याचा मृत्यू झाला. यावेळी त्याच्या मुलांमध्ये गादीच्या वारसाहक्कासाठी वारसा युध्द सुरू झाले. त्यामुळे मोगल सरदार व सैन्यात गोंधळ निर्माण होऊन प्रत्येक सरदार स्वतंत्र होऊ पहात होता. उदा. फोंडयाशेजारी असलेला मीर्झा निझाम - उद्दीन याने तर फोंडा व त्याच्या आसपासची जमीन विकण्यासाठी पुढे आणली होती. या सरदाराने खेमसावंताशी बोलणी सुरू केली होती. त्यानुसार निजाम-उद्दीन व सावंताचे सैन्य एकत्र येऊन पोर्तुगीज-सोदेंच्या राजाच्या सैन्याविरुध्द फोंडयावर हल्ला केला. परंतु या युध्दात मात्र खेमसावंताचा पराभव झाला. याचे कारण मोगल सरदाराने पोर्तुगीजांना आतुन मदत केली असावी. पुढे १७०७ ते १७०९ याकाळात सोंधेच्या राजाबरोबर पोर्तुगीजांनी बोलणी सुरू केली पण त्यातही त्यांनी स्वार्थच साधण्याचा प्रयत्न केला. याच काळात खेमसावंत गप्प न बसता त्याने सिवेश्वर येथील जासुद यास ठार मारले व दोन पोर्तुगीज जखमी केले. ही लढाई म्हणजे खेमसावंताच्या आयुष्यातील शेवटची लढाई होती. तो याच काळात मरण पावला. खेमसावंतासारख्या एका लहान भारतीय संस्थानिकाने पोर्तुगीज सत्तेला तोंड दिले व तेही यशस्वीरित्या, त्यामुळे खेमसावंताचे कौतुक करावेसे वाटते[२१].

खेमसावंत निवर्तण्यापूर्वी १७०८ मध्ये जानेवारीत, "कायतानु द मेलु द काश्यू" हा व्हाईसरॉय जाऊन नवीन" दो सद्रिगु द कोश्त" हा व्हाईसरॉय गोव्यात आला होता. ही संधी पाहून खेमसावंताने पोर्तुगीजांशी मैत्री साधण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार त्यांच्यात करार झाला. परंतु या कराराला सोंधेच्या राजाचा सल्ला पोर्तुगीजांनी घेतला होता. याचवेळी सावंतांनी सोंधेच्या राजावर २००० पायदळ, १५० घोडदळ व ८०० नावीकदल सैन्य घेऊन फोंडयावर स्वारी केली. परंतु पुढे खेमसावंत निवर्तल्यावर फोंडसावंत सावंतवाडीच्या गादीवर आला आणि १७१२ मध्ये त्याचे पोर्तुगीजांशी तह केला. फोंडसावंत मात्र इतका खेमसावंतासारखा धैर्यवान नव्हता. त्यामुळे

ह्या तहाने त्यांच्यावर अतिशय अन्याय केला होता. पण तहाच्या सर्व अटी त्याने मुकाट्याने मान्य केल्या. फोंडसावंत एवढा साहसीवृत्तीचा व तालेवार नव्हता. तहाचे पहिल्या कलमानुसार सोंदेच्या राजाची फोंडयावरील सत्ता मान्य करुन त्यांच्याबरोबर कुरापत काढु नये असे होते. हे कलम सावंतांनी असहयतेने मान्य केले. कारण फोंडा एकेकाळी आपल्या ताब्यात होता व आता तो एका क्षुल्लक राज्याच्या हाती द्यावयाचा हे वाडीकरांना पटत नव्हते. या कलमामुळे सोंदेचा राजा बेडर बनला व सावंताचे वजन आपोआपच कमी होत गेले[22]. सावंतवाडी राज्यात पोर्तुगीज व्यापारी जर व्यापारासाठी आले तर त्यांच्याशी सावंतांनी शत्रुत्व न करता त्यांच्यावर जादा कर लादू नये असे या करारात एक कलम होते त्यामुळे सावंतवाडी-सरकारचा परक्या व्यापाऱ्यांवर कर बसविण्याचा अधिकारच काढुन घेतला होता. याचा परिणाम सावंतवाडी राज्याच्या व्यापारावर होऊन आर्थिक परिस्थितीवर झाला आणि राज्याच्या तिजोरीतील पैसा वाढण्याऐवजी तो कमीच होऊ लागला. या नंतर पोर्तुगीजांच्या शत्रुस सावंतांनी आसरा देऊ नये असेही या तहात कलम होते. परंतु यामुळे सावंतवाडीकर पेचात पडले कारण पोर्तुगीजांचे शत्रु म्हणजे सावंतांचेही सर्व शत्रुच असतील असे नाही. म्हणून सावंतांना आपल्या मित्रराजांनाही मुकावे लागले. अरब व्यापाऱ्यांनाही या कलमामुळे सावंतवाडी राज्यात येण्यास आपोआप बंदी आली. त्यामुळे सावंतवाडी सरकारचे खुपच आर्थिक नुकसान झाले[23].

पोर्तुगीजांचा मराठ्यांना सावंतवाडीकरांविरोधी मदतीस नकार :-

सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात अनेक तह झाले होते. उदा. १७१२ तही पोर्तुगीजांनी सावंतांवर तह लादला होता. हा तह पाळणे सावंतवाडीकरांना शक्य नव्हते. म्हणून त्यांनी पोर्तुगीजांना प्रारंभापासूनच विरोध करण्यास सुरुवात केली. जे पोर्तुगीज गुलाम सावंतवाडी राज्यात पळून येऊ लागले त्या सर्व पोर्तुगीज गुलामांना वाडीकरांनी आसरा दिला. त्यामुळे पोर्तुगीज सावंतांवर चिडले. याच दरम्यान १७१६ त सावंत व

मराठे यांचे संबंध बिघडले होते. तेव्हा पोर्तुगीज व संभाजी यांनी मार्च १७१६ ला सावंतवाडीकरांविरूध्द तह केला. या तहाने पोर्तुगीज स-ता मराठ्यांना सावंतांविरूध्द मदत करील असे ठरविण्यात आले होते. इ.स. १७१७ च्या जानेवारीत संभाजीचा सावंतांवर स्वारी करण्याचा बेत झाला. यावेळी पोर्तुगीजांनी मदत देण्यास होकार दिला. परंतु दुस-या बाजूने पोर्तुगीजांना मदत करावीशी वाटत नव्हते. कारण सावंतांना जर मराठ्यांनी गिळंकृत केले तर ते गोवा घेतल्यावाचूनच राहाणार नाही. तेव्हा मराठ्यांना मदत देणे म्हणजे स्वत:च्या राज्यावर स्वत:च संकट आणणे हे पोर्तुगीजांच्या लक्षात आले होते. याचवेळेला मराठा सरदार रामराव याने पोर्तुगीजांच्या प्रदेशात शिरून लुटालुट केली व हे कारण पुढे करून पोर्तुगीजांनी मराठ्यांना मदत देण्यास नकार दिला[२४].

आपण जर मराठ्यांना सावंतांविरूध्द मदत केली तर आपला नाश आपणच ओढवून घेतल्यासारखे होईल असे पोर्तुगीजांना वाटू लागले. पोर्तुगीजांनी लुटीची भरपाई मागितली संभाजीही भरपाई देण्यास नाखूष होता. त्यामुळे सावंतांविरूध्द मराठ्यांना पोर्तुगीजांची मदत न मिळाल्याने मराठे व पोर्तुगीज यांच्यात वितुष्ट आले[२५].

पोर्तुगीजांची सावंतवाडीकरांना मराठ्यांविरूध्द मदत :-

इ.स. १७१८ मध्ये सावंतवाडीकर व मराठे यांचे संबंध बिघडलेले होते. म्हणूनच त्याचा फायदा फोंडसावंताने उठविण्याचे ठरवून त्याने पोर्तुगीज व्हाइसरॉय "काऊंट लुईस गोसाल्वीज दे मिनेझिस" यास पत्र पाठवून मराठे व आंग्रे यांच्या विरूध्द लढण्यासाठी दारूगोळ्याची मदत मागितली. सावंतवाडीकरांना मदत करण्याची पोर्तुगीजांनाही संधी आल्यामुळे त्यांनी लगेच २० पिपे दारू फोंडसावंताच्या मदतीस तातडीने पाठवून दिली. परंतु सावंतवाडीकरांना मदत करण्याच्या पाठीमागे पोर्तुगीजांचा फार मोठा लाभ होता. तो म्हणजे सावंतवाडीकर

व मराठे यांच्यात परस्पर संघर्ष होऊन मराठ्यांचा अप्रत्यक्ष पराभव होईल व पुढील काळात आपल्या राज्यावर येणारे मराठ्यांचे संकट टळेल. यासाठीच त्यांनी वाडीकरांना मदत देऊ केली. यावेळी पोर्तुगीज व्हाईसरायने सावंतवाडीकरांना कळविले होते की " आम्ही गैरसावध राहू नये म्हणून मराठे व आंग्रे यांच्या हालचालींच्या बातम्या मिळवून आम्हाला वेळोवेळी पाठवाव्या" म्हणजे वाडीकरांना मदत देऊन पोर्तुगीजांनी त्यांच्याकडून पुरेपूर फायदा उठविला.

वाडीकरांना २० पिपे दारूची मदत करून पोर्तुगीज थांबले नाही तर इ.स. १७२० मध्ये गाजीबेग या मोगल सरदाराने काही मोगल सरदारांशी संगनमत करून त्यांनी सौंदाच्या राजावर स्वारी केली. त्यानंतर वाडीकरांवर हल्ले होऊन ते वाडीकरांच्या प्रदेशात घुसण्याच्या बेतात होते[२६]. परंतु यावेळी पोर्तुगीजांनी त्वरीत वाडीकरांना तसा इशारा देऊन सावध केले होते. एवढेच नव्हे तर सरहद्दीवर बंदोबस्त ठेवावा त्यामुळे मराठ्यांना वचक बसेल असेही वाडीकरांना कळविले होते.

सावंतवाडीकर व मराठ्यांचा समझोता :-

इ.स. १७२० मध्ये सावंतवाडीकर व मराठे यांच्यात समझौता झाला व ही बातमी बाळभट बाके या वाडी राज्यात रहाणाऱ्या गृहस्थाने पोर्तुगीजांना कळविली[२७]. त्यामुळे पोर्तुगीजांची तळपायाची आग मस्तकात गेली. उभयतांमध्ये झालेल्या समझोत्यानुसार मराठ्यांकडून जे शाहू महाराजांकडून सावंतवाडीकरांना सवलतीही मिळाल्या. त्यांच्या एकीनंतर शाहूच्या सैन्याच्या हालचाली सुरू झाल्या आणि त्यामुळे पोर्तुगीजही भयभीत झाले कारण सावंतवाडीकर व मराठे एकत्र आले तर आपले राज्य अल्पावधीतच संपुष्टात येईल याचीही त्यांना जाणीव होती.

सावंतवाडीकरांचा पोर्तुगीजांना उपदेश :-

मार्च १७२० मध्ये फोंडसावंताने पोर्तुगीज व्हाईसरॉय "काऊंट" लुईज गोसाल्वीज द मिनेझिस" यास पत्र पाठवून त्यात उपदेश केला, की, आपण सोंदेच्या ~~सजाची~~ राजाशी समजौता करावा, शेजारच्या राजाराजांमध्ये सलोखा असावा, आपापसात शेजाऱ्यांशी भांडणे करू नये. यावेळी पोर्तुगिझांनीही सावंतवाडीकरांना इशारा दिला की, फोंड्यावर चालून आलेल्या मराठ्यांनी वाडीच्या राज्यात शिरू नये म्हणून तुम्ही काळजी घेतली पाहिजे.

याचवेळी सावंतवाडीकरांनी मराठ्यांबरोबर सलोखा साधला होता. त्याचे पोर्तुगीजांना दुःख झाले होते. परंतु वाडीकरांनी त्याची तमा न बाळगता मराठ्यांप्रमाणेच पुन्हा पोर्तुगीजांबरोबरही संबंध प्रस्थापित करण्यासाठी त्यांना उपदेशपर व हिताचे पत्र लिहिले. वाडीकरांनी नेहमीच मराठे, आंग्रे, मोगल यांच्याबरोबर संघर्षात गुंतून रहावे असे पोर्तुगीजांना वाटत होते. परंतु वाडीकर मात्र पोर्तुगीजांसह सर्वांशी संबंध सलोख्याचे ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. त्यामुळे खोटा मुखवटा धारण करून का होईना परंतु पोर्तुगीजहि वाडीकरांना सदिच्छा देऊ लागले. उदा. "वाडीकरांना त्यांच्या आंग्रे या शत्रूविरुध्द यश मिळावे अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे" अशी सदिच्छा पोर्तुगीज व्हाईसरॉयने प्रगट केली होती[२८].

२९ मार्च १७२० ला मराठे फोंड्यावर चालून येत असल्याचा इशारा पोर्तुगीज व्हाईसरॉयने वाडीकरांना दिला व मराठे ज्या घाटातून खाली उतरणार होते, त्या घाटात कडक बंदोबस्त ठेवण्याचा सल्लाही त्यांनी वाडीकरांना दिला. सावंतांना पोर्तुगीजांनी दिलेला इशारा म्हणजे फक्त स्वार्थासाठीच होता. कारण मराठ्यांना फोंडा ताब्यात घेऊन त्यानंतर पोर्तुगीजांच्या ताब्यातील प्रदेशही गिळंकृत करावयाचा होता. त्यामुळे पोर्तुगीजांच्या राज्याला मोठा धोका निर्माण झाला होता.

म्हणूनच वाडीकरांना पोर्तुगीजांनी घाटात बंदोबस्ताचा इशारा दिला होता. सावंतवाडीकरांनी मराठ्यांना थोपविले की, आपल्या राज्याला इजा पोहचणार नाही, अशी पोर्तुगीजांची धारणा होती. परंतु त्यात वाडीकरांचे नुकसान होईल याचा मात्र यंतकिंचीतही त्यांनी विचार केला नाही[२९].

<u>सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात वितुष्ट :-</u>

इ. स. १७२१ मध्ये फोंडसावंत व पोर्तुगीज यांच्यात भांडण सुरू झाले[30]. याचे कारण काही पोर्तुगीज सैनिक सावंतवाडी राज्यात पळुन आले होते. या सर्व सैनिकांना वाडीकरांनी पोर्तुगीजांच्या ताब्यात द्यावे असे उभयतांमध्ये आलेल्या तहानुसार ठरले होते. त्यानुसार बार्देशच्या पोर्तुगीज सेनापतीने वाडीकरांकडे तशी मागणीही केली. परंतु यावेळी फोंडसावंताने या मागणीस नकार दिला. म्हणजे फोंडसावंताने तहातील कलमांचे उल्लंघन केले आणि त्यामुळेच वाडीकर व पोर्तुगीज यांच्यात कलह निर्माण झाला. यावेळी पोर्तुगीजांनी सैनिक परत न केल्यास त्याबद्दल योग्य ती अद्दल घडविली जाईल अशी सावंतवाडीकरांना धमकी दिली. परंतु वाडीकरांनी देखील पोर्तुगीजांच्या धमकीला भीक न घालता पोर्तुगीजांचे पळून आलेल्या सैनिकांना राजकीय आश्रय (Asylum) दिला. परिणामी उभय सत्तांमध्ये तेढ निर्माण झाले. पुढील काळात पोर्तुगीजांबरोबर आलेल्या तहाचे वाडीकरांनी कधीच काटेकोरपणे पालन केले नाही. कुठलीही सत्ता, राजा एकदा तह झाल्यावर त्याचा भंग करीत नाही. परंतु सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात जो तह होता, त्याचे पालन अतिशय अल्पकाळ होत असे. तह होऊन राज्यात एकदा शांतता पुस्थापित झाली की लगेच सावंतवाडीकर पोर्तुगीजांशी झालेल्या तहाचे उल्लंघन केल्याशिवाय रहात नव्हते. अशा तऱ्हेने उभयतांमध्ये जे जे तह झाले त्या सर्व तहांना वाडीकरांनी पायदळी तुडवले. त्यामुळे वाडीकरांच्या वागणूकीला बाधा आली होती.

वाडीकरांच्या या धोरणामुळे पोर्तुगीजांचा वाडीकरांवर कधीच विश्वास बसला नाही. वाडीकर विश्वास ठेवण्यात पात्र नाही असे स्पष्टपणे पोर्तुगीज म्हणत असत. वाडीकरांनी सर्वसामान्यपणे तहांचे पालन करण्याचेच धोरण आमलात आणावयास हवे होते, कारण इतर सत्तांचाही त्यांच्या बाबत पोर्तुगीजांप्रमाणेच दृष्टिकोन बनला होता.

सावंतवाडीकरांना मराठ्यांविरूध्द पोर्तुगीजांची मदत :-

वास्तविक पहाता यावेळी सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात कलह सुरू झालेला होता. परंतु पोर्तुगीजांनी हा कलह बाजूला ठेवून वाडीकरांच्या मदतीला धावले. वाडीकरांनी मराठ्यांचे वर्चस्व मानावे असे मराठ्यांचे मत होते तर वाडीकरांना त्यांचे स्वत:चे अस्तित्व पाहिजे होते, त्यामुळे वाडीकर व मराठे यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची वेळ आली. दरम्यान वाडीकर व पोर्तुगीज यांच्यात वितुष्ट निर्माण झालेले असतांना देखील दोघांचा समान शत्रू म्हणजे मराठे असल्याने एक होणे आवश्यक होते. नाहीतर मराठे वाडीच्या राज्यावर स्वारी, करून, वाडीकरांचा नि:पात करून लगेच बादेशात शिरून फोंडा ताब्यात घेण्याच्या विचारात होते. मराठ्यांना गोव्याच्या राज्यात जाण्यासाठी प्रवेशव्दार सावंतवाडी राज्यातूनच उघडावयाचे होते. कारण वाडीकर जिंकले म्हणजे पोर्तुगीजांचा पराभव अटळ होता आणि पोर्तुगीजांचा पराभव झाला की गोव्याचे राज्यही लगेच ताब्यात घेतले जाणार होते, असे स्वप्न मराठे पहात होते[३१].

त्यानुसार मराठ्यांनी इ.स. १७२४ च्या मे महिन्यात अगदी भर उन्हाळ्याच्या दिवसात सावंतवाडी राज्यावर स्वारी करून ते वाडीच्या प्रदेशात घुसले. या स्वारीची बातमी पोर्तुगीज सेनापतीने ताबडतोब (पत्र) पाठवून पोर्तुगीज व्हाईसरॉयला कळविली. त्यावेळी व्हाईसरॉयने

सेनापतीस तातडीचा संदेश पाठवून विनासायास सावंतवाडीकरांना मदत करण्याची सूचना केली. त्यानुसार मराठे व सावंतवाडीकर यांच्या संघर्षात पोर्तुगीज व्हाईसराय वाडीकरांच्या मदतीस धावून आला. शत्रूचा हेतू काय आहे, ही बातमी मिळविण्यासाठी पोर्तुगीजांनी काही हुशार हेर वाडीकर व मराठे यांच्यात चालू असलेल्या युध्दाच्या ठिकाणी पाठविले. मराठ्यांची सावंतवाडीवर स्वारी म्हणजे हे वाडीकरांवरील भयंकर संकट असल्यामुळे पोर्तुगीजांनी वाडीच्या राज्यातील वृध्द, अपंग, माणसे, गुरेढोरे, यांना त्यांच्या राज्यात येण्याची परवानगी दिली. मात्र वेश्या व कलावंतीणी यांना कुंभारजुवे बेटावर ठेवावे असा वाडीकरांना त्यांनी सल्ला दिला होता. वेश्या व कलावंतीणींना लांबवर ठेवण्याचे कारण म्हणजे युध्दकाळात त्यांनी हेरगिरी करण्याचा प्रयत्न करू नये. त्यानुसार वाडीकरांनी वेश्या व कलावंतीणी यांना दूरच ठेवले होते. सावंतवाडीकर धूर्त बनले होतेच, परंतु त्यांना पोर्तुगीजांची शिकवण व मदत मिळाली होती. त्यामुळेच त्यांना या गोष्टी करणे सोपे गेले[३२]. यावेळी जर पोर्तुगीजांनी वाडीकरांना उभय सल्ला दिला नसता व मदत केली नसती तर वेश्या व कलावंतीणी यांनी नक्कीच हेरगिरी केली असती व त्यात वाडीकरांचा तोटा झाला असता.

सावंतवाडीकर व मराठे यांच्या संघर्षात पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांना हवी ती मदत देऊ केली होती. परंतु ही मदत त्यांनी का दिली असावी याचा जर विचार केला तर असे कळते की त्यांच्या स्वार्थापोटीच वाडीकरांना त्यांनी मदत केली होती. एवढेच नव्हे तर पोर्तुगीजांनी वाडीवरील मराठ्यांच्या स्वारीचा मुख्य हेतूही ओळखला होता. व तो म्हणजे सावंतवाडीकरांच्या पाडावानंतर गोव्यावर स्वारी करून गोवा आपल्या ताब्यात घ्यावयाचा हा होय. याच भीतीपोटी त्यांना वाडीकरांनी सर्वतोपरी मदत दिली होती. यावेळी जर पोर्तुगीजांनी

जर सावंतवाडीकरांना मदत केली नसती तर सावंतांना जबर पराभव पत्करावा लागला असता आणि पोर्तुगीजांनाही लगेच युध्दाच्या खाईत पडावे लागले असते. वाडीकरांना स्वतंत्रपणे पोर्तुगीजांची मदत न घेता मराठ्यांशी लढणे कठीण होते, कारण वाडीकरांचे सैन्य मोजकेच होते. सैन्यात एकी नव्हती, कारण योग्य ते प्रशिक्षण त्यांना दिले जात नव्हते. वाडीकरांचे लष्करातील सैनिक शत्रूकडून लाच घेऊन गुप्त बातम्या पुरवित होते. त्यामुळेच त्यांनी पोर्तुगीजांची मदत घेतली होती. परंतु पोर्तुगीजांची राजनिती अत्यंत वाखाणण्याजोगी होती. त्यांनी वाडीकरांना मदत करून स्वत:वरील संकटही दूर केले व वाडीकरांवरही आपले वर्चस्व प्रस्थापित केले. यापुढे वाडीकरांना त्यांनी आपल्या वर्चस्वाखालील सरदाराप्रमाणेच वागणूक दिली. पोर्तुगीज अत्यंत धूर्त व स्वार्थी होते. त्यांनी सावंतवाडी राज्य हीच युध्दभूमि समजून तेथेच सर्व युध्दे लढविली होती. नुकसान मात्र वाडिकरांचे झाले व स्वत: पोर्तुगीज मात्र अगदी तळहाताच्या फोडाप्रमाणे राहिले[३३].

पोर्तुगीजांचा सावंतवाडी राज्यात हस्तक्षेप :-

इ.स. १७२६ मध्ये नागोबा सावंताने आपल्या बापाविरूध्द म्हणजे फोंडसावंताविरूध्द बंड पुकारून पोर्तुगीजांचा आश्रय घेतला. नागोबा सावंताने बंड केल्यामुळेच सावंतवाडी राज्यात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली. या परिस्थितीचा पोर्तुगीजांनी फायदा उठवून पोर्तुगीज व्हाईसरॉय "ज्यु आँव द सालदान्य द गाम" याने फोंडसावंताच्या अपरोक्षात नागोबा सावंतावर अन्यायकारक तह लादला. या तहानुसार नागोबा सावंत पोर्तुगीजांचा मांडलीक बनला आणि त्याची डिचोलीचा किल्ला, व खोरजुवे, पनाळे, समोरील शेत वगळून बाकीच्या प्रदेशावरील नागोबा सावंताची स-ता मान्य करण्यात आली[३४]. नागोबा सावंताने

आपल्या बापाविरूध्द बंड केल्यामुळे सावंतवाडीतील इतर वाडीकरांचे सरदार देखील फोंडसावंतास विरोध करू लागले. आणि परिणामी वाडीच्या राज्यात गोंधळात्मक परिस्थिती निर्माण झाली.

पोर्तुगीजांनी नागोबा सावंतावर लादलेला तह वाडीकरांना अत्यंत हानीकारक होता. तहातील पहिलेच कलम म्हणजे नागोबा सावंताला मांडलीक बनविण्यासंबंधी होते. पोर्तुगीजांनी जरी त्याला आश्रय दिला, सावंतवाडीवर त्याची स-ता मान्य केली, पण त्याचबरोबर त्याच्या राजकीय स्वातंत्र्याचा मात्र अस्त झाला याचा त्याने यत्किंचीतही विचार केला नाही. फक्त निमुटपणे स-तेसाठी पोर्तुगीजांचे मांडलीकत्व त्याने पत्करले होते.

नागोबासावंतावर आता पोर्तुगीजांनी समुद्रावर पोर्तुगीजांचे जहाजे लुटू नये असेही बंधन घातले. यापूर्वीचे वाडीतील राज्यकर्ते पोर्तुगीजांना कधीही न घाबरता समुद्रावर चाचेगीरी करीत असत. परंतु आता स-तेसाठी नागोबाला ते बंद करावे लागले व चाचेगीरीपासून मिळणा-या उत्पन्नालाही मुकावे लागले. त्यामुळे पोर्तुगीजांचे जहाजे आता वाडीसरकारच्या बंदरात मन मानेल तेव्हा मुक्त संचार करू लागले. परिणामी वाडीकरांना पूर्वी जो कर मिळत होता त्या कराचे उत्पन्नही घटले होते. परंतु यामुळे वाडीकर व पोर्तुगीज यांच्यातील व्यापारी संबंध पुस्थापित झाले होते.

नागोबाबरोबर झालेल्या तहानुसार यापुढे सावंतवाडीतील न्यायनिवाडा पोर्तुगीज करतील असे ठरले होते, म्हणजे सावंतवाडीकरांच्या न्याय स्वातंत्र्यावरही त्यांनी गदा आणली होती. सावंतवाडी राज्यातील नागरीकांमध्ये कलह झाल्यास किंवा तंटा झाल्यास त्याचा न्यायनिवाडा हा पोर्तुगीज कायद्यानुसार पोर्तुगीज सरकारच करील अशी कबुली नागोबा सावंताकडून घेतली होती. यापुढे सावंतवाडीकर आपल्या

राज्यातील नागरिकांचा तंटा देखील स्वतंत्रपणे मिटवू शकणार नव्हते. एवढेच नव्हे तर सावंतवाडी राज्यात गोव्यातून येणारे निग्रो लोकही वाडीकरांनी पोर्तुगीजांच्या ताब्यात देण्याचा हुकूम पोर्तुगीजांनी नागोबा सावंतास केला होता. त्यामुळे सावंतवाडीकर पोर्तुगीजांचे आता गुलामच बनले होते. कारण नागोबा सावंत हा स्वतंत्र विचारी नव्हता त्याला फक्त स-तेची हाव होती. त्यामुळेच त्याने स्वातंत्र्य नष्ट करणा-या तहावर सही केली होती.

सावंतवाडीराज्यातील कोणतीही जमीन पेरण्यास नागोबाने पोर्तुगीजांना परवानगी दिली होती. त्यामुळे पोर्तुगीज आता कोणत्याही शेताचा लाभ घेऊ शकत होते. त्यांना वाडीतील शेतकरी विरोधही करू शकत नव्हते, कारण सरकारनेच तसे करण्यास पोर्तुगीजांना परवानगी दिली होती. परंतु यामुळे पोर्तुगीजांचा अतिशय फायदा झाला व सावंतवाडी राज्यातील शेतक-यांची अतिशय कुचंबणा झाली व तोटाही झाला. या सर्व गोष्टी नागोबाने आपल्या बापाला स-तेवरून खाली खेचून स्वत: स-तेवर येण्यासाठीच मान्य केल्या होत्या. परंतु पुढे चालून पोर्तुगीजांनी पेरलेल्या जमीनी स्वत:च बळकावून घेतल्या. नागोबा सावंताने सर्व गोष्टी मान्य केल्यामुळेच त्याला वाडीचा स-ताधीश म्हणून पोर्तुगीजांनी मान्यता दिली व त्याचा संरक्षणाची हामी स्वत:कडे घेतली.

अशाप्रकारे पोर्तुगीजांनी नागोबा सावंतास हाताशी धरून फोंडसावंताची स-ता संपुष्टात आणण्याचा प्रयत्न केला. परंतु ख-याअर्थाने नागोबा सावंतानेच अशा कठोर तहाला विचार करून मान्यता द्यावयास नको होती. नागोबा सावंताने आपल्या बापाविरूध्द राज्यात बंड न करता बापालाच पूर्णपणे सहकार्य केले असते आणि मराठे व पोर्तुगीज यांच्याविरूध्द लढला असता तर त्यांनी नक्कीच त्यांना हैराण करून सोडले असते. परंतु त्याने भविष्यकालीन विचारच केला नाही. त्यामुळेच पोर्तुगीजांना वाडीच्या राज्यात हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली.

पोर्तुगीजांनी आपल्या स्वार्थासाठीच दोघा पिता-पुत्रांमध्ये भांडण सुरू करून दिले व त्यात आपला लाभ करून घेतला. नाहीतर पिता-पुत्रात इतके पराकोटीला जातील असे मतभेद नव्हते. पोर्तुगीजांनी नागोबा सावंतास वाडीचा अधिपती म्हणून मान्यता दिल्यावर फोंड सावंतही पोर्तुगीजांशी नवीन तह करण्यास राजी झाला. फोंडसावंताने लगेच पोर्तुगीजांनी नागोबासावंतावर लादलेल्या तहासही मान्यता दिली. व त्या तहानुसार पुन्हा नवीन आठ अटी फोंडसावंतावर लादल्या[३५]. व शेवटी पोर्तुगीजांनी असे दाखविले की, हा करार फोंडसावंताच्या विनंतीवरून करण्यात आला आहे. तेव्हा हा करार अभंग रहाण्याचे आश्वासन फोंडसावंताने द्यावे, त्यानुसार फोंडसावंताने तसे आश्वासनही दिले. या अगोदर फोंडसावंताने आपल्या पुत्राला विश्वासात घेऊन त्याचे मन वळविले असते व तहाला एकत्र येऊन विरोध केला असता तर त्याच दोघांचेही शौर्य व धैर्यही दिसून आले असते. परंतु फोंडसावंताने तसा प्रयत्न केला नाही. त्यामुळेच पोर्तुगीजांना वाटेल त्या अटी घालता आल्या. पोर्तुगीजांना फोंडसावंतापेक्षा नागोबासावंत वाडीचा अधिपती होणे फायद्याचे होते, कारण वाडीकरांवर पुन्हा कितीही अन्यायकारक तह लादता येईल, कोणताही प्रदेश घेऊन गोव्याच्या राज्याला जोडता येईल व कायमस्वरूपी वाडीकरांवर वर्चस्वही निर्माण करता येईल, असे पोर्तुगीजांना वाटत होते[३६].

पोर्तुगीजांनी फोंडसावंतावर लादलेल्या तहाने तो भयभीत झाला होता. कारण आता इच्छा नसतांना स्वत:च्या मुलास पोर्तुगीजांच्या दडपणामुळे ८०० आसुर्प्यांचे वेतन द्यावे लागत होते. वास्तविक मुलगाही फोंडसावंताचा, राज्यही त्याचे, परंतु तरी सुध्दा वरील रक्कम दरमहा खजिन्यातून केवळ पोर्तुगीजांच्या ढवळाढवळीमुळे द्यावी लागत होती आणि त्यामुळे राज्याचा खजिनाही रिकामा होऊ लागला होता. फोंडसावंत केवळ

घाबरला म्हणूनच त्याच्यावर तह लादला गेला. जर फोंडसावंताने पुन्हा पोर्तुगीजांच्या व नागोबाच्या विरूध्द युध्द पुकारून मराठयांची मदत मागितली असती तर त्याला ८०० आसुर्प्या देण्याचीही गरज नव्हती. परंतु केवळ भितीपोटी फोंडसावंत काहीच करू शकला नाही. एवढेच नव्हे तर त्याला आपली स-ता जाते की काय असेही वाटत होते. तरी सुध्दा त्याने आपल्या राज्यातील डिचोली जिल्हा पोर्तुगीजांना देऊन राज्याची सीमा कमी केली होती. फोंडसावंत व त्याचा पुत्र नागसावंत या दोघांमधील कलह मिटविण्यासाठी पोर्तुगीज व्हाईसरायची नेमणूक करण्यात आली. परंतु त्याने ती भांडणे मिटविण्याऐवजी त्यात तेल ओतून भांडण पेटवून दिले. त्याच्यापाठीमागे त्याचा फार मोठा स्वार्थी हेतू होता. व तो हेतू म्हणजे पिता-पुत्रात युध्द सुरू झाले की, लगेच सावंतवाडीचे संपूर्ण राज्यच आपल्या गोव्याच्या राज्यात विलीन करून टाकायचे. अशा रीतीने पोर्तुगीजांनी फोंडसावंताच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्यास सुरूवात केली. परंतु पोर्तुगीज सावंतवाडी राज्य कधीच गोव्याला जोडू शकले नाहीत पुढे इंग्रज, ते काम करण्यास यशस्वी झाले. पोर्तुगीजांनी प्रत्येक ठिकाणी हस्तक्षेप करण्याचे धोरण अवलंबिल्यामुळे आता फोंडसावंत जवळ जवळ सावंतवाडी राज्याचा नामधारी राजा झाला, असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही असे वाटते.

सावंतवाडी व गोवा यांच्या सीमेवर काही वेश्या व कलावंतीणी रहात होत्या. पोर्तुगीजांनी वेश्या व कलावंतीणी यांना दूर ठेवावे असे फोंडसावंतास कळविले होते. कारण पोर्तुगीज सैनिकांना गैरवर्तन लागू नये, गोवा राज्यातील नागरिकांनीही त्या मार्गाला जाऊ नये हे होते. त्याचबरोबर पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांच्या जहाजांना पोर्तुगीजांकडून परवाना घेतल्याशिवाय समुद्रावर फिरण्यासही बंदी केली. त्यामुळे सावंतवाडीकरांची चाचेगीरी देखील आपोआप बंद झाली.

पूर्वी पोर्तुगीजांना वाडीकरांच्या बंदरात येण्यासाठी त्यांची परवानगी घ्यावी लागे परंतु खेमसावंतानंतरचे राज्यकर्ते निष्क्रीय व अकार्यक्षम निघाल्यामुळे पोर्तुगीज वरचढ झाले. सावंतवाडीकरांचे हळू हळू पोर्तुगीज सर्व अधिकार काढून घेऊ लागले. फोंडसावंताला एवढाही त्रास झाला तरी पोर्तुगीजांना विरोध करण्यास त्यांचे धाडस होत नव्हते. त्यावरून फोंडसावंत किती धैर्यवान होता हे कळते[३७].

सावंतवाडीकरांना या तहानंतर इतर असलेले मित्रही गमवावे लागले. कारण पोर्तुगीजांनी त्यांच्यावर असे बंधनच घातले होते की, पोर्तुगीजांचे जे शत्रू असतील त्यांच्याशी सावंतवाडीकरांनी कोणत्याही प्रकारचे संबंध ठेऊ नयेत.यामुळे सावंतवाडीकरांना आपल्या मित्रांनाही तिलांजली द्यावी लागली. आता सावंतवाडीकरांना फक्त पोर्तुगीजांशीच दळणवळण करणे भाग होते. नाहीतर पुन्हा त्यांच्यावर पोर्तुगीजांचा रोष येण्यास विलंब लागणार नव्हता. परंतु पुढे पुढे पोर्तुगीजांनी लादलेल्या तहानुसार वागणे अगदी अशक्य होऊ लागले. आणि त्यामुळे शेवटी फोंडसावंताने गोव्यातून सावंतवाडी राज्यात पळून आलेल्या निग्रोंची विक्री करून तहाच्या कलमांचे उल्लंघन केले. कारण तहाचे उलंघन केल्याशिवाय फोंडसावंतास दुसरा पर्यायच उरला नव्हता[३८].

पोर्तुगीजांची नागोबा सावंतास चिथावणी :-

फोंडसावंताने तहाचे उलंघन केल्यामुळे पोर्तुगीज फोंडसावंतावर चिडले व पुन्हा एकदा त्यांनी १९ ऑगष्ट १७२६ ला नागोबासावंताला फोंडसावंताविरुध्द संघर्ष करण्यास चिथावणी दिली. त्यानुसार नागोबा सावंताने लगेच डिचोली येथील कोटातील घरे पाडण्यास सुरवात करून फोंडसावंताला त्रास देण्यास प्रारंभ केला. यावेळी हे कृत्य फोंडसावंताने पोर्तुगीजांना कळविले व त्यानुसार पोर्तुगीजांनी नागोबासावंतास पत्र पाठवून असे न करण्याचे सुचविले. परंतु हा पोर्तुगीजांचाच कट होता.

वरकरणी फोंडसावंतास सहानुभूती दाखवून आतून नागोबासावंतास चिथविले व उभय पिता-पुत्रामधील संघर्ष चालूच ठेऊन प्रदेशाची नासधूस करण्यासही नागसावंताला उत्तेजन दिले. नागोबासावंतांनी जे याचेळी ८०० आसुर्प्यां घेण्याचे नाकारून संपूर्ण डिचोली जिल्हाची किल्ल्यासह मागणी केली होती. जर फोंडसावंताने नागोबासावंताची वरील मागणी मान्य केली नाही; तर फोंडसावंताशी लढण्याचीही त्याने तयारी दर्शविली होती. त्यामुळेच फोंडसावंतास नागोबासावंताची भीती निर्माण झाली होती[३९].

फोंडसावंताचा पोर्तुगीज प्रदेशावर हल्ला :-

फोंडसावंतास पदोपदी पोर्तुगीजांनी कोंडीत पकडण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता. त्यामुळे फोंडसावंताच्या रागाला सीमा उरली नाही आणि म्हणूनच आता त्याने न घाबरता धाडसाने पोर्तुगीजांना विरोध करण्यास सुरूवात केली. पोर्तुगीजांनी त्याच्यावर लादलेल्या तहानुसार काही खंडणी लादली होती व त्यास मांडलीक बनविले होते. परंतु फोंडसावंताने लगेच मांडलीकत्वाचा करार धाब्यावर बसवला व पोर्तुगीज प्रदेशावर त्यांच्याविरूध्द हल्ले करण्यास सुरवात केली. पहिल्यांदा फोंडसावंताने आपले आरमार वाढवून चीनच्या नौकेवर व दमणच्या एका पालावर हल्ला केला व खंडणीस नकार दिला[४०]. परंतु फोंडसावंताचे सामर्थ्य पोर्तुगीजांपेक्षा अगदीच नगण्य असल्यामुळे त्याची बाजू लंगडी पडली. त्याच वेळी आंग्रेनीही फोंडसावंतावर आक्रमण करून दोन किल्ले घेतले. त्यामुळे फोंडसावंताची चोहोकडून कोंडी झाली. परिणामी पोर्तुगीजांना त्याचा पराभव करणे सोपे गेले.

या युध्दानंतर डिचोली येथील सावंतवाडीकरांचा किल्ला व कोट पाडून टाकावे असे पोर्तुगीजांनी ठरविले होते. कारण पुढे मागे

नागोबासावंत हा देखील बापाप्रमाणेच पोर्तुगीजांचा शत्रू झाल्याशिवाय रहाणार नाही, याची त्यांना खात्री होती. पोर्तुगीजांकडे दारुगोळ्याचा साठा भरपूर होता. त्यामुळेच फोंडसावंताचा पराभव झाला. यावेळी फोंडसावंताने जर इंग्रजांशी त्वरीत संधान साधून मदत घेतली असती तर पोर्तुगीजांना एक तर पराभव पत्करावा लागला असता किंवा मागे तरी फिरावे लागले असते. कारण इंग्रजांचे नाविकदल हे जगात अजिंक्य म्हणून नावाजलेले होते. परंतु फोंडसावंताने एवढीही सावधगिरी घेतली नव्हती.

या युध्दाचे परिणाम अतिशय वाईट झाले. फोंडसावंताने झुगारुन दिलेले पोर्तुगीजांचे मांडलीकत्वच पुन्हा एकदा मान्य केले. नागोबासावंत मात्र या युध्दामुळे उत्साही झाला होता. कारण त्याला डिचोली कोट व किल्ला मिळण्याची आशा होती. परंतु पोर्तुगीजांनी डिचोलीचा कोट व किल्ला नागोबासावंताला न देता पाडून टाकला. त्यामुळे त्याची महत्वाकांक्षा तशीच अपूर्ण राहिली. परंतु तरी देखील नागोबा सावंत मात्र आता काहीही हालचाल करू शकत नव्हता. कारण बापाविरूध्द कारवाया करून त्याने पोर्तुगीजांचा आश्रय घेतला होता. थोडक्यात म्हणजे नागसावंताची दोहोकडून कोंडी झाली होती. पोर्तुगीजांनी त्याला दूर केले तर फोंडसावंतही त्यास जवळ करण्यास तयार नव्हता[४१].

पोर्तुगीज व मराठ्यांच्या युध्दात सावंतवाडीकर तटस्थ :-

सावंतवाडीकरांचा पोर्तुगीजांनी पराभव केल्यानंतर पुढे मे १७३१ मध्ये पोर्तुगीज व मराठे यांच्यात युध्द सुरू झाले. या युध्दात मराठ्यांनी पोर्तुगीजांचा दणदणीत निर्णायक पराभव केला[४२]. या युध्दाच्या वेळी सावंतवाडीकर तटस्थ राहिले. कारण वाडीकरांचे पोर्तुगीजांशी नुकत्याच झालेल्या युध्दात अतोनात नुकसान झाले होते. त्याचबरोबर सावंतवाडीकरांचा दुसरा शत्रू आंग्रे कधी वाडीवर हल्ला करील याचा

नेमच नव्हता. त्यामुळे वाडीकरांना नेहमी तयारीत रहावे लागे. एक तर अगोदरच त्यांच्याकडे सैन्यबळ व आरमार कमी होते. परंतु तरी सुध्दा पोर्तुगीज-मराठे युध्दाच्यावेळी फोंडसावंताने संधी साधून व पोर्तुगीजांची अडचण हीच आमची संधी असे मानून जर गोव्यावर स्वारी केली असती तर अडचणीत सापडलेल्या पोर्तुगीजांचा त्याने नक्कीच पराभव केला असता. कारण पोर्तुगीजांना सावंतवाडीकरांकडे लक्ष देण्यास फुरसतच नव्हती. आणि एकदा का पोर्तुगीजांचा पराभव झाला असता तर पोर्तुगीज पुन्हा सैन्य उभारून वाडीकरांशी लढु शकले नसते, कारण अगोदरच मराठ्यांनी त्यांचे खच्चीकरण केले होते. परंतु फोंडसावंताने प्रसंगावधान राखले नाही. नाहीतर संपूर्ण गोव्याचे राज्य सावंतवाडीकर व मराठ्यांच्या ताब्यात आले असते. परंतु असे जरी घडले असते तरी शेवटी पोर्तुगीजांप्रमाणे मराठ्यांनी आपले वाडीकरांवर वर्चस्व निर्माण केले असते हे तितकेच निर्विवाद सत्य आहे. कारण मराठेही आपल्या राज्याच्या सीमा वाढवीत होते.

इ.स. १७२८ च्या शांततेच्या तहाची १७३८ मध्ये पुनरावृत्ती :-

फोंडसावंत भोसले व पोर्तुगीज यांच्यात इ.स. १७२८ मध्ये जो शांततेचा करार झाला होता. त्या कराराची इ.स. १७३८ मध्ये पुनरावृत्ती झाली. आणि पुन्हा त्याच कराराला पुस्ती जोडण्यात आली. त्यानुसार सावंतवाडीकरांकडे ११ वर्षांची जी बाकी होती, ती पोर्तुगीजांनी त्यांना माफ केली. परंतु दरवर्षी दोन अरबी घोडे द्यावे व ते द्यावयाचे नसतील तर त्याऐवजी प्रत्येक घोड्याच्या बदली ५०० आसुर्प्या नियमित देण्याचे वाडीकरांनी मान्य केले[४३]. म्हणजे दरवर्षी १००० आसुर्प्या सावंतवाडीकरांच्या तिजोरीतून, पोर्तुगीजांना जाऊन खजिना रिकामा होण्यास मदत होणार होती. एवढेच नव्हे तर या नवीन करारानुसार नागोबासावंताच्या गैरकृत्यांची जबाबदारीही

पोर्तुगीजांनी फोंडसावंतावरच टाकली. त्यामुळे फोंडसावंतात राज्यकारभार करणे कठीण झाले. कोणताही निर्णय घेतांना फोंडसावंतास पोर्तुगीजांना विचारावे लागत असे.

पोर्तुगीजांनी याच दरम्यान सावंतवाडीकर व सोंदेचा राजा यांच्यात भांडणे लावून दिली व त्यांना एकमेकांविरूध्द कायमचे लढण्यास प्रवृत्त केले. तर इकडे सिद्दी व मराठा यांच्यात वाद निर्माण करून लढा सुरू करून दिला. आणि पोर्तुगीजांनी मात्र नकळत आपला फायदा साधला. यावेळी फोंडसावंत पोर्तुगीजांच्या इतक्या कह्यात गेला होता की तो पोर्तुगीज व्हाइसरायला पाठविलेल्या पत्रात लिहितो की, " मी कुडाळ परगण्याचा व इतर प्रांताचा सरदेसाई फोंडसावंत भोसले आपणाला अनेक सलाम करीत आहे" यावरून असे दिसते की फोंडसावंत जणू काय पोर्तुगीजांचा गुलाम म्हणूनच काम करीत होता. पोर्तुगीजांनी पाठविलेल्या हुकूमाचेही फोंडसावंत काटेकोरपणे पालन करीत असे. फोंडसावंतास पोर्तुगीजांनी आपल्या हातातील कळसुत्री बाहुलेच बनविले होते. त्यास जिकडे फिरविले तिकडे जाण्यास फोंडसावंत तयार असे, कारण त्याच्याशिवाय त्यास गत्यंतर नव्हते. नाहीतर सावंतवाडीराज्यच धोक्यात येण्याची शक्यता होती. त्यामुळेच फोंडसावंत पोर्तुगीजांनाही कोणत्याही प्रकारचा कितीही जाचक अटी असलेला अन्यायकारक तह लादला तरी विनाविलंब मान्य करीत असे. अशारितीने पोर्तुगीजांनी फोंडसावंताचे सर्व अंतर्गत व बहिर्गत राज्यकारभारावर आपले नियंत्रण प्रस्थापित केले होते. नागोबा-सावंतालाही आता पोर्तुगीजांनी आपला स्वार्थ साधून घेतल्यानंतर दूर लोटले होते. त्याची मदतही बंद केली आणि त्याचा बंदोबस्त करण्याचे कामही फोंडसावंतावरच सोपविले. म्हणजे नागोबासावंताचा जोपर्यन्त फायदा उठवावया तोपर्यन्तच त्याला पोर्तुगीजांनी जवळ केले व तदनंतर त्याच्याशी असलेले संबंध तोडले.

पोर्तुगीजांची सावंतवाडीकरांकडे मदतीची याचना :-

इ.स. १७३७ मध्ये पोर्तुगीजांचे उत्तरेकडील प्रांतात मराठ्यांशी युध्द चालू होते. चिमणाजी अप्पा याने मराठे व इंग्रज यांच्यातील तहाचा भंग करून दगलबाजीने पोर्तुगीजांच्या प्रदेशावर आक्रमण केले होते[४४]. त्यामुळे पोर्तुगीज घाबरले व लगेच व्हाईसराय कौंट द सांदोनील याने आपले पसरलेले सर्व भागातून सैन्य गोळा करून मराठ्यांविरूध्द लढण्यास पाठविण्यास सुरवात केली. यावेळी सावंतवाडीकरांचा प्रधान श्री.पांडुरंग विश्राम शेणवी याजकडे पोर्तुगीज व्हाईसरायने पत्र पाठवून मराठ्यांशी लढण्यासाठी सैन्य पाठविणेस विनंती केली. पोर्तुगीजांवर हे अतिशय मोठे अरिष्ठ होते. त्यातून निभावण्यासाठीच त्यांनी सावंतवाडीकरांकडे लष्कराच्या मदतीची याचना केली होती. परंतु सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांना मराठ्यांविरूध्द मदत पाठविण्याचे नाकारले. यावेळी वाडीकरांना उत्तम संधी असतांनाही त्यांनी पोर्तुगीजांवर आक्रमण केले नाही. कारण यावेळी पोर्तुगीज अतिशय अडचणीत सापडले होते. त्याचा वाडीकरांनी फायदा उठवला असता तर नक्कीच पोर्तुगीज कोंडीत सापडले असते.

सावंतवाडीकरांची पोर्तुगीजांऐवजी मराठ्यांना मदत :-

पोर्तुगीज-मराठे युध्दात सावंतवाडी करांनी पोर्तुगीजांनी मदत मागितली असतांनाही त्यांना नकार दिला व मराठ्यांना (पेशवे) मदत करण्याचा निर्णय घेऊन शेवटी मराठ्यांना सक्रीय मदत देण्यास प्रारंभ केला[४५]. वाडीकरांनी मराठ्यांना मदत करण्याचा जो निर्णय घेतला होता तो अतिशय विचार करूनच घेतलेला होता असे वाटते. परंतु या पोर्तुगीज-मराठे युध्दात प्रत्यक्षात वाडीकरांचा मात्र काहीच फायदा झाला नाही. तर याउलट पोर्तुगीजांशी शत्रुत्व वाढत गेले. आणि त्यांच्याशी असलेले शांततेचे संबंध आता संघर्षाचे बनले. सावंतवाडीकरांनी पोर्तुगीज सोडून मराठ्यांनाच मदत करण्याचे कारण म्हणजे पेशव्यांनी अनेक वेळा सावंत-वाडीकर व

करवीरकर यांची भांडणे मिटविण्यासाठी मध्यस्थी केली होती. त्याचप्रमाणे सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्या लढ्यातही मराठ्यांनी वाडीकरांना मदत केली होती केवळ मराठ्यांनी सावंतावर केलेल्या उपकारामुळेच त्यांनी त्याची जाण ठेवून मराठ्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला होता. आता वाडीकरांचे पोर्तुगीजांशी जरी संबंध बिघडले होते तरी पेशव्यांचा त्यांना भक्कम पाठिंबा मिळाला होता.

सावंतवाडीकरांशी पोर्तुगीजांचे मैत्रीसाठी प्रयत्न :-

पोर्तुगीज-मराठे संघर्षात वाडीकरांनी जरी मराठ्यांना मदत केली होती. तरी पुढील काळात पोर्तुगीजांनी वाडीकरांचे महत्व ओळखून त्यांच्याशी मैत्री प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. रामचंद्र सावंत व जयराम सावंत हे वाडीचा कारभार पहात असतांना इ.स. १७३९ मध्ये त्यांनी पेशव्यांबद्दलचे आपले धोरणही बदलले होते[४६]. मराठ्यांना त्यांनी मदत देण्याचे बंद केले होते. उदा. व्यंकटराव घोरपडे या पेशव्यांच्या सरदारास साष्टी प्रांताच्या स्वारीत वाडीकरांनी मदत देण्यास नकार दिला. त्यामुळे वाडीकर व पेशवे यांचे संबंध दुरावले होते. या संधीचा फायदा घेऊन पोर्तुगीज व्हाईसरायने वाडीकरांना पत्र पाठवून त्यांनी घेतलेल्या निर्णयाचे स्वागत करून त्यांचे आभार मानले. वाडीकरांनी पेशव्यांना मदत नाकारली तेव्हा पोर्तुगीजांना अत्यानंद झाला होता. कारण जर यावेळी वाडीकरांनी पेशव्यांना मदत केली असती तर पोर्तुगीजांचा निश्चीतपणे धुव्वा उडाला असता. वाडीकरांशी पोर्तुगीजांचा मैत्री करण्यापाठीमागील उद्देश म्हणजे वाडीकरांची पेशव्याविरुध्द मदत मिळविणे हा होता. पोर्तुगीजांनी यावेळी विनाविलंब गोव्याचा सावंतवाडीतील वकील श्री. देवबा शेणवी यास सावंतवाडीकरांबरोबर बोलणी करण्यासाठी पाठविले, परंतु दुर्दैवाने

उभयतांमधील बोलणी फिस्कटली.

यानंतर पुण्यात सावंतवाडीकरांचा वकील नारबा सावंत याने पोर्तुगीजांशी बोलणी करण्याचे टाळले. कारण पोर्तुगीज वकील पुण्यास आल्यानंतर त्याने प्रथम नारबास भेटणे आवश्यक होते. असी नारबाची इच्छा होती. त्यामुळे परिणामी पोर्तुगीजांनी वाडीकरांच्या वकिलाने सहकार्य न केल्याची वाडीकरांकडे तक्रारही केली होती. नारबा सावंत खरोखर पोर्तुगीज वकिलास सहकार्य करीत नव्हता. उदा. पोर्तुगीज वकील नारबास भेटला तेव्हा नारबा त्यास म्हणाला की. "पोर्तुगीजांचे बोलणे खरे नाही, ते फसवे आहे, त्यांना वाटाघाटी चालू ठेवून वेळ काढावयाचा आहे आणि तेपोर्तुगालहून कुमक येण्याची वाट पहात आहेत" अशाप्रकारे नारबा बोलल्यामुळे पोर्तुगीज वकील नाराज होऊन त्याने वाडीकरांकडे तक्रार केली होती.

परंतु शेवटी फेब्रुवारी १७४० मध्ये राजश्री रामचंद्र सावंत व जयराम सावंत यांनी पोर्तुगीजांशी असलेला तंटा संपुष्टात आणण्यासाठी त्यांच्याशी जंजीरा येथे तह केला[४७]. या तहाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले होते. कारण या तहामुळे मराठयांना शह बसणार होता. हा तह वाडीकरांच्या जास्त फायद्याचा होता, असे दिसते उदा.पोर्तुगीज व बाजीराव पेशवे यांच्यात इंग्रजांच्या मध्यस्थीने तह झाला होता. परंतु या तहानुसार वाडीकरांच्या सल्ल्याशिवाय त्यांच्याशी दुसरा तह करू नये असे ठरले होते. म्हणजे या तहामुळे वाडीकरांना अतिशय महत्त्व प्राप्त झाले होते. त्याचप्रमाणे या तहानुसार सावंतवाडीकरांना दारूगोळ्याची गरज भासल्यास पोर्तुगीजांनी दारूगोळा योग्य त्या दरात द्यावा असे ठरले होते. त्यामुळे वाडीकरांना दारूगोळ्याची कमतरता भासणार नव्हती. पोर्तुगीजांनी वाडीकरांपुढे नमते घेण्याचे कारण म्हणजे त्यांना मराठी सत्तेविरुद्ध फळीच उभी करावयाची होती.

पोर्तुगीजांचा हलोर्ण किल्ल्यावर हल्ला-१७४६ :-

या अगोदर पोर्तुगीजांनी वाडीकरांशी मैत्रीसाठी प्रयत्न करून संबंध सलोख्याचे केले होते. परंतु इ.स. १७४३ मध्ये सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांची दोन गलबते लुटून कुरापत केली[४८]. व उभयंतामध्ये कलहास सुरवात झाली. ही गलबते लुटली तेव्हा ती कर्नाटकातील व्यापाऱ्यांची म्हणून पकडली असे वाडीकरांनी सांगितले. परंतु खरे पहाता सावंतवाडीकरांना ही गलबते पोर्तुगीजांची आहे असे माहीती होते, तरी जाणून बुजून त्यांनी ती लुटून फस्त केली. यावेळी हा गुन्हा खपविण्यासाठी जयराम सावंत व रामचंद्र सावंत यांनी लगेच पोर्तुगीजांशी मैत्री वृध्दिंगत करण्याचे मत प्रदर्शित केले. परंतु पोर्तुगीजांनी तसे करण्यास विरोध दर्शविला. साताऱ्याच्या शाहुमहाराजांनी स्वत: वाडीकर व पोर्तुगीज यांच्यात मैत्री घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परंतु तरीही उपयोग झाला नाही. तर दिवसेंदिवस वाडीकर व पोर्तुगीज यांच्यात तेढ वाढत गेले. शेवटी उभयंतामधील संबंध इतके तणावाचे झाले की त्यांचे पर्यवसन युध्दात झाले. सावंतवाडीकरांच्या विरुध्द पोर्तुगीजांनी सोंदेकरांचे सहाय्य घेऊन ५ मे १७४६ रोजी प्रारंभी वाडीकरांच्या हलोर्ण किल्ल्यावर हल्ला केला[४९]. या हल्ल्यात वाडीकरांचा पराभव होऊन किल्ला पोर्तुगीजांनी हस्तगत केला. वाडीकरांचा हलोर्ण किल्ल्याचा किल्लेदार गोमा सावंत याने या लढाईत मोठा पराक्रम दाखविला. यानंतर पोर्तुगीज सैन्य हलोर्णकडून डिचोलीच्या किल्ल्याकडे जात आहे हे पाहून वाडीकरांनी त्या किल्ल्याची मोडतोड केली व डिचोली जाळून तेथून पळ काढला. परंतु पोर्तुगीजांनी याचवेळी डिचोलीचा किल्लाही ताब्यात घेतला. वरिल लढाईत वाडीकरांची फार मोठी हानी झाली होती. त्यामुळेच त्यांनी त्वरीत पोर्तुगीजांबरोबर तह करण्याची इच्छा व्यक्त केली होती. परंतु पोर्तुगीजांना वाडीकरांशी तह करावयाचा नसल्यामुळे त्यांनी नकार दिला.



-तेरेखोल किल्ला-

पोर्तुगीजांचा तेरेखोलवर हल्ला :-

पोर्तुगीजांनी हलोर्ण, डिचोली येथील किल्ले घेतल्यानंतर लगेच तेरेखोलवर २३ नोव्हेंबर १७४६ रोजी तेरेखोलकडे आपला मोर्चा वळून तेरेखोलवर हल्ला चढवला. पोर्तुगीज जनरलने आपल्या आरमारानिशी तेरेखोलच्या कोटावर चढाई केली. व अल्पावधीतच तो कोट काबीजही केला. याप्रसंगी पोर्तुगीजांनी वाडीकरांचे आरमारातील गलबते पकडून ती लगेच नाहीशीही केली. यावेळी वाडीकरांच्या आरमारात १५ ते २० तोफा असलेले १० पाल, १७ गलबते, ३ बतेले, एक मचवा, चार पारंग इतके जहाजे व पुष्कळ होडयाही होत्या. अशारीतीने पोर्तुगीजांनी वाडीकरांचा प्रदेश हस्तगत करीत असतांनाच त्यांचे आरमारही संपुष्टात आणले.

पोर्तुगीजांनी रेड्डी किल्ला घेतला :-

सावंतवाडीकरांचे एका पाठोपाठ पोर्तुगीजांनी किल्ले घेण्याचा सपाटा लावला होता. तेरेखोल हस्तगत करताच ताबडतोब त्याच वर्षी डिसेंबरमध्ये पोर्तुगीजांनी रेड्डीच्या किल्ल्यावर हल्ला चढविला. आणि सावंतवाडीकरांच्या आरमाराचा व सैन्याचा निर्णायक पराभव ~~केला व~~ करून किल्ला आपल्या ताब्यात घेतला[५१]. पोर्तुगीजांनी यावेळी आपले धोरण फक्त येनकेनप्रकारे आपल्या राज्याच्या सीमा वाढवावयाच्या हेच अवलंबिले होते. त्यामुळे त्यांनी सावंतवाडीराज्याचा जो भाग किंवा प्रदेश हातात सापडेल तो घेण्यास सुरुवात केली होती व आतापर्यन्त बरेच किल्ले व प्रदेश सावंतांकडून हस्तगत केला होता. कारण सावंत हे पोर्तुगीजांपेक्षा दुबळे होते. यात शंका नाही. पोर्तुगीजांनी सावंतांच्या घेतलेल्या प्रदेशावर व किल्ल्यावर आपले अधिकारी नेमले होते.

सावंतवाडीकर व राणे यांच्या संघर्षात पोर्तुगीजांचा फायदा :-

सावंतवाडीकर व साखळीकर राणे यांच्यात फार दिवसापासून वितुष्ट होते. त्याचाही पोर्तुगीजांनी फायदा घेतला आणि राजांना आश्रय दिला. मणेरीकर,गावस, डिचोलीकर रघुनाथ प्रभू यांनाही याने जवळ केले. वरील सर्वांनी पोर्तुगीजांची स-ता मान्य केली व सावंतांविरुध्द पोर्तुगीजांना हवी ती मदत करीत होते. सावंतांच्या राज्याच्या सर्व बाजूंनी आता शत्रुच तयार झाले होते. सावंतांनी जर वरील सर्व देसायांना जवळ केले असते तर पोर्तुगीजांना सहज तोंड देता आले असते.

पेशव्यांच्या मध्यस्थीचा प्रयत्न :-

सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात मध्यस्थि करून त्यांचे कलह संपुष्टात आणण्याचा पेशव्यांनी प्रयत्न केला. परंतु पोर्तुगीजांनी सावंतांशी तह करण्यास साफ नकार दिला. व त्यामुळे पेशव्यांनी चिडून सदाशिवराव भाऊबरोबर सैन्याच्या तुकडया देऊन सावंतांच्या मदतीसाठी पाठविले होते. परंतु पावसाळा जवळ आल्याने सदाशिवरावभाऊ घाटाखाली न उतरता परत फिरला. तरी सुध्दा पोर्तुगीज व सोंदेचा राजा यांच्यात अतिशय भिती उत्पन्न झाली होती. सोंदेकरांचे सदाशिवराव भाऊची भेट घेऊन १ लाख रुपये देऊ केलेहोते. फक्त घाटाखाली उतरू नये या अटीवर, परंतु भाऊने ब-याच मागण्या केल्या. उदा.सावंताचे पोर्तुगीजांनी घेतलेले किल्ले परत करावे. सदाशिवराव माघारी न येता तसाच पुढे गेला असता तर पोर्तुगीजांचा धुव्वा उडवला असता. परंतु मराठ्यांच्या गुरांना चारा कोकणात कदाचित मिळाला नसता आणि इकडे मोगलांविरुध्द मराठ्यांना नेहमी सैन्य सज्य ठेवावे लागत होते. म्हणूनच परत आला होता. परंतु तेवढा धोका टळल्यामुळे पुढे पोर्तुगीज लगेच सावध व तयारीत राहू लागले[५२].

पोर्तुगीजांची निवतीवर धाड १७४८:-

इ.स. १७४६ मध्ये सदाशिवराव भाऊने केलेल्या नाटकास पोर्तुगीज तात्पुरते घाबरले होते. परंतु थोड्याच दिवसात त्यांनी पुन्हा सावंतवाडी राज्य जिंकण्याचा चंग बांधला. पेशव्यांनी दिलेल्या दुमास त्यांनी धाब्यावर बसविले आणि २ डिसेंबर १७४८ रोजी पोर्तुगीजांनी निवतीच्या किल्ल्यावर धाड घातली. किल्ल्यावर शत्रू चालून येणार असे सावंतवाडीकरांना माहिती नव्हते नाहीतर त्यांनी पूर्वतयारी केलीच असती. परंतु सावंताचे हेरखाते परिश्रमी नव्हते. सावंतांच्या हलगर्जीपणामुळे पोर्तुगीज निवतीचा किल्ला घेऊ शकले. पोर्तुगीजांचा मुसलमान कॅप्टन इस्लामखान याने सावंतांच्या सैन्याचा दणदणीत पराभव केला व निवतीच्या किल्ल्यावर पोर्तुगीज निशाण फडकविले. हा मुसलमान सरदार पूर्वी सावंतांच्या सैन्यात नोकरीला होता. त्यामुळे त्याला सावंतांबद्दल पूर्णपणे माहिती होती यात शंका नाही. जर सावंतांनी या मुसलमान सरदारास पुन्हा विश्वासात घेतले असते व त्यास लगेच लाच देऊन उलट पोर्तुगीजांवरच अचानक हल्ले चढविता आले असते व निवतीचा किल्लाही पूर्ववत त्यांच्याच ताब्यात राहिला असता[५३].

पोर्तुगीजांनी निवतीचा किल्ला घेतल्यानंतर ते वेंगुर्ल्याकडे वळले. त्यांना वेंगुर्ल्याचा कोट ही घ्यावयाचा होता व तेथून सावंतांचे उच्चाटन करावयाचे होते. परंतु त्या अगोदर सावंतांनी कोटाचा काही भाग पाडून टाकला. सावंतवाडीकर आता मात्र अतिशय घाबरले होते. परंतु त्यांनी घाबरटपणा दाखविला नाही. सावंतांचा सतत तीन वर्षे पोर्तुगीजांकडून पराभव होत आला याचे कारण सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्या सैन्यव्यवस्थेत फार मोठा फरक होता. तरी सुध्दा धैर्य खचू न देता सावंतांनी १७४६ ते १७४८ पर्यन्त पोर्तुगीजांशी संघर्ष सुरू ठेवला होता. सावंतवाडीकरांचे आरमार पोर्तुगीजांनी नष्ट केले होते.

एवढया अडचणीत असतांनाही सावंतांनी १७४८ च्या फेब्रुवारीत तुळोजी आंग्रेचा मुडागड घेतला व लगेच इ.स.१७४९ मध्ये तुळोजीचा मसुरेचा किल्लाही घेतला. आंग्रेने पोर्तुगीजांची मदत मागितली होती. परंतु पोर्तुगीजांनी त्यास मदत दिली नाही. कारण आंग्रेच्या आरमाराची त्यांना जास्त भीती वाटत होती[५४].

सावंतांचा रेड्डी किल्ला घेण्याचा अयशस्वी प्रयत्न :-

पोर्तुगीजांनी १७४६ मध्ये रेड्डी सावंतांच्या ताब्यातून जिंकून घेतला होता. तो परत घेण्यासाठी सावंत सतत धडपड करीत होते. १७४६ च्या जुलैत किल्ल्यातील शिपायांचा पोर्तुगीजांचा कॅप्टन रघुजी नाईक यास सावंतांनी फितूर केले. व तो किल्ला वाडीकरांच्या ताब्यात देण्याची वेळही ठरली. परंतु रेड्डीच्या रामा कामत या व्यापाऱ्याने गोव्यास जाऊन व्हाइसरॉयला सांगितले. त्याचप्रमाणे रेड्डी किल्ल्यातील पोक्या नाईक या पोर्तुगीज सैनिकानेही ही वार्ता पोर्तुगीज व्हाइसरायला कळविली. त्यामुळे वाडीकरांना रेड्डी घेण्यात यश मिळाले नाही. पुन्हा ऑगष्ट १७४७ मध्ये रेड्डीचा किल्ला घेण्याची शिकस्त केली पण वाडीकरांना पुन्हा अपयशच पत्करावे लागले. या किल्ल्याचे दुसरे नांव यशवंतगड आहे.

पोर्तुगीजांकडून तहाचे उलंघन :-

१७४८ मध्ये सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात महादजी शिन्दे यांच्या मध्यस्थीने तह झाला होता. या तहाची कलमे पोर्तुगीजांनी न पाळता पायदळी तुडवून सावंतांच्या प्रदेशात जाऊन लुटालूट केली. आणि १७४९ मध्ये पोर्तुगीजांनी वाडीकरांचे सर्व सागरी किल्लेही जिंकून घेतले. या वेळी सावंतांनी शांतता पाळली. परंतु पोर्तुगीज आता तहास नकार देऊ लागले. थोडयाच काळात पोर्तुगीजांनी सावंतांकडे काही अटी

आता सावंतांनी अमान्य केल्या. मेटाकूटीस आलेले सावंत पोर्तुगीजांनी घातलेल्या अटी अमान्य करतात, म्हणजे काही तरी गूढच होते. याचे कारण सावंतांना पेशव्यांची फूस असावी असे वाटते. कारण पेशव्यांच्या मनातही पोर्तुगीजांची जिरवावी असे होते. यामुळेच कदाचित सावंत एवढे धीट झाले असावे. परंतु इ.स. १७५२ त पोर्तुगीजांनी दक्षिण कोकणात अरोंदेची नदी व सदाशिवगडची नदी या दोन नद्यांमधील प्रदेशाचा ताबा घेऊन राज्यविस्तार करावा असे पोर्तुगीज व्हाइसराय मार्केज द तोव्हर याचे साम्राज्यवादी धोरण होते. त्याचबरोबर दिघी घाट रामघाट व हनुमानघाट घेण्याचाही त्यांचा विचार होता. परंतु १७५४ मध्ये पुन्हा पोर्तुगीजांचे मन पालटले व सावंतांशी मैत्री करण्याची त्यांची इच्छा बळावली. कारण सावंत आता अस्वलासारखे गरीब झाले होते. म्हणून २६ जुलै १७५९ रोजी पेशव्यांच्या मध्यस्थीने सावंत व पोर्तुगीज गव्हर्नर यांच्या तह झाला[५५]. या तहानुसार पेडणे, डिचोली, साखळी हे तीनही महाल सावंतवाडीकरांना खोतीने देण्यात आले. आपल्याच महालांचे उत्पन्न सावंतवाडीकरांना पोर्तुगीजांस द्यावे लागणार होते. यानंतर १७६१ मध्ये पुन्हा दुसरा तह पोर्तुगीजांनी सावंतांवर लादला. याचे कारण सावंतांनी खोती झुगारून देऊन वरील तीनही महाल आपल्या ताब्यात घेतले. म्हणजेच सावंतवाडीकर तहास कितपत महत्त्व देत असावे हे लक्षात येते. १७६१ च्या तहानुसार सावंतवाडीकर आता पोर्तुगीजांचे वर्चस्व मान्य करून राहू लागले. सावंतांचे स्वातंत्र्य आता जवळ जवळ नष्टच झाले होते[५६]. सावंतवाडीतील पोर्तुगीज अधिकारी (रोहणवाला) यांचा पगारही पोर्तुगीजांनी सावंतांवरच लादला होता. पोर्तुगीज फौजदारासही ४००० आसुर्फी द्यावा असे वाडीकरांना सांगण्यात आले होते. आता सावंतवाडीकरांना आर्थिक अडचण निर्माण झाली होती. नेमका या अडचणीच्या काळातच म्हणजे इ.स. १७६१ त खेमसावंत तिसरे

गादीवर आले होते. त्यांनाच या अडचणींना तोंड द्यावे लागले. वरील तहानुसार वाडीकर आता पोर्तुगीजांच्या जहाजांवर कर आकारू शकत नव्हते. त्यामुळे वाडीकरांचे उत्पन्न कमी झाले आणि पोर्तुगीज स्वत:चा माल सावंतवाडी राज्यात बिगर कराचा विकू लागले. परिणामी तुलनेने वाडीकरांचा माल तसाच पडून राहू लागला. कारण वाडीकरांचा माल पोर्तुगीज मालाशी स्पर्धा करू शकत नव्हता. त्यामुळे वाडीच्या राज्याची आर्थिक घडी विस्कटली होती[५७].

इ.स. १७६३ मध्ये पोर्तुगीजांनी फोंडयाचा किल्ल्यावर चढाई करण्याचे ठरविले होते. कारण त्यांना परिस्थितीही पूर्णपणे अनुकूल होती. उत्तरेत पानिपतच्या युध्दात मराठ्यांचा पराभव झाल्यामुळे त्यांचे खच्चीकरण झाले. या संधीचा फायदा घेऊन पोर्तुगीजांनी फोंडयावर चाल केली. यावेळी सावंतवाडीकरांकडे पोर्तुगीजांनी निसंकोचपणे मदत मागितली व त्यांनीही मदत दिली. एवढेच नव्हे तर पेशव्यांकडील गुप्त बातम्याही पोर्तुगीजांना त्यांनी वेळेवेळी पुरविल्या. यावेळी तर वाडीकरांनी पेशव्यांचा रोष पत्करून गोवेकरांना मदत केली. वास्तविक पहाता पेशव्यांनी वाडीकरांना वेळोवेळी मदत करूनही वाडीकरांनी पेशव्यांशी बेइमानी केली, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.


इ.स. १७६५ मध्ये इंग्रजांनी जलमार्गाने येऊन आपल्या आरमारानिशी त्यांनी अचानकपणे जंजी-यावर हल्ला करून किल्ल्याला वेढा दिला[५८]. इंग्रजांनी विनाविलंब सर्ज्याकोट हस्तगत केला, पोर्तुगीज या वेळी अतिशय मोठ्या संकटात सापडले होते. त्यांनी ताबडतोब सावंतवाडीकरांकडे मदतीची याचना केली. वास्तविक पहाता पोर्तुगीजांचे सैन्य आधुनिक पध्दतीचे होते आरमारही तसे सुसज्य होते मग वाडीकरांकडे मदत मागणीची आवश्यकता का भासली, याचा जर विचार केला तर असे दिसते इंग्रजांचे आरमार हे जगात अजिंक होते आणि त्यामुळेच पोर्तुगीजांना

वाडीकरांची मदत हवी असेल.

सावंतवाडीकरांना पोर्तुगीजांनी १७७२ पर्यन्त पूर्णपणे आपल्या वर्चस्वाखाली आणले होते. आणि वाडीकरांनीही पोर्तुगीजांची सत्ता मान्य केली होती. संपूर्ण वाडीच्या राज्यात मुक्त संचाराचे स्वातंत्र्य मिळाल्यामुळे आता पोर्तुगीज ख्रिस्ती धर्माचा प्रसारही जोमाने करू लागले होते. परंतु वाडीकरांना ते सहन न झाल्यामुळे त्यांनी यावर बंदी घातली. परंतु पोर्तुगीजांनी वाडीकरांना बंदी उठविण्यास भाग पाडले. ख्रिस्ती धर्माच्या प्रसारामुळे सावंतवाडी राज्यातील जनतेत पोर्तुगीजांविषयी व त्यांच्या धर्मप्रसार धोरणाविषयी घृणा निर्माण झाली. पोर्तुगीजांनी १३ जून १७७५ मध्ये वाडीकरांची इच्छा नसतानाही त्यांच्यावर तह लादला[५६] या तहाला त्यांची मान्यता घेतली व त्यानुसार ख्रिस्ती लोकांना सावंतवाडी राज्यात रहाण्याची व ख्रिस्ती धर्मप्रसार करण्याची परवानगी सावंतवाडीकरांकडून घेतली. या तहाच्या वेळी वाडीकरांची एकही सूचना गोवेकरांनी ऐकून घेतली नाही, तर उलट त्यांना पाहिजे तशा अटी वाडीकरांकडून मान्य करून घेतल्या. वाडीच्या संपूर्ण राज्याचा राजधर्म म्हणून ख्रिस्तीधर्म करण्याचा पोर्तुगीजांचा विचार होता असे दिसते. परंतु दुर्दैवाने त्यांना ते शक्य झाले नाही.

सावंतवाडीकर व पोर्तुगीज यांच्यात संघर्ष १७७९ :-

इ.स.१७७५ च्या तहानुसार सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांना मौजे असगांव देऊन पोर्तुगीज या गांवाचे स्वामी बनले होते. त्याचप्रमाणे वाडीकर पोर्तुगीजांच्या परवानगीशिवाय कोणत्याही सत्तेशी संबंध ठेऊ शकत नव्हते. परंतु सावंतवाडीकरांनी अल्पकाळातच वरिल तह पायदळी तुडवून ते समुद्रावर चाचेगीरी करू लागले. पोर्तुगीजांची मालवाहू व्यापारी जहाजेही वाडीकरांनी लुटण्यास मागेपुढे पाहिले नाही.



डिचोलीच्या किल्ल्यावर पोर्तुगेजांची स्वारी (स. १७७९)

(आर्किव्हू इस्तोरिकु उल्त्रामारीन. लिस्बन)

इ.स. १७७९ त पुन्हा वाडीकरांनी वाचेगीरी चालू ठेवून पोर्तुगीजांना शह दिला. या घटनेमुळे पोर्तुगीजांचा संताप अनावर झाला. त्यांनी लगेच विनाविलंब आपला सेनापती फेडरीक गिळेराम याच्याबरोबर सैन्य देऊन त्याला सावंतवाडीकरांच्या मुलूखावर स्वारी करण्यासाठी पाठविले. वाडीकरांनीही ताबडतोब आपले लष्कर जमा करून पोर्तुगीज सैन्यावर चाल केली. उभयतांच्या सैन्यात निकराची लढाई झाली. परंतु या लढाईत निर्णायक विजय कुणालाच मिळाला नाही[६०]. सावंतवाडीकर या युध्दात प्राणपणाने लढले त्यामुळेच ते पराभूत न होता पोर्तुगीजांच्या बरोबरीस राहिले. परिणामी वाडीकरांचे अप्रत्यक्ष वजनही वाढले कारण पोर्तुगीजांपुढे नेहमीच हार खाणारे वाडीकरांनी आता पोर्तुगीजांशी लढून युध्द अनिर्णीत ठेवण्यात यश मिळविले. या लढाईनंतर १७७९ मध्ये उभयंतात शांततेचा तह घडून आला.

पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांचे साखळी, पेणेरी, व शेवटी डिचोली हे प्रांत का घेतले याचे जर संशोधन केले तर असे दिसते, गोवेकरांच्या ताब्यात असलेले बारदेश व साष्टी ह्या महालांचा प्रदेश उघडा असल्यामुळे त्यावर शत्रूच्या कित्येकवेळा स्वाऱ्या झाल्या. सावंतवाडीकर व सोंदेकराचे राज्य सीमेजवळ असणे गोवेकरांना धोक्याचे वाटत नव्हते, परंतु हैदरने सोंदेकरांचे राज्य खालसा केले, त्याचबरोबर मराठ्यांचाही बारदेश, साष्टी, फोंडा या प्रदेशावर डोळा होता. त्याच बरोबर बारदेश महालाचे रक्षण करणारी उत्कृष्ट व नैसर्गिक सिमांत म्हणजे पेडणे महाल हा होता त्यामुळे तो महाल घेणे पोर्तुगीजांना आवश्यक होती[६१]. परिणामी पोर्तुगीजांना बारदेश व साष्टीच्या संरक्षणासाठी सावंतवाडीकराचे सर्व प्रांत घेणे आवश्यक होते त्यामुळेच पोर्तुगीजांनी हळू हळू एक एक परगणा गिळंकृत केला. यावेळी सावंतवाडीकर पेशव्यांच्या अंकीत वावरत असत. त्यांचे महाल घेण्याचे महाल घेण्याचे दुसरेही महत्वाचे कारण म्हणजे सावंतवाडीकरांना पेशव्यांच्या छत्राखालून काढून त्यांच्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित

करण्याचा पोर्तुगीजांचा हेतू होता. यादरम्यान पेशवे, इंग्रज, करवीरकर, हैदर यांची सर्वांचीच बारदेशवर स्वारी होण्याची भीती वाटत होती. पोर्तुगीजांना या सर्व सत्तांपेक्षा वाडीकरांचे राज्य त्यांच्या राज्याशेजारी असणे कधीही हितावह वाटत होते. कारण वाडीकर सर्व दृष्टिने दुर्बल बनले होते.

पोर्तुगीजांची डिचोलीवर स्वारी १७८१ :-

बारदेश व साष्टी या प्रदेशांना सावंतवाडीकरांची भिती नव्हती. परंतु हैदरने सोंदेकराचे राज्य खालसा केले व खोलगडच्या दक्षिणेकडील ठाणी हस्तगत केली. त्यामुळे पोर्तुगीजांच्या बारदेश, साष्टी व पर्यायाने संपूर्ण गोव्याच्या राज्याला धोका निर्माण झाला होता. त्यामुळे त्यांना वर निर्देशील्याप्रमाणे साखळी, मणेरी, पेडणे व डिचोली घेऊन बारदेश व साष्टीचे संरक्षण करणे आवश्यक होते. यावेळी पोर्तुगीजांना डिचोली घेण्याची संधीही आपोआप चालून आली होती. सावंतवाडीकरांनी कोल्हापूरकरांविरूध्द युध्द पुकारून रांगणा किल्ल्याला वेढा दिला होता. या युध्दात खेमसावंताच्या मागणीनुसार पोर्तुगीजांनी त्यास दारू गोळा पुरविला. खेमसावंत भोसलेस करवीरकरांशी सुरू असलेल्या लढायात गुंतलेला पाहून पोर्तुगीजांनी दिनांक २४ ऑगष्ट १७८१ रोजी ब्रिगादेस येरिकिस याच्या नेतृत्वाखाली डिचोलीजवळ मये येथे सैन्य पाठविले व २५ ऑगष्ट १७८१ या तारखेस पोर्तुगीजांनी मयेहून झपाट्याने डिचोलीला जाऊन तेथील किल्ल्याला वेढा दिला. सावंतवाडीकरांचा पोर्तुगीजांनी पराभव करून डिचोलीचा किल्ला हस्तगत केला. डिचोली किल्ल्याबरोबर संपूर्ण डिचोली प्रांतही पोर्तुगीजांनी वर्चस्वाखाली आणला. यानंतर पोर्तुगीजांनी साखळीस जाऊन, विठोबाच्या देवालयाभोवती असलेल्या कोटास वेढा दिला. जवळ जवळ एकूण चवदा तास तुंबळ युध्द झाले. परंतु शेवटी या युध्दात सावंतवाडीकरांचा पोर्तुगीजांनी निर्णायक पराभव केला.

पोर्तुगीजांनी त्वरीत साखळी परगणाही आपल्या ताब्यात घेतला. साखळी, डिचोली हे महाल घेतल्यानंतर पोर्तुगीजांनी एक जाहीरनामा काढून उभय महालातील लोकांना त्यांच्या चालीरिती व रिवाजाप्रमाणे वागण्यासाठी स्वातंत्र्य बहाल केले. कारण उभय महालातील बहुसंख्य लोक हे हिंदु होते. त्यांच्यावर ख्रिस्ती धर्म लादण्याची तेथील जनतेला भिती वाटत होती. त्यामुळेच पोर्तुगीजांनी जाहिरनामा काढुन तेथील जनतेला दिलासा दिला होता. थोडक्यात म्हणजे हिंदु जनतेला धर्मस्वातंत्र्य दिले होते. यानंतरच्या काळातही वाडीकरांचा बराच मोठा प्रदेश पोर्तुगीजांकडे गेल्यामुळे तो परत घेण्यासाठी पोर्तुगीजांशी दोन हात करण्याचा वाडीकरांनी पुन्हा निश्चय केला होता[६२].

सावंतवाडीकरांची पोर्तुगीजांना तहाची विनंती :-

बरेच दिवसापासून वाडीकरांचा पोर्तुगीजांशी कमी अधिक प्रमाणात संघर्ष चालुच होता. परंतु इ.स. १७८३ त पोर्तुगीज पेडणेचा शेष भागही घेण्याच्या मार्गावर होते. तेव्हा सावंतवाडीकरांनी शेष भाग घेऊ नये म्हणून पोर्तुगीजांना तह करण्यासाठी विनंती केली[६३]. त्यानुसार पोर्तुगीजांनी वाडीकरांच्या विनंतीला मान देऊन तहाची बोलणीही सुरू केली. पोर्तुगीजांना वाडीकरांची विनंती मान्य करणे आवश्यकच होते. कारण वाडीकरांना पेशव्यांकडून पोर्तुगीजांविरोधी हवी ती मदत मिळण्याची शक्यता होती. म्हणून वेळीच पोर्तुगीजांनी वाडीकरांशी तहाची बोलणी चालवली होती. शेवटी उभयतांमध्ये जून-जुलै १७८४ त तह घडून आला[६४]. या तहामुळे ब-याच दिवसापासून सुरू असलेला उभयतांमधील संघर्ष तात्पुरता का होईना पण संपुष्टात येऊन शांतता निर्माण झाली. या तहानुसार वाडीकरांचे घेतलेले किल्ले, परगणे प्रदेश वाडीकरांना परत न करता उलट पोर्तुगीजांनी जिंकलेला सर्व प्रदेश आपल्याच अंकीत ठेवून

वाडीकरांची त्यास मान्यता घेतली. वाडीकरांनी पोर्तुगीजांशी सुरू असलेला संघर्ष त्यांच्याशी तह न करता तसाच पुढे चालू ठेवून त्यात जर पेशव्यांची मदत घेतली असती तर कदाचित शेवटी शेवटी का होईना पण त्यांना यश मिळाले असते. कारण पोर्तुगीजही संघर्षाला कंटाळले होते. त्यांची शक्ती बरीच कमी झाली होती.

वाडीकर व पोर्तुगीज यांच्यात तह झाल्यानंतर पोर्तुगीज व्हाईसराय "दो फ्रेदरीक ग्रुल्येमीं द सौज" याने पोर्तुगालच्या राजाला १६ मार्च १७८५ त पत्रातून कळविले की "वाडीकरांचा पेशव्यांनी पक्ष घेतला आहे आणि टिपू सुलतानकडूनही आक्रमणाची भिती आहे त्यामुळे तूर्त पेडणे महालाचा संपूर्ण प्रदेश काबीज करण्याचे स्थगीत केले आहे[६५]. योग्य वेळी ते कार्य तडीस नेणार आहोत या मजकूरावरून असे कळते की पोर्तुगीजांनी वाडीकरांशी तह करून संघर्ष थांबविण्याचे कारण म्हणजे पेशव्यांनी वाडीकरांची बाजू घेतली त्यामुळे पोर्तुगीज भयभित झाले. पेशवे प्रमाणेच त्यांना टिपू सुलतानच्या आक्रमणाचीही मोठी धास्ती होती. जर पेडणे घेण्याच्या कामात आपण गुंतलो आणि इकडे टिपूने व पेशव्यांनी गोवे प्रांतावर स्वारी केली तर आपली कोंडी होईल आणि आपल्या पराभवही अटळ ठरले. असा पोर्तुगीजांनी विचार केल्यामुळेच त्यांनी पेडणे महाल घेण्याचे पुढे ढकलले. त्यामुळेच वाडीकरांनाही ब-याच दिवसांनी तात्पुरती का होईना परंतु शांतता लाभली.

सावंतवाडीकर - करवीरकर युध्दात पोर्तुगीजांची भूमिका :-

इ.स. १७८५ त वाडीकरांना राजेबहाद्दूर किताब व मोर्चेलाचा बहुमान मोगल बादशहाकडून मिळाला. तेव्हा हे करवीरकरांना अपमानास्पद वाटले. त्यामुळे करवीरकर व वाडीकर यांच्यात पूर्वीच तणाव निर्माण झाला होता. त्यात पुन्हा वरील भर पडली आणि

करवीरकरांनी वाडीकरांविरूध्द युध्द आरंभिले[६६]. यावेळी करवीरकर व वाडीकर दोघेही गोवेकरांची मदत मागू लागले. गोव्याच्या रक्षणासाठी सावंतवाडीकरांचे संरक्षण करणे पोर्तुगीजांना आगत्याचे वाटे. वाडीकरांचा पराभव होऊन जर त्यांचे राज्य करवीरकरांकडे गेले तर गोव्याला फार मोठा धोका आहे हे पोर्तुगीज सरकार विसरले नव्हते. परंतु संबंध पेडणे महाल या ना त्या कारणाने गोव्यास जोडण्याचे त्यांचे उद्दीष्ट होते. दरम्यान पोर्तुगीजांनी कोल्हापूरकरांकडे वाटाघाटीस तयार असल्याचे कळविले त्यामुळे सावंतवाडीकर जास्त घाबरले आणि पेडणे महालावर पाणी सोडण्यास तयार झाले. पोर्तुगीजांनी पुन्हा त्यांनी घेतलेल्या सर्व प्रदेशावरील वाडीकरांनी आपला हक्क सोडावा अशी अट घातली. वाडीकरांनी तीही अट नाईलाजाने मान्य केली. अशारितीने पोर्तुगीज व सावंतवाडीकर यांच्यात २९ जानेवारी १७८८ रोजी तह झाला. आणि त्यानुसार शेष भागाचा पोर्तुगीजांनी ताबा घेतला. अशारितीने सावंतवाडीकरांचा बराच प्रदेश पोर्तुगीजांनी गिळंकृत केला. आणि वाडीकरांना १७८९ मध्ये मांडलीकत्वही स्विकारण्यास त्यांनी भाग पाडले[६७].

यानंतर इ.स.१७८७ मध्ये पेशव्यांनी साखळी, डिचोली, पेडणे हे वाडीकरांचे महाल त्यांना परत करावे आणि त्यांच्याशी मैत्री जोडावी अशी पोर्तुगीज व्हाईसरायला विनंती केली[६८]. परंतु वाडीकरांचा जिंकून घेतलेला संपूर्ण प्रदेश पोर्तुगीजांनी कायमस्वरूपी गोव्याच्या राज्याला जोडला होता. पेशव्यांनी पोर्तुगीजांना केलेल्या विनंतीस उत्तर दिले की वाडीकरांचे डिचोली, साखळी, पेडणे हे प्रांत युध्दात जिंकून घेतलेले आहे. या युध्दाला स्वत: वाडीकरच जबाबदार होते. वाडीकरांशी आम्ही जे जे करार केले त्या सर्व करारांचे त्यांनी कधीच पालन केले नाही तर याउलट त्यांनी वारंवार करारांचा भंग केला. त्यामुळे त्यांना वठणीवर आणण्याकरिता वरील प्रांत खालसा करावे लागले. व आमच्या राज्याला जोडावे लागले. अशाप्रकारे पोर्तुगीज व्हाईसरायने पेशव्यांच्या विनंतीस उत्तर दिले. पेशव्यांना त्यांनी असे दाखवून दिले

की, वाडीकरांनीच आम्हाला त्रास दिला. व त्यामुळे युध्दात जिंकलेला प्रदेश आमच्या राज्याला जोडला हा प्रदेश वाडीकरांना यापुढे कधीही परत केला जाणार नाही असे त्यांनी पेशव्यांना कळविले.

सावंतवाडीकरांना पोर्तुगीजांचा खलिता १७८८ :-

पोर्तुगीज व्हाइसरायच्या सुचनेनुसार पोर्तुगीज वकिलाने जानेवारी १७८८ त सावंतवाडीकरांना खलिता पाठविला. त्यात म्हटले आहे की "सावंतवाडीकरांनी जर पोर्तुगीजांची कुरापत काढली किंवा पोर्तुगीज प्रदेशात लुटालूट, चाचेगीरी केली तर हा गुन्हा त्यांना आम्ही माफ करणार नाही तर त्याबद्दल वाडीकरांना जबर शिक्षा करू"[१९]. अशारीतीने पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांकडे खलिता पाठवून त्यांना भीती दाखविण्याचा प्रयत्न केला. ऐवढेच नव्हे तर सावंतवाडीकरांचे गेलेले प्रांत परत मिळविण्यासाठी पोर्तुगालच्या राजास पत्र पाठविण्यासाठी वाडीकरांनी पोर्तुगीज व्हाइसरायला विचारले असता त्याने तसे करण्यास नकार दिला. म्हणजे यावरून सावंतवाडीकरांवर पोर्तुगीजांचे पूर्णपणे वर्चस्व निर्माण झाले होते असे दिसते. आणि त्यामुळे वाडीकर स्वतंत्ररित्या वागू शकत नव्हते. पोर्तुगीज मार्गदर्शन करतील त्यानुसारच त्यांना वागावे लागत होते. कारण आता वाडीकरांच्या संरक्षणाची जबाबदारी देखील पोर्तुगीजांनीच घेतली होती. शत्रूविरोधी काही कारवाई करावयाची असेल तरी वाडीकरांना पोर्तुगीजांची पूर्वपरवानगी घ्यावी लागत असे.

पोर्तुगीजांचा सावंतवाडीकरांना उपदेश :-

इ. स. १७८८ मध्ये वाडीकरांनी टिपू सुलतानाला नजराणे व खलिते पाठविले, यावेळी वाडीकर व पोर्तुगीज यांचे संबंध इतके सलोख्याचे नव्हते.

वरील बातमी पोर्तुगीजांना कळताच त्यांची घाबरगुंडी उडाली. वाडीकर व टिपू हे कदाचित संयुक्त मोहीम गोव्यावर काढल्याशिवाय रहाणार नाही. असे पोर्तुगीजांचे मत झाले. त्यामुळे त्यांनी यासंदभात वाडीकरांनी तसे करू नये म्हणून उपदेश केला की " टिपूशी मैत्री करून वाडीकरांना टिपूचा काहीच उपयोग होणार नाही. टिपू सुलतान मैत्रीचा व तुम्हाला मदत पाठविण्याचा बहाणा करील व त्याचा बाप हैदरअली याने ज्याप्रमाणे छोटया संस्थानिकांना मदत करण्याचे ढोंग करून उलट त्यांनी राज्येच घशात घातली, त्याप्रमाणे टिपू सुलतान देखील वाडीकरांना मदतीचा बहाणा करून त्यांचे राज्यच घशात घातल्याशिवाय रहाणार नाही"[७०]. थोडक्यात म्हणजे टिपू सुलतान व सावंतवाडीकर यांचे सख्य होऊ नये म्हणून वाडीकरांना त्यापासून परावृत्त करण्याचा पोर्तुगीज प्रयत्न करीत होते. कारण जर टिपू व वाडीकर यांची युती झाली असती तर पोर्तुगीजांना अतिशय त्रासदायक ठरली असती.

इ.स. १७८५ पासूनच वाडीकर व कोल्हापूरकर यांचे संबंध तणावाचे होते. परंतु इ.स. १७८८ त करवीरकरांनी वाडीकरांच्या प्रदेशावर अचानक हल्ला करून दोडा खेडी काबीज केली. वाडीकरांनी त्वरीत पोर्तुगीजांकडे दारूगोळयाची मागणी केली. परंतु पोर्तुगीजांनी हालचाल न करता मदत देण्यास नकार दिला नाही व होकार देखील नाही. म्हणजेच वाडीकरांना येनकेन प्रकारे दुर्बल व कमकुवत कसे करता येईल हाच पोर्तुगीजांचा हेतू होता[७१]. यावेळी मदतीपूर्वी वाडीकरांना तह करणेस सांगितले तर ते लगेच तयार झाले. परंतु ख-या अर्थाने वाडीकरांनी घाबरणे इष्ट नव्हते कारण त्यांच्या विरूध्द पोर्तुगीज कोल्हापूरकरांना मदत करूच नव्हते. कारण दगडापेक्षा वीट मऊ अशी स्थिती निर्माण झाली होती. कोल्हापूरकर पोर्तुगीजांना धोकेदायक वाटत होते तेव्हा ते शेजारी येऊ नये अशीच पोर्तुगीजांची धारणा होती. परंतु वाडीकर इतके विचारी नव्हते त्यामुळे त्यांच्या ही गोष्ट कधीच ध्यानी आली नाही.

सावंतवाडीकर-करवीरकर युध्दात पोर्तुगीजांची वाडीकरांना मदत :-

करवीरकर मात्र वाडीकरांच्या मागे पूर्णपणे लागले होते. वाडीकरांचा नायनाट करण्यासाठी करवीरकरांनी पोर्तुगीजांकडे मदत मागितली तेव्हा पोर्तुगीजांनी नकार दिला. तेव्हा फेब्रुवारी १७८८ त करवीरकरांनी वाडीवर स्वारी केली. वाडीकर व करवीरकर यांच्यात सुरू झालेल्या युध्दात पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांची बाजू घेऊन त्यांना पूर्णपणे मदत देऊ केली. पोर्तुगीज आरमाराने करवीरकरांच्या आरमारावर हल्ला चढवून त्यांचा पराभव करून त्यांनी घेतलेल्या रेड्डीच्या किल्ला पुन्हा आपल्या ताब्यात घेतला. एवढेच नव्हे तर करवीरकरांनी घेतलेले निवती, वेंगुर्ला, ही दोन ठिकाणी पोर्तुगीजांनी त्यांना सोडण्यास भाग पाडले[७२]. पोर्तुगीजांनी यावेळी सावंतवाडीत आपले सैन्यही वाडीकरांच्या राजधानीच्या रक्षणासाठी ठेवले होते. कोल्हापूरकरांनी सैन्य मागे घेतल्याशिवाय पोर्तुगीजही आपले सैन्य वाडीतून मागे घेणार नाही असे पोर्तुगीजांनी पेशव्यांना पत्राने कळविले होते. यावेळी पोर्तुगीजांनी सावंतवाडीकर व करवीरकर यांच्यातील संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी व त्यांच्यातील सलोखा निर्माण करण्यासाठी पेशव्यांना मध्यस्थी करण्यासाठी विनंती केली. म्हणजे पोर्तुगीज करवीरकर व सावंतवाडीकर या दोन्ही सत्तांना आपल्या वर्चस्वाखाली कसे ठेवता येईल असा नियमितपणे प्रयत्न करीत होते. पोर्तुगीजांना करवीरकर मोठे होणे हानीकारक वाटत होते तर वाडीकर नष्ट होणे त्यांच्या अहिताचे होते. त्यामुळेच पोर्तुगीजांची वर्तणूक अशी दुटप्पी होती.

सावंतवाडीकर-पोर्तुगीज यांच्यात संघर्ष १७९३ :-

इ.स. १७९२ त पेशव्यांनी पोर्तुगीजांकडे सदाशिवगडाची मागणी केली ती सावंतवाडीकरांच्या सल्ल्यावरूनच होती. वाडीकरांना यावेळी पेशव्यांचा आधार मिळाल्यामुळे त्यांच्यात धैर्य निर्माण होऊन

त्यांनी २१ जानेवारी १७८८ त पोर्तुगीजांशी झालेल्या तहाचे उलंघन केले आणि सावंतवाडीकरांनी लगेच पोर्तुगीज प्रदेशात शिरुन लुटालूट सुरू केली. पोर्तुगीजांना कायमच्या दिलेल्या पेडणे महालावर वाडीकरांनी इ.स. १७९३ च्या डिसेंबरमध्ये आक्रमण केले. वाडीकरांनी या महालातील कोरेगांव, केरी इ. ठिकाणी आपल्या चौक्या बसविल्या होत्या. परंतु पोर्तुगीज सैन्य येताच वाडीकरांनी आपल्या चौक्या उठविल्या. या वाडीकर-पोर्तुगीज युध्दात वाडीकरांची बरीच माणसे ठार झाली व खूप नुकसानही झाले होते[७३].

खेमसावंताची फोंड्यावर स्वारी :-

खेमसावंताने गोव्यात अंतर्गत बंड करणा-याबरोबर हातमिळवणी केली. व त्वरीत किरी घेतले. किरी घेतल्यानंतर लगेच खेमसावंताने फोंड्यावर स्वारी केली. पोर्तुगीजांनी ताबडतोब दोन हजार सैनिकांची तुकडी अज्युडंट जनरल याने पाठविली. उभय पक्षांमध्ये घनघोर लढाई झाली. या लढाईत वाडीकरांचे बरेच सैनिक मारले गेले. भितीपोटी वाडीकरांचे सैन्य मार्ग मिळेल तिकडे पळत सुटले. या लढाईत सावंतवाडीकरांचा निर्णायक पराभव झाला[७४]. व जिंकलेला प्रदेश गोव्याच्या राज्याला जोडला. या लढाईत वाडीकरांचा लष्कराचा सेनापती बाबाजी पाटणकर हा गंभीर जखमी झाला. वाडीत आल्याबरोबर त्याचे निधन झाले. बाबाजी पाटणकराच्या निधनामुळे वाडीकरांच्या पायदळीची शिस्तही बिघडली होती.

यानंतर सावंतवाडीकरांनी १८०१ च्या दरम्यान पोर्तुगीजांच्या विरूध्द परकियांची मदत मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. वाडीकरांनी सखाराम घाटगेबरोबर करार केला. त्यानुसार घाटगे ने खेमसावंताला पोर्तुगीजांविरूध्द मदत करावी असे ठरले. सखाराम घाटगेलाही पोर्तुगीजांबद्दल तिरस्कारच होता. उभयतांमध्ये झालेला हा करार गुप्तरित्या झालेला असल्यामुळे पोर्तुगीजांना ज्ञात नव्हता[७५].

शेवटी १८०७ मध्ये सावंतवाडी राज्यात सर्वत्र अराजकता, गोंधळ निर्माण झाला होता. वाडीकरांना राज्य करणे कठीण झाले होते. वाडीकर हा गोंधळ नष्ट करण्यास असमर्थ ठरले होते. त्यामुळे त्यांनी पोर्तुगीजांशी असलेले वैर बाजूला ठेवून शेवटी त्यांच्याकडे मदतीसाठी पदर पसरला. पोर्तुगीजांनीही वाडीकरांना मदत दिली व वाडीत शांतता निर्माण झाली. व वाडीकर आता खुशीत पोर्तुगीजांच्या वर्चस्वाखाली कारभार करू लागले[७६]. परंतु पुढील काळात इंग्रजांनी वाडीकरांवर वर्चस्व प्रस्थापित केल्यामुळे पोर्तुगीज मागे सरले.

वाडीकर व पोर्तुगीज यांचे अत्यंत जवळुन संबंध १८ व्या शतकात आले. परंतु आठराव्या शतकाच्या उत्तरार्धात उभयतांमध्ये अनेक लढायाही झाल्या. वाडीकर व पोर्तुगीज यांच्यातील दीर्घकालीन संघर्षात सावंतवाडीकरांना पुष्कळवेळा पोर्तुगीजांकडून पराभव पत्करावा लागला. त्यामुळे सावंतवाडीकर लष्करीदृष्टया व आर्थिकदृष्टया कमकुवत बनत गेले. परिणामी पोर्तुगीजांचे वाडीकरांवर राजकीय प्रभुत्व निर्माण होण्यास वेळ लागला नाही.

पोर्तुगीज सावंतवाडीकरांचे इतरांशी जवळचे संबंध निर्माण होऊ न देण्यासाठी नेहमी प्रयत्न करीत असत व त्यांना आहे त्याच परिस्थितीत म्हणजे दुबळ्या स्थितीत ठेवण्यासाठी प्रयत्न करीत. कारण वाडीकरांमुळेच गोव्याच्या राज्याचे रक्षण होत होते. वाडीकर इतर सत्तेला मिळाले तर गोव्याच्या राज्याला धोका निर्माण होण्याची पोर्तुगीजांना भिती वाटत होती. एवढेच नव्हे तर वाडीकरांनी टिपूबरोबर संबंध जोडण्याचे प्रयत्न केल्याची वार्ता गोवेकरांना मिळताच त्यांनी वाडिकरांना त्वरित उपदेशपर पत्र लिहून त्यांना तसे करण्यापासून परावृत्त केले. म्हणजे यावरून समजते की वाडीचे राज्य हे एक प्रकारची गोवा राज्याच्या संरक्षणाची भिंतच होती.

वाडीकरांवर पोर्तुगीजांनी वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर १९ व्या शतकाच्या प्रारंभापर्यन्त त्यांचे वर्चस्व टिकून होते. परंतु पुढील काळात पोर्तुगीजांप्रमाणेच परकीय सत्ताधारी इंग्रजांनी जवळ जवळ संपूर्ण हिंदुस्थानातील लहानमोठी राज्य खालसा करून आपल्या साम्राज्यात विलीन करण्याचा सपाटा सुरू केला होता. १९ व्या शतकाच्या आगदी प्रारंभापासूनच इंग्रजांनी कोकण प्रांतावर नजर केंद्रीत केली. याचवेळेपासून इंग्रजांनी सावंतवाडीराज्याच्या सीमा कमी करण्यास सुरवात केली. त्यावेळी इंग्रजांबरोबर पोर्तुगीज स्पर्धा करू शकत नव्हते. इंग्रजी सत्ता भक्कम असल्यामुळेच पोर्तुगीजांनी आपसातच चव ओळखून यावेळेपासून साम्राज्याविस्ताराचे धोरण जवळ जवळ बंद केले. नाहीतर त्यांचे गोव्याचे राज्यही इंग्रजांनी घेतले असते. पोर्तुगीजांचे वाडीकरांवरील वर्चस्व नष्ट होऊन इंग्रजांचे त्यांच्यावर प्रभुत्व निर्माण झाले व वाडीच्या राज्याचा शेवटही इंग्रजांनीच घडवून आणला. त्यात पोर्तुगीजांनी कसलाही हस्तक्षेप केला नाही.

वाडीकरही काही कमी नव्हते. त्यांनीही पोर्तुगीजांना वेळोवेळी जेरीस आणले होते. पोर्तुगीजांचे वाडीकरांवर प्रदेश घेण्यासाठी प्रत्येक प्रसंगी त्यांच्यावर तह लादण्याचे धोरण होते.पण वाडीकरही झालेल्या तहाचे लगेच उल्लंघन करून पोर्तुगीजांना शह देत असत. अशारीतीने शेवटपर्यन्त वाडीकर व पोर्तुगीज यांचे संबंध तणावाचेच राहिले परंतु तरी सुध्दा मधून मधून एकमेकांकडे दोन्हीही सत्ता मदत मागीत असत.

१ परेरा, मइसा, पों.द.-२ पृ. ५०-५२.

२ गोद, RV, n6, Fls, 4/v.

३ गोद, MR.62.Fls.203.

४ परेरा, मइसा, पोद २ पृ. ५२.

५ परेरा, मइसा, पोद-२, पृ. ५२-५३.

६ गोद, LIVRO DOS RELS VIZINHOS NO.4, Fls.119.

७ परेरा, मइसा, पोद-२ पृ. ६७-९८

८ कि-ता.

९ गोद, LIVRO DOS RELS VIZINHOS NO.5.Fls.11.

१० कि-ता.

११ परेरा, मइसा, पोद-२, पृ. ८४-८५.

१२ (L.D.R.V.No.5.FLS.71).

१३ University of Bombay, Maratha History Seminar, p.292.1971.

१४ कि-ता.

१५ कि-ता, पृ. २९२-९३.

१६ कि-ता; पृ. २९३.

१७ LDRV.No.5.Fls.76.

१८ कि-ता, (L D R V No.5 FLS.111 V)

१९ कि-ता.

२० MSH, Uob, P.294-95.

२१ MHS, UoB.P, 295-96.

२२ कि-ता.

२३ कि-ता.

२४ परेरा, मइसा, पोद-२. पृ. १४.

२५ परेरा, मइसा, पोद-२ पृ. १४०.

२६ परेरा, मइसा, पोद-२, पृ. १४०.

२७ गोद, Livro dos reis Vizinhos, No.8, Fls.94V.

२८ कि–ता,

२९ कि–ता,

३० गोद, Livro dos Reis Vizinhos No.8, Fls.107.

३१ परेरा, मङता, पोद–२, पृ. २१३–१४.

३२ कि–ता, ५

३३ परेरा, मङता, पोद–२, पृ. २१५.

३४ परेरा, मङता, पोद–२. पृ. २३५–३६.

३५ परेरा, मङता, पोद–२, पृ. २३७–३८

३६ कि–ता.

३७ परेरा, मङता, पोद–२, पृ. २४०–४१.

३८ परेरा, मङता, पोद–२, पृ. २५३.

३९ कि–ता. पृ. २५८–५९.

४० कि–ता.

४१ परेरा, मङता, पोद–२, पृ. ३२१.

४२ परेरा, मङता, पोद–२, पृ. ४३९–४०१.

४३ गोद, Livro dos reis Vizinhos No.9. Fls.26.

४४ कि–ता.

४५ पिसुर्लेकर, मङता, पोद–२, पत्र–२. पृ. १६–१७.

४६ खरे, शिचता, ख–१३, लेख–२८, पृ. २५–२७.

४७ पिसुर्लेकर, मङता, पोदखर, पृ. २८.

४८ भाइसंमं. त्रै. १४. पत्र–८, पृ. ८–९.

४९ पिसुर्लेकर, पोमसं, पृ. २२१

५० कि–ता.

५१ भाइसंमं. त्रै. खं. १४, पत्र–८. पृ. ९.

५२ पिसुर्लेकर, पोमसं, पृ. २२६.

५३ भाइसंमंत्रै, ख. १४, पत्र. ८ पृ. ९, पिसुर्लेकर पोमसं. पृ. २२६.

५४ पिसुर्लेकर, पोमसं, पृ. २३०.

५५ पेदनिंका, पकिपेहा, गोल, सरदेसाई, पत्र. १०२ पृ. ८.

५६ भाइसंमं, शिचसा. १३, ले. ३५, पृ. ३९-४३. त्रै. १९६४-६५.

५७ पिसुर्लेकर, पोमसं, पोद-२, पत्र-५६. पृ. १०२.

५८ पिसुर्लेकर, मइसा. पोद-५, प ा ५६. पृ. १०२.

५९ शिचसा, खं. १३, लेख-४८. पृ. ५७-६२.

६० शिचसा, १३, लेख६६, ८२-८४.

६१ गोद., Moncoes do.reino 164.F.Fls.1480.

६२ गोद. मपोभा, नं. १६६२. (ता. १-८-१९८१ चे पत्र)

६३ गोद, MR, 164, F.Fls.1480.

६४ शिचसा, १३ लेख-७० पृ. ८९-९१.

६५ गोद, MR, 164.Fl.1480.

६६ गोद MR 169 A, Fls.324-340.

६७ पिसुर्लेकर, मइसा, पोद-२, पत्र-१०८ पृ. ६६.

६८ पिसुर्लेकर, मइसा, पोद-२, पत्र९५, पृ. ५२-५४.

६९ पिसुर्लेकर, मइसा, पोद-२, पत्र. १०८, पृ. ६७.

७० कि-ता.

७१ कि-ता.

७२ पिसुर्लेकर, मइसा, पोद-२, पत्र-१०९, पृ. ७०.

७३ पिसुर्लेकर, पोमसं-२, पत्र-६२, पृ. १०४-१०५.

७४ कि-ता, पत्र-७०, १०८-१०९.

७५ कि-ता, पत्र. १३६, पृ. १३६.

७६ कि-ता, पत्र १५७, प. १४२-४३.

शासकिय
विभाग

प्रकरण ७ वे

सावंतवाडीकरांची शासन व्यवस्था

सावंतवाडी संस्थानाचा क्षेत्रविस्तार :-

खेमसावंत पहिले यांनी वाडीच्या राज्याची स्थापना केली व दुसरे खेमसावंत यांनी इ.स.१६९७ त कुडाळ देशस्थ प्रभूस जिंकून कुडाळ परगण्यातील बारा तर्फा, एक बंदर आणि भिमगड परगण्यातील साखळी, मणेरी, डिचोली, बांदा, पेडणे हे पांच महाल आपल्या वर्चस्वाखाली आणून, वरिल प्रदेशावर सावंतवाडीकर स्वतंत्रपणे सत्ता चालवू लागले. दोन्हीही परगण्यात एकूण ४२७ गांवे होती. सावंतवाडीकर आपल्यास "सरदेसाई परगणे कुडाळ व महालानिहाय" असे म्हणवू लागले. सावंतवाडी राज्याच्या सीमा उत्तरेस कालीनदी पलीकडे साळशी महाल, पूर्वेस कोल्हापूर संस्थान व बेळगांव जिल्हा म्हणजे घाटापर्यन्त, दक्षिणेला तेरेखोल बारदेश, व पश्चिमेस अरबीसमुद्रापर्यन्त म्हणजे वेंगुर्ला महालापर्यन्त होत्या. कालांतराने वाडीकरांचा काही मुलूख शेजारच्या सत्तांनी घेतला. कुडाळ प्रांतातील तीन तर्फा व बंदर इंग्रजांनी घेतले. भिमगडमधील तीन महाल पोर्तुगीजांनी घेतले. शेवटी नऊ तर्फा व दोन महालच फक्त सावंतांच्या ताब्यात राहिले. म्हणजे खेमसावंत दुसरे यांच्या वेळी वाडीच्या राज्यात असलेल्या परगण्यातील बराच भाग त्यांच्या हातातून गेला[१]. काही राजे सोडले तर सावंतवाडीकरांना आपल्या दरबारात कधीही शिस्त निर्माण करता आली नाही, कारण प्रत्येक राजाला शत्रूशी लढत रहावे लागत असे. सावंतांना सर्वबाजूंनी शत्रू निर्माण झाले होते. त्यामुळे शत्रूचा बंदोबस्त करण्यातच त्यांचा काळ गेला, त्यामुळे राज्यव्यवस्थेकडे वाडीकरांचे आपोआपच दुर्लक्ष होत गेले, तरीसुध्दा राज्यव्यवस्थेत सुसंगती आणण्यासाठी वाडीकरांनी प्रयत्न केले. सावंतवाडीत राजेशाही राज्यपध्दतीच अस्तित्वात होती.

म्हणजे राजा हाच सर्वोच्च प्रमुख होता. सावंतवाडीच्या राज्यकर्त्यांना युध्दावर जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते त्यामुळे राज्यव्यवस्थेकडे लक्ष देण्यास त्यांना हवा तेवढा वेळही मिळत नसे. राज्यरक्षणाबरोबर सावंतांची राज्यकारभाराची पध्दती त्या परिस्थितीत बरी होती. राज्याच्या भोवती अस्थिर परिस्थिती असतांना सुध्दा राज्यात राज्ययंत्रणा स्थिर केली हे महत्वाचे आहे.

सावंतवाडी दरबारात प्रधान किंवा कारभारी, सरदार, वगैरे अधिकारी असून वाडीकर राजांच्या हातात अंतिम स-ता होती. सरसुभेदार, सुभेदार, लहानमोठे अधिकारी, चिटणीस किल्लेदार इ. मिळून राज्याची यंत्रणा चाले. परंतु या राज्यकारभाराबाबत अंतीम अधिकार पूर्णपणे राजाला असत[२].

राज्यसंस्था ही व्यापक असल्यामुळे एकट्या राजाला स्वत:च्या भरवशावर राज्य चालविणे शक्य नाही. या न्यायाने सावंतवाडीकरांनी राज्यकारभार चालविण्यासाठी अनेक अधिकारी, सरकार, सेनापती, सरसेनापती इ. नेमले होते उदा. वाडीकरांचा सवात महत्वाचा अधिकारी म्हणजे मुख्य प्रधान होय. लखमसावंतांच्या काळात त्याने प्रथमच प्रधानपद निर्माण करुन पितांबर शेणवी यांस प्रधान (कारभारी) नेमले. त्यानंतर अनेक प्रधानपदी नेमले त्यांची नांवे पुढीलप्रमाणे आहेत.

विश्राम अनंत सबनीस	१७०८ ते १७३५
पांडूरंग विश्राम सबनीस	१७३७ ते १७५१, १७५३ ते १७५६.
जिवाजी विश्राम सबनीस	१७५२, १७६५, १७६७ ते १७७०, १७७२ ते १७८०
रघूनाथ दळवी	१७६३,
विठोजी कामत	१७६६

विठ्ठल विश्राम सबनीस	१७८७
शिवराम जिवाजी	१७८८
विष्णू कामत	१८०३ ते १८०८
माधवराव शिवराम	१८२२
सदाशिव नारायण	
अनंत रामभट	
लक्ष्मण नारायण लेले	
हिरो रामशेठ	
लक्ष्मण दातार	
सदाशिव काळे	
सांतोराम आकेरकर	
फेंटभट नातू	
गोपाळराव सबनीस	
जिवाजी नेरूरकर	
दौलत आजम†	

सावंत भोसले घराण्याच्या सर्व राजांच्या काळात वरील प्रधान वेळोवेळी नेमले होते.

प्रधानाचे कार्य :-

वाडीकरांच्या राज्यव्यवस्थेत सर्व सरदार, अधिकारी यांच्यात प्रधानाला मानाचे स्थान होते. कारण प्रधानाची नेमणूक राजा स्वत:च्या पारखीने करीत असे. प्रधानावर संपूर्ण राज्यकारभाराची जबाबदारी असे.

---

† वरिल पैकी काहीप्रधानांचा कालावधी मिळाला नाही.

सर्व शाखांवर त्याचे नियंत्रण असे. राजाला प्रत्येक बाबतीत प्रधान सल्ला देत असे. राजाच्या वतीनेच तो कारभार सांभाळीत असे. त्यामुळे प्रधानाला दुसरे नांव कारभारी असेही होते. इतर स-तांबरोबर तह करणे, युध्दाचे नियोजन करणे इ. कामे प्रधान राजाच्या मार्गदर्शनाखाली करीत असे[3]. प्रत्यक्ष युध्दातही भाग घ्यावा लागत असे.

<u>दप्तराचे प्रमुख पाच भाग पाडले होते :-</u>

१) चिटणीस - परकी राजाशी झालेला पत्रव्यवहार

२) फडणीस - सनदांची बारनीशी

३) जमाबंदी - वसूलाचे हिशोब व संबंधीत पत्रव्यवहार

४) नगदी

५) मनसुबदारी

पैशाच्या देवीघेवीचे ते नगदी दिवाणी व फौजदारी संबंधाने आलेल्या फिर्यादी, त्यांची चौकशी केल्याबद्दलचे कागदपत्र व निवाडे हे मनसुबदारी[४].

संपूर्ण राज्यकारभाराचे कागदपत्र वरील पांचपैकीच दप्तरात ठेवले जात होते व व्यवस्थितपणे सर्व कागदपत्रे सांभाळली जात होती.

मुख्य प्रधानाखेरीज वाडीकरांनी अनेक वेगवेगळे अधिकारी व सरदारांच्या नेमणुका केल्या होत्या. मुख्य प्रधानास, कारभारी म्हटले जात होते. इतर अधिकारी खालीलप्रमाणे होते.

१) चिटणीस

२) दप्तरदार

३)पोतनीस

४) पागनीस

५) कोटणीस व कारखानीस

६) फडणीस व तटणीस

७) कमाविसदार

८) पाटील (गांवकर) व कुलकर्णी

९) हवालदार

१०) सरदार

वरील अधिका-यांची कामे खालील प्रमाणे होती.

१) चिटणीस :- राजेसाहेबांकडून दुस-या राजास किंवा संस्थानिकास पत्रे पाठवावयाचे झाल्यास त्याचे मसुदे करून ते राजेसाहेबास दाखवून त्याप्रमाणे ते पत्र लिहीणेचे काम चिटणीस करीत असे. सरकारी दप्तराचा बहुतेक भाग चिटणीसांना सांभाळावा लागे. प्रधानाला प्रसंगी लढायांवर सुध्दा जावे लागे. प्रधानाच्या नेमणुकीचा अधिकार जसा वाडीकरांनी स्वत:कडे ठेवला होता, तसाच प्रधानाने गैर कारभार केल्यास त्यास पदावरून दूर करण्याचाही अधिकार राजाकडेच होता. सावंतवाडीच्या काही राजांनी त्यामुळे अल्पकाळात अनेक प्रधान पदावरून दूर करून नवीन नेमलेले होते. परंतु या धोरणामुळे राज्यकारभारात कार्यक्षमता न राहता अव्यवस्था निर्माण होत असे. कारण पदावरून दूर केलेल्या प्रधानाचे धोरण, नवीन प्रधान कधीच पुढे चालू ठेवीत नसे तर त्याचे नवीनच धोरण आखून कायदेशीर कारभार पहात असे याचा परिणाम राज्यकारभारात गोंधळ निर्माण होण्यावर झाला. पदावरून दूर केलेले प्रधान असंतुष्ट झाल्यामुळे ते राजाच्या व राज्याच्या विरूध्द कारवाया करण्यास मागे पुढे पहात नसेत त्यामुळे वाडीकरांचा राज्यकारभारातील हा दोष होता असे म्हटले तरी चालेल.

कारण यामुळेच राज्यकारभारात स्थिरता निर्माण होऊ शकत नव्हती. व राजाचीही आपल्या राज्यकारभारावरील पकड ढिली होण्यास कारण ठरत होती. परंतु सर्वच राजांनी हे धोरण अवलंबिले नव्हते त्यामुळे ठराविक काळ सोडता राज्यकारभार सुरवातीच्या व मधल्या काळात स्थिरावला होता[5].

चिटणीसाला प्रधानाप्रमाणेच मानमरातब मिळत असे. कारण राजाचा खास पत्रव्यवहार व राजनैतिक पत्रव्यवहार लिहिण्याचे काम त्याच्याकडे असे वतनपत्रे, दानपत्रे, इनामपत्रे तयार करण्याचे काम मात्र चिटणीसाकडे नसे. चिटणीसाबद्दल त्यास १०० होनाची रक्कम मिळत असे. शिवाय मोकासाही चालत होता. इ.स.१८३२ मध्ये चिटणीसाला दरसाल २०७५ पीरखानी रुपये मिळत असे. चिटणीसाची नेमणूक व बडतर्फीचे अधिकार राजाने स्वत:कडेच ठेवले होते.

फडणीस :-

सरकारकडून ज्या सनदा देण्यात येत होत्या त त्यावर सरकारचे शिक्के करून घेऊन त्यांची बारनिशी करणे हे फडणीसाचे काम होते. याशिवाय वतनपत्रे, दानपत्रे, इनामपत्रे तयार करण्याचे कामही फडणीसाकडेच होते. फडणीसाला दरसाल २२५ रुपये मोबदला मिळत असे.

दप्तरदार :-

सावंतवाडीराज्यातील जमाबंदीचे व वसुलाचे काम दप्तरदाराकडे होते. प्रत्येक गावाकडे येणे किती, वसूल किती गोळा झाला, बाकी किती राहिली, त्याचा हिशोब ठेऊन वसुलाची तजवीज करणे व त्याचा दरमहा राजाला हिशोब देणे हे दप्तरदाराला काम करावे लागत असे.

याशिवाय जकातीचे मक्ते ठरवून देणे, पारदामाबद्दल सनद देऊन पैसा घेणे, गांवकामगारांच्या दप्तराची तपासणी करणे, त्यांच्याकडून हिशोब घेणे इ. कामे दप्तरदारास करावी लागे. दप्तरदार हा हुद्दा ब्रिटीश सरकारचा वाडीसंस्थानवर कारभार सुरू होईपर्यन्त अस्तित्वात होता. त्यास दरसाल २५० पिरखानी रुपये मोबदला दिला जात होता.

पोतनीस :-

सरकारी खजिन्यात जमा होणारा प्रत्येक पैसा लिहून ठेवणे व खजिन्यातून पैसा द्यावयाचा असेल तर पावती घेऊन देणे हा सर्व जमाखर्च ठेऊन हुजूरात हिशोब पाठविणे, तसेच सरकारचे जडजवाहीर, दागीने सांभाळण्याचेही काम पोतनीस करीत असे. पूर्वी त्यास २५० पीरखानी रुपये मिळत असत. नंतर दरसाल ८४० रुपये मिळू लागले.[६]

पागनीस :-

पूर्वी संस्थानची पागा बरीच मोठी होती. पागेत नेहमी २५० घोडेस्वार असत. त्यांची सर्व व्यवस्था पागनीस अधिकाऱ्याकडे असे त्यास २५० रुपये दरसाल मिळत असे. पागेतील घोडे व स्वाराचा सालाला ७००० रुपये खर्च येत होता[७].

कोटणीस :-

वस्तूरुपात आलेला वसूल घेण्याचे काम कोटणीस करीत असे. त्याचप्रमाणे राजेसाहेबांच्या कुटूंबाखर्चासि ज्या वस्तू खरेदी कराव्या लागत. त्या स्वत: कोटणीसच करीत असे. ह्या वस्तूही कोटणीसाच्याच ताब्यात राही. गल्ल्यांचे मापही त्याला करावे लागे. कोटणीसास दरसाल १२५

रुपये मिळत होते. कोटणीस पद १८४८ मध्ये इंग्रजांनी रद्द केले. थोडक्यात म्हणजे कोठी सांभाळण्याचे महत्त्वाचे काम कोटणीसाला करावे लागत होते.

<u>कमाविसदार :-</u>

कमाविसदार हा महसूल अधिकारी होता. महसूल गोळा झाल्यावर त्याचा पूर्ण हिशोब त्यास दप्तरदाराकडे द्यावा लागत होता[८].

<u>हवालदार :-</u>

परगण्यातील प्रत्येक तर्फेला हवालदार नेमलेला असे त्या त्या तर्फेमधील महसूल खालच्या नोकरांकडून वसूल करून तो वरच्या अधिकाऱ्यांकडे पाठविण्याचे काम हवालदारास करावे लागे. त्याबरोबर राज्यकारभाराशी निगडीत असलेले तर्फेमधील सर्वच कामे त्यास पहावी लागत असे[९].

<u>पाटील कुलकर्णी (गांवकर)</u>

खेडेगावांची सर्व व्यवस्था पहाण्याची जबाबदारी पूर्णपणे गांवातील पाटलावर होती. गावांतून महसूल गोळा करणे, गावांत शांतता राखणे, झगडे तंटे मिटविणे इ. कामे पाटलास करावे लागत असे.

म्हणजे सावंतवाडी राज्याची राजधानी सावंतवाडी ते खेडयापर्यन्त राज्यकारभार पहाण्यासाठी वरीष्ठ अधिकारी व नोकर नेमले होते.

<u>सावंतांकडे असलेले सरदार :-</u> सावंत वाडीकरांनी बरेच सरदार आपल्या पदरी ठेवले होते. पहिल्या खेमसावंताने आपल्या पदरी खालील सरदार ठेवले होते.

१) खव दळवी

२) फाटसावंत

३) मांग सावंत माणगांवकर

४) विठसावंत

५) अनसावंत

त्याचबरोबर पुढील राजांनीही आपल्या पदरी सरदार ठेवण्याची प्रथा चालूच ठेवली होती.

६) बबना गोपाळ

७) संभाजी सावंत

८) काकसावंत

९) फोंडसावंत तांबूळीकर

सावंतवाडीकरांनी आपल्या पदरी सरदार ठेऊन त्यांचा राज्याच्या विस्तारासाठी व राज्याच्या संरक्षणासाठी उपयोग करून घेतला. शत्रूबरोबर लढण्याशी वेळ आली तर लगेच सरदारांना हजर रहावे लागे. त्यांच्यावर सोपविलेली कामगिरी, मग ती किल्ला सांभाळण्याची असो नाही तर लढाईची असो किंवा एखादे ठाणे सांभाळण्याची असो, ती पार पाडावी लागत असे. सरदारांना इनाम, जहागी-या सावंतवाडीसरकारकडून मिळत असे. परंतु वाडीकरांचे त्यांच्या सरदारांवर पूर्णपणे नियंत्रण नव्हते.[२०]

सावंतवाडीकर सावंत भोसले नियमीत परदेशी दरबारात आपले वकिल ठेवीत असत. या वकिलांमार्फत इतर राजे, संस्थाने यांच्याशी संबंध विकसीत करीत असत. वाडीकरांनी नेमलेले वकिल त्या त्या राज्यात राहून पत्रव्यवहार, तह, करारनामे यासंबंधात नेहमी आपल्या राजेसाहेबांना कळवित असे. वाडीकरांचे खालीलप्रमाणे इतर राज्यात वकिल होते.

१) नारबा चिटणीस = वाडीकरांचा पेशवे दप्तरातील वकिल

२) सदाशिव शेणवी चिटणीस = वाडीकरांचा साता-यास असलेला वकिल

३) जिवाजी महादेव = वाडीकरांचा महादजी शिंदेकडे असलेला वकि

४) सदाशिव दुभाषी = वाडीकरांचा गोव्यातील वकिल.

इतर राजाशी किंवा संस्थानाशी जर काही पत्रव्यवहार करावयाचा असेल किंवा काही सल्लामसलत असेल तर ती वाडीकर सरकार त्या राज्यात किंवा संस्थानात असलेल्या आपल्या वकिलामार्फतच करीत असे. तहाची बोलणी करण्यासाठी देखील संबंधीत राजास आपल्या वकिलामार्फतच विचारणा केली जात होती. म्हणजे परकीय राजांशी संबंध व व्यवहार व्यवस्थित ठेवण्यासाठी वकिलांच्या नेमणुका होत्या. वकिल वाडीकरांना इतर बातम्याही पाठवित असत[११].

परकीय राज्यातील महत्वाची कागदपत्रे पोहचविण्यासाठी त्याकाळी सावंतवाडीकरांनी वकिलांचीच नेमणूक केली होती. हा वकिल फक्त वाडीकरांची कागदपत्रे दुसरीकडे पोहचविणेचे व दुसरीकडून कागदपत्रे वाडीकरांकडे आणून देणे, एवढे काम करीत असे. इ.स. १७८६ मध्ये रामजी नाईक ठाकूर हा पत्रव्यवहार ने आण करण्यासाठी खेमसावंताने वकील म्हणून नेमला होता.

वाडीकरांच्या राज्यकारभाराची भाषा मराठी होती. व कानडी भाषेचाही वापर वाडीकर करीत असत.

वरील राज्यकारभाराची पध्दती पुढील काळात थोडीफार बदलतही गेली. ~~होती~~. उदा. १८०९ मध्ये राणी लक्ष्मीबाई हिने राज्याचा कारभार पहाण्यासाठी दिवाणांची नेमणूक केली होती. प्रधानाला दिवाण हे दुसरे नांव होते.

वाडीकरांच्या राज्यव्यवस्थेत वरीलप्रकारे अधिकारी नेमून त्यांच्याकडे वेगवेगळी कामे सुपूर्त केली होती. व त्यांच्यावर राजाचे अंतिम अधिकार व वर्चस्व होते. थोडक्यात म्हणजे केंद्रच बळकट होते असे म्हणता येईल[१२].

कुडाळ परगणा व त्यात १२ तर्फ व पुन्हा अतिरिक्त दोन तर्फ, एक बंदर व एक उपविभाग यांचा समावेश होता. कुडाळ परगण्यातील १२ तर्फ खालीलप्रमाणे आहेत

१) मसुरी तर्फ	=	११ खेडे	महसूल	=	२५०० रू.
२) वराड तर्फ	=	१० खेडे	महसूल	=	१७००० रू.
३) पठ	=	१० खेडे	महसूल	=	१५००० रू.
४) हवेली तर्फ	=	१५ खेडे	महसूल	=	२०,००० रू.
५) मलुंडी तर्फ	=	१५ खेडे	महसूल	=	५००० रू.
६) माणगांव तर्फ	=	१४ खेडे	महसूल	=	२५००० रू.
७) तुलवार	=	१२ खेडे	महसूल	=	७५००० रू.
८) आजगांव तर्फ	=	१२ खेडे	महसूल	=	२५००० रू.
९) सतारी तर्फ	=	१२ खेडे	महसूल	=	१५,००० रू.
१०) मनोहर तर्फ	=	२४ खेडे	महसूल	=	१२,००० रू.
११) बोरूरी	=	१६ खेडे	महसूल	=	१२,००० रू.
१२) कळसुली तर्फ	=	१२ खेडे	महसूल	=	१३,००० रू.

अतिरिक्त तर्फ म्हणजे पाटगांव – १२ खेडे ६ हजार रू. महसूल[१३]

व नेरूर तर्फ १४ खेडे १४ हजार महसूल

उपविभाग – ४८ खेडे १४ हजार महसूल

बांदा – वेंगुर्ला बंदर कर – १४ हजार

एकूण महसूल – २,२९,००० रू.

घाटावरून येण्यावरील कर ९०,०००

एकूण उत्पन्न ३,१९,००० रू.

भीमगड परगण्यातील महाल

१) डिचोली	–	१४ खेडे
२) पेडणे	–	२४ खेडे
३) साखळी	–	७० खेडे
४) मणेरी	–	२५ खेडे
५) बांदा	–	२० खेडे

वरील परगणे व तर्फा मिळून सावंतवाडीकरांचे राज्य झाले होते. या राज्याच्या सिमा वाढविण्यासाठी सावंतवाडीकरांनी युध्दाचे धोरण चालू ठेवले व त्याबरोबर राज्याच्या शेजारील जमीनीही विकत घेण्याचा सपाटा सुरू केला. त्यामुळे राज्याच्या सिमा वाढल्या व राज्याच्या क्षेत्रातही वाढ झाली होती. परंतु पुढे पुढे वाडीच्या राज्यात राज्यकारभारावरील नियंत्रण सैल होऊ लागल्यामुळे व शत्रूंची संख्या जास्त झाल्यामुळे वाडीच्या राज्याची लचकेतोड होऊ लागली. पोर्तुगीज, इंग्रज, करवीरकर यांनी हळू हळू वाडीकरांचे राज्यातील प्रदेश घेण्यास सुरवात केली. व शेवटी वाडीच्या राज्यात फक्त तीन महत्वाचे विभाग उरले. ते म्हणजे
१) सावंतवाडी, (२) कुडाळ व (३) बांदा हे परगणे होय[१४].

सावंतवाडीकर आपल्या राज्यात सनदाही देत असत. उदा. १८०२ मध्ये खेमसावंताने खालील लोकांना सनदा दिल्या.

१) राजश्री रामचंद्रभट ज्योतीशी आजगांवकर
२) कृष्ण बाबू ज्योतीशी अखवलीकर
३) लक्ष्मण गोपाळ ज्योतिशी रेडकर
४) सदाशिव ज्योतीशी - अरावंदेकर

ज्योतीषांप्रमाणेच देवस्थानच्या बाबतीतही काही सनदा दिल्या होत्या ज्योतिशी व ब्राम्हण यांच्याकडे पुरातन काळापासून धार्मीक अधिकार चालत आलेले होते. त्यामुळेच ज्योतिशांप्रमाणेच ब्राम्हणांनाही सनदा दिला होत्या. त्यामुळेच ब्राम्हण लोक धार्मिक कार्य चांगल्यारितीने पार पाडीत असत. सावंतवाडीकर देवस्थानांना देणग्या देखील देत असत.

राज्यव्यवस्थेचा विचार करता सर्व बाबतीत सावंतवाडीकरांनी विचार करूनच अधिका-यांच्या नेमणुका केल्या. परगणे, तर्फा, यांची व्यवस्था लावली आणि त्यामुळेच सुरवातीला वेळेवर महसूलही खजिन्यात येऊ लागला[१५].

न्याय व पोलीस :-

सावंतवाडी राज्यातून लोकांकडून फौजदारी व दिवाणी या दोन्ही स्वरूपाच्या येणा-या फिर्यादींची चौकशी करण्यासाठी वाडीकरांनी एकच अंमलदार नेमला होता. धक्काबुक्की, मारामारी विनापरवाना झाड तोडून नेणे, हे लहानस्वरूपाचे गुन्हे समजले जाई. हे गुन्हे करणा-यास चार आण्यापासून ५ रूपयापर्यन्त दंड केला जाई. अंमलदार या सर्व तंटयांच्या निवाडा करीत असे. जर नियमाचे उल्लंघन केल्यास दंडाची शिक्षा दिली जाई. याशिवाय पंचायतीचे वाद तोडण्याची पध्दती प्रचलीत होती. गावांतील तंटयाबाबत पंच नेमून न्याय दिला जात असे. गांवकामगार पंचाला मदत करीत असे. नेमलेले पंच वादीप्रतीवादींचा पुरावा पाहून आपले त्यावरील मत कळवित. त्यानंतर गांवकामगारांची खबर राजेसाहेबांकडे गेल्यावर राजा त्याप्रमाणे अखेरचा निर्णय देत असे. शपथ घेण्याची चालही त्यावेळी अस्तित्वात होती.

काही महत्त्वाच्या बाबतीत मात्र स्वत: राजा किंवा प्रधान यांच्यासमोर वादीप्रतिवादींची तक्रार चालली तर ते न्यायदान करीत असत. निकाल पत्रव्यवहारा पर राजाचे शिक्के मारीत असत व त्याची अंमलबजावणी केली जात असे.

वरील न्यायदान पध्दती संस्थानात पूर्वी प्रचलित होती. परंतु शेवटच्या काळात मात्र तीत बदल झाला होता. बदलेली वाडीकरांची न्यायपध्दती अतिशय महत्त्वपूर्ण होती. लोकांना न्यायदान करण्यासाठी व महसूलासंबंधी तक्रारीचे निवारण करण्यासाठी सरकारने दोन सिव्हील कोर्टस् स्थापन केले होते. याव्यतिरिक्त राजाचे कोर्ट स्वतंत्र होते. त्यात तीन न्यायधीशांचे मंडळ होते. पंचाच्या निर्णयानंतर सर्व प्रकारच्या तक्रारी राजाच्या कोर्टात जात व तेथे पुन्हा न्यायनिवाडा होई. अंमलदार हा पोलीस अधिकारी होता. त्याच्याकडे तक्रार आल्यावर तो राजाकडे

पाठवित असे व नंतर राजा व त्याचे तीन न्यायधीश त्या तक्रारींवर विचार करून त्याचा निकाल लावीत असे. स्थापन केलेले हे राजाचे कोर्ट इंग्रजांच्या काळात १८४२ पर्यन्त अस्तित्वात होते. परंतु १८४२ मध्ये हे कोर्ट इंग्रज सरकारने रद्द केले व नवीन कोर्ट स्थापन करून स्थानिक न्यायधीश नेमला. यावेळी राजा व त्याच्या तीन न्यायधीशांच्या कोर्टाला तिराईत न्यायालय असे म्हणत असे[१६].

पोलीस :-

१८३४-३५ मध्ये ग्राम-प्रमुखाकडेच (Village Headman) पोलीसांचे सर्व काम दिलेले होते. या कामाबद्दल त्यास मोबदला कमी दिला जात होता. त्यामुळे पोलीस गोव्याकडून येणाऱ्या सर्व गुन्हेगारांकडून लाच घेऊन त्यांना सोडून देत ~~होता~~ असत. राज्यातील कारभारात यामुळेच भ्रष्टाचार माजून शांतता नष्ट झाली होती. लाचलुचपतीचे प्रकार सावंतवाडीराज्यात सर्रास चालू झाले होते. त्यामुळे कारभारात गोंधळ निर्माण होऊ लागला होता.

१८३५ पासून वाडीराज्यातील प्रत्येक गावांत फौजदाराची नेमणूक करण्यात आली. फौजदार हा हेडमन (Headman) च्याच चालीचा असे. खेडयात पाटील कुलकर्णी फौजदाराच्याच मदतीने महसूल गोळा करीत असे. खेडयात नेमलेल्या फौजदाराला गांवच्या पाटलाबरोबरीचा मान होता. त्यास सावंतवाडी सरकारकडून पगारही मिळत नव्हता तर गावांतील लोकांकडून धान्य जमा करून फौजदारास दिले जात होते. म्हणजे सरकार पगाराचे घोंगडे परस्पर गांवकऱ्यावर टाकून मोकळे होत असे. याव्यतिरिक्त दळवी, भावीन, महार, इ. नोकरवर्ग नेमलेला होता. सरकारच्या खजिन्यात पैसा कमी असल्यामुळे सरकारला वरील निर्णय घ्यावा लागत असे[१७].

१ Mr.W.Courtney and J.W.Auld Menoir on Sawantwadi State,p.

२ कि-ता.

३ पिसुर्लेकर, पोमसं, पृ. २६१.

४ निद, अ.७६०२

५ Mr.W.Courtney and J.W.Auld, MOSS., P 10

६ कि-ता.

७ पिंगुळकर सांसई पृ. ५०-५२.

८ वालावलकर, पां.बा.सावंतवाडी संस्थानचे सचित्र भूवर्णन पृ. २.

९ Choksey, M.R., letter 52., p.106.

१० पेदनिका पृ. ९७

११ शिचसा, भाइसंमं, खंड १३, पृ.लेख, १०६, पृ. १२६

१२ मइ.सा.पोद.खं.२ पत्र १८१ पृ. १४४ पिसुर्लेकर

१३ Courtney auld, Memoir on Sawantwadi State P. 155.

१४ कि-ता.

१५ कि-ता.

१६ Ratnagiri, Savantwadi Gazetter.1880.

१७ कि-ता, पी. १४७.

प्रकरण ८ वे

सावंतवाडीकरांची महसूलव्यवस्था

दुसरे खेमसावंत भोसले यांनी राज्यव्यवस्थेसाठी वेगवेगळे कामदार नेमून राज्यकारभारात सुधारणा घडवून आणल्या. त्यांनी नेमलेल्या कामदारांच्या कामापैकी मुख्य व महत्वाचे काम म्हणजे जमाबंदीचे मानले जात होते. सावंतांची स-ता येण्यापूर्वी जमीनीच्या उत्पन्नातील राजभाग, रहदारी मालावरील जकाती व तंबाखूवरील कर, अशा तीन मार्गानी मिळत असे. परंतु सावंतांच्या राजवटीत वरील कराव्यतिरिक्त धंद्याच्या संबंधाने कित्येक नवीन कर घेण्याची पध्दत सुरू केली. उदा. जमीनीतील उत्पन्नावरील कर पुढीलप्रमाणे घेतला जात होता असे पिंगुळकरांनी आपल्या सावंतवाडी संस्थानच्या इतिहास या पुस्तकात नमूद केले आहे. परंतु पिंगुळकरांनी महसूलासंबंधी जे लिहीले ते परंपरेने मिळत आलेल्या महसूलासंबंधी माहितीवरून लिहीले आहे, असे तेच स्वत:च्या पुस्तकांत नमूद करतात.

<u>जमीनबाब</u> :- जमीनबाब म्हणजेच कुंबळे होय ही उत्पन्नाची प्रमुख बाब. जमिनीतील उत्पन्नापैकी जो राजभाग मिळे त्यास कुंबळे असे म्हणत[१]. परंतु याबाबत प्रत्यक्ष कोठेही रेकार्ड नाही किंवा दाखलाही दिलेला नाही. म्हणजेच ही माहिती परंपरेने मिळाली आहे.

कुंबळ्यांचे एकूण प्रकार सात होते. (१) सर्द कुंबळे (२) विदळ कुंबळे (३) गिमवत कुंबळे (४) नारळ (५) फणस (६) सुपारी (७) गूळ व फणस. वरिल कुंबळे किंवा राजभाग तीस वर्षातील उत्पन्नाचा नजरमानाने आकार करून त्यावरून एक वर्षाचे उत्पन्न काढून त्यावरून ठरविला जात होता. प्रत्येक ठिकाणचे ठरविलेले कुंबळे एका चोपडीत लिहून ठेवलेले असत. त्यास जाबता असे म्हणत. दर निरनिराळ्या भागासाठी तेथील विक्रीच्या मानाने ठरविलेले असत[२].

फोंडसावंत उर्फ आण्णासाहेब यांनी १७०९ च्या दरम्यान अनेक पट्याबाबत्या म्हणून कर बसविले होते. हे कर उत्पन्न पाहून बसविले जात होते. तांदूळ, उडीद, तीळ, साळी यावरील उत्पन्नावर वरील कर बसविण्यात आला होता.

यानंतर तिसरे खेमसावंत यांनी तर जमाबंदीची चौकशी करण्यासाठी बाळंभट धोपेश्वरकर, विष्णू गणेश मराठे, सदाशिव रांगणेकर हे मामलेदार म्हणून नेमले. त्यांनी गावोगांव जाऊन जमाबंदीची चौकशी करून महसूल ठरविला. वरिल कुंबळेपध्दती संस्थानात शास्त्रीय पध्दतीने जमीन महसूल ठरेपर्यन्त आस्तित्वात होती. महसूलाचे सरकारी दरसाल उत्पन्न १७३६.११ रू. होते.

तंबाखू पट्टी :- सावंतवाडी संस्थानात तंबाखू विकण्याचा मक्ता कोणीतरी एक जण पत्करून विक्री करीत असे. परंतु तिस-या खेमसावंताने हा वहिवाट मोडुन प्रत्येक गावांतील उत्पन्नाचे प्रमाण पाहुन गांववार कर बसविला.

कुळपट्टी :- कुळाची ऐपत पाहुन पट्टी बसवित असत. १८०१ पासून ब्रिटीश सरकारने हा कर घेण्याचे बंद केले[3].

धंदा कर :- धंद्यावरील कर ही फोंडसावंत उर्फ आण्णासाहेब यांच्याच काळात बसविल्याचे उल्लेख सापडतात. उदा. कुंभार, चांभार, सुतार, सोनार, घाणेकरतेली, दुकानदारवाणी, परीट, हजाम, भंडारी, दारू दुकानदार, गवळी, महार, जोशी इ. बलुतेदारांवर धंदा कर बसविला होता. प्रत्येक गावातील गांवकरी स्थानिक धंदे वाल्याच्या धंद्याचे उत्पन्न पाहून कर ठरवित असत. गांवक-यांना सावंतवाडीकरांनी तसे अधिकार दिले होते. वरील करांना खालीलप्रमाणे नांवेही होती.

उदाहरणार्थ :- कुंभारपट्टी,
सुतारपट्टी,
सोनारशिक्केपट्टी,

आणखी धनगर लोक सावंतवाडी प्रदेशात गुरे चारण्यासाठी आणीत, त्या गुरांवरही कर लादला जात होता. त्याचबरोबर डुक्कर पट्टीही डुकरावर लादली जात होती. चांभार डुकरे पाळीत असत डुकराच्या किंमती ठरवून दर रुपयास एक आणा कर ठेवला होता. या व्यतिरिक्त शेतकरी ताग पेरीत त्यावरही कर बसविला होता. वरील सर्व कर हे मक्ते देऊनच वाडीसरकार वसूली करीत असे.

१७ व्या शतकात सावंतवाडीकरांनी विजापूरकरांचीच महसूल पध्दती अवलंबिली होती. राज्यातील शेतीत एकूण बी किती पेरले, त्या पेरलेल्या बियाण्यावरच सरकारी महसूल किंवा सारा ठरविला जात असे. वाडीसरकारने पिकांच्या हंगामानुसार विभागणी केली होती. ही पध्दत विजयनगरमध्ये देखील होती. उदा.पावसाळी पिके म्हणजे खरीप, रब्बी पिके, सरकारचा एकूण उत्पन्नात वसूलीचा हिस्सा १/५ किंवा १/६ इतका होता. बागायत शेतीत पिकणाऱ्या पिकांचा वसूल मात्र त्या शेतात लावलेल्या झाडांच्या उत्पादनावर आकारला जात असे. उदा.सुपारीची झाडे, फणस इ.

नारळांच्या उत्पादनाच्या बाबतीत सरकार एकूण नारळाच्या उत्पन्नापैकी अर्धे उत्पन्न महसूल म्हणून गोळा करीत असे. १२ ते २० शेर सुपारीवर १/३ किंवा १/४ वसूल आकारला जाई.

१८ व्या शतकाच्या सुरवातीला म्हणजे १७१५ च्या दरम्यान पूर्वीचे दर बदलले व नवीन दर अमलात आणले. त्यानुसार नवीन पध्दतीत पावसाळ्यातील तांदूळ पिकविणारी जमीन चार विभागात विभागली होती.

१) <u>एक नंबरची चांगली जमीन</u> :- या जमीनीत निघणाऱ्या एकूण उत्पादनाच्या १/६ इतका महसूल आकारण्यात येऊ लागला[४].

२) ज्या जमीनीत पिकासाठी लागणीची गरज असते अशा जमीनीवर उत्पादनाच्या १/८ शेतसारा आकारला जाई.

उत्पादनाच्या $\frac{१}{६}$ इतका महसूल आकारला जाई.

४) डोंगराळ जमीनीत एक किंवा दोन पिके घेतल्यावर ती पडीत ठेवावी लागे त्यामुळे अशा जमीनीवर एकूण उत्पन्नाच्या $\frac{१}{१२}$ महसूल आकारला जात होता.

ज्या बागाईत जमीनीत वर्षातून एकच पीक घेतले जाई, अशा जमिनीवर सरकार $\frac{१}{८}$ महसूल आकारीत असे. उन्हाळयात नाचणी पिकविणा-या जमीनीवर उत्पादनाच्या $\frac{१}{१२}$ महसूल आकारला जाई. फळबागांवर उत्पन्नाच्या $\frac{२}{५}$ महसूल आकारला जाई. नदीच्या किना-यावरील थळभागावर $\frac{३}{१०}$ महसूल आकारला जात होता. जर शेतक-याने स्वत: पाणी दिलेले पिक जमिनीत घेतले असेल, तर त्या जमिनीवर $\frac{१}{७}$ महसूल आकारीत असे. त्याला अदागर असे म्हणत. सुपारी पिकविणा-या जमिनीवर मात्र वेगवेगळे दर सरकारने ठरवून दिले होते. ते दर म्हणजे एकूण उत्पादनाच्या $\frac{१}{६}$, $\frac{१}{८}$ इतका महसूल आकारला जाई[५]. सावंतवाडीसरकार वसूल किंवा महसूल पैशांच्या स्थाने किंवा वस्तुंच्या स्थानेही घेत असे. इ.स. १७९१ त सावंतवाडी सरकारने भाताच्या उत्पादनातून महसूल वसूल करण्याऐवजी त्याच्या मोबदल्यात लोणी, तेलबिया व हळ इया वस्तू महसूलाच्या स्थाने घेतल्या होत्या. त्यापाठीमागील हेतू म्हणजे त्या वस्तू कोठारांमध्ये सरकारला साठवून नंतर परदेशात निर्यात करून परकीय चलन मिळवावयाचे होते. इ.स. १७९० मध्ये एकूण राज्याचा महसूल २,४२,८४० रू. इतका जमा झाला होता. व खर्च मात्र २,६२,१८० रूपये होता.

<u>जकात</u> :- सावंतवाडीकरांनी आपल्या राज्यात बाहेरून म्हणजे कोकणातून वरघाटी जाणा-या वस्तूंवर व घाटावरून कोकणात येणा-या वस्तूंवरही कर लादले होते, त्यासच जकात म्हणण्यात येऊ लागले. त्यासाठी सरकारने खास मोक्याच्या ठिकाणी नाके बसविले होते.

<u>वसूलाची पध्दत</u> :- वसुलासाठी सरकारने कामाविसदार या नांवाचे अंमलदार नेमले होते. गांवाचा वसूल गोळा करण्यासाठी गांवकर व कुलकर्णी हे नोकर होते. दप्तरदार व गांवकामगार म्हणजेच कोतवाल परंपरेने काम करीत असत. कधी कधी महसूल वसूल करण्याचा मक्ताही एखाद्या वजनदार माणसास ठराविक मुदतीसाठी देत असत.
मामलतदाराचा पगार दरमहा ७५ पासून तर १५० पर्यन्त असे. त्याच्या मदतीसाठी एक शागीर्द, यास दरमहा ३ रू. पगार असे, दोन खिजमतगार, त्यांना पगार ३ रू. महिना असे, दोन कारकून त्यांना प्रत्येकी दरसाल १०० रू. पगार असे. १५ तहसिलदार शिपाई नेमून पगार प्रत्येकी ४ रू. महिना असे. जकातीखेरीज बहुतेक वसूलाचे मक्तेच दिले जात होते. कधी कधी नोकर ठेवून अधिकारीही वसूल गोळा करीत असे. मामलतदार, कामाविसदार व गांवकामगार, कुलकर्णी यांना दप्तरदाराकडे हिशोब द्यावा लागत असे.

वसुलाच्या कामात तगादा देण्यासाठी दप्तरदाराकडे तहशीलदार शिपाई असत. या शिपायांवर शिवलकर उपनांवाचा मुख्य कामदार होता. जमीनबाब व इतर उत्पन्न सप्टेंबर महिन्यापासून वसूल करीत असत.

वरील बाबी सोडता अजून किरकोळ उत्पन्नाच्या बाबी होत्या.

१) <u>पाटदाम</u> :- क्षूद्र लोकात विधवापुनर्विवाह करण्याची चाल होती. त्या विवाहास पाट लावणे असे म्हणतात. अशा विवाहास परवानगी देतांना सरकार सदर लोकांकडून कर घेत असे. त्यास पाटदाम असे म्हटले जात होते. परंतु पुढे १८४५ पासून हा कर घेण्याचे पूर्णपणे बंद केले[7].

<u>जात देण्याचा कर</u> :- ब्राम्हणेतर लोकात एखाद्यास जातीबाहेर टाकल्यास त्याबद्दल चौकशी करून त्यास जातीत घेण्यास लावण्याचा

अधिकार राजेसाहेबास होता. जातीत घेण्याची सनद देतांना सदर माणसाकडून काही कर घेतला जात होता. त्यास जात देण्याचा कर असे म्हणत असे.

न्यायदानासाठी नेमलेला अंमलदार फौजदारी गुन्हा करणाऱ्यापासून दंड व दिवाणी फिर्यादीतील वादीप्रतीवादींपासून गुन्हेगारी कर घेत असत. यापासून सरकारला एकूण १५०० रु. उत्पन्न जमा होत असे.

या व्यतिरिक्त सावंतवाडी सरकारने सावंतवाडी येथे ठशांनी नाणी पाडण्यासाठी एक टांकसाळ उघडली होती. ते काम सोनार करीत असे. टांकसाळीचे उत्पन्न दरसाल १०० रु. इतके होते. वाडीकरांची टांकसाळ १८४५ पर्यन्त अस्तित्वात होती. १०० पीरखानी रुपये पाडण्यास सोनार १० आणे घेत असे. दुष्काळात महसूल माफ करण्याचीही चाल वाडीसरकारने सुरु केली होती.[८]

जमीनीची खरेदी-विक्री

सावंतवाडीकर आपल्या राज्याच्या सीमा वाढविण्यासाठी व शेती उत्पादनासाठी कोणीही जमीन विकत असेल तर ती खरेदी करीत असत.

शेवटच्या कुडाळदेशस्थ देसाई ब्राम्हण श्री. नारायण प्रभु देसाई कुडाळ याने आपल्या मौजे आजगांव येथील जमीन खेमसावंत भोसले यांना ३५ सोन्याच्या होनास विकली. या जमीनीचे पैसे गोसावी च्या मार्फत देसाईस दिले गेले. हा जमीनीचा सर्व व्यवहार करतांना सावंत व देसाई यांनी साक्षीदारांच्या सहया जमीनीच्या खरेदीच्या कागदावर घेतलेल्या आहे. सदर जमीनीत असलेले बाग, भातशेती,

माडीची असंख्य झाडे हे सर्व सावंतवाडीकरांच्या मालकीची झाली. यानंतर लगेच सहा महिन्यांनी मौजे हडी, येथीलही देसाईंची जमीन वाडीकरांनी ३० होनास विकत घेतली. यानंतर सात नाक बाळनाक कबूल याचे वेंगुर्ले येथील मीठाचे आगर म्हणजे मीठ तयार करण्याचा पट्टा, नारळाची झाडे ही जमीन १० रू. स विकत घेतली. जमीन घेतांना चतु:सिमाही ठरवून घेतल्या जात होत्या.

इ.स. १६९४ त पेडणे महालाचे पारसेकर देसाई व केशव नाईक देसाई (कसबा पेडणे) यांच्यात तुवे या इनाम गांवाची वाटणी झाली. यानंतर पारसेकरांनी आपला हिस्सा २५० होनास खेमसावंतास विकत दिला. खेमसावंताने तो विकत घेऊन खंडाने दिला.

जमीनीवरील खाजगी मालकी हक्कही गाजवता येत होता. जमीन मक्त्याने ही देण्याची पध्दत होती. जमीनीत निघालेल्या उत्पन्नातून फक्त १०० होन मशागत करणा-यास देऊन उरलेले उत्पन्न सरकारी खजिन्यात जमा होत असे. म्हणजेच सावंतवाडीकरांची जी खाजगी जमीन होती, ती बहुतांशी खंडाने किंवा मक्त्याने दिली जात होती असे स्पष्ट होते व तो मिळालेला खंड म्हणजेच सरकारचे उत्पन्न होते. शेतीच्या उत्पन्नातून स्वत: वाडीसरकारही खजिन्यात भर घालीत असे[१].

इ.स. १६९८ त वीट शेणवी सालसकर याकडून नारळाचे बाग, फणसाची झाडी असलेला प्रदेश, अंबराई, शेती, माडाची झाडे, नारळाचे बाग असलेली कुडाळ जवळील शेती सावंतांनी कायदेशीर विकत घेतली. जमीनीचे विक्रीपत्र करूनच ती घेतली. त्यावर जमीन विकणाराची सही, पैसे मिळाले यासाठी साक्षीदाराची सही, तारीख, विक्रीपत्र लिहिणाराचे नांव

उदा. लिहीणार - विठ्ठल विश्वनाथ काबाडी नाडकर्णी

साक्षीदार - विठ्ठल नरहरी सुकठणेकर[२]

(भि. इ. सा. भाईसंम, ख. १३. ले १९६४-६५.)

जमीनीचा उपभोग काळ : (Land Tenure) Period of holding land

सावंतवाडी संस्थानात एकूण चार धारा पध्दती होत्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१) राज्याची जमीन (State land)

२) दुस-यास मालकी दिलेली जमीन (Alienated land)

३) दस्तिबाद (Rent free)

४) शेतक-यांच्या जमिनी (Peasant holders)

१) सरकारची जमीन :- यात दोन प्रकार होते ते खालीलप्रमाणे आहेत.

१) खाजगी जमीन (राज्याची मालम-ता)

२) राजाची जमीन

ह्या जमीनीचा कारभार पहाण्यासाठी जिल्हा महसूल अधिकारी(District Revenue Officers) नेमलेले असत. हे अधिकारी जमीनीचा जास्तीत जास्त पैसे मिळविण्यासाठी लिलाव पध्दतीत ती कसण्यासाठी लोकांना काही वर्षांचा करार करुन देत असत.

२) दुस-यास मालकी दिलेली जमीन :- (Alienated land)

१) इनाम (२) दस्तिबाद (३) देवसू जमीन, यातील जमीन राजाने आपल्या नातेवाईकांना दिलेली असे. तीत दुमालाही असे नातेवाईकांनाही जमीन लेखी कराराने दिली जात असे. या नातेवाईकांना सरकार कडे कोणताही कर किंवा महसूल भरावा लागत नव्हता.

३) दस्तिबाद (Rented)

या प्रकारातील जमीनी अत्यंत दुर्मिळ होत्या. त्यामुळे या जमिनीवर देखिल सरकार जमीन महसूल आकारीत नसे. परंतु थोडक्या प्रमाणात त्यांना कर धावा लागत असे.

देवस्थ जमीन :- ही जमीन मंदिराच्या नोकरांकडे दिलेली असे, तिचे दोन प्रकार होते. १) इनाम देवस्थ (२) देवस्थ कुळे.

देवस्थ कुळे जमीन धारकांना सरकारचा उत्पन्नातील हिस्सा द्यावा लागे म्हणजेच महसूल द्यावा लागत असे. सरकारी महसूल वजा करता उरलेली रक्कम देवळाच्या कार्यासाठी उपयोगात आणीत असत.

३) Rented land खोती :-

अगदी थोड्या जमीनी खोतीने किंवा भाड्याने दिल्या जात होत्या. खोती वंशपरंपरेने चालत असे.

४) शेतकऱ्यांच्या ताब्यातील जमीन (Peasants holders)

शेतकऱ्यांचे दोन वर्ग होते (१) खातेळी (२) केवीकुळ[१०].
खातेळी हे सर्व जातीचे असत ते सरकारलाच महसूल भरण्यास जबाबदार असत जर त्यांनी सारा भरला नाही तर त्यांची जमीन विकली जाई. काही खातेळी (Peasants holder) तर वतनदार असत, ते स्वत: त्यांच्या जमीनीचा सारा सरकारकडे भरीत असत. सरकारने कायदा करुन वतनदारांच्या जमीनी कमी केल्या.

जमीनीतील दुरुस्ती :-

राज्यातील जमीनी सावंतवाडीकर शेतकऱ्यांच्या विनंती अर्जावरुन दुरुस्त करुन देत असत. एखाद्या खेड्यातील जमीन नापीक असेल व तिच्या दुरुस्तीसाठी जर तसा विनंती अर्ज केला तर वाडीकर लगेच त्याची दखल घेऊन जमीनीत सुधारणा करुन देत असत. उदा. असंदे, येथील जमीनीचा बांद फुटलेला होता त्यामुळे गांवाची जमीन नापीक म्हणजे पिके न पेरताच पडित राहू लागली. तेव्हा गांवातील लोकांनी गांवातील कुळकर्णीकडे बांध घालून मिळण्याची विनंती अर्ज केला.

कुलकर्णीने लगेच कारवाई करून बांध पूर्णपणे बांधून दिला. ही कामगिरी इ.स. १७३१ मध्ये फोंडसावंत भोसले यांच्या काळात झाली होती, त्यामुळेच अखंदे येथील लोकांनी बांध दुरुस्तीबद्दल सावंतांना काही जमीनी नमसी करून दिल्या. नमसी म्हणजे मोबदला न घेता कायमच्या लागवडीसाठी जमीन देणे. गांवक-यांनी ह्या जमीनी गावकर व कुलकर्णी यांच्यामार्फत सावंतांना दिल्या[११].

जमिनीची दुरुस्ती करण्यासाठी लागणारा संपूर्ण खर्च हा सावंतवाडीकर करीत असत. शेतक-यांकडून खर्चाची रक्कम घेतली जात नव्हती. परंतु शेतकरी जमीनीची दुरुस्ती झाल्यानंतर स्वखुषीने सावंतांना जमीनीचा काही भाग देत- असत. दिली जाणारी जमीन सावंतांना कायम स्वरूपी दिली जात होती. जमीन देतांना सर्व लिखापडी करून त्या कागदावर गावातील लोक व कुलकर्णी यांच्या सह्या घेतल्या जात.

हा व्यवहार पहाण्यासाठी व लोकांच्या कामांची काळजी घेण्यासाठी कुलकर्णींची नेमणूक वाडीकरांनी केलेली असे. १७३१ मधील जमीन सावंतांना मिळाली तेव्हा खालील लोकांच्या सह्या होत्या.

गांवातील गांवकरी

१) पोळु विठु नाईक
२) मोदु गणेश नाईक
३) तुको नार नाईक
४) गोदजी बुध
५) गणबा नाईक

लिहिणारा - नारायण बाबाजी कुलकर्णी[१२]

सावंतवाडीकर लोक कल्याणाच्या दृष्टिनेच जमीनीतील दुरुस्ती करून देत असे व त्यासाठी लागणारा संपूर्ण खर्च सरकारी तिजोरीतून केला जात असे. जमीनीतील दुरुस्ती करून दिल्यामुळे आपल्याच राज्याचे उत्पादन वाढून वसूलाच्याही रकमेत वाढ होऊन खजिना भरण्यास त्यामुळे हातभार लागेल याची वाडीकरांना समज होती. त्याचबरोबर जमीनीत सुधारणा केल्यामुळे त्याचा ताबडतोबीचा मोबदला वाडीकरांना जमीनी नमती करून मिळत असे व परिणामी त्यांच्या खाजगी जमिनीच्या क्षेत्रात वाढ होत जाऊन उत्पादनातही वाढ झाली.

महसूल वसूलीबाबत देखील वाडीकरांचे धोरण अतिशय कडक असे नव्हते. जर पैशाच्या स्वरूपात वसूल देण्यात पैसे नसतील तर वाडीकर सरकार वस्तूंचा स्वरूपात वसूल स्विकारीत व जनतेची अडचण लगेच दूर होत असे. वसूल गोळा करीत असतांना दुष्काळी प्रदेशातील लोकांकडून वसुली करण्याचे स्थगित केले जात असे.

१ शिचसा, खं. १३, त्रै. लेख क्र. ६८, पृ. ८६, १९६४-६५.

२ पिंगूळकर, सां. सं. इ. पृ. १२७-२८

३ कि-ता, पृ. १२७-३०

४ पिंगूळकर, सां. सं. ई. पृ. १३०-३४

५ Savantwadi Ratnagiri p.449 Gazetteer 1880.

६ Savantwadi Ratnagiri Gazetteer pp.449.1880.

७ Savantwadi and Ratnagiri Gazetteer. p.449.1880.

८ कि-ता.

९ ~~कि-ता, पृ.~~ शिचसा, भाईसंभ, खं १३, लेख ६८, पृ ८६ -१९६४-६

१० सां. स. ई. सा., वर्दे, लेख १०-११, पृ. ९-११.

११ R & S. Gazetteer. p.450. 1880.

१२ वर्दे, सांसइंसा, लेख ३१, पृ. २४-२५.

सावंतांची सैन्यव्यवस्था

सावंतवाडीचे राज्य स्थापन होण्याच्या अगोदर सावंतवाडीकर हे आदिलशहाची चाकरी करीत होते. परंतु त्यांनी वेळ येताच उघड उघड आदिलशहाविरुध्द बंड पुकारले आणि आपले स्वतंत्र अस्तित्व जाहीर केले. आदिलशहाच्या विरुध्द सावंतवाडीकरांनी बंड पुकारण्याच्या आगोदरच थोडे सैन्य निर्माण केले होते. म्हणूनच सावंतवाडीकर स्वतंत्र असे सावंतवाडी राज्य स्थापन करु शकले. मुलकी शासनव्यवस्था व लष्करी शासनव्यवस्था ही राज्याच्या रथाची दोन चाके असतात. यापैकी एक जरी नसेल तरी तो रथ निकामी होईल. मुलकी शासनाला लष्करी शासनाचे पाठबळ लागते. शुक्राचार्य यांनी लष्करी व्यवस्थेचे महत्व एका वाक्यात सांगितले, "सैन्यावाचून राज्य, धन, व पराक्रम यांना काहीच अर्थ उरत नाही". सावंतवाडीकरांनी आपल्या राज्याच्या स्थापनेनंतर राज्य कारभारातील हे मूलभूत सुत्र जाणले होते. लष्करी व्यवस्थेमुळेच पुढील काळात सावंतवाडीकरांच्या राज्याचा विस्तार होऊ शकला व राज्यात शांतता व सुरक्षितता वेळोवेळी निर्माण होऊ शकली. लष्करामुळेच वाडीकर राज्याच्या सीमा सुरक्षित राखू शकले किंबहुना वाढवू शकले. सावंतवाडीकरांचे सैन्य थोडे असल्यामुळे कोणाची ना कोणाची चाकरी, केल्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते, त्यामुळेच सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांची परवानगी घेऊन मोगल बादशहाची चाकरी करण्यास सुरवात केली. ब-याच दिवस मोगलांच्या सैन्यात राहुन मोगलांचे राज्याचे संरक्षण करण्याचे सावंतांनी कशोशीने प्रयत्न केले. परंतु विनासायास मोगलांची चाकरी करुन काहीच फळ मिळत नाही, हे लक्षात आल्यावर त्यांनी लगेच मोगलांची चाकरी सोडली व स्वत:च्या लष्करा वाढ करण्यास सुरवात केली[१]. परंतु वाडीकरांवर पोर्तुगीजांचे वर्चस्व असल्यामुळे त्यांच्या परवानगीशिवाय ते काहीही करु शकत नव्हते.

त्यामुळेच वाडीकरांनी लष्करात वाढ करण्यासाठीही पोर्तुगीजांची परवानगी घेणे आवश्यक वाटत होते. आणि वाडीकरांनी लष्करात वाढ करावी असे पोर्तुगीजांना कधीही वाटणे शक्य नव्हते. त्यामुळेच सावंतवाडीकरांनी पोर्तुगीजांना न जुमानता आपल्या स्वत:च्या सैन्यात वाढ करण्यास सुरवात केली. खेमसावंत दुस-याने १६७५ ते १७०९ या दरम्यान पोर्तुगीजांची परवानगी न घेताच पहिल्यांदा वाडीकरांचे लष्कर वाढविण्यास प्रारंभ केला. खेमसावंताने लष्कराची वाढ करीत[2] असतांनाच आपल्या लष्कराचे घोडदळ व पायदळ, असे दोन विभाग पाडले होते. इ.स.१७०९ पर्यन्त वाडीकरांनी जवळ जवळ २००० पायदळ आणि १५० घोडदळ वाढविले होते. आपल्या लष्करात वाढ करुन ब-या अर्थाने आता सावंत पोर्तुगीज, आदिलशहा व पुढील काळात करवीरकर यांना विरोध करु लागले होते. इ.स.१७८३ मध्ये सावंतवाडीकरांनी आपल्या लष्करात वाढ केली. कारण सावंत व पोर्तुगीज यांच्यात युध्द झाले होते. त्यामुळेच लष्करबळ आता २८०० पर्यन्त पोहचले होते. परंतु पोर्तुगीजांच्या पराभवाचे ध्येय समोर ठेऊन वाडीकरांनी आपली सैन्यसंख्या पुढील काळात ५००० केली होती. आणि ३००० पर्यन्त घोडदळ वाढविले होते. परिणामी वाडीच्या लष्करात नवचैतन्य संचारले होते. जयराम सावंतांचे वाडी सुलतानी म्हणत की " पूर्वी एक पोर्तुगीज सैनीक १० वाडीच्या शिपायांना जड जाई, पण आता एक वाडीकर शिपाई शंभर पोर्तुगीज शिपायांना भारी होऊ लागला आहे[3]". यावरुन सावंतवाडीकरांच्या सैन्याची ताकद वाढली होती असे दिसते. सावंतांच्या प्रत्येक सैनिकाच्या मनात विश्वास व धैर्य निर्माण झाले होते. पुढे १८१८ त राणी दुर्गाबाईने ही आपल्या सैन्यात २००० ने वाढ केली. म्हणजे वाडीकरांचे सैन्य दिवसेंदिवस वाढतच गेले. अनेक वर्षे सावंतवाडीकरांनी आपले लष्कर वाढविले नसते परंतु आपल्या राज्याच्या आसपासच्या सर्व बडया सत्ताधा-यांचा विचार करुन आपल्या राज्याच्या संरक्षणास धोका आहे, हे वाडीकरांनी ओळखले आणि नंतरच त्यांनी लष्करात वाढ केली होती.

खेमसावंत दुसऱ्याच्या काळात लष्करात वाढ करण्यास सुरवात केली व खेमसावंत तिसऱ्याच्या काळात सावंतांचे लष्कर बलाढ्य झाले. तिसरे खेमसावंत याने इ.स. १७९५ मध्ये बाबाजी पाटणकर याची सरसेनापती पदावर नेमणूक केली. बाबाजी पाटणकर याने सावंतांच्या लष्करात शिस्त निर्माण करून सुसूत्रता आणली. यावरून असे दिसते की १७ व्या शतकाच्या शेवटी शेवटी लष्कराचे महत्त्व सावंतांना वाटू लागले तत्पूर्वी त्यांनी लष्कराकडे दुर्लक्ष केलेले होते. परंतु १८ व्या शतकात मात्र वाडीकरांनी लष्कराकडे पूर्णपणे लक्ष केंद्रीत केले होते. १९ व्या शतकाच्या सुरवातीला सावंतवाडीकर इंग्रज सत्तेच्या छायेखाली होते. आणि १९ व्या शतकाच्या मध्यास सावंतांची पूर्ण सैन्यव्यवस्था इंग्रजांच्या ताब्यात गेली[४].

सावंतवाडीकरांचे घोडदळ :-

सावंतवाडीकरांच्या घोडदळात दोन प्रकार होते :-

१) बारगीर (पागा)

२) शिलेदार

१) <u>बारगीर</u> :- बारगीर म्हणजे सरकारच्या घोडेस्वार होय. हा विभाग अतिशय महत्त्वाचा होता. बारगीरास सरकारी घोडा व सरकारी हत्यार मिळत असे. याशिवाय सेवेचा मोबदला वेगळा दिला जात होता. सरकार बोलावील तेव्हा बारगीरांना हजर रहावे लागत असे.

२) <u>शिलेदार</u> :- शिलेदार म्हणजे स्वतःचे घोडे व स्वतःचे हत्यार असून सरकारी चाकरी करणारा घोडेस्वार होय. शिलेदारावर बारगीरांप्रमाणे एवढी बंधने नव्हती. त्यामुळे या विभागातील सैनिक मनापासून लढत नसावेत. कारण संपूर्ण लढण्याची सामुग्री त्यांना स्वतःने घ्यावी लागत असे.

सावंतवाडीकरांचे घोडदळ व शिवाजी महाराजांचे घोडदळ यात साम्य आहे. कारण शिवाजीच्या घोडदळातही वरील दोन प्रकार होते.

कदाचित शिवाजीचे पाहूनच सावंतवाडीकरांनी सुध्दा त्यांच्या धर्तीवर पायदळाची रचना केली असावी[५]. शिवाजीच्या लष्करी पध्दतीचेच अनुकरण काही प्रमाणात सावंतवाडीकरांनी केले होते असे दिसते.

<u>घोडदळाची रचना</u> :-

२५ स्वारांवर	१ हवालदार
५ हवालदारांवर	१ जुमलेदार
१० जुमलेदारांवर	१ हजारी
५ हजारीवर	१ पंचहजारी

सर्व पंचहजारीवर सरसेनापती असे. सावंतवाडीकरांच्या बहुतेक वेळी पावसाळ्यात मोहिमा बंद असत, अशावेळी राज्यात ठिकठिकाणी घोडदळ व पायदळ यांच्या छावण्या पडत असत. सावंतवाडीकर लष्करात लागणारे घोडे आयात करीत असत. कारण सावंतवाडी राज्यात घोड्यांची पैदास होत नव्हती. जर वाडीकरांना आपल्या घोडदळाची संख्या वाढविण्याची इच्छा झाली तर ते लगेच परदेशातून घोडे मागवून व आपले घोडदळ वाढवित असत. प्राचीन काळापासूनच सतत हिंदुस्थानात अनियंत्रित सत्ता असल्यामुळे प्रत्येक राजास आपल्या पदरी राज्यरक्षणासाठी घोडदळ बाळगावे लागत असे. व त्या लष्कराची व्यवस्था ठेवणे हे राजाचे प्रमुख कर्तव्य होते[६].

<u>वाडीकरांचे पायदळ</u> :-

सावंतवाडीकरांनी पायदळाकडे घोडदळापेक्षा जास्त लक्ष केंद्रीत केले होते. कारण राज्यातील संपूर्ण प्रदेश पर्वतमय होता. पर्वतमय प्रदेशात पायदळ अधिक उपयोगी ठरते, याचीही त्यांना जाणीव होती. याशिवाय वाडीकरांच्या किल्ल्यांच्या व ठाण्यांच्या संरक्षणासाठीही हजारो भरती करतांना वाडीकरांनी परकीय लोक देखील आपल्या सैन्यात भरती करून घेतले होते. पायदळाची रचना खालीलप्रमाणे असे :-

१) सरसेनापती	-	लष्कर प्रमुख
२) जमादार	-	२ हवालदार ताब्यात
३) हवालदार	-	५ नाईक ताब्यात
४) जुमलेदार	-	३ हवालदार ताब्यात
५) नायक	-	१० सैनिक ताब्यात
६) सैनिक	-	सर्वात कमी दर्जा

अशा प्रकारचे हुद्दे वाडीकरांनी आपल्या लष्करात निर्माण करून सुसूत्रता निर्माण केली होती. वाडीकरांचे पायदळ राणी दुर्गाबाईच्या काळात उच्चांकाचे म्हणजे जवळ जवळ ७००० च्या पुढे होते. स्वसंरक्षणाचा विचार करूनच इ.स. १८१८ त राणीने लष्कर वाढविण्याचा निर्णय घेतला होता[७]. वाडीकरांच्या लष्करातील घोडदळात असलेले शिलेदार कधीही एका सरकारला सोडून दुसरीकडे जात असत. कारण शिलेदारांना जिकडे जास्त मोबदला मिळे तिकडे जाऊन आपला फायदा उठविण्याचा शिलेदारांचा शिरस्ता होता. त्यामुळे वाडीकरांचे घोडदळ हवे तसे भरभक्कम नव्हते तर कमकुवतच होते. सावंतवाडीकरांनी शिवाजीप्रमाणे आपल्या सैन्याची विभागणी डोंगर, पर्वत, द-याखो-यांमधून मोठ्याप्रमाणात केलेली नव्हती परंतु जास्तीत जास्त महत्वाच्या डोंगर द-यांमधून सैन्याची विभागणी केली जात होती. शिवाजी महाराजांच्या सैन्याप्रमाणे सावंतवाडीकरांचे सैन्य परिणामकारक गनिमीकाव्याचा पध्दती लढतांना अवलंबित नसत. सावंतांच्या सैन्याला शिवाजीच्या सैन्याप्रमाणे हवे तसे प्रशिक्षणही उत्तम रितीने दिले जात नव्हते. या सर्व व्यवस्थापनाच्या कमतरतेमुळे लष्कर कमकुवतच राहिले व त्यामुळेच वाडीकरांना अपयश पत्करावे लागले. वाडीकरांचा घोडदळ हा विभाग अतिशय खर्चिक होता. घोडेस्वारांना पगारही पायदळातील सैनिकापेक्षा जास्त द्यावा लागत असे. त्यामुळे सैनिकांचे महाजिकच पगारही थकले होते[८].

लष्कराचा पगार :-

सावंतवाडीकरांच्या लष्करात सरदार, परदेशी, घोडदळातील बारगीर शिलेदार यांच्या वेगवेगळ्या तुकडया पडलेल्या असत. या लष्करातील सर्व सैनिकांना वाडीकर मासीक वेतन देत असत. परंतु सावंतवाडी राज्याचा कारभार जेव्हा १८३५ नंतर इंग्रज सरकारच्या वर्चस्वाखाली आला तेव्हा मात्र इंग्रजसरकारने वाडीकरांच्या लष्कराला वार्षिक वेतन देण्याची पध्दती सुरू केली. वाडीकर दरवर्षी जवळ जवळ ४४००० रू. लष्करावर खर्च करीत असत. ४४००० रूपयापैकी २१ हजार रूपये सैनिकांना रोख पगार रूपाने देऊन उरलेली पगाराची रक्कम मात्र सैनिकांच्या महसूलातून वजा केली जात होती. म्हणजे सैनिकांनी प्रत्यक्षात महसूलाची रक्कम भरण्याऐवजी ती त्यांच्या पगारातूनच वाडीसरकार कापून घेत असे. खालीलप्रमाणे लष्कराला पगार दिला जात होता[१].

१)	जमादार	-	२० रू. दरमहा
२)	हवालदार	-	८ रू. दरमहा
३)	नायक	-	६ रू. दरमहा
४)	सैनिक	-	५ रू. दरमहा
५)	स्थानिक सैनिक	-	४ रू. दरमहा

स्थानिक सैनिकांपेक्षा सावंतवाडीकरांच्या लष्करात बाहेरून येऊन भरती झालेल्या सैनिकांना जास्त पगार दिला जात होता. उदा. स्थानिक सैनिकास दरमहा ४ रू. तर परदेशी सैनिकास ५ रू. दरमहा पगार दिला जात होता. परदेशी सैनिकांच्या पगारातून महसूल कापून घेण्याचा प्रश्नच उद्भवत नसे कारण परराज्यात त्यांच्या जमीनी, घरे असल्यामुळे तेथील सरकारला ते महसूल देत असत. अशा-रितीने स्थानिक व परदेशी असे दोन प्रकार वाडीकरांनी आपल्या सैन्यात

निर्माण केले होते. वास्तविक पहाता असे लष्करात विभाग पाडणे सावंतांना धोक्याचे असतांनाही त्यांनी त्याचा विचारच केला नाही. परदेशी सैनिक फक्त पैसे मिळविण्यासाठीच लष्करात नोकरी करीत असत, जे काही वाडीकरांसाठी व त्यांना प्रत्येक लढाईत जय मिळवून देण्यासाठी कार्यक्षमता दाखवित नव्हते. तर त्यांच्या मूळच्या मायदेशावरच त्यांचे खरे प्रेम होते. याचा वाडीकरांनी तीळमात्रही विचार केला नाही त्यामुळेच वाडीकरांना ब-याच वेळा अपयश पदरात पाडून घ्यावे लागले[१०].

युध्दात वापरली जाणारी हत्यारे :-

सावंतवाडीकर युध्दात शत्रूविरोधी ढाल, तलवार, बरची, तिरकामठा, भाले, जंबिये, दारूगोळा इ. शस्त्रे वापरीत असत. त्यामुळे प्रत्येक सैनिकाला आपला बचाव करण्यास उपयोग होई. नैसर्गिकदृष्ट्या उंचसखल भागाचा, द-याखो-यांचा, जंगलांचा व किल्ल्यांचा आश्रय घेतला जात असे. सावंतवाडीकरांचे दारूगोळ्याचे कारखाने जरी नव्हते तरी ते पोर्तुगीजांकडून दारूगोळा घेऊन उपयोगात आणीत असे. अशारितीने हत्त्यारांचा विचार केला तर मराठ्यांच्या हत्यारांशी मिळती-जुळती अशी हत्यारे वापरली जात होती. इ.स.१८३५ नंतर मात्र वाडीच्या फोंडसावंताने आपल्या काळात लष्कराकडे लक्ष दिले नाही. कोणताही राजकर्ता किंवा सरकार जर तेथील लष्कराची काळजी घेत नसेल तर ते लष्कर तेथील राजकर्त्यांविषयी नाराज झाल्याशिवाय राहणार नाही. एवढेच नव्हे तर ते सैन्य कार्यक्षमतेने कार्यही करणार नाही. सावंतवाडीच्या राज्यकर्त्यांबाबत नेमके असेच घडले. वाडीकर सरकार लष्करातील सैनिकांची साधी चौकशी देखील करीत नव्हते. कामचुकार सैनिक व प्रामाणिक कार्यक्षम सैनिक यांच्यात कोणताही फरक देखील केला जात नव्हता[११]. सरकारकडून दुर्लक्ष होत असल्यामुळे वाडीचे सैन्य आपोआप आळशी बनले. पर्यायाने राज्याचे संरक्षणही धोक्यात आले. वाडीच्या लष्करातील एखादा

सैनिकाचे एखादे उत्कृष्ठ काम केले तर त्याला त्याचा मोबदला म्हणून बक्षीस देखील दिले जात नव्हते. आणि अशा सैनिकांचे कौतुकही केले जात नसे. त्यामुळे असे सैनिक सरकारवर नाराज होऊन आपोआप त्यांच्या कामात ढिलेपणा निर्माण होत असे. कामात कुचराई करणाऱ्या सैनिकास वाडीसरकार शासनही करीत नसे. सावंतवाडीसरकारने आपल्या लष्करावर नियंत्रण ठेवले नव्हते. वाडीच्या सरदारांना वाडीसरकार समान वागणूक देत नसे. उदा. एखादा सरदार सरकारने सांगितले कोणतेही काम करण्यास तयार असेल, तर एक काम संपल्यानंतर लगेच दुसऱ्या प्रकारचे काम सरकार त्याच्यासाठी तयार ठेवी व काम न करणारे सरदार आरामात रहात असतांना, सरकार त्यांचेबद्दल दखलही घेत नसे. परिणामी कार्यक्षम सरदार सावंतवाडीसरकारवर असंतुष्ट झाले. त्याचा परिणाम वाडीराज्याच्या संरक्षणावर झाला होता. अंतर्गत बंडाळीही यामुळेच सुरू झाली होती. तरीही सरकारच्या लवकर निदर्शनास आले नाही[१२].

अशी परिस्थिती असतांनाही लष्करातील काही अधिकारी असे होते की त्यांना राज्याच्या संरक्षणाची काळजी वाटत होती. हे अधिकारी स्वतः च कार्यक्षमतेने कार्य करीत असत आणि त्यांनी दिलेले आदेश लष्करातील सैनिकही निमुटपणे पाळीत असे. कारण हे अधिकारी आपापल्या तुकडीतील सैनिकांना लढाईत लढण्यासाठी नेहमी स्फूर्ती देत असत. थोडक्यात म्हणजे देशप्रेम असल्यामुळे राज्याच्या संरक्षणाची आपल्यावर घेतली होती. परंतु वाडीकरांच्या लक्षात आल्यावर लष्करात सुधारणा घडवून आणल्या.

लष्करातील सुधारणा :-

सावंतवाडीकरांनी सैन्यावर नियंत्रण न ठेवल्यामुळे संपूर्ण सैन्यव्यवस्था मोडकळीस आली होती. सैन्यातील गोंधळ अराजकता, असंतुष्टपणा घालविण्यासाठी आणि कार्यक्षम अशा सैन्यनिर्मितीसाठी

वाडीसरकारने खालील सुधारणा केल्या. सैन्यात असतांना जर सैनिक मृत्यू पावला तर त्याच्या जागी त्याच्या मुलाला नेमणूक दिली जात होती. आणि मृत्यू पावलेल्या सैनिकाच्या वारसांना इनामी जमीनही देण्याची सावंतवाडीकरांनी पध्दत सुरु केली.

१) अनियमित सैनिक, बारगीर, शिलेदार आणि सरदारांना वाडीसरकारने नोकरीतून कमी केले.
२) सावंतवाडी प्रांतीक बटालीयन स्थापन करण्यात आली[१३].
३) नव्याने ४६० सैनिक, ५ जमादार, २० हवालदार, ४० नायक व ५ स्थानिक सैनिक यांची सैन्यात भरती करण्यात आली.
४) सैनिकाला ५ रु. महिणा पगार देऊन त्यातून १ रुपया दारुगोळा किंमत म्हणून घेण्यात येऊ लागला. व खरा पगार फक्त ४ रु. ठरविण्यात आला.

वरील सुधारणा घडवून आणल्यामुळे लष्करात चैतन्य निर्माण झाले. लष्कराला स्थिरता प्राप्त झाली. आणि आपल्या लष्कराची कार्यक्षमताही अप्रत्यक्षरीत्या वाढली. परंतु निवृत्त होणाऱ्या सैनिकांना सावंतवाडीसरकार कोणत्याही प्रकारे निवृत्ती वेतन देत नव्हते ही खेदाची बाब होती. सावंतवाडीकरांची लष्करव्यवस्था १८३५ मध्ये इंग्रजांच्या हातात गेल्यानंतर त्यांनी अनियमित बटालियन ताबडतोब युरोपियन अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिली. त्यामुळे आता सावंतवाडी राज्याच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी इंग्रजसरकारवर पडली. इंग्रजांनी पाश्चिमात्य पध्दतीनेच वाडीलष्कराची पुनर्रचना केली. परंतु लष्करावर खर्च होणारा सर्व पैसा वाडीसरकारकडून घेतला जात होता. थोडक्यात म्हणजे वाडीच्या राज्यावर इंग्रजांनी पूर्णपणे आपले नियंत्रण बसविले[१४].

सावंतांच्या किल्ल्यांची व्यवस्था :-

सावंतवाडीकरांच्या लष्करी व्यवस्थेत किल्ल्यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. किल्ले होते म्हणूनच वाडीकरांच्या राज्याचे अस्तित्व टिकू शकले. किल्ल्यांचे महत्व राज्यकारभाराच्या दृष्टीने त्या काळात होते. किल्ल्यावरच परगण्याची व सुभ्याची कारभार केंद्रे असत. तेथूनच आसपासच्या मुलखाचा कारभार पाहिला जात असे. इतिहासात किल्ल्याचे महत्व सांगतांना "एक सशस्त्र माणूस किल्ल्याच्या सहाय्याने शंभर योध्यांशी लढू शकतो" असे म्हटले जात होते. त्यामुळेच सावंतवाडीकरांनी देखील किल्ल्यांना महत्व दिले होते.

वाडीकरांनी स्वतः व महादेवगड, हनमंतगड, नारायणगड, निवती, यशवंतगड (रेडीचा किल्ला) नरसिंहगड इ. किल्ले बांधले होते. डिचोलीचा किल्ला, मर्दनगड, भरतगड[१५] तेरेखोल किल्ला, आजोना किल्ला, महादेवगड हे किल्ले वाडीकरांच्याच ताब्यात होते. कुडाळ, बांदा, वेंगुर्ले, आवाडे, डिचोली हळर्ण, सावंतवाडी हे सात कोटही वाडीकरांनी बांधले होते. वरील किल्ले व कोट ताब्यात असल्यामुळेच केवळ वाडीकर आपल्या राज्याच्या सीमा वाढू शकले. व पुढील अडचणीच्या काळात राज्याचे अस्तित्व टिकवू शकले. किल्ले आणि कोट यांचे जर वाडीकरांच्या राज्याला संरक्षण नसते तर केव्हाच परकियांनी त्यांच्या राज्याचे अपहरण केले असते[१५].

किल्ल्यांच्या व कोटांच्या खर्चासाठी बहुतकरुन किल्ल्याच्या आसपासच्या गावांचा वसूल लावून दिलेला असे. त्याशिवाय सावंतवाडीसरकार आपल्या तिजोरीतूनही किल्ले व कोटांसाठी खर्चाची तरतूद करीत असत. पुढील काळात म्हणजे इंग्रजांनी त्यांच्या अमलात वाडीकरांचे बहुतेक कोट व किल्ले बळकावून घेतले तर काही पोर्तुगीजांनी घेतले. शेवटी इ.स.१८३२ मध्ये सावंतवाडीकरांकडे वाडी, कुडाळ, बांदा, आवाडे हे चार कोट

आणि हनुमंतगड, नारायणगड व नरसिंहगड हे तिनच किल्ले उरले. किल्ल्याचा कारभार पहाण्यासाठी व संरक्षणासाठी सावंतवाडीकरांनी प्रत्येक किल्ल्यात सुभेदार किंवा किल्लेदार या अधिका-याची नेमणूक केलेली असे. उदा. हलोर्ण किल्ल्याचा सुभेदार म्हणून गोमासावंत यास नेमले होते. तोच त्या किल्ल्याचा पूर्ण कारभार पहात असे[१६]. त्याचबरोबर प्रत्येक किल्ल्यासाठी हवालदाराचीही नेमणूक केलेली असे[१७]. मशालीवालेही नेमले जात होते. त्याचबरोबर घरकामासाठीही शागीर्दपेशावाले नेमलेले असत[१८]. वरील कोट-किल्ल्यांसाठी खालील लोकांची नेमणूक केली होती.

<u>बांदे कोट</u> :-	किल्लेदार	- १	वर्षासाठी
	कारखानीस	- २	रक्कम
	सैनिक	- ६५	१२४९ रुपये
	कुणबीण	- १	
कुडाळ कोट	किल्लेदार	- १	खर्च ७२०
	कारखानीस	- १	
	सैनिक	- २०	व कुणबीन - १
आवाडे कोट	सैनिक		खर्च १७३
हनुमंतगड	किल्लेदार	- १	कारकून - ३ कीर्तनी - २
	कोठवळा	- १	सैनिक - ४७ कुणबीण - २
			खर्च - ३००० रु.

किल्ल्याचे प्रशासन सेनापती राजाच्या कारभारामार्फत (प्रधान) करीत असे किल्ल्यातील सैनिकांच्या हजेरीची वेळ पहाट ठरविलेली होती. किल्ल्यातील लोकांच्या हजेरीचा रिपोर्ट दररोज सेनापतीकडे पोहचविला जात होता. परंतु पुढे ब्रिटीशांनी संस्थानचा कारभार हाती घेतल्यावर मात्र किल्ल्यातील लष्कर, तोफा काढून घेतल्या व तेव्हापासून किल्ले व कोट नामशेष झाले. इंग्रजांच्या काळात किल्ले व कोट यांना महत्त्व


उरले नाही. इंग्रजांनी किल्ले ताब्यात घेण्यापूर्वी मात्र किल्ल्यांना सावंतवाडीराज्याच्या संरक्षणाची दृष्टीने अत्यंत महत्वाचे स्थान होते. कारण किल्ला म्हटले की डोंगर, पर्वत, यावरच सर्वसामान्यपणे बांधले जात, त्यामुळे परकीय शत्रूपासून संरक्षण करणे त्यांना शक्य होई. काही महत्वाच्या किल्ल्यांची माहिती खालीलप्रमाणे देता येईल.

१) <u>मनोहरगड</u> :- मनोहरगड सावंतवाडी शहरापासून उत्तर-पूर्वेला १४ मैलाच्या अंतरावर आहे. हा किल्ला   मैल लांबीच्या व अरुंद अशा शिखराच्या दोन रांगांनी बनलेला आहे. या किल्ल्याची उंची २,५०० फूट आहे. व लांबी ४४० यार्ड आहे. या किल्ल्याला एकच प्रवेशव्दार आहे. करवीरकरांनी हा किल्ला सावंतवाडीकरांकडून काही दिवस घेऊन पुन्हा वाडीकरांनी परत घेतला. हा किल्ला सावंतवाडी राज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा होता.[१९]

<u>कुडाळचा किल्ला :-</u>

सावंतवाडी राज्यातील दुसरा महत्वाचा किल्ला म्हणजे कुडाळचा किल्ला होय. सावंतवाडीपासून उत्तर-पश्चिमेस १३ मैल अंतरावर आहे. या किल्ल्याची लांबी १६० यार्ड आहे. किल्ल्याच्या सर्व बाजूंनी खंदक खोदला होता. किल्ल्याचे बांधकाम पूर्णतः चिखल व दगडात केलेले आहे. परंतु नंतर हा किल्ला मोडकळीस आला, कारण शत्रूनी ब-याच वेळा हल्ले चढविले होते. किल्ल्यात क्यातिसदाराच्या कचेरीची इमारत बांधली होती. लष्कर व इतर नोकरांना पाण्याची सोय व्हावी यासाठी सावंतवाडीकरांनी किल्ल्यात विहिरे खोदलेली होती[20].

<u>बांद्याचा किल्ला</u> :- हा किल्ला सावंतवाडीपासून सात मैल दक्षिणेला आहे. तेरेखोल नदीच्या डाव्या किना-यावर हा बांधला होता. हा किल्ला देखील अर्धा चिरेबंदी व दगड व अर्धा चिखलदगडाचा बांधला आहे. किल्ल्याची लांबी १०० यार्डस् आहे या किल्ल्यात कुडाळच्या किल्ल्याप्रमाणे विहीर नाही.



रेडुडीचा किल्ला :- हा किल्ला सावंतवाडीच्या पश्चिमेला समुद्रकिना-यावर बांधलेला आहे. शेजारीच रेडुडी गांव वसलेले आहे. दक्षिणेला तेरेखोलवाडी किल्ला आहे. रेडुडीच्या किल्ल्याला राज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने फार महत्व होते. कारण समुद्रमार्गे येणा-या शत्रूंचा बंदोबस्त करणे सावंतवाडीकरांना या किल्ल्यामुळे सहज शक्य होत असे.

कोणत्याही राज्याचे संरक्षण करण्यासाठी किल्ल्यांची नितांत आवश्यकता असते हे इतिहासावरुन समजते. शिवाजी महाराजांनी देखील राज्याच्या संरक्षणार्थ अनेक गड, कोट, कील्ले बांधले व नेहमी डागडूजीही केली. त्याप्रमाणे सावंतवाडीकरांनाही राज्याच्या संरक्षणासाठी किल्ले व कोट बांधावे लागले होते. कारण सावंतवाडी राज्याच्या चोहोबाजूंनी वाडीकरांचे शत्रू होते. तेव्हा या किल्ल्यांमुळेच वाडीकर राज्याचे संरक्षण करु शकले. किल्ल्यांमुळे शत्रूविरोधी लढण्यासाठी सैनिकही संख्येने कमी लागतात. सावंतवाडीकर शत्रूने पाडलेल्या किल्ल्यांची वेळोवेळी डागडुजी करीत असत. किल्ल्यामुळे इतर प्रशासन पहाण्यास सुलभ होत असे. किल्ल्यांच्या वाटा, दरवाजे, बुरुज अतिशय अडचणीचे असल्यामुळे परकीय शत्रूला एकदम अचानक हल्ला करणे शक्य होत नसे. उदा. पोर्तुगीजांना अचानक हल्ला करणे शक्य होत नव्हते, कारण सावंतवाडीकरांचे किल्ले अतिशय दुर्गम ठिकाणी बांधलेले होते.

सावंतवाडीकरांच्या लष्करी व्यवस्थेत किल्ल्यांचे महत्व अनन्यसाधारण आहे. कारण किल्ले बांधले म्हणूनच राज्याची वाढ करता आली. याच किल्ल्यांनी अनेकवेळा सावंतवाडीकरांच्या आयुष्याचे रक्षण केले. किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी किल्लेदार, कारखानीस, सरनोबत हवालदार, यांच्यावर असे सावंतवाडीकरांना किल्ल्यांचे महत्व पूर्णपणे समजले होते. म्हणूनच त्यांनी किल्ल्यांची डागडूजी केली व नवीन किल्ले बांधले होते. किल्ल्यामुळे राज्याला बळकटी येते असे वाडीकरांचे मत होते.

सावंतवाडीकरांचे आरमार :-

सावंतवाडीकरांचे राज्याची पश्चिमेकडील सिमा म्हणजेच अरबी समुद्राच्या संपूर्ण दक्षिण किनारा होय. इ.स. १७९३ पर्यन्त त्यांनी संपूर्ण दक्षिण समुद्र किनारा आपल्या ताब्यात घेतला होता. या किना-याचे संरक्षण करण्यासाठी सावंतवाडीकरांना आरमार उभारणे आवश्यक झाल्यामुळेच त्यांनी आरमार उभारले. यावेळी ख-या अर्थाने युरोपियन लोकांचीच सागरावर स-ता चालत होती, त्यात इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच हे प्रमुख होते. मोगली स-ता मात्र याबाबत पिछाडीला होती. अकबरापासून औरंगजेबापर्यन्तच्या मोगल बादशहांना सागरावर आपले वर्चस्व निर्माण करता आले नव्हते. दक्षिणेकडील आदिलशहाचीही तीच अवस्था होती. अशा वेळी सावंतवाडीकरांनी आरमाराचे महत्व ओळखून आरमार बांधले. ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र असा त्यावेळी समज होता. आरमार हे वाडीकरांच्या लष्करी व्यवस्थेचे हे एक अत्यंत महत्वाचे वैशिष्ठये मानले जात होते.

जहाजांचे प्रकार :-

सावंतवाडीकरांच्या आरमारात पुढील जहाजे होती :-

१) गुराब (२) गलबत

गुराब :- लक्ष्मीप्रसाद, भवानीप्रसाद, साडेबलदर

गलबत[२१] :- रामबाण, रघुनाथ, दुर्गा, यशवंती लक्ष्मी इ.

या दोन प्रमुख प्रकाराव्यतीरिक्त इतर प्रकारचीही जहाजे आरमारात होती.

१) तरांडे

२) मचवा

३) पाल

४) पारंग

५) मचेले

६) होडी

७) तारवे

वरील जहाजांच्या सहाय्यानेच सावंतवाडीकर राज्याचे संरक्षण करीत व व्यापारही चालत असे. जहाजांच्या सहाय्यानेच सावंतवाडीकर समुद्रावर चाचेगिरी करीत उदा. इ. स. १७४० मध्ये जयराम सावंताने एक लहानसे आरमार तयार केले. व त्या आरमाराच्या सहाय्याने तो चाचेगिरी करू लागला. गोव्यातून पोर्तुगीजांची नोकरी सोडून पळून आलेल्या पोर्तुगीज शिपायांचे त्यांनी एक पथक उभारून आपल्या राज्यात कवायतीचा उपक्रम सुरू केला[२२].

आरमारबांधणी केंद्र :-

आरमार उभारण्यासाठी सावंतवाडीकरांनी स्वतंत्र जागा निवडून ते आरमार उभारणी केंद्र सुरू केले. हे केंद्र कालींनदीत सुरू केले होते. इ. स. १७४८ मध्ये या नदीत वाडीकरांनी तारवे बांधण्यास सुरवात केली. या नदीत गुप्त ठिकाणी तारवे उभारले जात होते. हे ठिकाण सर्वांना अज्ञात होते. शत्रूला त्याचा सुगावा लागू नये अशी व्यवस्था करण्यात आली होती. या केंद्राच्या संरक्षणासाठी नदीच्या तीरावर चौहोबाजूंनी तोफा ठेवण्यात आल्या होत्या. तारवे (जहाज) तयार झाल्यानंतर ते आरमार प्रमुखाच्या ताब्यात दिले जात असे. इ. स. १७५१ मध्ये सावंतवाडीकरांच्या आरमाराचा प्रमुख हिरोजी नाईक होता. आरमार प्रमुखाच्या ताब्यात सर्वप्रकारचे लढाऊ जहाजे असत. आरमार प्रमुखाला सरसुभेदार असा सुद्धा होता उदा. हिरोजी नाईकानंतर राम येसू या रफू येसूच्या मुलाला खेमसावंत भोसले यांनी इ. स. १७६८ मध्ये आपल्या आरमाराचा प्रमुख म्हणूनच सरसुभेदार पदी नेमले होते[२३].

सरसुभेदारास आरमारासंबंधी सर्व अधिकार असत. परंतु फक्त लढाऊ जहाजांच्या बाबतीत त्याला सर्व अधिकार असत. शत्रूबरोबर दोन हात करण्याची वेळ आली तर त्यालाच संपूर्ण नियोजन करावे लागत असे. व शेवटी कारभारी किंवा प्रधान लक्ष घालीत असे. पोर्तुगीजांना सावंतवाडीकरांच्या आरमार उभारणी केंद्राचा सुगावा लागताच त्यांनी इ.स. १७५१ मध्येच हाती आलेले तीन लढाऊ मचवे पकडून आपल्या हद्दीत नेले.

सावंतवाडीकरांनी स्वतःचे आरमार उभारले खरे परंतु पोर्तुगीज व इंग्रज या परकिय सत्तांचेआरमार मात्र वाडीकरांच्या आरमारापेक्षा श्रेष्ठ व शक्तीशाली होते. त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांचेही म्हणजे मराठ्यांचे आरमारही त्यांच्याआरमारापेक्षा बलाढ्य होते. त्यामुळेच प्रारंभी पोर्तुगीजांनी व नंतर ब्रिटीशांनी सावंतवाडीकरांवर आपापले वर्चस्व निर्माण केले होते. ज्याप्रमाणे इंग्रज व पोर्तुगीज यांनी आपल्या आरमारात वेळोवेळी आधुनिक पध्दतीनुसार बदल घडवून आणाले त्यानुसार सावंतवाडीकरांनी मात्र आपल्या आरमारात आधुनिक तंत्राचा वापरच केला नाही. परिणामी त्यांच्या आरमारी शक्तीत त्यांना हवे तसे यश मिळविता आले नाही. कारण आजूबाजूच्या सर्व सागरीसत्तांचे आरमार बलवान होते. जर सावंतवाडीकरांनी पायदळ, घोडदळ, यापेक्षा आरमारावर आपले लक्ष केंद्रीत केले असते व आधुनिक तंत्रज्ञान वापरले असते तर मात्र त्यांचे आरमार अतिशय भक्कम पायावर उभे राहिले असते व त्यांना मग परकियांशी व स्वकियांशी यशस्वीरित्या तोंड देता आले असते.

सावंतवाडीकरांचे आरमार ख-या अर्थाने दुस-या खेमसावंताच्या काळातच विकसित झाले होते. इ.स. १६९५ मध्ये खेमसावंताजवळ ८ लढाऊ गलबते[२४] आणि बरेच व्यापारी जहाजे ही होती. लढाऊ गलबतांच्या सहाय्याने आपल्या राज्याला लागून असलेल्या समुद्रकिनारपट्टीचे संरक्षण केले जात होते व व्यापारी जहाजे माल इतर राज्यात वाहून नेत असत व इतर राज्यातील माल आपल्या राज्यात वाहून आणीत असत.

म्हणजे इतर राज्यांशी वाडीकरांचा जहाजांच्या सहाय्याने व्यापार चालत असे. व्यापारी जहाजे इतरांकडून लुटले जाऊ नयेत याचीही सावंतवाडीकर काळजी घेत असत. जहाजांच्याच मदतीने काली नदीसारख्या मोठ्या नद्यांमधूनही वाडीकरांचा व्यापार उदीम चालत असे.

लढाऊ जहाजांच्या सहाय्यानेच खेमसावंत समुद्रावर चाचेगीरी करीत असे. चाचेगीरी म्हणजे समुद्रातून इतर परकियांचे व्यापारी मालवाहु जहाज माल वाहून नेत असतांना त्याच्यावर धाड घालून ते पकडून लुटायचे व त्यातील माल हस्तगत करून संपत्ती मिळवावयाची, असा खेमसावंतांचा खाक्या होता. खेमसावंतच नव्हे तर सावंतवाडीतील जवळ जवळ ब-याच राज्यकर्त्यांनी चाचेगीरीचा व्यवसाय चालू ठेवला होता. कारण त्यापासून पुष्कळ आर्थिक फायदा मिळत असे. परंतु चाचेगीरी करीत असतांना चाचेगीरीचा दुष्परीणाम मात्र सावंतवाडीकरांच्या लक्षात येत नव्हता. तो म्हणजे व्यापारी जहाजे लुटल्यामुळे किंवा त्यांना त्रास दिल्यामुळे आपले परकियांशी असलेले संबंध बिघडतील. प्रारंभी तर केवळ सावंतवाडीकरांच्या चाचेगीरीमुळेच पोर्तुगीज व इंग्रज या परकिय स-तांशी वाडीकरांचे वाकडे आले. यामुळेच उभयंतामध्ये संघर्ष निर्माण झाले व त्याचे विपरीत परिणाम असे झाले की पोर्तुगीज व इंग्रज यांनी वेळोवेळी अनेक अन्यायकारक, अपमानकारक अशा अटी असलेले तह सावंतवाडीकरांवर लादले. वाडीकरांनी सुध्दा ते सर्व तह निमुटपणे मान्य केले. कारण त्याशिवाय त्यांना दुसरा पर्याय नव्हता. परकीय स-तांनी लादलेले तह झुगारून देण्यासाठी सावंतवाडीकराजवळ परकीयांपेक्षा बलाढ्य असे आरमार नव्हते. त्यामुळेच सावंतवाडीकरांना त्यांनी हळू हळू दुर्बल बनविले. आणि शेवटी इंग्रज पोर्तुगीजांना सरसे होऊन त्यांनी सावंतवाडीचे राज्य पूर्णपणे घशात घातले. सावंतवाडीकरांनी जरी चाचेगीरी केली नसती आणि इंग्रज व पोर्तुगीज यांच्याशी संबंध चांगले ठेवण्याचे धोरण अवलंबिले असते तरी तरी सुध्दा पुढील काळात इंग्रजांच्या साम्राज्य विस्ताराच्या धोरणात सावंतवाडीकरांना बळी पडावेच लागले असते.

१६ नोव्हेंबर १७४६ मध्ये पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांच्या ताब्यात असलेल्या तेरेखोल वर हल्ला केला, कारण तेरेखोल, बारदेश ताब्यात असणे त्यांना आवश्यक होते. त्यामुळेच त्यांच्या राज्याचे मराठ्यांपासून संरक्षण होणार होते. तेरेखोलवरील हल्ल्यात पोर्तुगीजांच्या १५ ते २० तोफा असलेले दडा, पाल, १७ गलबते, ३ बतेले, एक लढाऊ मचवा चार पारंगा, काही, होड्या, इतक्या जहाजांचा त्यात समावेश होता[२५]. यानंतर एकच महिन्याने म्हणजे डिसेंबरमध्ये पोर्तुगीजांनी सावंतवाडीकरांचा आपल्या आरमाराच्या जोरावर रेड्डी किल्ला व बंदर घेतले. यानंतर आरमाराच्याच शक्तीवर पुढे १७४८ मध्ये पोर्तुगीज आरमाराचा कॅप्टन इस्मालखानने सावंतवाडीकरांच्या निवतीच्या किल्ल्यावर पोर्तुगीज निशाण लावले[२६].

निवतीचा किल्ला घेतल्यानंतर कालींच्या नदीत वाडीकर तारवे बांधीत असल्याची माहिती पोर्तुगीजांना कळली तेव्हा त्यांच्या कॅप्टन इस्मालखानाने व्हाईसरॉयची परवानगी घेऊन लगेच काली नदीकडे कूच केले. तेथे जाऊन सावंतवाडीकरांचे सर्व तारवे जाळून टाकली. सावंतवाडीकरांनी मोठ्या कष्टाने ही तारवे उभारली होती. परंतु पोर्तुगीजांनी एका क्षणात काहीही विचार न करता ती तारवे नष्ट केली. पोर्तुगीजांनी वाडीकरांचे आरमार नष्ट केले. त्यानंतर वाडीकरांनी पुन्हा ताबडतोब काली नदीत नव्याने आपले आरमार उभारण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्यांना अपयश पत्करावे लागले. सावंतवाडीकराचे आरमार नष्ट करणारा इस्मालखान हा पूर्वी वाडीकरांच्या पदरी नोकरीस होता. परंतु वाडीकरांचे तारवे त्याने पोर्तुगीजांच्या पदरी असल्यामुळे व पोर्तुगीजांवर त्याची निष्ठा असल्यामुळे नष्ट केली होती. पोर्तुगीजांच्या जाचामुळे सावंतवाडीकर मेटाकुटीस आले होते.

त्यांचे आरमार नष्ट केल्यानंतर थोडी गलबते पुन्हा निर्माण करून त्यांचा तळ रेड्डीच्या नदीत दिला. वाडीकरांच्या आरमारावर वेळोवेळी संकट आले, त्यातून वाचविण्याचा त्यांनी सतत प्रयत्नही केला परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. वाडीकरांनी सतत पहाता आरमाराचा पूर्णपणे उपयोग करून घेतला. आरमारामुळेच त्यांचे संरक्षणही बराच काळ झाले. आरमारामुळेच वाडीकरांना काही काळ समुद्रावर चाचेगीरी करता आली.

१ MHS, U.B, p.295-296.

२ महसा, पोद, खं. २, पत्र ७५ पृ. ११२.

३ पोमतं, पिसुर्लेकर, पृ. २०७

४ महसा, पोद खं-२ पत्र ७५ पृ. ११२.

५ फारैन डिपार्टमेंट, नॅ. आॅ. आॅ. इंडिया, दिल्ली, पृ. ३२-३३.

६ फॉडि, नॅआॅइ, दिल्ली, पृ. ३२-३३.

७ फॉडि, नॅआॅइ, दिल्ली, पृ. ३३.

८ कि-ता.

९ कि-ता.

१० कि-ता.

११ कि-ता.

१२ कि-ता.

१३ कि-ता.

१४ कि-ता.

१५ शिपसा, खं. १३ लेख ८१ १९६४-६५

१६ निट, अ. १३२७.

१७ वर्दे, सांसहसा, लेख-७१, पृ. ५४.

१८ पिसुर्लेकर, पोमत, पृ. २९८.

१९ Courtney and Auld, Memoir on Sawantwadi state, p.33.

२० Courtney and Auld, Memoir, p.34-35.

२१ Ratnagiri and Sawantwadi Gazetteer, p.387, 1885, Bombay.

२२ पिसुर्लेकर, पोमतं, पृ. २०७

२३ वर्दे, सांसहसा, लेख. ५८, पृ. ४३.

२४ Pissurlencar, Assentos, IV.p.496-97.

२५ Epenaphora, Parte III.p.27.

२६ कि-ता, V., P.73.

सामाजिक-आर्थिक विभाग

प्रकरण १० वे

सामाजीक परिस्थिती

मध्ययुगीन काळाच्या शेवटापर्यन्त हिंदूस्थानातील एतद्देशीय राज्यपध्दतीत सामाजीक जीवन स्पष्टपणे वेगळया स्वरुपात दिसून येत नाही. याचे कारण तत्कालीन समाज हा क्वचितच जागृत अवस्थेत आढळतो. समाजात राजा हाच सर्व गोष्टींचा सुत्रधार मानला जाई. राजा हा ईश्वराचा अंश असल्यामुळे तो सर्वांचे कल्याण करणारा आहे. अशीच कल्पना रूढ होती. यावरून राजाचे महत्त्व जनमानसात मोठ्या प्रमाणावर होते. सावंतवाडी राज्यातही राजालाच महत्त्व प्राप्त झाले होते. प्रत्येक राजाची कारकीर्द परंपरेनुसार चालत आलेली आढळते.

विविध धर्मांचे लोक :- सावंतवाडी राज्यात हिंदू, मुस्लीम, जैन, ख्रिश्चन या धर्मांचे लोक रहात होते त्यांची भाषा मराठी व उर्दू होती. मराठी भाषा त्याकाळी कुडाळी भाषा म्हणून संबोधीले जात होते. ख्रिश्चन लोक मात्र मराठी व पोर्तुगीज या दोन भाषा मिश्रीत बोलत असत.

हिंदू धर्मात अनेक जाती होत्या. त्यातील महत्त्वाच्या जाती खालील प्रमाणे आहेत.

शुद्र, ब्राम्हण, मराठा, वाणी व अनेक उपजाती होत्या.

ब्राम्हण हे धार्मिक कार्य, भविष्य म्हणजे जोतीशीचे कार्य व कारकुनीचे काम करीत असत आणि मराठे सैन्यात भरती होत असत. मराठे शेतीही करीत असत. वाणी लोक मात्र व्यापार करीत तर शुद्र मजूरी करीत असत.

सावंतवाडी संस्थानात वेगवेगळया धार्मीक पध्दती होत्या उदा. संस्थानातील कुणकेरी गांवची ग्रामदेवता श्री.भावई हिच्या आज्ञेने श्री.भवानीस नवस म्हणून जमीन दिलेली होती. गावांतील कोणतीही जमीन देवतेस द्यावयाची असल्यास गावक-यांच्या बैठकीत ठराव पास होऊनच ती जमीन दिली जाई. हा ठराव पास होण्याच्या वेळी महार

गांवकरीही हजर रहात व ठरावावर सह्या करीत. म्हणजेच महार गांवकरी प्रत्येक सामाजीक किंवा धार्मीक कृत्याला हजर रहात असत असे दिसते. सावंतवाडी राज्यात वरील गोष्टीवरुन जातीयता नसावी असेही वाटते. जर जातीयवाद असता तर महार गांवक-यांना कोणत्याच सामाजीक किंवा धार्मीक कृत्यास पाचारण केले नसते. गांवच्या कारभारातही महारांना मानाचे स्थान होते. इतर राज्यात महारगांवक-यांवर जे अन्याय होत असत, त्यांची पिळवणूक केली जात असे, अशी वागणूक वाडीच्या राज्यात महारांना दिली जात नव्हती[१].

<u>सण</u> :- सावंतवाडी राज्यातील लोक वर्षभरात बरेच सण साजरे करीत असत. उदा. हिंदू लोक मकर संक्रांत , होळी, नागपंचमी, नारळी पोर्णिमा, गणेश चतुर्थी, दसरा आणि दिवाळी, शिवरात्र, रामनवमी, आषाढी एकादशी, गोकूळअष्टमी, कार्तीकी एकादशी ख्रिश्चन धर्माचे लोक मात्र वर्षातून एकच सण म्हणजे २५ डिसेंबरचा ख्रिसमस सण साजरा करीत असत. सणाच्या निमि-ताने सजावट केली जात होती.

परंपरेनुसार वाडी राज्यात एकत्रकुटूंब पध्दत चालत आलेली होती. एखाद्या कुटूंबामध्ये काही कारणास्तव तंटे निर्माण झाल्यास कुटूंबातील भाऊ लगेच वेगळे होऊन आपली संप-ती किंवा मालम-ता भावांमध्ये वाटून घेत असत. परंतु त्याचबरोबर वडिलांनाही एक हिस्सा ठेवीत असे म्हणजे आज ती कुटूंबपध्दती आहे तीच पध्दती पूर्वी सावंतवाडी राज्यातही अस्तित्वात होती. आज ज्या पध्दतीने कुटूंबातील कलहामुळे विभाजन होते, त्याचपध्दतीने पूर्वी वाडीच्या राज्यातील कुटुंबाचे विभाजन होत असे. उदा. डिचोलीचे राम शेणवी कोठारीया यांचे कुटुंबात मुलांचे एकत्र जमेना म्हणून सर्व मालम-तेचे समान वाटप करुन कुटुंबाचे विभाजन करुन दिले व स्वत:च्या उपजिविकेसाठीही एक हिस्सा ठेवला होता. संपूर्ण वाडीच्या समाजात वरीलप्रमाणेच कौटुंबिक स्थिती होती[२].

राज्यातील स्त्रियांची स्थिती :-

स्त्रियांना सावंतवाडी राज्यात समाजात पुरूषाप्रमाणे स्थान नव्हते. त्यांना शिक्षणही मिळत नसे. स्त्रिया नेहमी अनेक बंधनांनी जखडलेल्या असत. त्यांना पुरूषाप्रमाणे स्वातंत्र्यही उपभोगता येत नव्हते. सावंतवाडी राज्यात सतीची चालही अस्तित्वात होती. विनाकारण इच्छा नसतांनाही स्त्रिया पती वारल्यानंतर प्रेताबरोबर तिला सती जावे लागत असे. सती जाणे म्हणजे जीवंत स्त्रीची निघृण हत्या केली जात होती. जर स्त्रीची सती जाण्याची इच्छा नसेल तर तिला तिच्या पतीच्या चितेत जबरदस्तीने लोटून दिले जात असे.

परंतु जेव्हा इ.स.१८२९ मध्ये इंग्रजांनी सती बंदीचा कायदा पास करून सतीची चाल बंद केली. तेव्हा मात्र वाडीच्या राज्यातील सतीची चाल बंद होऊ लागली. आणि यानंतर हळू हळू स्त्रियांचे समाजातील स्थान उंचावु लागले. तरीसुध्दा स्त्रियांना आजच्याप्रमाणे पूर्ण स्वातंत्र्य नव्हते. स्त्रियांना पुरूषापेक्षा कमीच लेखले जात होते. परंतु १८३४ नंतर मात्र स्त्रियांचा समाजिक दर्जा सुधारत गेला. त्यांना समाजात मानमरातब मिळू लागला[3].

विवाहपध्दतीतील दोष :-

सावंतवाडी संस्थानातील समाजात मुला-मुलींचा विवाह ठरत असतांना मुलीचे वडील मुलाच्या पक्षाकडून पैशांची मागणी करीत असत. म्हणजे त्यावेळी तेथे मुलाचे वडिल मुलीच्या वडिलांकडे मुलीचा हुंडा देत असे. हुंडा हा शब्द जरी त्याकाळी प्रचलीत नव्हता तरी मुलीचे वडील मुलगी देणेच्या बदली पैसे घेत असत. मुलीच्या वडिलांना पैसे दिले तरच मुलगी मिळत असे. यावरून स्त्रियांचे पुरूषापेक्षा प्रमाणही कमी होते असे दिसते. आज मात्र मुलीचे वडिल मुलाला मुलगी देऊनही देणगीच्या स्वरूपाने

पैसे देतात व त्या देण्गीस समाजात "हुंडा" असे म्हणतात.

पैसे घेण्याची पध्दती बंद करणेसाठी मराठ्यांचा राजा राजाराम याने सावंतवाडीकरांना पत्र लिहुन कळविले होते की, पैसे घेण्याची प्रथा पूर्णपणे बंद करणे. एवढेच नव्हे तर, जर एखाद्या मुलीच्या वडिलाने पैसे घेतल्याची बातमी कळली तर त्यास जबर शासन करण्याचीही परवानगी होती. म्हणजे सुरु झालेली देण्गी घेण्याची समाजातील रुढी बंद करण्याचाही सरकारने प्रयत्न केला होता. यामुळे ज्या मुलीच्या वडिलांजवळ पैसे नसे, त्याचा विवाह लांबणीवर पडत असे किंवा जमीन विकून लग्न करावे लागत असे[४].

भावीण पध्दती :- सावंतवाडी राज्यात भावीण होण्याची पध्दती समाजात प्रचलीत होती. भावीण म्हणजे दासी होय. ब-याच स्त्रिया भावीण बनून राजाची चाकरी करण्याचा मार्ग अवलंबीत असत. राजाची चाकरी करणे हेच भावीणीचे ध्येय ठरलेले होते. भावीण व्हावयाचे असेल तर स्त्रीला पहिल्यांदा सरकारची म्हणजे राजाची कायदेशीर परवानगी घ्यावी लागत असे. राजाने लेखी परवानगी दिली, म्हणजे त्यास आज्ञापत्र म्हणत असे, ते मिळाल्यानंतर देवाला तेल वाहुन भावीण बनत असत. भावीणीला राजा पोटगी देत असे. उदा. कुसबे गावातील एका स्त्रीने स्त्रीजे व नरडवे गावातील गुणा ढवळ भंडारी याची मुलगी, भिकली हिने मौजे मारी येथे येऊन देवाला तेल वाहिले सरकारकडे आज्ञापत्र मागितले ते मिळाल्याबरोबर तेव्हापासून त्यां स्त्रियांनी भावीणी झाल्याचे जाहीर करुन राजाची चाकरी करण्यास प्रारंभ केला. तरुण मुलीही स्वत: होऊन भावीणपण स्विकारीत असत. सावंतवाडीकरांनी त्यामुळे एक कायदाच काढला होता की ज्यानुसार असे जाहिर करण्यात आले होते की, कोणतीही स्त्री स्वेच्छेने जर भावीण होत असेल तरच तिला भावीण होण्यास परवानगी दिली जाईल[५].

कुणबीणीची खरेदी-विक्री :-

१८ व्या शतकाच्या पूर्वी व सुरवातीला सावंतवाडी संस्थानात कुणबीणींची खरेदी विक्री चालत असे कारण कुणबी व कुणबीण यांना तत्कालीन समाजात स्थानच नव्हते. त्यांना समाजामध्ये गुलाम म्हणूनच वागविले जाई व तेही गुलाम म्हणूनच रहात असत व कामही करीत असत.

कुणबीणी सर्व जाती धर्मांतील असत. मुस्लीम धर्मांतील स्त्रिया देखील कुणबीणीचे काम करीत असत. त्यामुळे त्यांचीही खरेदी विक्री होत असे. राज्यात श्रीमंत लोक कुणबीण खरेदी करून किंवा गुलाम म्हणून ठेवून तिच्याकडून घरातील शेतावरील सर्व प्रकारची कामे करून घेत होते. उदा. कुणबीण रखमाबाई हिची मुलगी बनामसई हिची खरेदी फक्त ८ रू. ला केली होती.

पेशव्यांच्या राज्यात देखील सावंतवाडी संस्थानाप्रमाणेच कुणबीणीच्या खरेदी-विक्रीची पध्दत चालत आलेली होती. समाजात या कुणबीण स्त्रिला शून्य स्थान होते. ज्याच्या घरी गुलाम म्हणून रहात तेथे सर्व काम करावे लागत असे व मोबदला काहीही मिळत नसे. समाजात त्यांना गुलाम म्हणूनच वावरावे लागे. जनावरांप्रमाणे त्यांची खरेदी विक्री होई[८].

सावंतवाडी संस्थानात अनेक जुन्या परंपराही अस्तित्वात होत्या. उदा. विसाजी महादेव यांच्या स्वप्नात परमेश्वर आला, त्याने तिसरे खेमसावंताची वागणूक सुधारावी असा उपदेश केला. त्यानुसार विसाजी महादेव यांनी तिसरे खेमसावंत यांना पत्र लिहिले त्या पत्रात स्वप्नातील सर्व खुलासा करून कळविले की श्रीदेव नारोबा वालावल यास नारळ वाहावे व श्रीचा प्रसाद घ्यावा आणि तो देवाचा प्रसाद घेण्यासाठी सदाशिव अनंत यासच पाठवावे राजश्री नाना कुशालकर वेदशास्त्र संपन्न यांच्या सिधमानेच प्रसाद घ्यावा असे कळविले. विसाजी महादेव हे थोर वेदशास्त्रज्ञ असे ब्राम्हण होते. यानुसार राजानेही तसे अनुकरण केले.

यावरून असे आढळून येते की, तत्कालीन समाजात स्वप्न किंवा भास या गोष्टींना अतिशय महत्त्व प्राप्त झालेले होते, व त्यानुसार कृत्यही केले जात होते. तिसरे खेमसावंताच्या राजवटीत जनतेची पिळवणूक होत होती, सर्वत्र भ्रष्टाचार माजला होता. सर्वत्र अन्याय होत होता. त्याला आळा घालण्यासाठी म्हणूनच विसाजी महादेव या ब्राम्हणाला वरील स्वप्न पडले होते. अशा अनेक गोष्टी सांगता येतील की ज्या परंपरांवर आधारीत होत्या[७].

राज्वाडयातील देवकृत्य :-

सावंतवाडीकरांचा देवावर विश्वास असल्यामुळे ते परमेश्वरास भजत असत. आपल्या राजवाडयात ते स्वतंत्रपणे काही देवकृत्यही करीत असत. देवांचे उत्सवही साजरे करीत असत.

उदा. चैत्र शु. १ या दिवशी राजवाडयात श्रीराम जयंतीचा उत्सव सुरू होऊन पौर्णिमेपर्यन्त चालत होता व त्यादिवशी मारूती जन्म होऊन उत्सव पुरा होत असे.

वैशाख - या महिन्यात अक्षयतृतीयेच्या दिवशी उदकुंभ व हिरण्यश्राध्द.

आषाढ- आषाढी एकादशीस विठोबाला स्वारी (दिंडी) जात असे व राजवाडयात रात्री कीर्तन होत होते.

श्रावण - गोकुळाष्टमी हा सण साजरा करून कृष्णभक्ती, व पोवत्याची पौर्णिमा.

भाद्रपद - या महिन्यात हरतालीका, गणेशचतुर्थी व पंचमी, गणपती विसर्जन.

आश्वीन - या महिन्यात महोत्सव करून त्यास सुवासिणीची पुजा, नंतर नाच व कीर्तन, नवमीला देवाला नारळ व रूपये ठेवीत.

भवानीस माळ, शस्त्रपूजन नंतर डांडेकर रेडा धरीत व सावंतवाडीकर कापीत, त्याचे डोके भवानीच्या समोर ठेवीत. त्याचे मांस शिजवून राजवाडयात रहाणाऱ्यांना सर्वांना वाटीत असत.

दस-याच्या दिवशी अभोटयाची पूजा केली जात असे. अभोटा झाडाचे प्रथम सावंतभोसले पान तोडीत असे व नंतर सर्वजण अभोटयाच्या झाडाला लुटून नंतर सावंतभोसले सरकार राजवाडयात परत येई. व राजवाडयातील देवास सोने घाली व नंतर सर्व लोक राजाला सोने देत असत. जकातदार व मक्तेदार राजाला नजराणा देत असत.

कार्तिक :- कार्तिकी एकादशीस राजा विठ्ठलमंदीरात जाई व त्या दिवशी किर्तनही होत असे, दुसरे दिवशी तुळशीचे लग्न होई. नंतर प्रसाद वाटणे, व शेवटी कलावंतांचा नाच होत असे.

मार्गशीर्ष :- फातरीचे देवपणास सुरवात, राज्याच्या देवास भक्ताकडून नारळ वाहिले जात होते.

पौष :- तीळदान केले जात होते.

माघ :- महाशिवरात्रीच्या दिवशी महादेवाची पूजा केली जाई.

फाल्गुन :- शु.१२ रोजी राजाच्या देवाला हक्द वाहत असे. होळी पेटवून तिची पूजा केली जात असे. नंतर रंगपंचमीपर्यन्त राजवाडयात नाच चालत असे. म्हणजे राजवाडयात शिमग्याचा सण साजरा केला हा जात होता.

सावंतवाडीतील देवस्थाने :-

या प्रदेशातील गावांत हिंदुचीच लोकसंख्या जास्त असल्यामुळे प्रत्येक खेडयात लहानमोठी देवस्थाने आहेत. प्रत्येक देवस्थानकडे वर्षातून एकदा तरी यात्रा भरत असे. उदा. आकेरी येथील देवस्थानाची यात्रा, नेरूर येथील महाशिवरात्रीच्या दिवसात होणारा रथोत्सव, पौर्णिमेस तळवणे येथील भंडारा ही यात्रा प्रसिध्द आहे, कुडाळ येथील किल्ल्यातील खाजणादेवीचीही यात्रा भरते. वालावली येथे लक्ष्मीनारायणाचे देवालय आहे. या देवालयाची बांधणी शास्त्रोक्त व टुमदार आहे, देवालयाशेजारी पाण्याचा तलावही आहे. माऊली व नारोबाचे देवालय हे अनुक्रमे

पठारावर व दरीत आहे. पाट, परूळे धामापूर, नेरूर येथे अनुक्रमे गणपती, देवी (भगवती) व शिव यांची मंदीरे आहेत. सातर्डे येथे सकलेश्वराचे देवालय आहे. आकेरीत रामेश्वराचे मंदीर आहे.

वाडीत अनेक देवस्थाने व देवता होत्या उदा.जैनांची महालक्ष्मी, महाराजांची देवता, पिशाच्च देवता, सर्पदेवता, रावळनाथ देवता, माऊली देवता, परशुरामाची देवता, लक्ष्मी नारायण देवता अशा अनेक देवता त्याकाळी सावंतवाडीराज्यात होत्या. त्यांची पूजाही लोक करीत असत या व्यतिरिक्तही अनेक देवता अस्तित्वात होत्या[९].

ज्याप्रमाणे राजा राजवाडयात प्रत्येक देवाचे देवकृत्य करीत असे त्याप्रमाणेच राज्यातील लोकही धार्मिक देवकृत्य करण्यात विसरत नसे. होडावडे येथील गावकऱ्यांनी श्रीदेव क्षत्रपाल व श्रीदेव पूर्वजांचा राजाचा वंश आणि पूर्वज दळवी यांना नारळ वाहिले. नारळ वाहण्याची पध्दत नियमित चालू होती. देवाला नारळ वाहून सर्व तक्रारी देवासमोर मांडीत असत. ह्या सर्व गोष्टी करतांना मोठा समारंभही ते घडवून आणीत. समारंभपूर्वकच नारळ वहाणे तक्रारी देवापुढे मांडणे ह्या गोष्टी तेथील लोक करीत असत.

म्हणजे राजा व जनता यांना जर काही अडचणी निर्माण झाल्या तर ते आपल्या देवतेसमोर व्यतीत करून आपले समाधान करवून घेत असत. वेताळ नावांच्या दैवताची देखील भक्ती करून त्याची मर्जी संपादन करावी म्हणजे आपल्या पुढील सर्व संकटांचे निवारण होईल व आपल्याला त्रास होणार नाही अशी लोकांची समजूत होती. वेताळ हे देवस्थान अतिशय जागृत देवस्थान मानले जात होते.

थोडक्यात म्हणजे वाडीच्या राज्यातील लोक व राजा देवदेवतांवर श्रध्दा ठेवणारे होते[१०].

देवळांची आर्थिक व्यवस्था :-

सावंतवाडीकर राज्यातील तीर्थस्थानांना, देवस्थानांना इनाम जमीनी देत असत. इनामाची सनद होऊन त्या इनामी जमीनीत देवस्थानच्या पूजाऱ्याने पिके काढून देवालयाचा सर्व खर्च भागविण्याची पध्दत होती. सावंतांनी अशा अनेक देवस्थानांना इनामी जमीनींच्या सनदा दिल्या होत्या आणि राज्यातील हिंदुच्या धार्मीक व सांस्कृतीक कार्याची परंपरा त्यांनी पुढे चालु ठेवल्याचेही आढळून येते.

१) बाणलींगाची इ.स.१८२७ मध्ये मौजे मार्तोंड येथे स्थापना करून या देवस्थानास सनद दिली होती. ही स्थापना राम बापे याच्या घरी करण्यात आली होती. पूजा करण्यासाठी बाबु रघूनाथ भट वाटवे यास दरसाल ८ होन मंजूर केले.

२) शंकर नारायण, मौजे कसबे यास देखील इनामाची सनद दिली.

३) हटभट ज्योतीसीसही इनाम सनद दिली.

४) वालावल येथील देवाची चाकरी करण्यासाठी रामचंद्र भट उपाध्ये यास गोंदे इनामाची सनद दिली. त्यानुसार उपाध्ये यास देवाचा अभिषेक व पूजा करावी लागे[११].

सावंतवाडीकर फक्त हिंदुच्याच देवस्थानांना इनामी सनद देत नसत तर मुस्लीमांच्या देवस्थानांना इनामी सनद देखील देण्याची प्रथा होती. उदा. पिराची चाकरी करणेबद्दल वाडीकरांनी इनामी सनद दिली होती. अशारितीने सावंतवाडीकर जरी हिंदु असले तरी सर्वधर्मसमभाव या तत्वाने ते वागत असत. म्हणजे त्यांचे राज्य हे धर्मनिरपेक्ष राज्य होते असे म्हणणे तरी चालेल.

कुठल्याही बाबतीत फायदा झाला तर त्या फायद्यातून देवस्थानाला देणग्या देण्याची पध्दतही सावंतवाडी संस्थानात प्रचलीत होती.

उदा. १७९३-९४ मध्ये नारायण नाईक याने चाचेगीरी करुन परदेशी गलबत लुटले. त्यास आर्थिक फायदा झाल्यामुळे त्याने खेमसावंताच्या आज्ञेनुसार खालील देवस्थानांना देणग्या दिल्या होत्या.

१) नारायण वालावल - २ रु.
२) वेताळ देवस्थान परडळे - २ रु.
३) देव मांगला मठ - २ रु.
४) देव पूर्वीचा वंश होडावडे - २ रु.
५) देवरामेश्वर आकेरी - २ रु.

असे प्रत्येक लुटलेल्या मालाबद्दल दान करीत असत कारण लुटारूपणा म्हणजे पाप समजले जाई, ते पाप धुवून काढण्यासाठी देणग्या दिल्या जात असत. इतरही लोक देणग्या देत असत[१२].

"फातरीचे देवपण":-

फातरीचे देवपण हा दैवतांचा वार्षिक समारंभ पहिल्या खेमसावंताने सुरू केला होता. तेव्हापासून सुमारे साडेपाचशे वर्षे हा समारंभ चालू राहिला परंतु इंग्रजांनी नंतर आपल्या राजवटीत हा समारंभ बंद केला.

कार्तिक पौर्णिमा होताच भगताने ओटवणेस जाऊन फातरीचे देवपण करण्यासाठी परवानगी घेतली पाहिजे, नंतर इतर देवास जाऊन प्रसादाची परवानगी घेतली पाहिजे. त्यानंतर सरकार, दळवी, हांडेकर, सबनीस, चिटणीस, यांनी येऊन सालाबादप्रमाणे नारळ वगैरे वाहून देवाला आपल्या अडचणी सांगणे, नंतर देवाला ३६० रु. ठेवावे लागत, नंतर पारधी वाद्ये वाजवीत असे, देवाला बकरा कापला जाई, नंतर देवाची मूर्ती नेवून सिंहासनावर बसविली जाई, नंतर मोठ-मोठ्या मंडळीने जेवण करुन उरलेला स्वयंपाक सर्वांना घालावा अशी पध्दत होती. हा समारंभ होत असतानाच देवपूजेसाठी नागीलीची पाने एकूण ३६० सुमारी ३६०

इतकी लागत असे. त्यानंतर नारळ फोडून त्याचबरोबर गणपतीची पूजाही करावी लागत असे, नंतर राजेसाहेब सरकार यांनी आपल्या अडचणी पुन्हा देवाला सांगाव्या व ३६० नारळे राजेसाहेब सबनीस, हांडेकरी चिटणीस, मानकरी यांनी मानाप्रमाणे देवास फोडावे, यानंतर महाराला काही तरी बक्षीस देऊन मार्गावरील सर्व देवांचे दर्शन घेत असत. वरीलप्रमाणे अनेक धार्मिक कृत्ये करीत करीत शेवटी पुन्हा एकदा ३६० रू. देवाला ठेऊन फातरीचे देवपण संपविले जात होते. शेवटी ब्राम्हणांना धर्मदाय दानही केले जात होते. त्याचप्रमाणे त्यांना नारळेही दिले जात असत.

सावंतवाडी संस्थानचे राजे बदलले, सीमाही बदलल्या, तरीही राज्यात पूर्वीपासून चालत आलेले फातरीचे देवपण ही देवस्की चालूच ठेवण्यात आली होती. इंग्रजांनी "फातरीचे देवपण" ही देवस्की बंद केल्यानंतर वाडी संस्थानातील लोक नंतर पूर्णपणे विसरले[१३].

संस्थानातील ब्राह्मणांचे कलह :-

राज्यातील कुडाळ, डिचोली व पंचमहाल, आजगांव, तलवडे या सर्व ठिकाणाचे गावडपाधीपण धर्माधिकार, तीर्थाधीकार, तीर्थावरील सर्व उपाधीपण, गावांतील श्रीदेवांच्या स्थापना, अवस्थ उद्यापने हे सर्व प्रकारचे धार्मिक अधिकार ब्राह्मण जोशांकडे पुरातन काळापासून चालत आलेले होते. याबद्दल पूर्वीच्या सरदेसायांनी त्यांना सनदाही दिल्या होत्या. ब्राम्हण जोशीचे पुढीलकाळात कराडे ब्राम्हणांबरोबर संघर्ष होऊ लागले. कराडे ब्राम्हण त्यांच्यावर हल्ले करू लागल्यामुळे जोशांनी सरदेसायांकडे त्यांच्याविरूध्द फिर्याद दिली. सरदेसायांनी पुन्हा जोशांनाच सनदा दिल्या.

सनदा दिल्या व कराडे यांच्या गुप्तपणे दिलेल्या सनदा नंतर लगेच काढून घेतल्या.

२० मार्च, १८०२ रोजी खेमसावंत भोसले यांनी ब्राम्हणांच्या झालेल्या तंटयाची चौकशी करण्यासाठी मशारनिल्हे जोतीशीची नेमणूक केली. त्याने चौकशी करून पुराव्यानिशी सिध्द करून दिले की जोशांचाच हक्क हा वाजवी हक्क ठरतो. याउलट कराडे यांच्याकडे कुठल्याही प्रकारे पूर्वीपासूनच चालत आलेल्या अधिकारांचा पुरावा उपलब्ध नव्हता, त्यामुळे सरकारने सर्वप्रकारचे हक्क कराडे ब्राम्हणांकडून काढून घेऊन जोशांना दिले. सरकारने फक्त जोशांचे पूर्वीचेच हक्क दिले नाही तर, राज्याच्या प्रत्येक तर्फेमधील हक्क देखील जोशांनाच द्यावेत, असा आदेश अधिका-यांना देण्यात आला होता. इतकेच नव्हे तर काही कुळासही ताकीद दिली होती, जर काही धार्मिक कार्य करावयाचे असल्यास ते फक्त जोशी ब्राम्हणांकडूनच करून घ्यावे, जर समजा कोणी आदेश न पाळता इतर ब्राम्हणांकडून धार्मिक कार्य करून घेतले आणि ती वार्ता जर सरकारला कळली तर, लगेच अशा आसामीला शिक्षा दिली जाई. म्हणजे सरकारने कराडे ब्राम्हण व जोशी ब्राम्हण यांच्यातील तंटयाच्या न्यायनिवाडा करून जोशांच्या बाजूने निर्णय दिला होता[१४]. म्हणजे तत्कालीन ब्राम्हण हक्कांसाठी एकमेकांशी भांडत असत हे दिसून येते. परंतु सरकारही त्यांच्यातील तंटे स्वत: मिटवून त्यांना योग्य तो निर्णय देत असे.

वरीलप्रमाणेच चितपावन ब्राह्मण व कराडे ब्राह्मण यांच्यातही कलह होऊन खेमसावंताकडे या कलहासंबंधी फिर्याद गेली. परंतु दोन तीन महिने ब्राम्हण सावंतवाडीत बसले तरीसुध्दा त्यांना निर्णय मिळाला नाही. कराडे ब्राह्मणांनी चितपावनांना पंगतीतून उठवून त्यांचा अपमान केला. तेव्हा कराडे ब्राम्हणांशी अन्नव्यवहार करू नये असा चितपावनांनी निर्णय घेतला. राजाने चितपावनांना तीन दिवसात निघून जाण्यास फर्माविले. जर गेले नाही तर राजदंड व ब्रम्हदंड घेतला जाईल असेही त्यांना सांगण्यात आले. शेवटी राजाने तंटा वरीलपध्दतीने मिटवला. राज्यात नेहमीच ब्राम्हणांचे कलह चालू असत, त्यांच्या कलहाला खाविंदही कंटाळले होते. त्यामुळे दोन्ही पक्षातील एका पक्षाच्या ब्राम्हणांना म्हणजे चितपावन ब्राम्हणांना सावंतांनी जबरदस्तीने, शिक्षेचा धाक दाखवून वाडी सोडण्यास भाग पाडले. त्यांच्या आदेशानुसार चितपावन निघून गेले व त्यांच्या कलहावर पडदा पडला[१५].

राज्यात ब्राम्हणांचे कलह नेहमी होण्याचे कारण म्हणजे त्यांच्यात दोन विभाग होते (१) द्रविड (२) गौड, द्रविड ब्राह्मणांतही चार उपविभाग होते.

१) देशस्थ
२) कराडे
३) चित्पावन
४) देवरूखे

देशस्थ ब्राम्हणांची संख्या बोटावर मोजण्याइतकी होती. कराडे ब्राम्हण मात्र राज्यात सर्वत्र पसरलेले होते. चित्पावन ब्राम्हण तसे कराडे ब्राम्हणांच्या संख्येच्या तुलनेने कमीच होते. देवरूखे ब्राम्हण तर फक्त कुडाळ प्रांतातच होते. वरिल चार उपविभागातील ब्राम्हण एकत्र खात-पित असत परंतु विवाहाची प्रथा एकमेकांमध्ये चालत नसे. गौड ब्राम्हण हे दुस-या प्रदेशातून आलेले होते. त्यांचेही चार विभाग होते.

१) बारदेशकर

२) कुडाळदेशकर

३) सेवनीस

४) पेडणेकर

या ब्राह्मणांमधील बहुतेक सरकारी नोकर होते, जमीनदारही होते. ते व्यापारही करीत असत[१६].

लोकस्थिती :-

वाडीच्या राज्यातील सांपत्तीक स्थितीचा विचार केल्यास राज्यात तशी संपत्ती अतिशय कमी होती. फक्त व्यापारी, सोनार यांच्याकडेच संपत्तीचे केंद्रीकरण झालेले होते. इतर समाजातील लोक मात्र शेतीवर अवलंबून होते. शेतकऱ्यात तीन वर्ग होते. (१) मराठा (२) भंडारी (३) देवळीस. मराठ्यापैकी काही सैन्यभरती होत असत. शेतकरी भात व नाचणीच्या भाकरी वरई खात असत.

कारागीरांचाही वर्ग अस्तित्वात होता-कुंभार, सोनार, शिंपी, चितारी (Painter), सुतार, तेली, विणकरी इ. कारागीर आपल्या कलेच्या जोरावर आपला उदारनिर्वाह करीत असत. म्हणजे समाजात बाराबलुतेदारांचा वर्ग होता. कारागीरांच्या जाती त्यांच्या धंद्यानुसार ठरविल्या गेल्या होत्या. म्हणूनच समाजात वर्णपध्दती अस्तित्वात होती. धंद्याच्या वाटणीमुळे संपत्तीची विभागणी होऊन विशिष्ट धंद्याना मक्ता मिळाल्यासारखे झाले. धंद्यात स्पर्धा निर्माण होण्याचा प्रश्नही निर्माण होत नव्हता. त्यामुळे कलेचा हवा इतका विकास झाला नाही.

खेड्यातील कारभार पहाणारी व्यक्ति म्हणजे पाटील होय. पाटील बहुधा मराठाच असे. खेडेगांवात पाटील हा पहिला मानकरी

समजला जाई. गांवातील सर्व गोष्टीत तो मध्यस्थी करीत असे. चावडी हे गांवातील प्रमुख ठिकाण होते. ब्राह्मण पंचांग व धार्मिक विधी सांगत असत. इतर बलुतेदार स्वत:चा व्यवसाय करून खेड्याच्या गरजा भागवित असत[१७].

खेड्यात जमीनदार, सरकारी नोकर, वाणी पैशांची बचत करीत असत परंतु त्यांना व्यापार करणे पसंत नव्हते. आपापल्या गांवातील लोकांना व्याजाने पैसे देण्यांतच त्यांना फायदा मिळत होता. त्यामुळे ते खेड्यात सावकारी व्यवसाय करीत असत. म्हणूनच व्याजाने पैसे देणा-यास सावकार असे म्हटले जात होते. व्याजाने दिलेला पैसा परत आला नाही तर, त्याचे घर किंवा बैलगाडी वगैरे गहाण म्हणून घेत असत. किंवा त्यांचे शेतही विकले जात होते. जर सावकाराचे एखाद्याने पैसे परत केले नाही तर, त्याला कैदेची शिक्षा मात्र होत नसे. गांवचा पाटील गांवात लहान शेतक-यांना कर्ज देई व स्वत:कडे कर्जदाराचे घर किंवा शेत गहाण घेत असे. उदा. पेरणीच्या वेळी बि-बियाणे पाटील देत असे, कर्ज धान्याचे रुपानेही किंवा पैशाच्या रुपाने परत केले जाई[१८].

राज्यातील प्रमुख वर्ग :-

राज्यातील प्रमुख वर्ग म्हणजे शेतकरी, हा सामान्य जनात संबोधिला जाई. शेतीच्या मशागतीसाठी जुनीच ~~जनावरे~~ अवजारे वापरली जात असत. काही शेतकरी कसीत असलेल्या जमीनीत जर उत्पादन प्रमाणात निघाले नाही किंवा त्यात जर नेहमीच शेतक-याला ~~नुकसान~~ नुकसान सहन करण्याची वेळ आली तर सावंतवाडीकर लगेच अशी जमीन स्वत:कडे घेऊन ती शेती नावारुपास किंवा नफ्यात आणण्याचा प्रयत्न करीत असत. राज्याचे उत्पन्न वाढावे यासाठी वाडीकरांचा हा प्रयत्न होता. राज्यात दुष्काळ पडला तर जनतेसाठी वाडीकर अन्नधान्य आयात करीत असत. एवढेच नव्हे तर इनामी दिलेल्या जमीनीचा वसूलही त्यावर्षी पूरता घेत नसे. थोडक्यात म्हणजे रयतेवर अन्याय होणार नाही याची वाडीकर नेहमीच दखल घेत असत.

एवढेच नव्हे तर वसुलीसाठी जनतेवर अन्याय होणार नाही याचीही ते काळजी घेत असत. सावंतवाडीकर विरोधक असेल तर त्याला आपलेसे करून घेण्यासाठी आपल्या मालकीची जमीन मक्त्याने देत असत. म्हणूनच समाजात कोणत्याही प्रकारे विषमता, विरोध, तंटे निर्माण होऊ नये यासाठी सावंत प्रयत्नशिल होते[१९]. या संस्थानात लोकांना गाण्यांची देखील अतिशय आवड होती. तबला, सारंगी वाजविण्यात वाडीतील लोक पारंगत होते. कलावंतही होते. मुली नाचकाम करीत असत व गाणेही म्हणत असत. वाजंत्रीही होते. वाजंत्री हे खालच्या जातीतील असत. सावंतवाडी शहरातच फक्त वाजंत्र्यांची पाच घरे होती.

राज्यात धनगर समाज देखील होता. या समाजातील लोक गुरे, शेळ्या बरोबर घेऊन वेगवेगळ्या ठिकाणी स्वत:चे व गुरे शेळ्यांचे पोट भरण्यासाठी नेहमी स्थलांतर करीत असत. न्हावी, परीट हे लोक ही होते. गवळी लोकही कोल्हापूरहून सावंतवाडीत आले होते.

मजुरांना वाडीत २ ते ३ शेर तांदूळाची मजूरी मिळत असे. दुष्काळात सावंतवाडी सरकार नवे रस्ते, इमारती यांचे कामे सुरू करून मजूरांना कामे उपलब्ध करून देत असे. अकुशल कामगारांना २-$\frac{१}{२}$ ते ३ आणे रोज मजुरीचा दर होता. स्त्रियांना१ ते १-$\frac{१}{२}$ आणा मजूरी होती. शेतावर कामास जाणाऱ्या स्त्रि, पुरूषास मात्र अनुक्रमे ३ शेर व ४ शेर साल काढलेला तांदूळ मजूरी म्हणून दिला जात होता. मुलांना २ शेर तांदूळ मिळत असे. म्हणजे वाडीच्या राज्यात लहान मुलांना देखील काम मिळत होते. परंतु त्यांच्या वयाचा मात्र विचार होत नव्हता असे दिसते[२०].

मजुरांचे वरिल विवेचन तात्पुरत्या मजूरांसंबंधी केलेले आहे. परंतु श्रीमंत शेतकरी किंवा व्यापारी आपल्याकडे मजूर कामाला ठेवीत असत. त्यांना त्यांच्या रोजगाराचे पैसे अगोदर दिले जाई. जेवण कपडे याशिवाय त्यांना ९ ते १२ रूपये दिले जात असत. मजूर व शेतकरी किंवा व्यापारी

यांच्यात एक वर्षाचा करार असे. परंतु असे वर्षानुवर्षे करार होत आले असून एकाच मालकाकडे वंशपरंपरेने मजूर काम करीत असत. यावरून असे दिसते की वाडीच्या राज्यात वेठबिगारीची पध्दती आस्तित्वात होती. ही वेठबिगारी परंपरेने चालत आली असली पाहिजे.

गावांतील तंटे मिटविण्यासाठी वाडीसरकार गांव कामगारांना तशा अधिकाराचा हुकूम देत असे. उदा. १८२० मध्ये मेरेल गोविंद गणी चोधरी हा तंटे करीत होता तर त्याचा झगडा मिटविण्यासाठी गावकामगार नेमले होते[२१].

सावंतवाडी राज्यातील सामाजीक परिस्थितीचा विचार करता १८ व्या शतकाच्या अखेरीपर्यन्त सामाजीक दृष्टया धार्मीक परंपरेचा फार मोठा पगडा असल्याचे आढळून येते. परंपरेचा पगडा व अंधश्रध्दा यामुळे लोकांच्या मनात नवीन विचारही येत नसत. धर्म, रूढी, परंपरा यांच्या पगडयामुळेच सावंतवाडीकर आपल्या राज्यातील सामाजिक विषमता दूर करू शकले नाही. कारण देवस्थानचा समारंभ असेल तर तो राजेसाहेबांच्या हातून होई. या समारंभात (यात्रा) च बरेच दिवस राजाला घालवावे लागत. त्यामुळे त्यांचे राज्यकारभाराकडे दुर्लक्ष होई. पर्यायाने जनकल्याण देखील दुर्लक्षीले जाई, आणि धर्माच्या नावाखाली भरपूर पैसाही खर्च होत असे. राजाची स-ता अनियंत्रीत असल्यामुळे राजाने घेतलेला निर्णयच अंतिम असे. त्याकाळी संस्थानात शिक्षणाचाही अभाव होता, पुढील काळात इंग्रजांनी शाळा मोठ्या प्रमाणावर सुरू केल्यामुळे सावंतवाडी राज्यातील लोकांना शिक्षण ख-या अर्थाने मिळू लागले. नाहीतर धार्मीक कृत्ये, विधी करणारे ब्राम्हणच, व राजवंशातील लोकच शिकलेले असत.[२२].

१ वर्दे. सासइंसा, लेख १८, पृ. १६.

२ शिवसा, खं. १३, त्रैमासीक, लेख २, पृ. ८, १९६४-६५

३ Courtsey and Auld MOSS p.189.

४ शिचसा, भाइसंमं, त्रै, खं. १३, लेख ३७, पृ. ४४.

५ वर्दे, सासंइसा, भाइसंम, ग्रथमाला, लेख १२, पृ. १५.

६ वर्दे, सासंइसा, लेख, २०, पृ. १८.

७ कि-ता, लेख-२५, पृ. २१.

८. वर्दे, सासइसा, लेख १७, पृ. ८९-९१.

९ वालावलकर, मठगांवचा शिलालेख, लेख-२१, पृ. ३४.

१० वर्दे, सासंइसा, लेख ६४, ६७, ६८, पृ. ४८-५१.

११ पिंगुळकर, सासंइ, परिशिष्ठ १ ले, लेख ४१, ४२, पृ. ३२.

१२. वर्दे, सासइसा, लेख ६९, ७२, पृ. ५२-५४.

१३ वर्दे, सासंइसा, लेख ९८, पृ. ९२-९५.

१४ वर्दे, सासंइसा, लेख ७७ पृ. ५९.

१५ खरे, ऐलेसं, भाग ११, पृ. २-३ (१९२२)

१६ कि-ता.

१७ Ratnagiri and Sawantwadi Gazetter, p.428, 1880.

१८ Ratnagiri and Sawantwadi Gazetter, p.429.

१९ वर्दे, सासंइसा, लेख २, १७, पृ. ३, १५.

२० Ratnagiri and Sawantwadi Gazetter p.415.

२१ पिंगुळकर, सासंइ, लेख ११२, परिशिष्ठ १ ले, पृ. ८७.

२२ वालावलकर, मठगांवचा शिलालेख व ~~कुडाळ प्रांताचा इतिहास~~, पृ. ७९.

प्रकरण ११ वे

सावंतवाडी राज्यातील व्यापार व उद्योगधंदे

सावंतवाडी राज्यात सुरवातीला वहातूक करण्यासाठी योग्य असे रस्ते नव्हते. त्यामुळे बैलांच्या पाठीवर पायवाटेने वस्तूंची ने-आण केली जात असे. बैलांच्या पाठीवर गोण्यांतून वस्तू ठेवून एका ठिकाणाहून दुसरीकडे नेल्या जात असे. समुद्रावरील व्यापारात जहाजांचा वापर होत असे. प्रारंभी वाडीतील व्यापार विकसित नव्हता परंतु हळू हळू व्यापारात वाढ होत गेली. आयात व निर्यातीचा व्यापारही वरील साधनांनीच चालत असे.

सावंतवाडीतून निर्यात होणा-या वस्तू :-

सावंतवाडी राज्यातून परदेशी निर्यात होणा-या वस्तू म्हणजे नारळ, कॉफी, अंबाडी, सुपारी, हिरडा, बेहडा, आवळकाठी, नारळाचा काथ्या, काजू, काळी मिरी, कोकाम, इ. होत्या. या वस्तूंची निर्यात दक्षिणेकडील देशात केली जात होती.

सावंतवाडीत आयात होणा-या वस्तू :-

सावंतवाडीकर धातू, साखर, मसालेचे पदार्थ, मिठातील मासे, किना-याकडून खोबरेचे तेल, गहू, ज्वारी, नाचणी, तूर, मूग, उडीद, कांदे, तंबाखू, अफू, कापूस, या सर्व वस्तू दख्खनमधून आयात करीत असत. तर सर्व प्रकारचे कपडेही दखनमधूनच आयात केले जात असे. जीन, तपकीर, काकवी, फळे, कागद, कोंबड्या (Poultry) आणि मेणब-त्या गोव्याहून पोर्तुगिजांकडून आयात केल्या जात असत. लाख, रंग या गोष्टी मुंबईहून आयात कराव्या लागत.

खेमसावंत याने १६९१ मध्ये सावंतवाडी येथे मोठी बाजारपेठ सुरू केली. आणि त्यानुसार त्यांनी देशी व परदेशी व्यापा-यांना सावंतवाडीत व्यापारासाठी बोलावले. परदेशी व्यापा-यांमध्ये बहुतांशी इराणी मुस्लीम व्यापा-यांचाच समावेश असे. म्हणजे ज्या प्रदेशावर व्यापा-यांचे वर्चस्व आहे असा मोठा प्रदेश; वरघाट व तळघाट येथील व्यापा-यांनाही वाडीत बोलाविण्यात आले. या सर्व व्यापा-यांनाही आज्ञा केली की, तुम्ही हणमंत व पारपोली घाटातून जो माल आणाल तो सरळ सावंतवाडीच्या बाजारपेठेत घेऊन येत जाणे व नंतर येथून पुढील प्रदेशात तो माल पाठवावा. या मालावर तुम्ही राज्यास जकात द्यावी[१].

या वाडीकरांच्या सूचना व्यापा-यांनी तात्काळ मान्य केल्या आणि त्यानुसार या व्यापा-यांनी आपला माल सावंतवाडी बाजारपेठेत व तेथून इतर ठिकाणी नेण्यास प्रारंभ केला, व त्या मालावर वाडीकरांना जकातही देऊ लागले. परिणामी वाडीकरांचे उत्पन्नही एकदम वाढले. एवढेच नव्हे तर इतर ठिकाणचे व्यापारी वाडीच्या बाजारपेठेत येऊ लागल्यामुळे ते वाडीचा स्थानिक मालही खरेदी करून परदेशी विकण्यासाठी पाठवू लागले. म्हणजे वाडीतील व्यापा-यांना देखील व्यापार कसा करावा याचे अप्रत्यक्ष शिक्षण मिळाले. सावंतवाडी राज्यात परदेशातून येणा-या मालावर खालीलप्रमाणे जकात आकारली जाई.

<u>जकातीचे दर :-</u>

नग		दर
१) कापड, तंबाखू,	एका नगास	२ आणे
२) खोबरे, सुपारी, यांच्या दर गोणीस		४ आणे
३) धूस दर गोणीस		४ आणे
४) मीठ वाडीहून भरलेले दर गोणीस		४ आणे[२]

वरीलप्रमाणे व्यापारी सावंतवाडी सरकारला जकात देत असत ही जकात देऊनही सदरच्या व्यापाऱ्यांनी सावंतवाडी बाजारपेठेचा उत्कर्ष करण्याचेही राजाला आश्वासन दिले होते. त्यापैकी काही व्यापाऱ्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

१) सागापा वाडेकर

२) लिगाणा दैलवी

३) इनापा देसुरी

४) खानापूरकार

५) पावडीशेर इलदी

६) दानप्पा उतूरकर

७) नागप्पा उतूरकर

८) हुकेरीकार

९) जामणा

१०) सिवाणा[3]

परदेशी व्यापाऱ्यांनी वाडीकरांच्या अटी मान्य करुन वाडी बाजारपेठेची भरभराट केली. या व्यापारी करारात व्यापाऱ्यांचाही भरमसाठ फायदा होता. त्यामुळेच त्यांना वाडीकरांच्या अटी मान्य झाल्या होत्या. सावंतवाडीकरांनी आपल्या राज्यातील व्यापार वाढावा, विकसित व्हावा आणि त्याकरवी राज्याची भरभराट व्हावी यादृष्टीनेच परदेशी व्यापाऱ्यांना वाडीत व्यापार करण्यास प्रोत्साहन दिले होते.

अशा प्रकारे देशी आणि, परदेशी व्यापाऱ्यांमध्ये व्यापार वाढला व सावंतवाडी हे राज्यातील मोठे व्यापारी केंद्र बनले. देशी माल बाहेर जाऊ लागला व बाहेरील माल राज्यात येऊ लागला त्यामुळे सरकारला

करल्याने भरमसाठ पैसाही मिळू लागला. या पैशांचा उपयोग राज्यात जनतेच्या कल्याणाच्या कामांसाठी होऊ लागला. वाडीराज्यातून मीठाची निर्यात होऊ लागली. त्यामुळे मीठाचे उत्पादन खूपच वाढले व मजूरांनाही काम मिळाले. मीठाप्रमाणेच खोबरे, सुपारी इ. वस्तूंचीही निर्यात होऊ लागली. परिणामी वाडीच्या व्यापारात वृध्दी झाली.

व्यापाऱ्यांना वाडीसरकारचे संरक्षण :-

देशी व परदेशी व्यापाऱ्यांनी वाडीच्या बाजारपेठेची वृध्दी केल्यामुळे व्यापाऱ्यांना वाडी सरकारने कायदेशीर संरक्षण दिले होते[४]. मालाची ने-आण करतांना व्यापाऱ्यांना जर रस्त्यात लुटण्याचा प्रयत्न झाल्यास किंवा धामधूम होऊ नये म्हणून सरकारने तशी व्यवस्थाही वरघाट व तळघाट येथे केली होती. सरकारने संरक्षण देण्याच्या अगोदर व्यापाऱ्यांचा रस्ता बंद झाला होता, तेव्हा वाडीसरकारने व्यापाऱ्यांना संरक्षण देऊन रस्ता सुरू केला.

जकात वसुलीसाठी मुतालिकची नेमणूक :-

सावंतवाडीकरांनी परदेशी व देशी व्यापाऱ्यांच्या व्यापारास पूर्ण संरक्षण दिल्यामुळे वाडीतील व्यापार सुरळीत चालत होता. व्यापाऱ्यांकडून मिळणारी जकात वसूल करून ती सरकारकडे जमा करण्यासाठी वाडीकरांनी मुतालिकच्या नेमणूका केल्या[५]. मुतालिक नेमल्यामुळे जकात वसूली नियमित व काटेकोरपणे होऊ लागली आणि वाडीसरकारच्या उत्पन्नात वाढ झाली. यापूर्वी जकात वसूली नियमित व व्यवस्थित होत नव्हती. परंतु व्यापाऱ्यांनीच अशा प्रकारे मुतालिकची नेमणूक करण्याची सावंतवाडीकरांना सूचना केली होती. म्हणजे व्यापाऱ्यांना तर सावंतवाडीतील व्यापारात फायदा हवाच होता परंतु सावंतवाडीसरकारचा देखील व्यापाऱ्यांनी वसुलीसाठी नोकर नेमण्याच्या सूचना करून फायदा मिळवून दिला. सावंतवाडीतील व्यापार सुरू

झाल्यापासून पुढील काळात वाडीकरांनी सर्व परदेशी व अंतर्गत व्यापा-यांशी संबंध चांगले ठेवले होते. व्यापा-यांना कोणत्याही प्रकारे त्रास न देण्याचे धोरण वाडीकरांनी स्वीकारले होते.

